सत्यमेव जयते

# ॥ लोकसेवेचा लोकजागर ॥







संकलन आणि संपादन
वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई / नागपूर

# ॥ लोकसेवेचा लोकजागर ॥



**प्रा.राम शिंदे**
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

" भारतीय राज्यघटनेचा आपण स्वीकार केल्याच्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित होत असलेला, 'लोकसेवेचा लोकजागर' हा मान्यवरांच्या भाषणांचे संकलन असलेला ग्रंथ म्हणजे, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्यांसाठी अमूल्य प्रेरक ठेवा आहे. ग्रंथाच्या प्रारंभीच असलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारप्रवर्तक भाषण सर्वांना अंतर्मुख करणारे आहे... नेतृत्त्वविकास, अर्थसंकल्प प्रक्रिया, महाराष्ट्र विधिमंडळाची गौरवशाली परंपरा, महत्वपूर्ण ठराव आणि त्यावरील विचारमंथन अशा अनेक बाबींचा हा लोकजागर निश्चितच लोकपसंतीस उतरणारा आहे... "



**ॲड.राहुल नार्वेकर**
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा

" वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित होत असलेल्या 'लोकसेवेचा लोकजागर' या संदर्भग्रंथामध्ये उत्तमोत्तम भाषणांचा समावेश करण्यात आला आहे. हा ग्रंथ लोकप्रतिनिधी, अभ्यासक-संशोधक, अधिकारी आणि सर्व नागरिकांना निश्चितपणे उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. या ग्रंथाद्वारे सभागृहातील कार्यपद्धती, समृध्द संसदीय वारसा, वाद-प्रतिवाद, विचारमंथन आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी याबाबतचे आकलन आणि जाणीव आणखी समृध्द होईल. भारतीय प्रजासत्ताक अमृतमहोत्सवी वर्ष पूर्ण करीत असतांना संसदीय लोकशाहीचे महत्व अधोरेखीत करणारे हे प्रकाशन औचित्यपूर्ण ठरणारे आहे... "



**डॉ.नीलम गोऱ्हे**
उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

" महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे विधिमंडळाच्या सन्माननीय सदस्यांसाठी तसेच समाजातील सर्व घटकांसाठी संसदीय अभ्यासवर्गांचे आयोजन आणि संदर्भसमृध्द ग्रंथांची निर्मिती करण्यात येते. 'लोकसेवेचा लोकजागर' हा ग्रंथ निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरणारा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताची राज्यघटना, संसदीय कार्यप्रणाली याविषयीचे चिंतन, महाराष्ट्रातील अलिकडच्या कालखंडातील सर्वपक्षीय नेत्यांचे राज्यघटना, अर्थसंकल्प प्रक्रिया, लोककल्याणाची संकल्पना, नेतृत्त्वविकास याबाबतचे विचारमंथन हे सारे आपल्याला एका दृष्टीक्षेपात या ग्रंथात बघायला, वाचायला मिळते... "



**श्री.अण्णा बनसोडे**
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा

" वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित होणारा 'लोकसेवेचा लोकजागर' हा संदर्भग्रंथ विधिमंडळाचे सदस्य, त्यांचे सहायक तसेच संसदीय लोकशाहीच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास वाटतो. लोकशाही ही जनतेच्या सहभागाने अधिक सक्षम होते. आपली संसदीय लोकशाही कशाप्रकारे कार्यरत आहे आणि कशाप्रकारे कार्यरत रहायला हवी, याविषयीची माहिती, अपेक्षा या ग्रंथातील भाषणांद्वारे सर्वांपर्यंत पोहोचेल. भारतीय राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरक विचारांचा, मान्यवरांच्या भाषणांचा समावेश असलेला हा ग्रंथ सर्वांना संसदीय लोकशाहीच्या बळकटीसाठी कार्यरत राहण्याची प्रेरणा देईल... "

सत्यमेव जयते

# ॥ लोकसेवेचा लोकजागर ॥


संकलन आणि संपादन

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई / नागपूर

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक व मुद्रक | : | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,<br>विधान भवन, मुंबई-४०० ०३२. |
| मुखपृष्ठ, मांडणी व सजावट | : | शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,<br>चर्नी रोड, मुंबई-४०० ००४. |
| मुद्रण | : | शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,<br>चर्नी रोड, मुंबई-४०० ००४. |
| स्वागत मूल्य | : | रु. ३००/— |

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

सत्यमेव जयते

# || लोकसेवेचा लोकजागर ||

## मार्गदर्शन आणि प्रेरणा



आचार्य देवव्रत
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य



प्रा. राम शिंदे
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद



ॲड. राहुल नार्वेकर
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा



श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



श्री. एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



श्रीमती सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



डॉ. नीलम गोऱ्हे
उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद



श्री. अण्णा बनसोडे
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा



श्री. चंद्रकांत (दादा) पाटील
संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

# ॥ लोकसेवेचा लोकजागर ॥

## :: महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ::



श्री. जितेंद्र भोळे
सचिव - १



श्रीमती मेघना तळेकर
सचिव - २



श्री. विलास आठवले
सचिव - ३



श्री. शिवदर्शन साठ्ये
सचिव - ४



श्री. निलेश वडनेरकर
ग्रंथपाल तथा माहिती व
संशोधन अधिकारी



श्री. निलेश मदाने
संचालक,
वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र



श्री. शत्रुघ्न मुळे
उपग्रंथपाल

आचार्य देवव्रत
**Acharya Devvrat**

सत्यमेव जयते

राज भवन,
मलबार हिल, मुंबइ ४०००३५
RAJ BHAVAN,
Malabar Hill, Mumbai 400 035

राज्यपाल, महाराष्ट्र
GOVERNOR OF MAHARASHTRA

१२ नोव्हेंबर २०२५

# शुभेच्छा

महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे 'लोकसेवेचा लोकजागर' हा मान्यवरांची भाषणे व इतर माहितीपूर्ण लेख असलेला संदर्भग्रंथ लवकरच प्रकाशित केल्या जाणार असल्याचे समजून आनंद झाला.

महाराष्ट्र विधानमंडळाला फार मोठा इतिहास लाभला आहे. राज्य विधानमंडळाने आपल्या प्रदीर्घ वाटचालीत उत्तम संसदीय प्रथा व परंपरा विकसित केल्या आहेत. या प्रथा व परंपरा देशभरातील विधान मंडळांना मार्गदर्शक सिद्ध होत आहेत. विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे विधिमंडळ सदस्यांना सभागृहाच्या कामकाजाची माहिती करुन देण्यासाठी नियमितपणे प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केले जात असल्याचे समजले.

केंद्रातर्फे प्रकाशित होत असलेल्या 'लोकसेवेचा लोकजागर' या संदर्भग्रंथामध्ये उत्तमोत्तम भाषणांचा समावेश केला असून सदर ग्रंथ अभ्यासक - संशोधक, अधिकारी व नागरिकांना निश्चितपणे उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. हा ग्रंथ संकलित करुन प्रकाशित करीत असल्याबद्दल मी वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे अभिनंदन करतो व ग्रंथ प्रकाशनासाठी आपल्या शुभेच्छा देतो.

**(आचार्य देवव्रत)**
**राज्यपाल, महाराष्ट्र व गुजरात**

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./११९५/२०२५
दि. १० नोव्हेंबर, २०२५

# शुभेच्छा

महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे 'लोकसेवेचा लोकजागर' संदर्भग्रंथ प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला. हा ग्रंथ महाराष्ट्राच्या संसदीय परंपरेतील एक महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त, असा प्रयत्न आहे.

लोकशाहीच्या पायाभूत मूल्यांची जपणूक आणि लोकसेवेच्या कार्यात विधानमंडळ सदस्यांची भूमिका अधिक सक्षम होण्यासाठी या ग्रंथातील लेख, भाषणे आणि संदर्भ निश्चितच मार्गदर्शक ठरतील. हा ग्रंथ विधानमंडळ सदस्य तसेच त्यांच्या स्वीय सहाय्यकांसाठी प्रशिक्षणात्मक आणि प्रेरणादायी ठरेल. पुढील पिढ्यांसाठी लोकसेवा आणि संसदीय लोकशाहीचा जिवंत दस्तावेज ठरेल, अशी खात्री आहे. या ग्रंथामधून सभागृहातील कार्यपद्धती, विचारमंथन आणि लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्यांविषयी सखोल आकलन होईल. या स्तुत्य उपक्रमासाठी वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राने हार्दिक अभिनंदन!

'लोकसेवेचा लोकजागर' ग्रंथाच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

एकनाथ संभाजी शिंदे
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

पुण्यश्लोक 300

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

17 FEB 2026

## शुभेच्छा

महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत 'लोकसेवेचा लोकजागर' हा महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला. संसदीय लोकशाही अधिक प्रगल्भ करण्यासाठी आणि लोकप्रतिनिधींच्या कार्याला दिशा देण्यासाठी हा स्तुत्य उपक्रम आहे.

आपल्या देशाच्या लोकशाहीचा पाया हा संविधानावर उभा आहे. या ग्रंथामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक भाषणांपासून ते आजवरच्या अनेक दिग्गज नेत्यांच्या विचारांचा, भाषणांचा आणि अनुभवांचा समावेश करण्यात आला आहे, ही बाब कौतुकास्पद आहे. अर्थसंकल्प, संसदीय कामकाज पद्धती आणि जनहितार्थ घेतलेले निर्णय यावर या ग्रंथामुळे प्रकाश पडणार आहे.

विधानमंडळाचे सदस्य, त्यांचे स्वीय सहाय्यक आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी हा ग्रंथ एका 'मार्गदर्शक दीपस्तंभा'सारखा ठरेल. यातील मांडणीमुळे नवीन पिढीला संसदीय लोकशाहीची मूल्ये आणि लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्यांचे सखोल आकलन होण्यास नक्कीच मदत होईल.

या ऐतिहासिक आणि संग्राह्य ग्रंथाच्या प्रकाशनाबद्दल वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

'लोकसेवेचा लोकजागर' या ग्रंथास आणि या उपक्रमास माझ्या शुभेच्छा !

**(एकनाथ संभाजी शिंदे)**

**कार्यालय** : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, **दूरध्वनी** : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
**ई-मेल** : dcm@maharashtra.gov.in, **संकेत स्थळ** : www.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री
## महाराष्ट्र राज्य

दि. ७ नोव्हेंबर २०२५

### शुभेच्छा

लोकशाही ही सतत जागृत आणि उत्तरदायी शासनपद्धती आहे. जनतेच्या आकांक्षा, अपेक्षा आणि समस्यांचा शोध घेऊन त्या सोडविण्याचे कार्य विधीमंडळाच्या सदस्यांच्या माध्यमातून घडते. यासाठी सदस्यांनी संसदीय कार्यप्रणाली, लोकसेवेची जबाबदारी आणि संविधानिक मूल्ये यांचे सखोल ज्ञान असणे अत्यावश्यक आहे.

वि. स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित होणारा 'लोकसेवेचा लोकजागर' हा संदर्भ ग्रंथ विधीमंडळाचे सदस्य, त्यांचे सहायक तसेच लोकशाहीच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास वाटतो. या ग्रंथाद्वारे जनप्रतिनिधींच्या कार्यातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसंपर्क अधिक प्रभावीपणे बळकट होईल.

लोकशाही ही जनतेच्या सहभागाने अधिक सक्षम होते. त्यामुळे जनतेशी संवाद, संवेदनशीलता आणि लोकहिताची जाणीव यांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या या उपक्रमासाठी मन:पूर्वक शुभेच्छा. या ग्रंथाच्या प्रकाशनानिमित्त वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि प्रशिक्षण केंद्राच्या भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!**

**(अजित पवार)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मंत्री

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण,
संसदीय कार्य

**चंद्रकांत (दादा) पाटील**

कार्यालय : ३०२, मंत्रालय (विस्तार) इमारत,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
✉ : cbpatil.minister@gmail.com
☎ + 91 22 2202 4751 / 2202 5398


## :: शुभ संदेश ::

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांना सभागृहाच्या कामकाजाची माहिती मिळावी, आणि लोकशाही प्रक्रिया अधिक परिणामकारक व लोकाभिमुख व्हावी, या उद्देशाने वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे विविध  उपक्रम राबविले जातात.याचाच एक भाग म्हणून 'लोकसेवेचा लोकजागर' हा संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्यात येत आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

"लोकसेवेचा लोकजागर" संदर्भ ग्रंथामध्ये मान्यवरांची भाषणे, लोकशाही व लोकसेवा या विषयांवरील मार्गदर्शक लेखन यांचा समावेश असलेला हा ग्रंथ सन्माननीय विधिमंडळ सदस्य, त्यांचे स्वीय सहायक, पत्रकार, संशोधक, सामाजिक-राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आणि लोकशाही अभ्यासक यांच्यासाठी निश्चितच एक उपयुक्त व संदर्भसमृद्ध मार्गदर्शक ठरेल. आणि संसदीय लोकशाहीच्या अध्ययनासाठी एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तावेज ठरेल, असा मला विश्वास आहे.

या उपक्रमास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

C.B.Patil
(चंद्रकांत (दादा) पाटील)



# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.**

भारतीय राज्यघटना स्वीकारल्याच्या घटनेला तसेच प्रजासत्ताकाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली आहेत. याच अमृतमहोत्सवी पर्वामध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जन्म त्रिशताब्दी वर्षदेखील आपण साजरे करीत आहोत. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी राज्य या संकल्पनेला त्यांनी समर्थपणे केवळ पुढे नेले नाही तर त्याला नवा आयाम प्राप्त करून दिला.

**"जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना आदरांजली..."**





**विधानमंडळ : लोकशाहीचे महामंदिर**

" विधानसभा हे लोकशाहीचे महामंदिर आहे. जनताजनार्दन हीच त्याची स्वयंभू सार्वभौम देवता! प्रतिनिधी हे त्या देवतेचे उपासक! त्या उपासकांचे सेवासाधनेचे संवाद म्हणजेच विधानमंडळातील चर्चा. सत्ता आणि सेवा, विरोध आणि विनोद, शक्ती आणि युक्ती, वाद आणि संवाद, कर्तृत्व आणि वक्तृत्व, मान आणि इमान, नय आणि विनय, निष्ठा आणि प्रतिष्ठा, सवाल आणि जवाब, आवेश आणि आर्जव इत्यादी गोष्टींचा पावनसंगम या विधानसभेत अनुभवावयास मिळतो. तोल सांभाळून बोल कसा लावावा, वैर सोडून वार कसा करावा, नर्म होऊन वर्म कसे भेदावे, दुजाभाव असून बंधुभाव कसा ठेवावा, अल्पमताने बहुमताला व बहुमताने लोकमताला कसा साद-प्रतिसाद द्यावा आणि ही सर्व संधाने बांधण्यात लोकसेवेचे अनुसंधान कसे सुटू नये, या सर्व गोष्टींचे दक्षतापूर्वक परिपालन म्हणजे वैधानिक कार्य. विधानसभा म्हणजे शिळोप्याच्या गप्पांचे ठिकाण नसून नवमहाभारताचे व्यासपीठ आहे, या जाणिवेने लोकप्रतिनिधी काम करतील याच अपेक्षेने लोक त्यांना नियुक्त करीत असतात."

**—महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष,**

**संतसहित्याचे गाढे अभ्यासक तथा**
**संसदीय लोकशाहीचे प्रभावी भाष्यकार श्री. बाळासाहेब भारदे**

# लोकसेवेचा लोकजागर

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऐतिहासिक भाषण आणि त्यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त विधानसभेतील अभिवादन प्रस्ताव...** | |
| (१) | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटनासमिती समोरील भाषण (दि. २५ नोव्हेंबर, १९४९ ) | १ |
| (२) | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त विधानसभा सभागृहातील अभिवादन प्रस्ताव, नागपूर (दि.१७ डिसेंबर, २०१५) मा. श्री. हरिभाऊ बागडे, तत्कालीन अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा | १९ |
| (२-अ) | मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचे अभिवादन प्रस्तावावरील भाषण | २३ |
| (२-ब) | मा. श्री. एकनाथ शिंदे, तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांचे अभिवादन प्रस्तावावरील भाषण | ३१ |
| (२-क) | मा. श्री. देवेंद्र फडणवीस, तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अभिवादन प्रस्तावावरील भाषण | ३५ |
| | **मराठवाडा मुक्तीसंग्रामाची 75 वर्षे** | |
| (३) | मराठवाडा मुक्तिसंग्राम : ७५ व्या वर्षानिमित्त तत्कालीन उप मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांचा विधानपरिषदेतील अभिवादनपर प्रस्ताव (दि. १९ जुलै, २०२३) | ४७ |
| (३-अ) | मराठवाडा मुक्तिसंग्रामः ७५ व्या वर्षानिमित्त अभिवादनपर प्रस्तावावर विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते मा. श्री. अंबादास दानवे यांचे भाषण (दि. १९ जुलै, २०२३) | ५७ |
| | **पीठासीन अधिकारी यांचे मनोगत-मंथन** | |
| (४) | मा. प्रा. राम शिंदे यांचे विधानपरिषद सभापतीपदी निवड झाल्यानंतरचे पहिले भाषण (दि. १९ डिसेंबर, २०२४) | ६७ |
| (४-अ) | मा. ॲड. राहुल नार्वेकर यांनी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा या पदावर निवड झाल्यावर केलेले भाषण (दि. ३ जुलै,२०२२) | ७३ |
| (४-ब) | मा. डॉ. नीलम गोऱ्हे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे महाराष्ट्र विधानपरिषद शतकमहोत्सवावेळी आयोजित स्नेहसंवाद या कार्यक्रमात केलेले भाषण (दि.८ नोव्हेंबर, २०२३) | ७७ |

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राष्ट्रीय विधायक संमेलन : मुख्यमंत्री महोदयांनी दिलेला यशस्वी लोकप्रतिनिधीत्वाचा मूलमंत्र...** | |
| (५) | मा.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री यांनी एमआयटी, पुणे येथे आयोजित केलेल्या "राष्ट्रीय विधायक संमेलनात" केलेले मागदर्शन (दि. ८ फेब्रुवारी, २०२५) | ८५ |
| | **अर्थसंकल्प... पुस्तक, भाषणे, अभ्यासवर्ग** | |
| (५-अ) | "अर्थसंकल्प सोप्या भाषेत...!" - मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांचे पुस्तक जसे आहे तसे (दि. ४ मार्च, २०२०) | १०३ |
| (६) | मा. श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे विधानसभा सभागृहातील अतिरिक्त अर्थसंकल्पावरील भाषण ( दि. ५ जुलै, २०२४ ) | १५३ |
| (६-अ) | मा. श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांचे दोन-दिवसीय अभ्यासवर्गातील अर्थसंकल्प या विषयावरील भाषण ( दि. ५ व ६ ऑक्टोबर, २०२१ ) | १८३ |
| (६-ब) | मा. ॲड. अनिल परब, वि.प.स. यांचे दोन दिवसीय अभ्यासवर्गातील अर्थसंकल्प या विषयावरील भाषण ( दि. ५ व ६ ऑक्टोबर, २०२१ ) | १९७ |
| | **नागपूर अधिवेशनांचे महत्त्व...** | |
| (७) | विधानपरिषद शतकमहोत्सवानिमित्त हिवाळी अधिवेशन नागपूर यासंदर्भातील लेख | २१३ |
| (८) | परिशिष्टे... | २२० |

## दोन शब्द ...

महाराष्ट्र विधिमंडळ हे भारताच्या संसदीय लोकशाहीच्या वाटचालीतील एक वैशिष्ट्यपूर्ण, वैचारिक आणि संसदीय वारसा लाभलेले विधिमंडळ आहे. या विधिमंडळातील विचारमंथनाला वैचारिकतेची आणि त्याचबरोबर लोकहिताच्या जाणिवेची डूब आहे. अभ्यासू सन्माननीय सदस्यांनी वेळोवेळी वैचारिक वाद आणि प्रतिवादाच्या माध्यमातून लोककल्याणाचा वसा आणि वारसा पुढे नेला आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कार्यवृत्तामध्ये हे वैचारिक वैभव संकलित आणि संपादित स्वरूपात सजग वाचकांसाठी उपलब्ध असतेच. त्यातील निवडक, काळातील व नित्य मार्गदर्शक ठरतील अशा अभ्यासपूर्ण भाषणांचा हा संग्राह्य ठेवा आपल्या हाती देताना आम्हाला अतीव आनंद व समाधान वाटते आहे. भारतीय प्रजासत्ताक आणि भारतीय राज्यघटना यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या संदर्भसमृद्ध प्रकाशन मालिकेत ‘ लोकसेवेचा लोकजागर...’ या प्रकाशनाची भर पडणे, ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने अत्यानंदाची बाब ठरावी.

भारतीय राज्यघटनेचे हे अमृतमहोत्सवी वर्ष असल्याने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटना समितीसमोरचे महत्त्वाचे भाषण या पुस्तकाच्या प्रारंभीच घेण्यात आले आहे. आपल्या सर्वांच्या दृष्टीने आत्यंतिक अभिमानाची बाब म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सन १९२६ ते १९३७ या काळात विधानपरिषद सभागृहाचे (बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल) सदस्य होते. त्यानंतर ते १९३७ पासून महाराष्ट्र विधानसभेचेही सदस्य होते. घटना समितीसमोर शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेले त्यांचे शेवटचे भाषण अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. लोकशाही केवळ बाह्य स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्षात अस्तित्वात यावी या दृष्टीने आपण काय करायला हवे याचे अत्यंत मौलिक विवेचन करताना त्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा आपण सर्वांनीच अभ्यासणे आवश्यक आहे.

सन्माननीय सदस्यांना मतदारसंघातील विकासकामे आणि तेथील जनतेशी नित्य संपर्क ठेवत सभागृह कामकाजातील आपल्या योगदानाकडेही लक्ष द्यावे लागते. सध्याचे युग हे कार्यसिद्धीइतकेच कार्यप्रसिद्धीचे देखील असल्याने मतदारसंघ आणि विधिमंडळ कामकाज या दोन्हीबाबत उचित मेळ राखावा लागतो. एमआयटी, पुणे संस्थेच्या वतीने दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ आयोजित ‘ राष्ट्रीय विधायक संमेलन ’ या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केलेले संबोधन, त्यांच्यातील वक्तृत्व आणि कर्तृत्व या गुणांना अधोरेखित करणारे ठरले आहे. अत्यंत नेमक्या शब्दात आणि नेमक्या वेळेत त्यांनी यशस्वी लोकप्रतिनिधित्वाची संकल्पना स्पष्ट केली. त्यांचे हे संबोधन सर्वांपर्यंत पुस्तिका स्वरूपात पोहोचवावे हा विचार आता प्रत्यक्षात येत आहे. त्यांनी हिंदीमध्ये केलेले भाषण, आशय बदलू नये या दृष्टीने, तसेच तसे हिंदीमध्येच या पुस्तकात समाविष्ट करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पविषयक बाबींची माहिती व्हावी या हेतूने ‘अर्थसंकल्प सोप्या भाषेत ’ हे त्यांचेच पुस्तक जशेच्या तसे या पुस्तकाचा भाग करून समाविष्ट करण्यात आले आहे. “महामुख्यमंत्री यांचे हे भाषण उपलब्ध करून दिल्याबद्दल ‘एमआयटी, पुणे’ आणि महा. मुख्यमंत्री कार्यालय याचे हार्दिक आभार.”

या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांना माहितीपूर्ण आणि मार्गदर्शक ठरतील अशी सर्वश्री अजित पवार, जयंत पाटील, ॲड. अनिल परब, एकनाथ शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, अंबादास दानवे तसेच विद्यमान पीठासीन

अधिकारी यांचीदेखील महत्त्वाच्या विषयांवरील भाषणे या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत. विधिमंडळ कामकाजाच्या रूपाने लोकशाही आपले संसदीय मार्गक्रमण करीत असताना त्या वाटचालीत अनेक उल्लेखनीय टप्पे येत असतात. अशा महत्त्वाच्या टप्प्यांप्रसंगी विशेष प्रस्ताव, होणारी चर्चा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यावेळी पक्षीय भूमिकेच्या पलीकडे जाऊन मांडलेले विचार, अनुभव, अपेक्षा, चर्चेतील सहभाग हे आपल्या विधिमंडळ कामकाजातील लखलखते तेजोकण ठरतात. अशा तेजोकण ठरलेल्या मार्गदर्शक विचारांचे या पुस्तकातील संकलन आपला पुढील मार्ग प्रकाशमान करणारे ठरणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करणारा प्रस्ताव नागपूर हिवाळी अधिवेशन, २०१५ मध्ये मांडण्यात आला. या प्रस्तावावरील सर्वश्री देवेंद्रजी फडणवीस, पृथ्वीराजजी चव्हाण, एकनाथजी शिंदे यांची भाषणे तसेच मराठवाडा मुक्ति संग्रामाच्या ७५ व्या वर्षानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिवादनपर प्रस्तावांवर तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि विरोधी पक्षनेते, विधानपरिषद श्री. अंबादासजी दानवे यांनी केलेली भाषणे या ग्रंथात आवर्जून समाविष्ट करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षात त्यांच्या मातृकुलातील ९ वे वंशज मा. प्रा. राम शिंदे यांची विधानपरिषदेच्या सभापतीपदी निवड व्हावी हा एक वैशिष्ट्यपूर्ण योग मानावा लागेल. सर्वसहमतीने व बिनविरोध झालेल्या त्यांच्या या निवडीनंतर विधानपरिषदेतील सभागृहात त्यांनी व्यक्त केलेल्या भावना आपण या पुस्तकात घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची पहिल्यांदा विधानसभा अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी व्यक्त केलेल्या भावना या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. विधानमंडळाची वास्तू ज्यांच्या विधानसभा मतदारसंघात येते तेच विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष म्हणून निवडले जाणे हा देखील एक दुर्मिळ योग ॲड. राहुल नार्वेकर यांच्यामुळे साधला गेला. गतवर्षी महाराष्ट्र विधानपरिषदेचा शतकमहोत्सवी सोहळा भारताच्या माननीय राष्ट्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. त्या संदर्भाने, मा. डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती यांनी ८ नोव्हेंबर आणि ८ डिसेंबर, २०२३ रोजी शतकमहोत्सवी विधानपरिषदेच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीचा मागोवा घेणारे जे भाषण केले त्याचादेखील या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे.

आपली राज्यघटना देशवासीयांतर्फे स्वीकारण्यात आली, त्या सुवर्ण प्रसंगाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून प्रकाशित करण्यात येत असलेला 'लोकसेवेचा लोकजागर...' हा ग्रंथ संसदीय लोकशाहीतील बलस्थानांविषयी आस्था बाळगणाऱ्या आपणा सर्वांसाठी तसेच अभ्यासक, पत्रकार आणि वाचक अशा सर्वांसाठी महत्त्वाचा संदर्भठेवा ठरेल असा विश्वास वाटतो. हा ग्रंथ साकारण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार आणि शुभेच्छा...

**निलेश मदाने,**

मा. सभापती महोदयांचे जनसंपर्क अधिकारी,
संचालक, वि.स.पागे सं. प्र. केंद्र आणि
जनसंपर्क अधिकारी, म.वि.स.



“

सुप्रसिद्ध घटनातज्ज्ञ एस. व्ही. पायली यांनी म्हटले आहे. “ डॉ. आंबेडकरांनी आपल्या सोबत विद्वता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठा व वक्तृत्व आणि अनुभव पणास लावले. अतिशय क्लिष्ट अशा प्रकारच्या प्रश्नावर देखील अतिशय दुर्लभ अशी त्यांची पकड होती आणि आपली मते अशावेळी अतिशय प्रभावीपणे तितकेच सुलभपणे ते मांडीत. जगातील सर्व सुधारलेल्या राष्ट्राच्या घटनात्मक कायद्यांचे व त्यांचे अंमलबजावणीचे त्यांना प्रचंड ज्ञान होते. तसेच १९३५ च्या कायद्यांचे बारकावेही त्यांना माहीत होते. घटनेचा मसुदा चर्चिला जात असताना उद्‌भवलेल्या कोणत्याही टीकेला ते स्पष्ट आणि सुटसुटीतपणे स्पष्टीकरण देत. त्यांनी उत्तरे दिल्यानंतर सदस्यांच्या मनातील संदेह, गोंधळ, असंदिग्धपणा यांचे ढग नाहीसे होत.”

”

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी
शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी
भारताच्या घटना समिती समोर केलेले शेवटचे भाषण.

दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ ला संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन त्या दिवशी भारताचे संविधान संमत झाले. त्याच्या एक दिवस आधी म्हणजे २५ नोव्हेंबर, १९४९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधानाचे शिल्पकार या शब्दांनी ज्यांचा सार्थ गौरव होतो, यांचे संविधान सभेत शेवटचे भाषण झाले.

संविधान निर्माणासाठी त्यांना किती परिश्रम घ्यावे लागले याची प्रचिती पुढील वृत्तांतावरुन येईल.

"चालू महिन्याच्या १७ तारखेस घटना समितीचे कामकाज तहकूब होईल असा अंदाज आहे. घटना सभा स्थगिती झाल्यास काही दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण विश्रांती घ्यावी लागेल. विश्रांतीसाठी सौ. माईसाहेबांच्या समवेत डॉ. बाबासाहेब बहुतकरून काश्मिरला जातील असा रंग दिसतो.

संविधान सभेचे कामकाज चालू असता, डॉक्टरसाहेब रोज १२/१२, १४/१४ तास कामात व्यग्र असतात. येत्या वर्षाअखेर म्हणजे ३१ डिसेंबर, १९४९ चे आत त्यांना सर्व घटना पास करून घ्यावयाची आहे. कारण नवी घटना, २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात यावी असा सर्वांचा संकल्प आहे."

संविधान निर्मितीतील त्यांच्या योगदानाबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल संविधान सभेच्या बहुतेक सदस्यांनी आणि वृत्तपत्र क्षेत्रातील या संबंधातील जाणकारांनी त्यांची मुक्तकंठाने स्तुती केली. त्यातील काहींचे उद्‌गार पुढीलप्रमाणे–

"आर के. सिधवा– हे सर्वोत्तम संविधान आहे. हे लोकांना सांगणे मी माझे कर्तव्य समजतो आणि संविधान सभेचा प्रत्येक सदस्य हे सांगेल अशी माझी अपेक्षा आहे. आपल्यात कितीही मतभेद असले तरी या संविधानाचा आपल्याला अभिमान आहे. आणि आपण जगाला हे जाहिर करू या जेणेकरून जगाला ही जाणीव होईल की हा दस्तावेज संदर्भ घेण्यायोग्यतेचा आहे. २६ जानेवारी १९५० या ऐतिहासिक दिवशी आपण लोकसत्ताक सार्वभौम राज्य होऊ आणि त्या दिवशी या संविधानाला कायद्याचे स्वरूप प्राप्त होईल याचा मला अभिमान वाटतो."

"पंडित ठाकूरदास भार्गव– मसुदा समिती आणि विशेषतः तिचे अध्यक्ष यांच्याप्रती आपण सर्वांनी कोणत्या शब्दात कृतज्ञता व्यक्त करावी हे मला कळत नाही. कायेदविषयक कुशाग्र बुद्धी, अथक परिश्रम, अत्युच्च दर्जाचे कौशल्य, दुर्दम्य आत्मविश्वास, आधुनिकतेशी संलग्नता या गुणांनीयुक्त मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी या संविधान सभेच्या माध्यमातून नेतृत्व केले आणि या संदर्भात निर्माण झालेल्या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक केली."

"बेगम ऐझाज रसूल–संविधानाचे भारतीय जनतेच्या आशा आकाक्षांना मूर्त स्वरूप दिले आहे. शब्द योजना, अंतर्भूत तरतुदीच्या निकषावर संविधानाचे मूल्यमापन होणार असेल तर जगातील संविधानात आपले संविधान श्रेष्ठ दर्जा प्राप्त योग्यतेचे आहे आणि त्याबद्दल आपल्याला

असलेला अभिमान न्यायोचित आहे. नेत्रदीपक कार्य केल्याबद्दल मी डॉ. आंबेडकर आणि मसुदा समितीचे सदस्य यांचे अभिनंदन करते.

धर्मनिरपेक्ष राज्य हे आपल्या संविधानाचं महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. धर्मनिरपेक्षतेच आग्रही प्रतिपादन हे आपल्या संविधानाचे पावित्र्य आहे आणि त्याचा आम्हास गर्व आहे. मला पूर्ण विश्वास आहे. ही धर्मनिरपेक्षता नेहमी जोपासली जाईल आणि कलंकित केली जाणार नाही. भारतातील लोकांचे ऐक्य त्यावर अवलंबून आहे. अन्यथा त्याशिवाय विकासाच्या आशा-आकांक्षा व्यर्थ ठरतील.''

संविधान सभेच्या दैनंदिन कामकाजाचा वृत्तांत दिल्ली तसेच बाहेरील वृत्तपत्रांना देण्याचे काम जे. पी. चतुर्वेदी या प्रसिद्ध पत्रकाराकडे सोपविले होते. चतुर्वेदी हे भारतीय पत्रकारितेच्या चळवळीचे जनक समजले जातात. संविधान निर्मितीच्या कार्यातील डॉ. आंबेडकरांच्या योगदानाविषयी ते म्हणतात. ''त्याकाळात त्यांना जवळून पाहण्याचा सन्मान मला लाभला. डॉ. आंबेडकरांना कोणीही आव्हान देणे अशक्य होते. ते जगातील सर्वच संविधानांचे अधिकारी विद्वान होते. त्यांचेशी चर्चा करायला मिळणे म्हणजे बौद्धिक मेजवानी होती व मला ही संधी मिळत असे.

दलितांच्या आणि शोषितांच्या उद्धारासाठी त्यांनी केलेला संघर्षच केवळ प्रामुख्याने, मुख्यत्वेकरून सांगितला जातो. परंतु, भारतीय नवीन प्रजासत्ताकाच्या पायाभरणीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबाबत काहीच उल्लेख केला जात नाही. आधुनिक मनू म्हणून त्यांना संबोधिले जाते. ज्या समाजातून त्यांचा उदय झाला त्यांच्या हितासाठी वेगळ्या कायद्यांना निर्धारित करण्याचाच केवळ त्यांनी प्रयत्न केला असे नव्हे तर त्यांनी नवीन कायदा दिला. भारतात बाल्यावस्थेत असलेल्या लोकशाहीला त्यांनी संविधानाच्या रूपानी कायदा दिला. संविधान निर्माण करणाऱ्या संविधान सभेतील पितामहांची जेव्हा आपण आठवण करतो त्यावेळेस आपण हे विसरता कामा नये की भारताच्या संविधान सभेत डॉ. आंबेडकर हे सर्वात उत्तुंग व्यक्तिमत्त्व होत. ज्यांनी वर्तमान संविधानाची प्रत्यक्षात रचना केली. भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या उत्क्रांतीला सुव्यवस्थित करण्यासाठी तसेच देशाची अखंडता सुरक्षित ठेवण्यासाठी त्याचे विचार दिशा दिग्दर्शित करतील.''

सुप्रसिद्ध घटनातज्ज्ञ एस. व्ही. पायली यांनी म्हटले आहे. '' डॉ. आंबेडकरांनी आपल्या सोबत विद्वता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठा व वक्तृत्व आणि अनुभव पणास लावले. अतिशय क्लिष्ट अशा प्रकारच्या प्रश्नावर देखील अतिशय दुर्लभ अशी त्यांची पकड होती आणि आपली मते अशावेळी अतिशय प्रभावीपणे तितकेच सुलभपणे ते मांडीत. जगातील सर्व सुधारलेल्या राष्ट्राच्या घटनात्मक कायद्यांचे व त्यांचे अंमलबजावणीचे त्यांना प्रचंड ज्ञान होते. तसेच १९३५ च्या कायद्यांचे बारकावेही त्यांना माहीत होते. घटनेचा मसुदा चर्चिला जात असताना उद्‌भवलेल्या कोणत्याही टीकेला ते स्पष्ट आणि सुटसुटीतपणे स्पष्टीकरण देत. त्यांनी उत्तरे दिल्यानंतर सदस्यांच्या मनातील संदेह, गोंधळ, असंदिग्धपणा यांचे ढग नाहीसे होत. तर्कस्पष्ट युक्तिवाद, प्रभावी आणि सर्वांना समजणारे स्पष्टीकरण कोणत्याही मुद्याला तात्काळ प्रतिवाद करून वाद संपुष्टात आणण्याची हातोटी त्यांच्याशिवाय अन्य कोणत्याही सदस्यात नव्हती. हे सारे करीत असताना विरोधकाने एखादा रास्त

मुद्दा मांडला तर तो समजून घेऊन स्वीकारण्याचा उदारपणादेखील त्यांच्यात होता. म्हणूनच त्यांना आधुनिक मनू अथवा भारतीय राज्यघटनेचे जनक म्हणतात, ते साजेसेच आहे."

बंगालच्या फाळणीमुळे तिथून निवडून आलेल्या काही सदस्यांचे संविधान सभेचे सदस्यत्व संपुष्टात आले होते. त्यात डॉ. आंबेडकरांचाही समावेश होता. तेव्हा पर्यंतच्या त्यांच्या कार्यावरून संविधान सभेला त्यांच्यातील घटनातज्ज्ञाची तसेच त्यांच्या मार्गदर्शनाची व सहकार्याची नितांत गरज भासायला लागली होती. हे डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मुंबई प्रांताचे तत्कालीन प्रधानमंत्री श्री. बी.जी. खेर यांना ३० जून १९४७ रोजी लिहिलेल्या पत्रावरुन दिसून येईल. ते आपल्या पत्रात लिहितात " दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार न करता आम्हाला असे वाटायला लागले आहे की, डॉ. आंबेडकरांचे संविधान सभा तसेच ज्या विविध समितीवर त्यांची नियुक्ती झाली होती त्यातील कार्य एवढे बहुमोल आहे की, आम्ही त्यांच्या योगदानापासून वंचित राहू इच्छित नाही. ते बंगालमधून निवडून आले होते. त्या प्रांताच्या फाळणीनंतर त्यांचे संविधान सभेवरील सदस्यत्व संपुष्टात आले. संविधान सभेचे पुढील सत्र दिनांक १४ जुलै पासून सुरू होत आहे. ते त्यात सहभागी व्हावेत यासाठी मी उत्सुक आहे. म्हणून ताबडतोब त्यांची निवड करण्यात यावी " त्याप्रमाणे जुलै १९४७ ला मुंबई प्रांतातून डॉ. आंबेडकरांची संविधान सभेवर नव्याने निवड झाली.

त्यांची निवड किती सार्थ होती हे संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान संमत करताना केलेल्या शेवटच्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या प्रती ज्या भावना व्यक्त केल्या त्यावरून दिसून येईल. डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणतात " या खुर्चीत बसून संविधान सभेच्या कार्याचे मी प्रत्येक दिवशी निरीक्षण करीत आलो आहे. संविधान सभेच्या मसुदा समिती वरील सभासदांनी किती उत्साहाने, चिकाटीने, निष्ठेने कार्य पार पाडले ह्याची खरी जाणीव अन्य कोणापेक्षाही मला अधिक आहे. विशेषतः त्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी आपल्या प्रकृतीची क्षिती न बाळगता ते काम तडीस नेले आहे. (टाळ्या) मसुदा समितीवर आणि तिच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करण्याचा जो निर्णय आपण घेतला त्यांच्याइतका अचूक निर्णय दुसरा कोणताही घेतला नाही. त्यांनी आपल्या निवडीची यथार्थता पटवून दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी जे हे कार्य केले त्याला एक प्रकारचा तेजस्वीपणा आणला. यासंदर्भात समितीच्या इतर सदस्यांमध्ये भेदभाव करणे योग्य होणार नाही. मला माहीत आहे की तिच्या अध्यक्षांप्रमाणेच त्या सर्वांनी आस्थेने तसेच एकनिष्ठेने कार्य केले आहे आणि राष्ट्राच्या धन्यवादास ते पात्र आहेत."

"डॉ. आंबेडकरांचा त्यानंतर देश परदेशात गौरव होत राहिला. चिरंतन स्मरणात राहावे असे महत्त्वाचे राष्ट्रकार्य त्यांनी करून दाखविले होते. आंबेडकरांनी घटनेद्वारे अस्पृश्यतेचे कायमचे उच्चाटन केले होते. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ह्या श्रेष्ठ मानवी मूल्याचे अधिष्ठान भारतीय जीवनात प्रस्थापित केले होते." ह्यामुळे जगातील एक थोर घटनापंडित म्हणून त्यांना कीर्ती लाभली. सुप्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ आणि ऑक्सफर्ड व कॅब्रिज विद्यापीठांचे माजी नामवंत प्राध्यापक अर्नेस्ट वार्कर ह्यांनी १९५१ साली आपला 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशन अँड पोलिटिकल थिअरी' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला. तो त्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश

पत्रिकेस (प्रिअॅम्बल) अर्पण केला आहे. ग्रंथाच्या प्रस्ताविकात ते म्हणतात, "माझ्या प्रस्तुत ग्रंथांचे विचारसार ह्या उद्देश पत्रिकेत समाविलेले आहे. भारतीय जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा प्रारंभ करताना ह्या श्रेष्ठ मानवी मूल्याचा अंगीकार केला ह्याचा मला अभिमान वाटतो.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर ह्यांच्या कर्तृत्वाचा ह्यापरता मोठा गौरव तो कोणता असणार !"

लक्ष वेधणारी अद्वितीय व्यक्ती

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण जवळजवळ ५५ मिनिटे चालले होते. त्या वेळी घटना समितीच्या भव्य हॉलमध्ये गंभीर शांतता पसरली होती. सर्व गॅलऱ्या भरगच्च झाल्या होत्या तरी, कोणाच्या श्वासाची अगर हातापायाची हालचालदेखील कळून येत नव्हती. उत्कृष्ट वुलन सुट पेहरलेल्या, दुरून धिप्पाड दिसणाऱ्या आणि मधूनमधून श्रोत्यांकडे दृष्टीक्षेप करणाऱ्या एकाच व्यक्तीकडे सर्व प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित झाले होते आणि ती व्यक्ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत."

"डॉक्टर साहेबांच्या भाषणाच्या सुरुवातीस व शेवटी जो टाळयाचा प्रचंड कडकडाट झाला त्याचे वर्णन करणे कठीण आहे. त्यांचेवर टाळयांच्या रूपाने गौरवाची वृष्टीच होत होती. भाषणाच्या शेवटी तर ज्यांनी त्यांनी डॉक्टर साहेबांशी हस्तांदोलन करून त्यांना धन्यवाद दिले."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले-

"महोदय,

संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ ला झाली. त्याकडे पाहता आतापर्यंत २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवसांचा कालखंड लोटलेला आहे. या कालखंडात संविधान सभेची एकूण ११ सत्रे पार पडतील. या ११ सत्रांपैकी ६ सत्रे उद्दिष्टापूर्तीचा ठराव पारित करणे आणि मूलभूत हक्क, केंद्रीय संविधान, केंद्राचे अधिकार, प्रांतिक संविधान, अल्पसंख्याक या समित्यांच्या अहवालावर आणि अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जमाती यावर विचार-विनिमय करण्यासाठी खर्ची पडली. सात, आठ, नऊ, दहा आणि अकरा ही सत्रे मसुदा संविधानाच्या विचार विनिमयार्थ उपयोगात आणली गेली. संविधान सभेच्या या अकरा सत्राचे प्रत्यक्ष कामकाजाचे १६५ दिवस होतात. त्यापैकी मसुदा संविधानाच्या विचारार्थ सभेने ११४ दिवस उपयोगात आणले.

संविधान सभेने २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची निवड केली. तिची पहिली बैठक ३० ऑगस्टला झाली. ३० ऑगस्ट पासून १४१ दिवस चाललेल्या कामकाजादरम्यान ती समिति संविधान मसुदा तयार करण्याच्या कामात व्यस्त होती. संविधान सल्लागारांनी मसुदा समितीकडे कामकाजासाठी आराखडा दिला तेव्हा मसुदा संविधानात २४३ अनुच्छेद आणि १३ परिशिष्टे समाविष्ट होती. मसुदा समितीने संविधान सभेला सादर केलेल्या पहिल्या मसुदा संविधानात ३१५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे याचा समावेश होता. विचार विनिमयाच्या शेवटच्या टप्प्यात मसुदा

संविधानातील अनुच्छेदांची संख्या वाढून ३८६ झाली. तिच्या अंतिम स्वरूपात मसुदा संविधानात ३९५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टांचा समावेश आहे. मसुदा संविधानात दुरुस्ती करण्यासाठी अंदाजे ७, ६३५ दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. त्यापैकी २,४७३ दुरुस्त्या सभागृहात प्रत्यक्ष विचारार्थ सादर करण्यात आल्या.

मी या वस्तुस्थितीचा उल्लेख एवढ्यासाठी करतो आहे की, एकावेळी असे म्हटल्या जात होते की, आपले काम पूर्ण करण्यासाठी समितीने प्रदीर्घ कालावधी घेतला आहे. ती संथपणे काम करीत आहे आणि जनतेच्या पैशाची उधळपट्टी करीत आहे. रोम जळत असताना निरो फिडल वाद्य वाजवित बसला होता अशी स्थिती असल्याचे बोलले जात होते. या आक्षेपात काही तथ्य आहे काय? इतर देशातील संविधान सभांनी त्यांचे संविधान निर्माण करण्यासाठी किती काळ घेतला ते पाहू या. काही उदाहरणे घेऊया. अमेरिकेच्या सभेची बैठक २५ मे १७८७ ला झाली आणि चार महिन्यात म्हणजे १७ सप्टेंबर १७८७ ला तिने आपले काम पूर्ण केले. कॅनडाच्या संविधान सभेची पहिली बैठक १० ऑक्टोबर, १८६४ ला झाली आणि मार्च १८६७ मध्ये संविधानाचे कायद्यात रूपांतर झाले यासाठी २ वर्षे ५ महिन्यांचा कालावधी लागला. ऑस्ट्रेलियाच्या संविधान निर्मितीचे कामकाज मार्च, १८९१ ला सुरू झाले आणि ९ जुलै १९०० ला कायदयाचे रूप प्राप्त झाले त्यासाठी त्यांना ९ वर्षे लागली. दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मितीच्या कार्याला ऑक्टोबर १९०८ मध्ये सुरुवात झाली. आणि २० सप्टेंबर १९०९ रोजी संविधानाची परिणती कायद्यात झाली. एक वर्षाच्या परिश्रमात हे घडून आले आहे. हे खरे आहे की, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या सभेने घेतलेल्या कालावधीपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला. परंतु कॅनडाच्या संविधान सभेपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला नाही आणि ऑस्ट्रेलियाच्या सभेपेक्षा खूपच कमी वेळ घेतला आहे. कोणी किती वेळ घेतला याची तुलना करताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांची संविधाने आपल्यापेक्षा फारच लहान आहेत. मी सांगितल्याप्रमाणे, आपल्या संविधानात ३९५ परिच्छेद आहेत तर अमेरिकन संविधानात केवळ ७ आहेत. त्यातील पहिल्या चार अनुच्छेदांची विभागणी २१ उप विभागात झाली आहे. कॅनडाच्या संविधानात १४७, ऑस्ट्रेलियाच्या संविधानात १२८ आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधानात १५३ अनुच्छेद आहेत. दुसरी लक्षात ठेवण्यासारखी बाब अशी की, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मात्यांना संविधान दुरुस्तीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागले नाही. सादर करण्यात आलेल्या स्वरूपातच त्या संमत झाल्या. दुसरीकडे आपल्या संविधान सभेला २,४७३ दुरुस्त्यांचा विचार करावा लागला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता दिरंगाईचा आरोप मला बराचसा निराधार वाटतो आणि इतके कठीण काम इतक्या अल्पावधीत यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल या सभेने स्वतःचे अभिनंदन केल्यास काही वावगे होणार नाही.

मसुदा समितीने केलेल्या कामाच्या दर्जाकडे पाहाताना श्री. नाझीरुद्दीन अहमद यांना ती पूर्णतया नाकारणे हे आपले कर्तव्य आहे असे वाटते. त्यांच्या मते मसुदा समितीने केलेले कार्य हे केवळ नाकारण्यायोग्यच आहे असे नव्हे तर ते निश्चितपणे त्याहीपेक्षा खालच्या दर्जाचे आहे.

मसुदा समितीने केलेल्या कार्याबद्दल स्वत:चे मत व्यक्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे आणि श्री. नाझीरुद्दीन यांनाही आहे. मसुदा समितीच्या कोणत्याही सभासदापेक्षा आपण अधिक बुद्धिमान आहोत असे श्री.नाझीरुद्दीन अहमद यांना वाटते. मसुदा समिती त्यांच्या या दाव्याला आव्हान करू इच्छित नाही. याउलट संविधान सभेला ते मसुदा समितीवर नियुक्त करण्याच्या योग्यतेच आहेत असे वाटले असते तर आपल्यात त्यांचे स्वागत करण्यात मसुदा समितीला आनंदच वाटला असता. संविधान निर्मितीच्या योगदानात जर त्यांना काही स्थान मिळाले नाही तर तो निश्चितपणे मसुदा समितीचा दोष नाही.

मसुदा समितीवरील स्वत:चा रोष व्यक्त करण्यासाठी नाझीरुद्दीन अहमद यांनी तिला नवीन नाव दिले आहे. ते मसुदा समितीला भरकटणारी समिती असे म्हणतात. हा टोमणा दिल्याबद्दल नाझीरुद्दीन यांना निश्चितच आनंद होत असेल यात शंका नाही. परंतु त्यांना याची स्पष्ट जाणीव दिसत नाही की अनियंत्रितपणे वाहत जाणे आणि वाहताना नियंत्रण ठेवणे यात फरक आहे. परिस्थितीवर नियंत्रण असल्याशिवाय मसुदा समिती कधीही वाहत गेली नाही. मासा गळाला लागणार नाही अशा ठिकाणी केवळ ती गळ टाकून बसली नव्हती. जो मासा तिला पकडायचा होता, तो ज्या ठिकाणी मिळेल, अशाच ठिकाणी ती पाण्यात गळ टाकून बसली होती. अधिक चांगले शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वाहवत जाणे नव्हे. हे करण्यामागे मसुदा समितीचे अभिनंदन करण्याचा नाझीरुद्दीन अहमद यांचा उद्देश नसला तरी, त्यांनी मसुदा समितीचे अभिनंदन केले आहे असेच मी समजतो. मसुदा समितीने दोषपूर्ण वाटणाऱ्या दुरुस्त्या बाजूला सारुन त्याऐवजी तिला योग्य वाटणाऱ्या दुरुस्त्या स्वीकारण्याचा प्रामाणिकपणा आणि धैर्य जर दाखविले नसते तर ती आल्या कर्तव्यापासून ढळली व प्रतिष्ठेच्या खोट्या समाजाला बळी पडली म्हणून ती दोषी ठरली असती. ही जर चूक असेल तर अशा चुका नि:संकोचपणे मान्य करून त्या दुरुस्त करण्यासाठी मसुदा समितीने पुढाकार घेतला याचा मला आनंद आहे.

एकमेव सदस्याचा अपवाद वगळता संविधान सभेच्या सदस्यांनी मसुदा समितीने केलेल्या कार्याचा गौरवच केला याचा मला आनंद वाटतो. मसुदा समितीने घेतलेल्या परिश्रमाला उस्फूर्तपणे स्वीकारून त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केल्यामुळे मसुदा समितीला आनंद होईल याची मला खात्री आहे. संविधान सभेचे सदस्य आणि मसुदा समितीचे माझे सहकारी यांनी माझ्यावर जो अभिनंदनाचा वर्षाव केला त्यामुळे मी इतका सद्‌गदित झालो आहे की त्याच्या प्रति माझी कृतज्ञता पूर्णत: व्यक्त करण्यासाठी माझ्याजवळ पुरेसे योग्य शब्द नाहीत. संविधान सभेत येताना अनुसूचित जातींच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यापलिकडे माझी दुसरी मोठी आकांक्षा नव्हती. यापेक्षा अधिक जबाबदारीचे कार्य करण्यासाठी मला आमंत्रित करण्यात येईल याची पुसटशीसुद्धा कल्पना मला नव्हती. सभेने मसुदा समितीवर माझी निवड केली तेव्हा मला फार आश्चर्य वाटले. मसुदा समितीने तिच्या अध्यक्षपदी माझी निवड केली तेव्हा तर माझ्या आश्चर्याला पारावर उरला नाही. मसुदा समितीत माझे मित्र सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्यासारखी माझ्यापेक्षा अधिक मोठी चांगली आणि अधिक योग्य माणसे होती. माझ्यावर इतका विश्वास व्यक्त करून आणि जबाबदारी सोपवून

त्यांनी माझी निवड केली आणि देशाची सेवा करण्याची मला संधी दिली यासाठी मी संविधान सभा आणि मसुदा समितीच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो. (हर्षध्वनी)

मला देण्यात आलेल श्रेय केवळ माझे नाही. संविधान सभेच घटनात्मक सल्लागार सर बी.एन. राव ज्यांनी मसुदा समितीच्या विचारार्थ संविधानाचा कच्चा मसुदा तयार केला, त्यांचाही यात अंशतः वाटा आहे. श्रेयाचा काही वाटा मसुदा समितीच्या सदस्यांचाही आहे. मी सांगितल्याप्रमाणे ही समिती १४१ दिवस कार्यरत होती आणि तिची, नवीन सूत्रे शोधून काढण्याची कल्पकता आणि विचाराच्या विविध मुद्यांना सामवून घेण्याच्या सहनशक्तीशिवाय संविधान निर्मितीचे हे अवघड कार्य यशस्वीरित्या पूर्णत्वास गेले नसते. श्रेयाचा मोठा वाटा संविधानाचा आराखडा तयार करणारे प्रमुख श्री. एस. एन. मुखर्जी यांच्याकडेही जातो. गुंतागुंतीच्या प्रस्तावांना सर्वात सोप्या आणि स्पष्ट कायदेशीर स्वरूपात परिवर्तित करण्याची तसेच कठोर परिश्रम घेण्याची त्यांची क्षमता कदाचितच कुणात आढळेल. समितीला लाभलेली ती एक ठेव आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय संविधानाच्या पूर्णत्वासाठी सभेला आणखी बरीच वर्षे लागली असती. श्री. मुखर्जी यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा उल्लेख करणे मला टाळताच येणार नाही. किती कठीण काम त्यांनी केले आहे. किती कठोर परिश्रम त्यांनी घेतले आहेत. कधीकधी मध्यरात्रीपर्यंत ते राबले आहेत याची मला जाणीव आहे. त्याचे प्रयत्न आणि त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचे आभार मानतो. (हर्षध्वनी)

संविधान सभा जर विविध घटकांचा विस्कळीत समुदाय राहिली असती तर सिमेंटचा उपयोग न करता तयार केलेला रस्ता, जिथे इकडे काळा दगड तर तिकडे पांढरा दगड याप्रमाणे प्रत्येक सदस्य आणि प्रत्येक गट हा स्वत:तच एक कायदा असता. तर अशा स्थितीत मसुदा समितीला तिचे काम करणे फार अवघड झाले असते. गोंधळाशिवाय त्या ठिकाणी काहीच दिसले नसते. समितीतील कॉंग्रेस पक्षाच्या या शिस्तीमुळेच मसुदा समितीला संविधानातील प्रत्येक अनुच्छेद आणि प्रत्येक दुरुस्तीच्या भवितव्याची खात्री असल्यामुळे, संविधान सादर करणे सुकर झाले. त्यामुळे मसुदा संविधान सभेमध्ये सुगमरित्या पारित होण्याचे श्रेय कॉंग्रेस पक्षालासुद्धा द्यावे लागेल.

जर सर्व सदस्यांनी पक्ष शिस्तिला घट्ट बांधून घेतले असते तर संविधान सभेचे कामकाज खूपच निरस झाले असते. पक्ष शिस्तिच्या ताठरतेमुळे या सभेच रुपांतर होय बा च्या समूहात झाले असते. सुदैवाने त्यात बंडखोरही होते. त्यात श्री. कामत डॉ.पी.एस.देशमुख, श्री. सिधवा. प्रा. सक्सेना आणि पं. ठाकुरदास भार्गव यांचा समावेश होता. त्यांच्या सोबतच प्रा. के. टी. शाह आणि पं. हृदयनाथ कुंझरु यांचा उल्लेख मी केलाच पाहिजे. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे बहुधा सैद्धांतिक होते. मी त्यांच्या सूचनांचा स्वीकार करू शकलो नाही याचा अर्थ त्यांच्या सूचनांचे मूल्य कमी होते. समितीच्या कामकाजात जिवंतपणा आणण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे महत्त्व कमी होते. असे नाही. मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्याशिवाय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या स्पष्टीकरणाची संधी मला मिळाली नसती. जी संविधान पारित करण्याच्या तांत्रिक बाबीपेक्षा अधिक महत्त्वाची आहे.

आणि शेवटी अध्यक्ष महोदय, या सभेचे कामकाज ज्या पद्धतीने आपण हाताळले त्यासाठी मी आपले आभार मानायलाच हवे. या सभेच्या कामकाजात ज्या सदस्यांनी भाग घेतला. त्यांना आपण जी आपुलकीची आणि सन्मानाची वागणूक दिली ती कधीही विसरता येणार नाही. मसुदा समितीने आणलेल्या काही दुरुस्त्या केवळ तांत्रिक स्वरूप असण्याच्या आधारावर काही प्रसंगी नाकारण्याचा प्रयत्न झाला. ते क्षण माझ्यासाठी फारच चिंताजनक होते. संविधान निर्मितीच्या कार्याला पराभूत करण्याच्या उद्देशाने पुढे आणलेल्या कायद्याच्या ताठरपणाला आपण परवानगी दिली नाही. यासाठी विशेषत्वाने मी आपला आभारी आहे.

संविधानाचे जेवढे समर्थन करता येणे शक्य होते तेवढे माझे मित्र सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर आणि श्री. टी. टी. कृष्णमाचारी अय्यर यांनी केले आहे. त्यामुळे संविधानाच्या गुणवत्तेविषयीच्या चर्चेत मी शिरू इच्छित नाही. कारण माझ्या मते, संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही.

तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णतः संविधानाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग जसे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका निर्माण करून देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वतःच्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते संवैधानिक मार्गाचा अवलंब करतील की क्रांतीकारी मार्गाचा अवलंब करतील? त्यांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केल्यास संविधान कितीही चांगले असो ते अयशस्वी होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज नाही आणि म्हणून भारतीय लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे जाणून घेतल्याशिवाय संविधानाबाबत कोणताही निर्णय घेणे निरर्थक ठरेल.

साम्यवादी पक्ष आणि समाजवादी पक्ष या दोन घटकांकडून संविधानावर मोठ्या प्रमाणात नापसंती व्यक्त करण्यात येत आहे. ते संविधानाच्या प्रती नापसंती का व्यक्त करतात? खरोखर संविधान वाईट आहे म्हणून ते नापसंती व्यक्त करतात काय? निश्चितपणे नाही असे मी म्हणतो. साम्यवादी पक्षाला कामगारांच्या हुकूमशाही तत्त्वांवर आधारलेले संविधान हवे आहे. हे संविधान सांसदीय लोकशाहीवर आधारित असल्यामुळे ते संविधानाचा निषेध करतात. समाजवाद्यांना दोन गोष्टी हव्या आहेत. पहिली गोष्ट त्यांना हवी आहे ती अशी की, ते जर सत्तारुढ झाले तर मोबदला न देता खाजगी संपत्तीचे राष्ट्रीयीकरण किंवा सामाजिकरण करण्याचे संविधानाने त्यांना स्वातंत्र्य दिलेच पाहिजे. समाजवाद्यांना पाहिजे असलेली दुसरी गोष्ट अशी की, संविधानातील मूलभूत अधिकार निरपेक्ष आणि कोणत्याही निर्बंधाशिवाय असावे जेणेकरून त्यांच्या पक्षाला सत्ता प्राप्त करण्यात अपयश आले तर, केवळ अनिर्बंध टीका करण्याचेच नव्हेतर राज्य उलथून पाडण्याचेही स्वातंत्र्य त्यांना हवे आहेत.

प्रामुख्याने या दोन कारणांमुळे संविधानावर टीका करण्यात येत आहे. संसदीय लोकशाहीच तत्त्व हाच केवळ राजकीय लोकशाहीच आदर्श प्रकार आहे असे मी मानत नाही. मोबदला न देता खाजगी संपत्ती ताब्यात घेण्याचे तत्त्व इतके पवित्र आहे. की त्यापासून फारकतच घेता येत नाही असे मी म्हणत नाही. मूलभूत अधिकार हे कधीही अनिर्बंध असू शकत नाही आणि त्यावर घातलेले निर्बंध केव्हाही उठविता येत नाही. असेही मी म्हणत नाही. मला सांगायचे ते हे की, संविधानातील अंतर्भूत मते ही आजच्या पिढीची आहेत किंवा प्रस्तुत विधान जर तुम्हाला अतिशयोक्तीपूर्ण वाटत असेल तर मी म्हणेन की संविधान सभेच्या सभासदाची ती मते आहेत. संविधानात त्यांच्या अंतर्भाव केल्याबद्दल मसुदा समितीला दोष का देण्यात यावा? मी म्हणतो की संविधान सभेच्या सभासदांवर सुद्धा हे दोषारोपण का करण्यात यावे? अमेरिकेच्या संविधान निर्मिती प्रक्रियेत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणारा अमेरिकेतील मुत्सद्दी जेफरसन, यांनी काही भारदस्त, अतिमहत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. जे संविधान निर्मात्यांना कधीही नजरेआड करणे परवडण्यासारखे नाही. एके ठिकाणी त्यांने म्हटले आहे, ते असे की :

"प्रत्येक पिढी, बहुसंख्यांकाच्या इच्छेप्रमाणे स्वतःला बांधून घेण्याचा अधिकार असलेल्या एका स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे आहे. येणाऱ्या पिढीला कोणी बंदिस्त करू शकत नाही, जसे दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना करता येत नाही."

दुसऱ्या एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे. ते असे की :

"देशहितासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांना स्पर्श करता येणार नाही किंवा त्यात फेरबदल करता येणार नाही. त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांना उत्तरदायी धरता येणार नाही कारण लोकांच्या हिताची जबाबदारी विश्वस्तपणे ज्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी त्यांना काही अधिकार बहाल करण्यात आले आहेत. कदाचित सत्तेचा दुरुपयोग करणारा राज्यशाहीविरुद्ध हे परिणामकारक प्रावधान असू शकेल परंतु ही कल्पना राष्ट्राच्या दृष्टीने मात्र अतिशय असंमजसपणाची आहे. तरी आपले कायदेपंडीत आणि धर्मगुरू हे तत्त्व सामान्यतया बिंबविण्याचा प्रयत्न करतात आणि समजतात की, आपली मागची पिढी आपल्यापेक्षा अधिक मुक्तपणे भूतलावर वावरत होती. आपल्याला बदल करता येणार नाही असे अपरिवर्तनीय कायदे लादण्याचा तिला अधिकार होता. त्याचप्रमाणे भावी पिढीला बदलविता येणार नाही असे कायदे आपण केले आणि ते भावी पिढीवर लादले तर वास्तवात हे जग मेलेल्यांचे असेल. जिवंत लोकांचे असणार नाही."

जेफरसनने जे सांगितले आहे, ते केवळ सत्यच नाहीतर ते निखळ सत्य आहे, हे मी मान्य करतो. त्याबद्दल दुमत होऊ शकत नाही. जेफरसनने सांगितलेल्या तत्त्वाकडे संविधान सभेने पाठ फिरविली असती तर तिच्यावर निश्चित पणे दोषारोपण करता आले असते, निषेधसुद्धा करता आला असता. परंतु मी विचारतो, असे आहे का? वस्तुस्थिती याउलट आहे. एखाद्याने केवळ संविधान दुरुस्ती प्रावधानाचाच पडताळा घ्यावा. कॅनडाच्या संविधानात दुरुस्ती करण्याचा लोकांचा अधिकार जसा नाकारला गेला आहे तसे संविधान सभेने आपल्या संविधानात अंतिमतेचे आणि

बिनचुकतेच शिक्कामोर्तब केलेले नाही किंवा अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाप्रमाणे घटना दुरुस्ती असाधारण शर्ती आणि अटींच्या पूर्ततेवर अवलंबून ठेवला नाही. याउलट संविधानदुरुस्तीसाठी आपल्या संविधान सभेने अतिशय सुलभ पद्धतीची तरतूद केली आहे. संविधानावर टिका करणाऱ्या कोणत्याही टिकाकारला मी असे आव्हान देते की, आपल्यासारखी अवस्था असणाऱ्या, जगातील कोणत्याही देशाच्या संविधान सभेने दुरुस्तीसाठी असे प्रावधान केल्याचे सिद्ध करावे. संविधानाप्रति असंतुष्ट असणाऱ्यांना केवळ २/३ बहुमत प्राप्त करावे लागेल आणि प्रौढ मतदान पद्धतीने निवडलेल्या संसदेत त्यांच्या बाजूने २/३ बहुमतही ते प्राप्त करू शकत नसतील तर संविधानावरील त्यांचा असंतोष हा सर्वसाधारण जनतेचा असंतोष आहे असे मानता येणार नाही.

संविधानाशी संबंधित अशा एका महत्त्वपूर्ण मुद्याच्या संदर्भात मी आता बोलू इच्छितो सत्तेचे वाजवीपेक्षा जास्त केंद्रीकरण करण्यात आले असून प्रांतांना नगरपरिषदांच्या पातळीवर आणले आहे अशी एक गंभीर तक्रार करण्यात येते. हे स्पष्ट आहे की, हा दृष्टिकोन केवळ अतिशयोक्तीपूर्णच आहे असे नव्हे तर संविधानाला नेमके काय घडवून आणायचे आहे याबाबतच्या गैरसमजावर तो आधारलेला आहे. केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध लक्षात घेण्यासाठी ज्या मूलभूत तत्त्वांवर ते आधारित असतात ते लक्षात घेणे आवश्यक आहे. संघराज्यतत्त्वाचे मूलभूत तत्त्व असे आहे की, विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या सत्तेची केंद्र आणि राज्यातील विभागणी ही केंद्राच्या कोणत्या कायद्यानी करावयाची नसून ती संविधानानेच केलेली असते. संविधान हेच करीत असते. आपल्या संविधानांतर्गत केलेली असते. संविधान हेच करीत असते. आपल्या संविधानांतर्गत असणारी राज्य त्यांच्या विधिविषयक किंवा कार्यकारी अधिकारांसाठी कोणत्याही प्रकारे केंद्रावर अवलंबून नाहीत. यासंदर्भात केंद्र आणि राज्ये समान पातळीवर आहेत. अशा संविधानाला केंद्रीभूत म्हणण्यात यावे हे समजणे अवघड आहे. असे असू शकेल की, दुसऱ्या कोणत्याही संघराज्य संविधानात आढळणार नाही इतके, विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळाचे व्यापक क्षेत्र, संविधानाने केंद्राला दिलेले आहे. असेही शक्य असू शकेल की, शेषाधिकार राज्यांना न देता केंद्राला देण्यात आले आहेत. परंतु ही वैशिष्ट्ये म्हणजे संघराज्याची मूलतत्त्वे नव्हेत. मी सांगितल्याप्रमाणे संघराज्याची प्रमुख ओळख म्हणजे केंद्र आणि घटकांमध्ये विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या सत्तेची संविधानाने केलेली विभागणी होय. हे तत्त्व आपल्या संविधानात अंतर्भूत आहे. याबाबत कोणतीही चूक असू शकत नाही. म्हणून राज्यांना केंद्राच्या अधिकारात ठेवण्यात आले आहे, असे म्हणणे चुकीचे होईल. या विभागणीची सीमा केंद्राला स्वतःच्या इच्छेने बदलविता येणार नाही. न्यायपालिकेला सुद्धा नाही. यासंदर्भात असे योग्यच म्हटले गेले आहे की,

"न्यायालयांना सुधारणा करता येईल. पण एकाच्या जागी दुसरे आणता येणार नाही. जुन्या अन्वयार्थात सुधारणा घडवून नवीन युक्तिवाद ते करू शकतील. नवीन दृष्टिकोन पुढे ठेवता येतील. अल्पमताच्या फरकाने दिलेले निर्णय ते बदलवू शकतात परंतु त्यांना पार करता येणार नाहीत. अशा सीमारेषा आहेत. अधिकाराच्या निश्चित वाटपात ते नव्याने फेरबदल करू शकत नाहीत. अस्तित्वात असलेल्या अधिकाराची व्याप्ती ते वाढवू शकतील, पंरतु एका सत्तेला दिलेला अधिकार निःसंशयपणे दुसऱ्याला देता येणार नाही."

संघीय पद्धतीला पराभूत करणारा केंद्रीकरणाचा हा पहिला आरोप निश्चितच निष्प्रभ ठरतो.

दुसरा आरोप असा की, राज्यावर कुरघोडी करण्याचा केंद्राला अधिकार देण्यात आला आहे. हा आरोप मान्य केलाच पाहिजे. परंतु अशा कुरघोडी करण्याच्या अधिकारांच्या तरतुदी असल्यामुळे संविधानाचा निषेध करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात घेतल्याच पाहिजे. त्यापैकी पहिली गोष्ट अशी की, कुरघोडी करण्याचे अधिकार संविधानाच्या सर्वसाधारण वैशिष्ट्यांचा भाग नाहीत. त्यांचा उपयोग आणि अमल निःसंदिग्धपणे आणिबाणीच्या काळापुरताच सीमित ठेवला आहे. दुसरी विचारात घेण्याची बाब अशी की, आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर कुरघोडी करण्याचे अधिकार केंद्राला देण्याचे आपण टाळू शकतो का? आणिबाणीच्या काळातसुद्धा असे कुरघोडीचे अधिकार केंद्राला असण्याचे समर्थन ज्यांना मान्य नाही. त्यांना या विषयाच्या मुळाशी असलेल्या समस्येची स्पष्ट कल्पना दिसत नाही. "द राऊंड टेबल " या प्रसिद्ध मासिकाच्या डिसेंबर १९३५ च्या अंकात ही समस्या एका लेखकाने इतक्या स्पष्टपणे विशद केली आहे की त्यातील काही भाग उद्धृत करण्यासाठी मला दिलगिरी व्यक्त करण्याची गरज वाटत नाही. लेखक म्हणतो :

"राजकीय व्यवस्था या अधिकार आणि कर्तव्ये यांच्यातील गुंतागुंत असून, जी अंतिमतः नागरिकांनी कुणाच्या किंवा कोणत्या सत्तेच्या प्रति आपली निष्ठा व्यक्त करावी, या प्रश्नाशी निगडित असते. सामान्य परिस्थितीत हा प्रश्न निर्माण होत नाही. कायदा सुरळीतपणे अंमलात येत असतो. एका क्षेत्रात एका सत्तेचा तर दुसऱ्या क्षेत्रात दुसऱ्या सत्तेचा आदेश मानून माणूस आपले व्यवहार करीत असतो. परंतु, संकटसमयी कुणाचा आदेश मानायचा याबाबत संघर्ष निर्माण होऊ शकतो आणि अशा प्रसंगी मात्र अंतिम निष्ठेचे विभाजन होऊ देता कामा नये हे स्पष्ट आहे. निष्ठेसंबंधीचा निर्णय हा अंतिमतः कायद्याच्या न्यायालयीन अन्वयार्थावर घेता येऊ शकणार नाही. कायदा हा वस्तुस्थितीशी सुसंगत असायलाच हवा अन्यथा तो अगदीच निष्प्रभ ठरेल. जेव्हा सर्व शिष्टाचार बाजुला ठेवले जातात. त्या वेळी उघड प्रश्न असा की नागरिकांच्या शेष निष्ठेवर कुणाची सत्ता असावी, केंद्राची की घटकराज्यांची?"

या समस्येवरील उपाय या प्रश्नाचे उत्तर कोण कसे देतो यावर अवलंबून असून तोच खरा प्रश्न आहे. आणिबाणीच्या प्रसंगी नागरिकांची शेष निष्ठा ही घटक राज्यांसोबत न राहता केंद्रासोबत असावी. बहुसंख्य लोक या मताचे असतात याबद्दल शंका असू नये. कारण सामाईक उद्दिष्टपूर्तीसाठी आणि देशाच्या एकूणच हितसंबधांच्या जपणुकीसाठी केंद्र सरकारच कार्यरत असते. यासाठीच आणिबाणीच्या काळात केंद्राला जादा अधिकार देण्याचे समर्थन निहित आहे. आणि सरतेशेवटी आणिबाणीचे अधिकार केंद्राला देण्यामागे राज्यांवर कोणते उत्तरदायित्व येते? एवढेच की, आणिबाणीच्या काळात स्वतःचे स्थानिक हितसंबंध जोपासण्यासोबतच, राज्यांनी एकूण राष्ट्राचे मत आणि हितसंबंध विचारात घ्यावे. ही समस्या ज्यांना नीटपणे कळलेली नाही तेच याविरुद्ध तक्रार करतील.

याठिकाणी मी माझे भाषण संपविले असते, परंतु माझे मन देशाच्या भवितव्याबाबत इतके चिंताग्रस्त आहे की, त्यासंबंधातील माझी मते व्यक्त करण्यासाठी या प्रसंगाचा मी उपयोग करावा

असे मला वाटते. २६ जानेवारी, १९५० ला भारत एक स्वतंत्र राष्ट्र होईल. (हर्षोल्लास ) त्याच्या स्वातंत्र्याचे काय होईल? तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवील की पुन्हा गमावून बसेल? हा विचार माझ्या मनात प्रथम उभा राहतो. असे नाही की भारत हा यापूर्वी कधीही स्वतंत्र नव्हता. मुद्दा हा आहे की त्याने असलेले स्वातंत्र्य एकदा गमावले आहे. तो पुन्हा दुसऱ्यांदा ते गमाविल का? भवितव्याबाबतचा हाच विचार मला सर्वाधिक चिंताग्रस्त करतो. भूतकाळात भारताने केवळ आपले स्वातंत्र्य गमावले असे नव्हे तर ते देशातील काही लोकांच्या बेईमानी आणि विश्वासघातामुळे गमावले गेले ही वास्तविकता मला अधिक अस्वस्थ करते. महम्मद बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले त्या वेळी दहार राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी महम्मद बीन कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजूने कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजूने लढण्याचे नाकारले. महम्मद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे निमंत्रण देणारा जयचंद होता. आणि त्याने त्याला पृथ्वीराज विरुद्ध लढण्यासाठी स्वतःच्या आणि सोळंकी राजांच्या मदतीचे आश्वासन दिले. जेव्हा शिवाजी हिंदुंच्या मुक्तीसाठी लढत होता त्या वेळी इतर मराठा, सरदार आणि रजपूत राजे मोगल सम्राटांच्या बाजूने युद्ध लढत होते. जेव्हा शीख राज्यकर्त्यांचा निःपात करण्याचा प्रयत्न इंग्रज करीत होते तेव्हा त्यांच्या प्रमुख सेनापती गुलाबसिंग शांत बसला आणि शिखांचे राज्य वाचविण्यासाठी त्याने शिखांना मदत केली नाही. १८५७ ला भारतातील बहुतांश भागांनी इंग्रजांच्या विरुद्ध स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा केली. तेव्हा शीख बघ्याच्या भूमिकेतून त्या घटनेकडे पहात राहिले.

इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे. जातींच्या आणि संप्रदायांच्या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रूंसोबतच भिन्न आणि परस्परविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. ह्या वास्तवाच्या जाणीवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्त्वप्रणालीला मोठे मानतील? मला माहित नाही. पंरतु एवढे मात्र निश्चित की जर पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले. तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. या संभाव्यतेविरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे. (हर्षध्वनी)

२६ जानेवारी, १९५० ला भारत एक लोकसत्ताक देश होईल तो या अर्थाने की, भारतात त्या दिवसापासून लोकांचे, लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार प्राप्त होईल. तोच विचार माझ्या मनात येतो, ह्या लोकसत्ताक संविधानाचे काय होणार? हा देश ते अबाधित ठेवण्यासाठी समर्थ राहील की पुन्हा तो ते गमावून बसेल. माझ्या मनात येणारा हा दुसरा विचार आहे. आणि पहिल्याप्रमाणेच तो मला चिंतातूर करणारा आहे.

भारताला लोकशाही म्हणजे काय हे माहित नव्हते असे नाही. एक काळ असा होता की, भारत हा गणराज्यांनी भरगच्च होता आणि जिथे कुठे राजेशाही असेलच तर ती एकतर निवडलेली

किंवा सीमित असायची. त्या प्रणाली कधीही अनिर्बंध नव्हत्या. भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असे नाही. बौद्ध भिक्खू संघाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, त्यावेळी केवळ संसदच होती असे नव्हे संघ हे दुसरे काही नसून संसदच होते-तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या सांसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहीत होते आणि त्यांचे ते पालन करीत होते. बसण्याच्या व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादीबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुद्धाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधिमंडळाच्या नियमावधीतूनच त्यांनी ते स्वीकारले असले पाहिजेत.

ही लोकसत्ताक पद्धती भारताने गमावली. पुन्हा दुसऱ्यांदा तो ती गमावणार काय? मला माहित नाही. परंतु भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की लोकशाही प्रदीर्घकाळापर्यंत उपयोगात नसल्यामुळे ती अगदीच नवीन भासण्याची शक्यता आहे- जिथे लोकशाही हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरूप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरूप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देईल. जर प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे.

केवळ बाह्य स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णतः दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गाचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल.

दुसरी महत्वाची गोष्ट जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते " लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्यांच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्यांच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणेकरून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील. " संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरूषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त

करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओ कॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, ''कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणतीही स्त्री स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही. कोणतीही स्त्री स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही.'' इतर देशांच्या तुलनेत भारताला हा सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात दिसणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्त किंवा व्यक्तीपूजा ही अधःपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी की, केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे. जो स्वातंत्र्य समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य समता आणि बंधुता ह्या तत्त्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. तो त्रयीचा एक संघ निर्माण करतात. ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही, समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय. स्वातंत्र्यशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरित्या अस्तित्वात राहाणार नाहीत. त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलीस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णतः अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करूनच आपण सुरूवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्राला आपला भारतीय समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निकृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी, १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील. परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि

आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारीत राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो. तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्वाचे तत्त्व मान्य करणे ही होय. बंधुत्व म्हणजे काय? जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्त्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करून देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे. ती किती कठीण आहे. हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याच्या अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांकितलेल्या गोष्टीवरून कळून येईल.

ब्राईसच्याच शब्दात मी उद्‌धृत करू इच्छितो. ती घटना अशी–

काही वर्षापूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रेवार्षिक अधिवेशनात त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करून त्यात सर्व लोकांसाठी असलेल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यू इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले, हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशिर्वाद दे उत्स्फुर्तपणे ते त्या दिवशी मान्य करण्यात आले. यावाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला धर्मपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी 'राष्ट्र' या शब्दावर आक्षेप घेतले, त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्ट्राचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे तो शब्द गाळण्यात आला आणि 'हे प्रभो, या संयुक्त राज्यांना आशिर्वाद दे' या शब्दांचा स्वीकार करण्यात आला.

ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना भारतीय लोक ' या शब्दाची चीड येत असे. 'भारतीय राष्ट्र' म्हणणे ते पसंत करीत असत. मी या मताचा आहे की, आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल, त्यानंतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचे महत्त्व आम्हाला कळेल आणि आमच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कोणत्या मार्गाचा

आणि उपायांचा अवलंब करावा याचा आम्ही गांभीर्याने विचार करू शकू या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे अमेरिकेतील लोकांना जेवढे कठीण होते त्याहीपेक्षा कितीतरी पटीने कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट, त्या समाजजीवनात विभागणी करतात त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती-जातींमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहवयास मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरासारखा केवळ बाह्य देखवा असेल.

आपल्यासमोर असलेल्या अवघड, जिकिरीच्या कामाबद्दल माझ्या या प्रतिक्रिया आहेत. काहींना त्या कदाचित फार आनंददायी वाटणार नाहीत. या देशात राजकीय सत्ता ही मुठभर लोकांची मक्तेदारी राहिली आहे आणि बहुतांश लोक केवळ ओझे वाहणारे प्राणीच नव्हे तर भक्ष्यस्थानी असलेले प्राणी झाले आहेत. हे कोणालाही नाकारता येणार नाही. या मक्तेदारीने त्यांना केवळ विकासाच्या संधीपासूनच वंचित ठेवले असे नव्हे तर मानवी जीवनाचे महत्वही कळणार नाही इतका त्यांचा निपात केला आहे. हे पददलित वर्ग त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. स्वतःच राज्य करण्यासाठी ते आतूर झाले आहेत. पददलित समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा वर्गसंघर्ष आणि वर्गयुद्ध होण्याइतपत वाढू देता कामा नये. त्याचा परिणाम घर दुभंगण्यात होईल. तो निश्चितपणे विनाशकारी दिवस असेल अब्राहम लिंकन यांनी समर्पकरित्या म्हटल्याप्रमाणे, दुभंगलेले घर अधिक काळपर्यंत टिकू शकत नाही. त्यांच्या आकाक्षाच्या पूर्तीसाठी जेवढ्या लवकर त्यांना संधी उपलब्ध करून देता येईल तेवढे ते मूठभरांच्या हिताचे, देशाच्या हिताचे. त्यांच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ आणि त्याच्या लोकसत्ताक संरचना टिकून राहण्यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात समता आणि बंधुत्व प्रस्थापित करण्यानेच हे शक्य होणार आहे. त्यामुळेच त्यांच्यावर मी इतका भर दिला आहे.

मी सभागृहाला अधिक थकवू इच्छित नाही. स्वातंत्र्य ही आनदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इंग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले तर त्यासाठी आपल्याशिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळवेगाने बदलतो आहे. आपले लोकसुद्धा नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत. लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येऊ लागला आहे. आत त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत की जेणेकरून लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या

सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील. यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बल ठरता कामा नये देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही.”

(संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-३, १९४६ ते १९५६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, सन २००२.)

*****



" भारतातील संसदीय कार्य प्रणालीची नेहमीच अमेरिकेच्या लोकशाही बरोबर तुलना केली जाते. राज्यघटनेचा मसुदा आकार घेत असताना देखील या विषयाची चर्चा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या दिनांक ४ नोव्हेंबर १९४८ च्या भाषणामध्ये या विषयी अतिशय सुंदर विवेचन केले. दोन्ही कार्यप्रणाली लोकशाही आघाडीवर असून त्यापैकी कोणती एक निवडायची हा निर्णय अत्यंत कठीण होता. लोकशाहीतील कार्यपालिकेच्या दोन अटी पूर्ण कराव्या लागतात. ही कार्यपालिका स्थिर असली पाहिजे. ही कार्यपालिका उत्तरदायी असली पाहिजे. तथापि, या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करू शकणारी प्रणाली दुर्दैवाने आज वर विकसित झालेली नाही. आपल्याला एक तर अधिक स्थैर्य परंतु, कमी उत्तरदायित्व असलेली प्रणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्व परंतु, कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल... "

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १२५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन...
माननीय अध्यक्षांनी उपस्थित केलेली चर्चा.

दिनांक १७ डिसेंबर २०१५

—श्री. हरिभाऊ बागडे, तत्कालीन मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा

अध्यक्ष : आपल्या भारतीय राज्यघटना समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष आणि दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटना मंजूर करण्यात आल्याची घोषणा आणि घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनेला ६६ वर्षे होणे हे औचित्य साधून आज सभागृहामध्ये या विशेष चर्चेचे आयोजन केले आहे. गेल्या महिन्यात दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ हा संविधान दिन म्हणून संपूर्ण देशात अत्यंत उत्साहात विविध कार्यक्रम आणि जागृतीपर उपक्रमाने साजरा केला. डॉ. आंबेडकरांच्या जीवनात नागपूरचे असलेले विशेष स्थान आणि २६ नोव्हेंबर, २०१५ नंतर आपले हिवाळी अधिवेशन सुरू असणे ही गोष्ट लक्षात घेता आपण संविधानावरील या विशेष चर्चेचे आयोजन केलेले आहे. संसदेत देखील अशाप्रकारे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी चर्चा होऊन संविधान आणि संविधान निर्मात्याचा गौरव करण्यात आला. कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. लोकसभा अध्यक्षा माननीय सुमित्राताई महाजन आणि देशाचे प्रधानमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी संविधानासंदर्भात यावेळी व्यक्त केलेले विचार आपल्याला एक लोकप्रतिनिधी म्हणून निश्चितच मार्गदर्शक ठरणारे आहेत. घटना समितीची मसुदा समिती झालेली होती. त्यावेळी १२ प्रांत या देशात होते आणि १२ प्रांताच्या विधानसभेतून काही सदस्य निवडून गेलेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बंगालमधून निवडून गेलेले होते आणि बंगालमधून त्यांना पाच सदस्यांनी समर्थन दिल्याने राज्य घटनेवर ते आलेले होते. पण पुढे १९४६ साली त्या प्रांताची विभागणी झाली आणि त्यांचे सभासदत्व त्यावेळी गेले. तेव्हा देशाचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी आपल्या राज्याचे मुख्यमंत्री श्री. खेर यांना पत्र लिहिले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बंगालमध्ये आवश्यकता आहे. आपल्या राज्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाठविण्यात यावे. आपल्या राज्यातून ते गेलेले होते. घटना समितीचे दिनांक ९ डिसेंबर, १९४६ ते दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ या काळामध्ये या एकूण काळामध्ये ११ अधिवेशने झाली. स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी दिनांक १४ ते ३० ऑगस्ट, १९४७ दरम्यान घटना समितीचे पाचवे अधिवेशन सुरू होते आणि स्वतंत्र भारताचे प्रथम विधिमंत्री या पदाची जबाबदारी सांभाळणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. या समितीमध्ये त्यावेळेला जे मसुदा समिती सदस्य होते त्यामध्ये के.एम. मुन्शी, अलादिक कृष्णास्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार, माधवराव, मोहम्मद सदुल्लाह, बी.एल. मित्तर, डी. पी. खेतान, टी.डी. कृष्णमाचारी आदि विद्वान या समितीमध्ये मसुदा समिती सदस्य होते. सखोल विचारमंथन, जगातील विविध राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास, भारतातील वैविध्य टिकवत एकसंधत्वाला प्राधान्य, वंचित घटकांना न्याय आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना संरक्षण या मुद्दयांना अग्रक्रम देत राज्यघटनेची अत्यंत परिश्रमपूर्वक निर्मिती करण्यात आली. आपली राज्यघटना म्हणजे राज्य व्यवस्थेच्या संदर्भातील केवळ नियमावली नाही, तर स्वतंत्र भारतातील नागरिकांच्या सर्वांगिण उन्नतीचा तो प्रेरक अविष्कार आहे.

राज्यघटनेच्या PREAMBLE मध्ये कुठेही बदल झालेला नाही. परंतु काही बदलही त्यानंतर घटना समितीमध्ये झालेले आहेत. भारतीय राज्यघटना दि. २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आली. दि. २६ जानेवारी हा दिवस का निवडला गेला? या दिवसालाही एक ऐतिहासिक महत्त्व आहे. दि. २६ जानेवारी १९३० साली कॉंग्रेस पक्षाचे एक अधिवेशन लाहोरला झालेले होते. त्या अधिवेशनामध्ये दि. २६ जानेवारी ह्या दिवसाबाबत मी फार वर्षापूर्वी ऐकले, वाचले होते. ' भारतीय जनतेचे स्वातंत्र्य दिवस' असे मी वाचले होते. अखंड हिंदुस्तानचा 'त्या वेळचा ठराव दि. २६ जानेवारी १९३० रोजी लाहोरच्या अधिवेशनामध्ये

केलेला होता. त्या नंतर आपल्या देशामध्ये दि. २६ जानेवारी हा दिवस पाळला जात आहे. स्व. यशवंतरावजी चव्हाण आपल्या राज्याचे माजी मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री यांच्या पुस्तकावरून हा दिवस साजरा केल्याचे दिसून येते. दि. २६ जानेवारी हा दिवस निवडला लाहोरच्या अधिवेशनाचा संदर्भ घेऊन निवडला गेला, ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे व त्या दृष्टीने विचार केला पाहिजे.

राज्य घटनेच्या संविधान समितीमध्ये जी नावे आलेली होती, त्यामध्ये १२ प्रांतांचे व ७१ संस्थांचे असे २९९ सदस्य त्या समितीमध्ये सदस्य होते. त्यामध्ये प्रांत १२ होते. त्यावेळी आपल्या प्रांतातून कोण निवडून गेले होते त्यांची नांवे मी आपल्याला सांगू इच्छितो. आपल्या मुंबई प्रांतातून विदर्भ वगळून, मराठवाडा वगळून, गुजरात मधील काही जिल्हे होते. त्यावेळी राज्यघटना समितीमध्ये जे सदस्य म्हणून गेलेले होते त्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत - श्री. भालचंद्र महेश्वर गुप्ते, श्री. के. एम. मुन्शी, श्रीमती हंसा मेहता, श्री. नरहर विष्णू गाडगीळ, श्री. हरिविनायक पाटस्कर, श्री. एम. डिजींग अप्पा, डॉ. बी. आर. आंबेडकर, श्री. एस. के. पाटील, श्री. जोसेफ डिसोझा, श्री. रामचंद्र मनोहर नल्वा, श्री. कन्हैयालाल ननाभाई देसाई, श्री. आर. आर. दिवाकर, श्री. केशवराव मारूतीराव जेठे, श्री. शंकरराव देव, श्री. खंडूभाई कासमजी देसाई, श्री. जी. व्ही. मावळणकर, श्री. बाळ गंगाधर खेर, श्री. वल्लभभाई जे. पटेल, श्री. एम. आर. मसानी, श्री. अब्दुल कादर महम्मद शेख, श्री. ए. ए. खान ही महाराष्ट्रातून घटना समितीवर गेलेले सदस्य होते. अशी घटना समिती तयार झाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मसुदा तयार केला. तो मसुदा लोकशाही प्रक्रिया चालू असलेल्या वेगवेगळया देशातल्या राज्य घटना तपासून आणि आपल्या देशाची परंपरा, संस्कृती, एकात्मता देशातील विविधता या सर्वांचा अभ्यास करून त्यांनी तयार केलेला आहे. अत्यंत परिश्रमाने तयार केलेल्या या मसुद्यास मसुदा समितीने संमती दिल्यावर, घटना समितीचा मसुदा तयार झाला.


दिनांक ४ नोव्हेंबर १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले जे भाषण आहे, त्या भाषणामध्ये त्यांनी विविध मुद्यांचा परामर्श घेतलेला आहे. अभ्यासकाच्या नव्हे तर सर्व सामान्य नागरिकाच्या दृष्टीने देखील अनमोल वैचारिक ठेवा या चर्चेच्या अनुषंगाने या ठिकाणी मांडण्यात आला. सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. हे भाषण आपण सर्वांनी काळजीपूर्वक वाचावे आणि अध्ययन करावे. राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने मूळ इंग्रजीतील भाषण मराठी भाषेमध्ये अनुवादीत करून पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित केलेले आहे. ती पुस्तिका आज पीजन होलच्या खणामध्ये टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी देखील ती पुस्तिका अनेक वेळा टाकली गेली असेल. आज पुन्हा नव्याने जुन्या व नवीन सन्माननीय सदस्यांना वितरित केली जात आहे.

भारतातील संसदीय कार्य प्रणालीची नेहमीच अमेरिकेच्या लोकशाही बरोबर तुलना केली जाते. राज्यघटनेचा मसुदा आकार घेत असताना देखील या विषयाची चर्चा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या दिनांक ४ नोव्हेंबर १९४८ च्या भाषणामध्ये या विषयी अतिशय सुंदर विवेचन केले. दोन्ही कार्यप्रणाली लोकशाही आघाडीवर असून त्यापैकी कोणती एक निवडायची हा निर्णय अत्यंत कठीण होता. लोकशाहीतील कार्यपालिकेच्या दोन अटी पूर्ण कराव्या लागतात. ही कार्यपालिका स्थिर असली पाहिजे. ही कार्यपालिका उत्तरदायी असली पाहिजे. तथापि, या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करू शकणारी प्रणाली दुर्दैवाने आज वर विकसित झालेली नाही. आपल्याला एक तर अधिक स्थैर्य परंतु, कमी उत्तरदायित्व असलेली

प्रणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्व परंतु, कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल. अमेरिका आणि स्विस प्रणालीमध्ये अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व आहे. याउलट ब्रिटीश प्रणालीत अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य आहे. प्रस्तावित राज्यघटनेत कार्यपालिकेसाठी संसदीय प्रणालीची शिफारस करताना अधिक स्थैर्यापेक्षा अधिक उत्तरदायित्वाला पसंती देण्यात आली आहे. यातून त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो. लोकप्रतिनिधी आणि त्यातून तयार होणारे सरकार हे जनतेला अधिकाधिक उत्तरदायी व जबाबदार ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. याचे कारण नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण अबाधित रहावे, याला त्यांनी प्राधान्य दिले. हा त्यांचा विचार किती महत्वाचा आहे याची आपणा सर्वांना निश्चिती करून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध अंगानी विचार केला. त्यांनी संदर्भ दिलेले आहेत. मग तो सरकारी बाजूचा असो, विरोधी बाजूचा असो वा अन्य कोणी असो. आपला एखादा मुद्दा प्रभावीपणे मांडताना डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा आधार घेऊन आपण ते सांगत असतो. अशा तऱ्हेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या राज्यघटनेला लवचिकपणा आहे. शांततेच्या आणि युद्धाच्या काळात देश एकसंध ठेवण्यासाठी ही घटना नक्कीच समर्थनीय आहे, असे म्हणावेसे वाटते. नव्या राज्यघटनेच्या अंमलामुळे परिस्थिती अधिक चांगली आणि अधिक उत्तम होईल. आपल्या देशाला मिळालेली ही उत्कृष्ट घटना आहे. देशाला, राज्याला एकसंध ठेवण्यासाठी त्याचा निश्चित आपण उपयोग करत आहोत. त्याचा अधिक उपयोग करावा. या विचाराला अधिक पुष्टी देऊन आपण सर्वदूर जातो. त्याला निश्चित बळकटी आणली पाहिजे. त्या विचारांवर आपला देश, राज्य आणि सर्व व्यवहार सुरू असतात. आपण घटनेला सर्वोत्तम महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देश व समाजासाठी अतिशय चांगली घटना दिली याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो व त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

*****



“ आपल्या लोकशाहीमध्ये तीन स्तंभ म्हणजे कार्यपालिका, न्यायपालिका व कायदेमंडळ आहे. या तिन्ही स्तंभांची अधिकारकक्षा ठरवून दिलेली आहे. या अधिकारकक्षेत एकाने दुसऱ्यावर अतिक्रमण करू नये. याला डॉक्ट्रीन ऑफ सेप्रेशन ऑफ पॉवर्स असे म्हटलेले आहे. त्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे, याच्या अधिकारामध्ये अंतर असले पाहिजे. एकमेकांनी एकमेकांच्या अधिकारावर अतिक्रमण करू नये. अशी मूलभूत कल्पना आपल्या लोकशाहीचा व घटनेचा आत्मा आहे. ”

—श्री. पृथ्वीराज चव्हाण,

वि.स.स. तथा माजी मुख्यमंत्री

**श्री. पृथ्वीराज चव्हाण** (कराड-दक्षिण) **:** अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त वर्षापासून विविध कार्यक्रम सुरू आहेत. त्या अनुषंगाने आज आपण विधिमंडळामध्ये चर्चा ठेवली. आपण हा विषय मांडल्यामुळे मी आपल्याला धन्यवाद देतो. मी माझ्या वतीने डॉ. बाबासाहेब यांच्या पावन स्मृतीला आदरांजली अर्पण करतो.

अध्यक्ष महोदय, आपण आपल्या भाषणात २६ जानेवारीचे महत्त्व विषद केले. अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनामध्ये लाहोरला सदर तारीख निश्चित करण्यात आली. आपले संविधान तयार झाल्यानंतर सदर दिवशी संविधान मान्य करण्यात आले. भारताने फंडामेंटल लॉ म्हणजे कॉन्स्टिट्यूशनचा स्वीकार केला. मी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करू इच्छितो. मार्च, १९३१ मध्ये कराची अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरु यांनी " मूलभूत अधिकार आणि आर्थिक धोरण " या संबंधी ठराव मांडला होता. त्या ठरावातून मूलभूत अधिकाराची कल्पना पुढे आली. आज तो भारतीय संविधानाचा आत्मा आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. ६६ वर्षांच्या काळात संविधान आणि प्रजासत्ताक राज्य त्याचप्रमाणे भारताची लोकशाही अतिशय मजबूत झाली आहे. अध्यक्ष महोदय, आपण यासंबंधी अतिशय महत्त्वाचा उल्लेख केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या परिस्थितीत इंग्लड, जर्मनी तसेच अमेरिकेत शिक्षण घेतले. त्यावेळी अमेरिकेत अश्वेतांचा लढा सुरू होता, इंग्लडमध्ये संसदीय लोकशाही सुरू होती. या गोष्टीचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. अशी व्यक्ती मसूदा समितीमध्ये असली पाहिजे. दुर्दैवाने बंगालची फाळणी झाल्यानंतर त्यांचा मतदार संघ नाहीसा झाला. यामुळे त्यांना घटना समितीमध्ये स्थान मिळाले नाही. काँग्रेस पक्षाने त्यांना पुन्हा मुंबईतून निवडून आणले आणि फक्त घटना समितीमध्ये घेतले नाही तर प्रारूप समितीमध्ये घेऊन समितीचे अध्यक्ष पद दिले.

अध्यक्ष महोदय, संविधान स्वीकारल्यानंतर संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आदरयुक्त उल्लेख केला होता की, " आज देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा विधीवेत्ता व ते ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात, त्यापेक्षा चांगली व्यक्ती आपल्याला मिळाली नसती. त्यांनी या सर्व कार्याला न्याय दिलेला आहे. " ६६ वर्षांपासून संविधानावर आधारित आपण राज्य व्यवस्था चालवित आहोत व आपली लोकशाही अधिक बळकट केली. त्या दरम्यान काही संकटे आली होती. त्या संकटांवर मात करण्याची ताकद संविधानामध्ये आहे. संविधानाला प्रासंगिक ठेवण्याकरिता घटनेत नमूद केलेल्या सूत्रानुसार आपण वेळोवेळी घटनेत दुरुस्ती केली. संविधान म्हणजे दगडावर कोरलेले वाक्य नाही, त्याला कधी बदलता येणार नाही. संविधानात अशी मूलभूत कल्पना मांडण्यात आली. संविधानाचा आत्मा उद्देशिकेत आहे. उद्देशिका सर्व संविधानाचा सार आहे. घटनेमध्ये घटना दुरुस्तीसंबंधी तरतूद केली आहे, ती उद्देशिकेला सुद्धा लागू आहे. यामुळे जेव्हा " उद्देशिकेमध्ये " समाज वाद" आणि " सर्वधर्म समभाव " या दोन शब्दांचा समावेश केला. यावेळी बराच वाद सुरू झाला. ४२ व्या घटना दुरुस्तीमध्ये घटनेमध्ये अनेक बदल करण्यात आले. यासंदर्भात काही लोकांनी विरोध केला, आंदोलने झाली. त्यानंतर निवडणुका झाल्यानंतर सरकार बदलले. ४२ व्या घटना दुरुस्तीमध्ये केलेले सर्व बदल निरस्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, ४२ व्या घटना दुरुस्तीमध्ये " समाज वाद" आणि "सर्वधर्म समभाव " या दोन शब्दांचा समावेश केला होता, त्यात कोणतीही दुरुस्ती करण्यात आली नाही. तो बदल कायम ठेवण्यात आला. एका दृष्टीने घटनेला प्रासंगिक ठेवण्यात समाजाचे वास्तव त्यात प्रतिबिंबित

करण्यास उक्त दोन शब्द अतिशय महत्त्वाचे आहेत असा त्यावेळी विचार आला व तो सर्व पक्षांनी मान्य केला. कारण ४२ वी घटनादुरुस्तीची निरस्तीकरणाची कार्यवाही ४४ व्या घटनादुरुस्तीमध्ये झाली तेव्हा हे शब्द बदलले नाही. ते तसेच राहिले. पण आज त्या शब्दांवर चर्चा सुरू झालेली आहे. केंद्रीय गृहमंत्री म्हणतात की, सेक्युलॅरिझम हा शब्द घटनेमध्ये समाविष्ट केल्यामुळे आता देशात प्रश्न उपस्थित झालेले आहेत. पण हे कोणीच स्वीकार करणार नाही. त्यांचे ते वैयक्तिक मत आहे. कित्येक वेळेला अशी भीती वाटते की, कोठून तरी घटनेला हात लावला जातो. घटनेचे मूलभूत प्रारूप म्हणजे फंडामेंटल स्ट्रक्चर बदलण्याचा प्रयत्न चालला आहे का?

आपणास आठवत असेल की, केंद्रामध्ये श्री. अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी घटनेमध्ये बदल करण्याकरिता एक समिती नेमली. त्याला विरोध झाला. काँग्रेस पक्षाने तर त्याबाबत कडाडून विरोध केला. परंतु त्या घटनादुरुस्ती समितीने काम चालू केले. त्यांनी अनेक प्रस्ताव मांडले. परंतु याबाबत देशात प्रक्षोभ निर्माण झाला की, घटनेचे मूलभूत स्वरूप बदलण्याचा प्रयत्न चाललेला आहे. सरकार कसे निवडायचे. संसदीय लोकशाही पद्धतीने काम करायचे की, राष्ट्रपती पद्धत आणायची असे विचार सुरू झाले. देशात वादळ उठल्यामुळे सरकारने तो विचार सोडून दिला. जे आहे तसेच आपले संविधान चालू राहिले. परंतु काळजी घेण्याची गरज आहे, कारण पुन्हा हे शब्द उपस्थित केले जातात, वाद उपस्थित केले जातात. घटनेचा मूळ ढाचा म्हणजे बेसिक स्ट्रक्चरला हात लावण्याचा प्रयत्न चाललेला आहे अशी परिस्थिती निर्माण होत आहे. आपणा सर्वांच्या मनात एक प्रश्न निश्चित निर्माण होईल की, गेल्या वर्षी नवीन सरकार आले, गेल्या वर्षी सरकारला सुचले नाही की, अशा प्रकारचा संविधान दिन साजरा करावा. पण चांगले आहे. देर आए दुरुस्त आए.. हरकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा उच्चार झाला व त्यांचे विचार प्रसारित झाले तर चांगली गोष्ट आहे. असे वाटते की, यामध्ये काही तरी राजकारण दडलेले आहे. पण खरेच सरकारला असे वाटले होते की, याबाबत आपण काही कार्यवाही केली पाहिजे. असे असते तर गेल्या वर्षी मे मध्ये नवीन सरकार आले होते, या डिसेंबरपर्यंत कोणाला काही सुचले नाही. आता निवडणुकीचे काही निकाल लागलेले आहेत, त्याचाही काही संदर्भ आहे का याची शंका येते.

मी आज आणखी एका मुद्याकडे वळू इच्छितो. १२५ व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने १४ एप्रिल हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन साजरा करण्याचे ठरविले आहे ही स्तुत्य बाब आहे. उशीरा केली तरी ही चांगली गोष्ट आहे. पण या दिनाचे नाव काय दिले आहे. याबाबत पुन्हा चिंता वाटते. मागचा अनुभव लक्षात घेता कधी काय घडेल याबाबत आम्हाला सावध राहणे भाग आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने ठराव केला की, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन साजरा करण्यात येईल. या दिवसाला बंधुता व समरसता असे नाव दिले. समरसता म्हणजे काय? केंद्रीय मंत्रिमंडळाची इंग्रजी कॅबिनेट नोट आपण वाचली तर त्यामध्ये देखील समरसता शब्द तसाच लिहिला आहे. समरसताचे भाषांतर कोणालाच माहिती नाही. समरसता शब्दाबाबत समोरच्या बाकावरील सदस्यांना चांगलेच माहिती आहे. राष्ट्रीय बंधुत्व समरसता दिन. समरसता ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एक लाडकी कल्पना आहे. आपणास माहिती आहे की, समरसता शब्दावर भर दिला जातो. समरसता शब्दाचा अन्वयार्थ काय आहे. सर्व समाजाने एकजीव, एक विचाराने व एक ध्येयी बनून आपले अस्तित्व संपूर्णपणे कोणत्या तरी विचारात समर्पीत करावे. तो कोणता

विचार आहे ? हे समर्पित करण्याचा विचार व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरोधात आहे. घटनेमध्ये सर्वात महत्त्वाचे तत्त्व व्यक्तिस्वातंत्र्याचे आहे. त्यामुळे समरसतेमध्ये मानवी व्यक्तिस्वातंत्र्याची आहुती देण्याची संकल्पना आहे. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य रहात नाही. कोणत्या तरी विचार प्रणालीला समीत होण्याची कल्पना आहे. तो विचार कशा प्रकारे साजरा केला जातो हे आपणा सर्वांना माहिती आहे. म्हणून स्वतंत्र आचार-विचार करावयाचा नाही. परंतु नेता सांगेल किंवा कोणीतरी सांगेल की, हा विचार आहे. त्याला समर्पित व्हायचे, ही धोकादायक संकल्पना या शब्दामध्ये आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने हा दिवस साजरा करावयाचे ठरविले असले त्याचे याचे मी स्वागत करतो. पण यामधील समरसतेची संकल्पना आम्हाला बिलकुल मान्य नाही. फ्रेंच रिव्हेल्युशनपासून अनेक शब्द आहेत. ते आपण आचरणात व अंमलात आणतो. पण समरसता काय भानगड आहे ? मला येथे धोक्याचा इशारा द्यावयाचा आहे की, मूलभूत मानवी अधिकार आणि मानवी स्वातंत्र्य ही मूलभूत कल्पना आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तीन उदात्त मूल्ये आहेत. आपण ती निश्चित स्वीकारली आहेत. तेच मूलभूत शब्द आपणास अबाधित ठेवावे लागतील. यामध्ये आपणास कोणताही बदल करून चालणार नाही. आपल्या लोकशाहीमध्ये तीन स्तंभ म्हणजे कार्यपालिका, न्यायपालिका व कायदेमंडळ आहे. या तिन्ही स्तंभांची अधिकारकक्षा ठरवून दिलेली आहे. या अधिकारकक्षेत एकाने दुसऱ्यावर अतिक्रमण करू नये. याला डॉक्ट्रीन ऑफ सेप्रेशन ऑफ पॉवर्स असे म्हटलेले आहे. त्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे, याच्या अधिकारामध्ये अंतर असले पाहिजे. एकमेकांनी एकमेकांच्या अधिकारावर अतिक्रमण करू नये. अशी मूलभूत कल्पना आपल्या लोकशाहीचा व घटनेचा आत्मा आहे. आज आपण पाहतो की, कार्यपालिकेचे अधिकार, कार्यपालिकेतील संस्थांचे अतिक्रमण कायदेमंडळावर व निवडून आलेल्या लोकांवर चाललेले आहे. सरकारजवळ असलेल्या संस्थांचा वापर करून विरोधी पक्षाला नामशेष करण्याचे प्रयत्न चाललेले आहेत. काही उदाहरणे आपण पहा पहिल्यांदा मी सीबीआय या संस्थेचा २-३ वर्षे दिल्लीमध्ये मंत्री होतो. सीबीआय ही आपल्या देशातील महत्वाची संस्था आहे. मात्र त्यांना काम करू दिले जात नाही. आमच्याही वेळेला अडचणी होत्या. सीबीआयकडे १० हजार खटले इन्व्हिस्टीगेट करून तयार आहेत. कोर्ट नाहीत म्हणून त्या खटल्याचा निकाल लागत नाही. तरीपण सीबीआयकडे नवनवीन काम दिले जात आहे. यातून काय झाले आहे, सीबीआयचा कसा वापर केला जातोय ? लोकांनी निवडून दिलेले मुख्यमंत्री श्री. विरभद्र सिंग यांच्या घरावर छापे टाकले जातात. दिल्लीचे मुख्यमंत्री श्री. अरविंद केजरीवाल यांच्या ऑफीसमध्ये छापे टाकले जातात. गोव्याच्या मुख्यमंत्र्यांचे काय झाले आहे ते आपण पाहिले आहे. एवढेच नव्हे तर काँग्रेस पक्षाच्या नेत्याला नामोहरण करण्याकरिता माजी वित्तमंत्री चिदंबरम यांच्या चिरंजीवाच्या कार्यालयात छापे टाकले गेले. राजस्थानचे माजी मुख्यमंत्री श्री. अशोक गहलोत यांच्यावरही छापे टाकले गेले. त्यांच्यावरही सीबीआयचा खटला भरला गेला आहे. ज्येष्ठ नेते, सचिन पायलट व आमच्या प्रदेशाध्यक्षांवरही सीबीआयचा खटला दाखल केला आहे. वायलार रवी यांच्या पुत्रावर सीबीआयचा खटला दाखल आहे. तसेच, काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी व राहूल गांधी यांना कशा प्रकारे अडकविता येईल, याबद्दल प्रयत्न चाललेले आहेत.

अध्यक्ष महोदय, घटनेचा आत्मा काय म्हणतो ? कार्यपालिकेचे स्वतःचे असे एक अधिकारक्षेत्र आहे. विधायकांचे स्वतःचे असे एक अधिकारक्षेत्र आहे. घटनेमध्ये राजकीय पक्षांनाही मान्यता दिलेली आहे. विरोधकांना नामोहरम करण्याकरिता पाशवी अधिकारांचा वापर होऊ लागला तर निश्चितपणे डॉ. बाबासाहेब

ज्या संविधानाची संकल्पना मांडली होती. ती घटना देशामध्ये अस्तित्वात रहाणार नाही. आज घटनेचा बचाव करण्याकरिता घटना बचाव समिती गठित करण्याची वेळ आलेली आहे. तसेच, घटनेचा बचाव करण्याकरिता आंदोलने देखील पूर्वीच्या काळात झालेली आहेत. आज देशात घटनेमध्ये मूलभूत बदल करण्यासंबंधीच्या दररोज नवनवीन कल्पना सूचत आहेत. मला या माध्यमातून निश्चितच या घटनांचा विरोध व निषेध करावयाचा आहे. आपल्या देशाच्या घटनेला व लोकशाहीला अधिक मजबूत करावयाचे असेल तर विचार मांडून त्यांचे आदान प्रदान करणे आवश्यक आहे. दडपशाही व हुकूमशाहीच्या आधारे देश चालवायचा प्रयत्न केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाची घटना समृद्ध करण्याचा प्रयत्न केला त्याचे काय होईल याचाही विचार होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, घटनेसंदर्भात मी एक बाब जी घटना समितीमध्ये उद्‌धृत केली गेली होती, त्याचा उल्लेख करू इच्छितो. " घटना कितीही चांगली असली तरीही अंमलात आणणारे लोक चांगले नसतील तर त्याला काही अर्थ राहत नाही. या उलट घटना कितीही वाईट असली तरीही अंमलात आणणारे लोक जर चांगले असतील तर ती घटना चांगले काम करू शकेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीमध्ये उद्‌धृत केलेले वाक्य आहे. "I feel, however good a constitution may be, it is sure to turn out bad because those who are called to work it, happen to be a bad lot. However bad a Constitution may be it may turn out to be good if those who are called to work it, happen to be a good lot. The working of a Constitution does not depend wholly upon the nature of the Constitution." आज तशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे की काय अशी चिंता आम्हाला वाटत आहे.

अध्यक्ष महोदय, आज देशामध्ये असहिष्णूतेचा मुद्दा उपस्थित झालेला आहे. आज एका विशिष्ट विचारांचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे. याच कारणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारावा लागला होता. त्यावेळी निर्माण झालेल्या असहिष्णूतेमुळे त्यांना हा निर्णय घ्यावा लागला होता. म्हणून आज तसेच असहिष्णूतेचे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न चालू आहे. या विरोधात निकराची लढाई आपल्यासारख्या स्वातंत्र्यप्रेमी राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांना करावी लागणार आहे. आज देशात काय घडते आहे? आज अशा प्रकारचे असहिष्णूतेचे वातावरण देशामध्ये का निर्माण झालेले आहे? याचाही विचार करणे आवश्यक आहे. पुरस्कार परत करून लोक नाराजी व्यक्त करीत आहेत. यावर असे म्हटले जाते की, भारतीय जनता पक्षाचे राज्य आहे म्हणून मुद्दाम राजकारण करण्याकरिता पुरस्कार परत केले जात आहेत. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. यापूर्वी बीजेपीचे राज्य केंद्रात नव्हते का? माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी हे भारतीय जनता पक्षाचे नेते देशाचे पंतप्रधान नव्हते का? त्यांच्या कारकिर्दीत गोध्रासारखी भयानक घटना घडली होती. परंतु त्यावेळी कोणीही पुरस्कार परत केले नाही. त्यावेळी असहिष्णूतेचे वातावरण निर्माण झाले, असे म्हटले जात नव्हते. देशाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी या गोध्रा घटनेचा निषेध नोंदविला होता. त्यांनी त्यावेळी राजधर्माचे पालन करून त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी घोषणा केली होती. गोध्रा घटना घडल्यानंतरही जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला होता. देशाध्ये जरी एखादी घटना घडली तरीही

देशाचे पंतप्रधान योग्य विचार करीत आहेत, असा विश्वास जनतेला होता. हे खरे आहे की, माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे पक्षामध्ये बहुमत नव्हते. त्यांचे कोणीही ऐकत नव्हते. त्यावेळी ते घडू दिले नाही. त्यामुळे त्यांच्याबाबत जनतेमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला. देशावर राज्य करणारे पंतप्रधान महोदय योग्य विचार करीत आहेत. आज अनेक अप्रिय घटना घडलेल्या आहेत. त्याचा उल्लेख मी आता करणार नाही, त्या सर्वांना माहिती आहेत. तरीही त्याचा निषेध सर्वोच्च पातळीवरून व्यक्त केला गेलेला नाही. यामुळे देशामध्ये असहिष्णूतेचे वातावरण वाढत आहे. हा एक विशिष्ट विचार पुढे ढकलण्याचा प्रयत्न किंवा छुपा अजेंडा तर नाही ना? अशी भिती आज आमच्यासारख्याच्या मनात आहे. फिल्म कलाकार व अनेक कलाकारांनी आपापला उद्वेग बोलून दाखविला. अनेक नेत्यांनाही वेगळ्या पद्धतीने निषेध नोंदवावा लागला. ते सर्व काही आमच्या पक्षाचे नेते नव्हते. अमेरिकेचे राष्ट्रपती आपल्या देशात पाहुणे म्हणून आले होते. त्यांचे देशात स्वागतच केले गेले. तरीही जातांना त्यांनी इशारा दिला की, 'देशातील विविधता संपविण्याचा प्रयत्न केला जाऊ नये. विविधता हीच भारताची थोरवी आहे.' आपला देश गरीब आहे. आपला देश फार श्रीमंत नाही. भारत देशामध्ये अनेक जातीधर्माच्या व विचारांच्या लोकांना बरोबर घेऊन लोकशाही पद्धतीने राज्य केले जात आहे. हाच या देशाचा सन्मान आहे. आपल्या देशाबरोबर स्वतंत्र झालेल्या इतर देशांमध्ये लोकशाही पद्धती टिकविली गेली नाही. शेजारच्या देशांमध्ये एखाद्या विशिष्ट धर्माच्या हुकूमशाहीचे राज्य, हुकूमशाही, राजेशाही, लष्करी हुकूमशाहीने राज्य चालू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या मजबूत संविधानामुळे भारतात लोकशाही पद्धतीने राज्य चालू आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या कालावधीमध्ये हे संविधान तयार केले गेले. इतर कोणत्याही देशाला जे जमले नाही, ते आपल्या देशामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या संविधानाने करून दाखविलेले आहे. त्याला आज धोका निर्माण झालेला आहे. पूर्वी असे काही करावे लागले नाही कारण असे काही कधी घडले नाही. आज असहिष्णूतेचे वातावरण वाढत आहे. आपल्या राज्यात देखील आपण घेतलेले काही निर्णय पुन्हा तपासण्याची गरज आहे. आज आपल्या राज्यात परकीय गुंतवणूक येत नाही. अनेक दौरे झाले अनेक करार झाले परंतु आज कोणीही आपल्या राज्यात गुंतवणूक करावयाला तयार नाही. लोकांच्या मनात भीती आहे की, कशा प्रकारचे सरकार चाललेले आहे? कोणी काय खायचे, कसा पोशाख करावयाचा याबद्दल सक्ती करावयाला सुरुवात झालेली आहे. यामुळे नागरिकांच्या विचारांच्या व बोलण्याच्या स्वातंत्र्यावर गदा येत आहे. आज राज्यात व देशात भारतीय जनता पक्षाचे राज्य आहे. परंतु मूलभूत ढाँचा जो तयार केलेला आहे. त्याला कोणी हात लावण्याचा प्रयत्न करू नका. जनतेमध्ये प्रक्षोभ होईल. काँग्रेसच्या नेत्यांवर एकएक आक्रमण व्हायला लागलेले आहे. आता जनतेमध्ये जाऊन लढा उभा करावा लागणार आहे. लोकशाहीमध्ये मुद्दाम दंगा व विरोध होऊ द्यावयाचा? असा सरकारचा विचार आहे की काय हे मला समजत नाही. पूर्वी कधीही झाले नव्हते ते आता व्हायला लागलेले आहे. दररोज नवीन बातमी येत आहे. सत्तेचा गैरवापर केला जात आहे. त्यामुळे विरोधी पक्षाला नामोहरम करून त्यांचा आवाज बंद करण्याचे काम चालू आहे.

अध्यक्ष महोदयांना मी सभागृहामध्ये अत्यंत महत्त्वाची चर्चा उपस्थित केल्याबाबत धन्यवाद देत आहे. जनता आजच्या या चर्चेकडे लक्ष लावून बसलेली आहे. या चर्चेचे उद्या राज्यामध्ये पडसाद उमटू शकतात. जनतेला यासंदर्भातील कोणाचे काय विचार आहेत, शासन कशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती कायम ठेवणार आहे, याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे. परंतु त्या स्मृती कोणी बदलविण्याचा व

पुसून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे का? समरसता ही संघाची कल्पना केंद्रीय मंत्रिमंडळ राबवित आहे की काय? अशी चिंता आम्हाला वाटते. अध्यक्ष महोदय, आपण घटनेचे संरक्षक आहात. आपण सर्वांनीच घटनेची शपथ घेऊन कामाला सुरुवात केलेली आहे. आपल्या सर्वांनाच आपल्या देशाची घटना अबाधित ठेवण्याचे काम करावे लागणार आहे. राजकीय मतभेद असू शकतील. मूलभूत लोकशाहीचा आत्मा कोणीही बदलविण्याचा प्रयत्न करू नये, एवढी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

*****



“ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहितांना समाजातील अखेरच्या व्यक्तीला डोळ्यासमोर ठेवून घटना लिहिली. त्यांना केवळ कायदे अभिप्रेत नव्हते तर या घटनेद्वारे कोट्यवधी भारतीयांना त्यांच्या सामाजिक हक्काची जाणीव व्हावी व हक्काचे रक्षण व्हावे, हा एक उद्देश होता आणि हेच त्यांना अभिप्रेत होते. म्हणूनच भारतीय राज्यघटनेचे एक अभ्यासक आणि ज्येष्ठ अमेरिकन विचारवंत श्री. ग्रॅन्डविल ऑस्टीन आपल्या राज्यघटनेला एक सामाजिक दस्तावेज म्हणतात. ”

१७ डिसेंबर २०१५

—श्री. एकनाथ शिंदे [ सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) ]

**श्री. एकनाथ शिंदे** [ सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम)] **:** अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती आणि संविधान या विषयावर सभागृहामध्ये चर्चा ठेवल्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या देशामध्ये परकीयांचे आक्रमण झाले. ब्रिटीशांनी आपल्या देशावर जवळपास १५० वर्षे राज्य केले. ब्रिटीशांविरुद्ध अनेक आंदोलने झाली. परंतु त्याचबरोबर या देशातील अस्पृशांना समानतेचा अधिकार मिळवून देण्यास संघर्ष करणारे एक प्रंचड विद्वान, अभ्यासू नेतृत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रुपाने या देशाने आणि या जगाने पाहिले.

अध्यक्ष महोदय, जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटना म्हणून भारतीय राज्य घटनेकडे पाहिले जाते. स्वातंत्र प्राप्ती नंतर आपण आजही सुदृढ लोकशाहीची फळे केवळ राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच बघायला मिळत आहेत. जगात ब्रिटन, अमेरिका या देशाकडे पाहिले असता, भारताची राज्यघटना सक्षम व सर्वव्यापी आहे. याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ही राज्य घटना तयार करताना घटना समिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्विटझरलँड आदी देशांच्या राज्य पद्धतीचे अवलोकन केले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य घटनेमध्ये एकूण ३९५ कलमांचा व ०८ परिशिष्टांचा समावेश केला आहे. विशेष म्हणजे जगातील इतर देशाच्या राज्यघटनेमध्ये भारतीय राज्य घटनेपेक्षा अत्यंत कमी कलमांचा समावेश आहे. मी उदाहरणा दाखल सांगू इच्छितो की, कॅनडा या देशातील घटनेत १४७ कलमांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलिया देशातील राज्यघटनेत १२८ कलमांचा समावेश आहे, अमेरिकेच्या राज्यघटनेत केवळ ७ आणि सोव्हिएत महासंघाच्या राज्य घटनेत १४७ कलमांचा समावेश आहे. याचाच अर्थ आपली राज्य घटना तयार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व घटना समितीने किती अभ्यास केला, हे या ठिकाणी स्पष्ट होते.

अध्यक्ष महोदय, घटना समितीची पहिली बैठक ०९ डिसेंबर १९४६ रोजी झाली होती. त्यावेळी स्वतंत्र भारताच्या घटनेचा मसुदा तयार करण्याचे काम २ वर्षे ११ महिने व १७ दिवसात पूर्ण केले. घटना स्वीकृत करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे भाषण केले ते आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. बाबासाहेबांनी म्हटले आहे की, आम्ही तयार केलेली राज्य घटनेमध्ये काही नवीन नाही. अपुऱ्या अभ्यासामुळे इतर देशांच्या घटनांची नक्कल करण्यात आली असे आरोप झाले असले तरी सुद्धा मसुदा समितीने आपली जबाबदारी पार पाडताना आंधळी नक्कल आणि गुलामी वृत्तीचे अनुकरण केले नाही. बाबासाहेबांचे हे वाक्य किती योग्य होते, याचा प्रत्यक्ष अनुभव या देशाचा कारभार लोकशाही मार्गाने आपण सुरू ठेवलेला आहे, त्यावरुन दिसून येते.

अध्यक्ष महोदय, या राज्य घटनेत मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्व, संसदीय शासन प्रणाली, संघराज्यात्मक पद्धती आणि कायद्याचे राज्य, इत्यादी तत्त्वाचा समावेश करण्यात आला आहे. बाबासाहेबांनी भारताला अशी घटना दिली की, जिने या देशातील कोट्यावधी जनतेला दिलासा दिला. एक अतूट विश्वास दिला की, या देशात कोणावरही जात, धर्म, भाषा व पंथ, तसेच गरीब, श्रीमंत भेदाभेद आणि अशिक्षितपणामुळे कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही आणि हा विश्वासच या देशाला एकसंघ ठेवण्यासाठी कारणीभूत ठरला. समता, बंधुता या तत्त्वावर या घटनेची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे या देशात हिंदु,

मुस्लीम, शिख, इसाई, जैन, बौद्ध आणि इतर धर्मीय जनता गुण्या गोविंदाने रहात आहे. शेकडो जाती जमाती, पोट जाती, भाषा, प्रांत, संस्कृती याने नटलेल्या या भारताला एकसंघ ठेवण्यास महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुमोल योगदान आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहितांना समाजातील अखेरच्या व्यक्तीला डोळ्यासमोर ठेवून घटना लिहिली. त्यांना केवळ कायदे अभिप्रेत नव्हते तर या घटनेद्वारे कोट्यवधी भारतीयांना त्यांच्या सामाजिक हक्काची जाणीव व्हावी व हक्काचे रक्षण व्हावे, हा एक उद्देश होता आणि हेच त्यांना अभिप्रेत होते. म्हणूनच भारतीय राज्य घटनेचे एक अभ्यासक आणि ज्येष्ठ अमेरिकन विचारवंत श्री. ग्रॅन्डविल ऑस्टीन आपल्या राज्य घटनेला एक सामाजिक दस्तावेज म्हणतात.

अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते. आपल्याला प्रामुख्याने माहिती आहे की, ते दलितांच्या, अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारे एक थोर समाजसुधारक तसेच ते निष्णात असे अर्थतज्ज्ञ होते. अर्थशास्त्रामध्ये डॉक्टरेट मिळविण्यासाठी परदेशी गेलेले ते पहिले भारतीय होते, हे ही या ठिकाणी मुद्दाम सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीच्या बैठकीमध्ये मसुदा समितीचे अध्यक्षीय भाषण केल्यानंतर श्री. फ्रँक ॲन्थोनी, श्री. कृष्णचंद्र शर्मा, श्री. टी. टी. कृष्णामाचारी, श्री. विश्वनाथ दास, श्री. काजी करिमुद्दीन, डॉ. पंजाबराव देशमुख तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी डॉ. बाबासाहेबांचे अभिनंदन करून त्यांच्या ज्ञानाला, धैर्याला, विद्वत्तेला सलाम केलाच परंतु त्यांनी असेही म्हटले की, बाबासाहेबांचे नाव भविष्यात महान घटनाकार म्हणून घेतले जाईल, असा अशावादही त्यावेळी व्यक्त केला.

अध्यक्ष महोदय, आज भारताच्या अर्थव्यवस्थेचे नियमन करणारी रिझर्व्ह बँक देखील बाबासाहेबांच्या कल्पनेतूनच साकार झालेली आहे. म्हणून याचीही नोंद आपण सर्वांनी घेतली पाहिजे. एक माणूस आपल्या आयुष्यात असे काही काम करून जातो की, येणाऱ्या कित्येक पिढ्या त्याची फळे चाखतात, हे डॉ. बाबासाहेबांच्या कामावरुन स्पष्ट झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, आज आपल्यासमोर शेतकऱ्यांचा प्रश्न आवासून उभा आहे. त्याचवेळी भारताला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल तर औद्योगिकीकरणाला चालना देण्याची गरज आहे. म्हणून यामध्ये सुवर्णमध्य कसा साधायचा हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पन्नासच्या दशकात सांगितले होते. भारत हा कृषी प्रधान देश आहे, असे केवळ तोंडाने न म्हणता शेती हा येथील प्रमुख उद्योग मानून त्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली पाहिजे, शेतीला चालना दिली पाहिजे, असे त्यांचे मत होते. या बाबीचे अनुकरण केले असते, तर गेल्या सहा दशकापासून झालेली शेतीची दुरावस्था आज दिसली नसती.

अध्यक्ष महोदय, लोकसभेत देखील अनेक नेत्यांनी बाबासाहेबांबद्दल आपली मत व्यक्त केली आहेत. या देशाचे प्रधानमंत्री माननीय श्री. नरेंद्रजी मोदी साहेबांनी देखील बाबासाहेबांचा उल्लेख केला की, बाबासाहेबांनी आयुष्यभर हालअपेष्टा भोगल्या, कमालीची अवहेलना, कमालीची उपेक्षा सहन केली. परंतु या देशाची घटना लिहित असताना त्यांनी मनात कटुता न ठेवता फक्त आणि फक्त देशाच्या भल्याचाच विचार केला. आज आपण शुल्लक गोष्टीवरून देखील मनामध्ये आढी ठेवतो आणि एकमेकाला पाण्यात

पहातो. परंतु बाबासाहेबांनी व्यक्तीगत मानापमानापेक्षा देशहित महत्त्वाचे मानले आणि म्हणूनच काश्मीरला कलम ३७० द्वारे विशेष दर्जा देण्यास त्यांचा विरोध होता. त्यावेळेस त्यांनी म्हटले होते की, काश्मिरचे शत्रुपासून रक्षण भारतीय सैनिकांनी करायचे, काश्मिरमध्ये चांगले रस्ते भारताने बांधायचे, काश्मिरला अन्न पुरवठा भारताने करायचा, परंतु काश्मिरबाबत भारत सरकारला कुठलाही अधिकार मिळता कामा नये या तुमच्या प्रस्तावाला पाठींबा देणे म्हणजे भारत व भारतीयांच्या हिताला धक्का लावण्यासारखे आहे. असे बाबासाहेबांनी शेख अब्दुल्ला यांना सांगितले होते. यावरून स्पष्ट होते की, या देशामध्ये समतेबाबत सामाजिक सुधारणांबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समतेच्या मुद्यावरून राजीनामा द्यावा लागला. या सारखे दुर्दैव नाही. या ठिकाणी आपल्या सिद्धांतावर ठाम असलेली व्यक्तीच असे ठोस पाऊल उचलू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाला लाभलेले फार मोठे व्यक्तीमत्व होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठेपण लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान केला आहे. जपान मधील विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिपुतळा उभारणे, मुंबईमधील इंदू मिल येथील १२ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणे, लंडनमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य ज्या घरामध्ये होते ते घर खरेदी करून त्याचे रूपांतर संग्रहालयामध्ये करणे व त्यांच्या आठवणी जतन करणे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे या गोष्टीला प्रत्यक्षात आणून महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सन्मान केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा त्याग, त्यांचा संघर्ष, त्यांची विद्वत्ता, त्यामधून निर्माण झालेले संविधान यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने त्यांचा सन्मान केला पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, पुन्हा एकदा या महामानवास, घटनाकारास, संविधानकारास मी विनम्रपणे आदरांजली अर्पण करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

धन्यवाद !

*****



“ आजच्या या आपल्या प्रणालीत काय महत्त्वाचे आहे? या सभागृहामध्ये बसल्यानंतर सामान्य माणसांचे जे मत आहे, ते या ठिकाणी मत मांडता येते. कार्यपालिकेला त्याकरिता जबाबदार धरता येते. प्रश्नांच्या माध्यमातून कार्यपालिकेचे उत्तरदायित्व सिद्ध करता येते. पुरवणी मागण्या व अर्थसंकल्प अशा आर्थिक प्रस्तावांच्या माध्यमातून कपात सुचविता येते. जी लोकशाही आपण स्वीकारलेली आहे, त्या लोकशाहीमध्ये कार्यपालिकेला उत्तरदायित्वाचा सामना करावा लागतो. हे जे तत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेले आहे, त्यामुळेच या सभागृहामध्ये सामान्यांचा आवाज सत्ताधारी व विरोधी पक्षाला सभागृहात मांडता येतो. सामान्यांनाही हा विश्वास आहे की, आपले प्रश्न विधानसभेपर्यंत पोहोचले की, त्यावर काही ना काही उत्तर मिळू शकते. ”

१७ डिसेंबर २०१५

—श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री

**श्री. देवेंद्र फडणवीस** (मुख्यमंत्री) **:** अध्यक्ष महोदय, आज १७ डिसेंबरचे औचित्य साधून या सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानाच्या संदर्भात चर्चा उपस्थित झाली आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. छगन भुजबळ, श्री. एकनाथ शिंदे, श्री. इम्तियाज जलील, ॲड. राहुल कूल, श्री. अबू आजमी, श्री. बच्चू कडू, श्री. सुभाष पाटील, श्रीमती वर्षा गायकवाड, श्री. शरद सोनवणे, सामाजिक न्याय मंत्री श्री. राजकुमार बडोले यांनी सहभाग घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, मी सामाजिक न्याय मंत्री श्री. राजकुमार बडोले यांचे अभिनंदन करतो की, आजच्या दिवसाचे औचित्य साधून या सभागृहात अशा प्रकारची चर्चा झाली पाहिजे हा मुद्दा त्यांनी आपल्या समोर मांडला. तसेच माननीय अध्यक्ष व माननीय सभापती यांचेही मी आभार मानतो की, त्यांनी तातडीने हा विषय स्वीकारला व आज आपण ही चर्चा येथे करीत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष आपण साजरे करीत आहोत. पण आजच्या दिवसाचे महत्त्व असे आहे की, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीमध्ये पहिले भाषण केले होते. हे भाषण करीत असताना डॉ. जयकरांचे एक भाषण झाले होते. डॉ. जयकरांच्या भाषणामध्ये काही विवादीत मुद्दे आल्यामुळे सभागृह पूर्णपणे तापलेले होते. आणि तेव्हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाचारण करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जयकर यांचा मुद्दा पुढे नेतात की, वेगळ काही मांडतात याची सर्वांना उत्सुकता होती. सभागृहाची परिस्थिती कशा प्रकारची राहील? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोक ऐकतील की नाही? अशा प्रकारची अनेक मते मनात तयार होत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सभेमध्ये उपस्थित झाले. त्यांनी भाषणास सुरुवात करीत असताना सांगितले की, मला वाटले नव्हते की, दुसऱ्या क्रमांकावर भाषणाकरिता मला उभे राहावे लागणार आहे. मला वाटले होते की, माझा क्रमांक भाषणाकरिता उद्याच लागेल. यामुळे भाषणाकरिता जी तयारी करणे आवश्यक होते, ती मी केलेली नाही. तरीदेखील मला आपण संधी दिली याकरिता मी माझे विचार या ठिकाणी मांडत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या पहिल्या भाषणामध्ये जे विचार मांडले ते अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यातील काही भाग पाहिला तर ते असे म्हणतात की, प्रजासत्ताक हा शब्द वादाचा केंद्रबिंदू असल्याचे जाणवते. कारण पूर्वी भविष्यकाळात देशात राज्य कोणाचे राहील यावर बरीच चर्चा झाली होती म्हणून ते म्हणतात की, प्रजासत्ताक हा शब्द वादाचा केंद्रबिंदू जाणवते. " सार्वभौमत्व लोकांमधून निर्माण होते. " या परिच्छेद चार मधील विधानाभोवती हा वाद केंद्रित झालेला आहे. मुस्लिम लीगच्या अनुपस्थितीत सभेने या ठरावावर चर्चा करणे संयुक्तिक होणार नाही, या माझे मित्र डॉ. जयकर यांनी काल उपस्थित केलेल्या मुद्यातून हा वाद निर्माण झाला आहे.

महोदय, या महान देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक भविष्यकालीन संरचनेबद्दल व उज्ज्वल भवितव्याबद्दल माझ्या मनात तिळमात्र देखील शंका नाही. आज आपण राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विभागलेले आहोत, याची मला जाणीव आहे. आपण एक दुसऱ्यांविरुद्ध लढणाऱ्या छावण्यांचा समूह आहोत आणि मी तर यापुढेही जावून हेही मान्य करेन की, बहुशः अशाच छावणीचा मीही एक नेता आहे. परंतु महोदय, हे सर्व खरे असले तरी मला पूर्ण खात्री आहे की, अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार नाही. विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंघ झाल्याशिवाय राहणार नाही. याबद्दल माझ्या मनात कसलीही शंका नाही. आज

जरी मुस्लिम लीग भारताच्या फाळणीसाठी प्रयत्नशील असला तरी एकसंघ भारतच त्यांच्याहीसाठी/ हिताचा आहे, असा विचार स्वतः मुस्लिम एक दिवस करायला लागतील हे सांगतांना मला जराही संकोच वाटत नाही. अंतिम ध्येयाबाबत, माझ्या मते आपल्यापैकी कुणीही भीती बाळगण्याचे कारण नाही. याबाबत कुणालाही शंका असू नये. आपली अडचण ही अंतिम भविष्याबाबतची नाही. आज एकसंघ नसलेल्या समाजातील लोकांनी एकत्रितपणे एकसंघत्वाकडे नेणाऱ्या मार्गाने कसा प्रवास करता येईल. याचा निर्णय घेणे ही आपली खरी अडचण आहे. अजून बरेच मोठे भाषण आहे. पहिल्याच भाषणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभागृहाला जिंकले होते. सभागृहाला कल्पना आली की, जी व्यक्ती मसुदा समितीचा अध्यक्ष आहे, त्या व्यक्तीमध्ये अनन्यसाधारण प्रतिभा आहे. या व्यक्तीचा अनन्यसाधारण अभ्यास आहे. या व्यक्तीमध्ये देशाला दिशा देण्याची ताकद आहे. या संविधान सभेतील त्यांची भाषणे आजही आपल्या सर्वांकरिता पथदर्शी आहे. अशाच एका भाषणात ते म्हणतात की, लोकशाहीतील कार्यपालिकेला दोन अटी पूर्ण कराव्या लागतात ही कार्यपालिका स्थिर असली पाहिजे आणि ही कार्यपालिका उत्तरदायी असली पाहिजे. तथापि या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करू शकणारी प्रणाली दुर्दैवाने आजवर विकसित झालेली नाही. आपल्याला एकतर अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व असलेली प्रणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल. अमेरिकी आणि स्विस प्रणालीमध्ये अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व आहे. याउलट ब्रिटिश प्रणालीत अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य आहे. याचे कारण स्पष्ट आहे.

अमेरिकी प्रणालीतील कार्यपालिका संसदबाह्य आहे. याचा अर्थ असा की, आपल्या अस्तित्वासाठी ही कार्यपालिका काँग्रेसमधील बहुमतावर अवलंबू नसते. परंतु ब्रिटीश प्रणालीतील कार्यपालका संसदेतील बहुमतावर आपल्या अस्तित्वासाठी अवलंबून असते. नेमक्या याच कारणास्तव अमेरिकी काँग्रेस कार्यपालिका बडतर्फ करू शकत नाही. मात्र संसदीय प्रणालीतील सरकारला संसदेतील बहुमत गमावता क्षणीच राजीनामा द्यावा लागतो. या दृष्टीकोनातून पाहता संसदबाहय कार्यपालिका संसदेवर अवलंबून नसल्याने विधिपालिकेप्रती कमी जबाबदार असण्याची प्रवृत्ती आढळते कारण ती संसदेतील बहुमतावर अवलंबून असते. या दोन्ही प्रणालींमध्ये जबाबदारीच्या जाणीवेखेरीज आणखी एक फरक आहे. तो म्हणजे त्यांनी जबाबदारी कशी पार पाडली, याचा लेखाजोखा घेण्याचा आणि तो घेणाऱ्या यंत्रणेचा संसदेतर प्रणालीमध्ये, उदा. अमेरिका हा लेखाजोखा निश्चित कालावधीनंतर घेण्यात येतो आणि तो मतदारांमार्फत घेण्यात येतो. संसदीय प्रणाली असलेल्या इंग्लंडमध्ये कार्यपालिकेचा लेखाजोखा दररोज आणि नियम कालावधीनंतर घेतला जात असतो. दैनंदिन लेखाजोखा संसद सदस्य प्रश्न विचारुन, ठरावांच्या माध्यमातून, अविश्वास ठराव, स्थगन प्रस्ताव आणि भाषणांवरील चर्चेच्या द्वारे घेत असतात. नियतकालिक लेखाजोखा मतदार निवडणुकांच्या माध्यमातून दर पाच वर्षांनी किंवा त्यापूर्वी घेत असतात. अमेरिकेत अस्तित्वात नसलेला जबाबदारीचा दैनंदिन लेखाजोखा अधिक प्रभावी मानला जातो आणि भारतासारख्या देशाला जास्त गरजेचा समजण्यात येतो. प्रस्तावित घटनेत कार्यपालिकेसाठी संसदीय प्रणालीची शिफारस करतांना अधिक स्थैर्यापेक्षा अधिक उत्तरदायित्साला पसंती देण्यात आली आहे.

आजच्या या आपल्या प्रणालीत काय महत्त्वाचे आहे? या सभागृहामध्ये बसल्यानंतर सामान्य माणसांचे जे मत आहे, ते या ठिकाणी मत मांडता येते. कार्यपालिकेला त्याकरिता जबाबदार धरता येते. प्रश्नांच्या

माध्यमातून कार्यपालिकेचे उत्तरदायित्व सिद्ध करता येते. पुरवणी मागण्या व अर्थसंकल्प अशा आर्थिक प्रस्तावांच्या माध्यमातून कपात सुचविता येते. जी लोकशाही आपण स्वीकारलेली आहे, त्या लोकशाहीमध्ये कार्यपालिकेला उत्तरदायित्वाचा सामना करावा लागतो. हे जे तत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेले आहे, त्यामुळेच या सभागृहामध्ये सामान्यांचा आवाज सत्ताधारी व विरोधी पक्षाला सभागृहात मांडता येतो. सामान्यांनाही हा विश्वास आहे की, आपले प्रश्न विधानसभेपर्यंत पोहोचले की, त्यावर काही ना काही उत्तर मिळू शकते. घटनेच्या स्वरूपाबाबत बोलतांना सांगितले की, इतिहासाला दोन प्रमुख प्रकारच्या घटना ज्ञात आहेत. एकात्मिक आणि संघराज्यात्मक. एकात्मिक घटनेची दोन वैशिष्टये आहेत. मध्यवर्ती राज्यसत्तेचे सर्वश्रेष्ठत्व आणि दुय्यम राज्यसत्तांच्या सार्वभौमत्वाचा अभाव. याउलट संघराज्यात्मक घटनेची दोन वैशिष्टये म्हणजे मध्यवर्ती राज्यसत्ता आणि दुय्यम राज्यसत्ता यांचे सहअस्तित्व आणि प्रत्येक सत्ता आपापल्या निर्देशित क्षेत्रात सार्वभौम असणे. हा विषय त्यांनी ओळखला होता की, हा जो देश आहे तो अनेक प्रांत व भाषा यामध्ये विखुरलेला आहे. अनेकतामधील एकता ठेवायची असेल तर आपल्याला केवळ युनिटरीकरिता आवश्यकता असलेले केंद्र सरकार तयार करून चालणार नाही. आपल्याला या ठिकाणी संघराज्य तयार करावे लागेल. पण संघराज्यांची संकल्पना सांगतांना ते म्हणतात की, संघराज्यामध्ये एका संघातील वेगवेगळे राज्य आहेत, त्यांचे अस्तित्व वेगळे असले तरीदेखील ते एक आहेत. यात त्यांचे सह अस्तित्व महत्त्वाचे आहे. आज ते वेगळे असूनही सह अस्तित्वातुळे एकमेकासोबत राहत आहेत. म्हणून ही अतिशय सुंदर रचना त्यांनी केलेली आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेच्या संदर्भात ते असे म्हणाले होते की, एखादे राज्य किंवा निवासी यांना देत असेलेले अनेक अधिकार अनिवासिंना कायदेशिररित्या नाकारू शकते, अथवा नाकारते किंवा निवासीपेक्षी अधिक कठोर अटी लादून अनिवासिंना उपलब्ध करते. राज्यातील नागरिकांना देण्यात येणारे हे लाभ राज्य नागरिकत्वाचे खास अधिकार असतात. एकंदरीत पहाता राज्याचे नागरीक आणि इतरांच्या अधिकारात बरीचशी तफावत असते. फिरस्ता व तातपुरता रहिवाशी प्रत्येक ठिकाणी हा खास अनुभव अनुभवतो. म्हणून प्रस्तावित राज्यघटनेत दुहेरी राज्यसत्ता असून, त्यामध्ये एकच नागरिकत्व आहे. राज्यसत्ता दुहेरी आहे. अमेरिका आणि आमच्यातील फरक काय आहे ? तो देशाचा आणि राज्याचाही नागरिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, एकाच भूखंडावर एक इमारत असावी, तिच्या भोवती अनेक छोट्या इमारती असाव्यात आणि या सर्व इमारती परस्परांपासून भिन्न दिसाव्यात तसेच मध्यवर्ती अथवा राज्य सरकार यांचे आहे. आपल्या देशामध्ये वेगवेगळी राज्ये असली तर त्या राज्यांचे अस्तित्व राहिल. पण नागरिकत्व मात्र एकच राहिल. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला देशाच्या अंतर्गत जे अधिकार आहेत, ते कोणत्याही प्रांतात सारखेच राहतील. तो एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात गेला तरी देखील त्याचे अधिकार हे मौलिक अधिकारांमध्ये टाकलेले आहेत.

प्रस्तावित भारतीय घटनेत दुहेरी राज्यसत्ता असून त्यामध्ये एकच नागरिकत्व देण्यात आलेले आहे. संपूर्ण भारतासाठी एकच नागरिकत्व असणार आहे. ते भारतीय नागरिकत्व असेल, राज्य नागरिकत्व ठेवण्यात आले नाही. प्रत्येक भारतीयाला तो कोणत्याही राज्याचा निवासी असला तरी, नागरिकत्वाचे समान अधिकार आहेत. त्यांचे हे संपूर्ण भाषण खरे पाहता रेकॉर्डवर येण्याची आवश्यकता आहे. पण त्यातील काही मुद्दे हे निश्चितपणे मी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. ते संघराज्याच्या संदर्भात असे म्हणतात की, इतर संघ राज्यांपेक्षा वेगळेपण दाखविणारे आणखी एक प्रस्तावित भारतीय राज्यघटनेत संघ राज्यात आहेत.

एखादे संघ राज्य स्वाभाविकता स्वतंत्र विधि पालिका, कार्य पालिका आणि न्याय पालिका यांच्या अधिकार विभाजनामुळे कायदे, प्रशासन आणि न्यायिक संरक्षण याबाबतीत विविधता पूर्ण असते. एका मर्यादेपर्यंत या वैविध्यामुळे फरक पडत नाही. स्थानिक गरजा आणि स्थानिक परिस्थिती यांच्यानुसार सरकारचा सत्ता वापरण्याचा प्रयत्न म्हणून त्याचे स्वागतही करता येईल. परंतु, ही विविधता एका मर्यादेपलीकडे गेल्यास निर्णायकी निर्माण करू शकते आणि अनेक संघ राज्यांमध्ये असा गोंधळ निर्माण झालेला आहे. भारतात २० राज्ये निर्माण झाली आणि विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, कौटुंबिक नातेसंबंध, करार, हानी, गुन्हे, वजन आणि मापे, धनादेश आणि बिले, बँकिंग आणि वाणिज्य आदिंबाबत २० वेगवेगळे कायदे केले, न्याय मागण्याच्या २० प्रक्रिया निर्माण झाल्या आणि २० प्रशासकीय पद्धती असल्या तर काय गोंधळ माजेल याचा केवळ विचार करता येत नाही, यामुळे केवळ राष्ट्रच दुर्बल होत नसून एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थालंतरन करण्याबाबत नागरिकांमध्ये असहिष्णुता तयार होते. कारण एका राज्यात कायदेशीर असणारी बाब दुसऱ्या राज्यात बेकायदा असल्याचे त्याला आढळते. घटनेच्या मसुद्याने साधने व पद्धती यांची एकात्मता आणण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या योगे भारतात केवळ एकच संघ राज्य असेल आणि देशाचे एक्य टिकविण्यासाठी आवश्यक मूलभूत बाबींमध्ये समानता असेल. मसुदा समितीने याबद्दल तीन साधनांचा अवलंब केलेला आहे. सुप्रीम कोर्ट, उच्च न्यायालय आणि खालची न्याययंत्रणा ही एकच आहे. दिवाणी आणि गुन्हेगारी विषयक मूलभूत कायद्यांमध्ये समानता आणि महत्वांच्या पदांची जबाबदारी सांभाळण्यासाठी सामुहीक अखिल भारतीय नागरी सेवा आहे. ज्यावेळी आमचे स्ट्रक्चर फेडरल केले, त्यावेळी केंद्र मजबूत असले पाहिजे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. त्याच वेळी राज्यांना अधिकचे अधिकार मिळाले पाहिजे, म्हणून आपल्या राज्यघटनेला युनिटरी तर म्हणता येत नाही पण फेडरलपेक्षा ती क्वॉसी फेडरल आहे. त्यामुळे इतर फेडरेशनपेक्षा वेगळ्या प्रकारचे अधिकार आपल्या राज्याला राज्यघटनेने दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, आज सभागृहात राज्यघटना कशी तयार केली याची चर्चा केली जात आहे. जगामध्ये भारत देशातील राज्य घटना ही फार मोठी आहे. राज्यघटनेत ४४८ कलमे, १२ परिशिष्टे आणि १०५ जास्त घटना दुरुस्त्या आहेत. जगातील सगळ्यात मोठी राज्यघटना ही भारत देशात तयार झालेली आहे. जवळ जवळ २ वर्षे ११ महिने १७ दिवस इतक्या काळात संविधान सभेचे काम चालले होते. एकेका परिच्छेदावर चर्चा झालेली आहे. त्यामुळे किती विचारपूर्वक संविधान केलेले आहे, हेच यावरून दिसून येत आहे. देशापुढील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर शोधण्याकरिता कोणत्याही तज्ज्ञांकडे जाण्याची आवश्यकता नाही. देशापुढील सर्व प्रश्नांची उत्तरे या संविधानामध्ये दडलेली आहेत. ती ताकद आणि शक्ती संविधानाने आपल्याला दिलेली आहे. जगात पहिली राज्यघटना इ.स. पूर्व २३०० साली तयार झाली. त्यानंतर तयार झालेली भारतीय राज्यघटना परमोच्च बिंदू आहे. या माध्यमातून एकात्मता कशा प्रकारे आपण निर्माण करू शकतो याचा विचार झालेला आहे. काही सन्माननीय सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भाषणात असे म्हणाले होते की, या राज्यघटनेत नवीन काय आहे? १९३५ चा कायदा आहे. यामधील काही गोष्टींचा त्यात अंतर्भाव केलेला आहे. त्यानंतर काही सन्माननीय सदस्यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही फ्रान्सच्या राज्यघटनेतून घेण्यात आलेली आहे. संसदीय राज्यपद्धत ही ग्रेट ब्रिटनमधून घेतली. मूलभूत हक्क हे अमेरिकेकडून घेण्यात आलेली आहे. अशी वेगवेगळी मते सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून व्यक्त केलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, १०० वर्षापेक्षा अधिक काळ विविध देशांच्या घटना तयार करण्यासाठी गेलेल्या आहेत. या विविध देशांच्या घटनेत जे काही चांगले आहे ते घेण्याकरिता लाज कशाला वाटली पाहिजे. आमच्या संस्कृतीने वेळोवेळी जगातील चांगले स्वीकारलेले आहे. राज्यघटना तयार करताना जगात जे चांगले आहे, ते आम्ही स्वीकारले आहे. पण हे आम्ही अंधतेने स्वीकारलेले नाही. हे स्वीकारत असताना त्यामागे तत्त्व काय आहेत, ती आम्ही समजून घेतली आणि त्यातील कोणती तत्त्वे या देशाला, समाजाला आणि समाज व्यवस्थेला लागू होतील, अशी तत्त्वे आम्ही समजून घेतली आणि त्या तत्त्वांच्या आधारावर त्या गोष्टींची स्वीकृती आम्ही केलेली आहे. म्हणून खऱ्या अर्थाने सामान्य माणसाला या राज्यघटनेने अधिकार दिले आहेत. संधीची समानता आपल्याला का दिली? कारण या देशामध्ये खूप मोठा समाज वंचित होता. अशा प्रकारच्या वंचित समाजाला खूप वर्षानुवर्षे, दशकानुदशके, शतकानुशतके भेदभावाला सामोरे जावे लागले होते. ज्याला मिळाले आहे आणि ज्याला मिळाले नाही यांच्यात असमानता ठेवली असती तर ज्यांना मिळाले आहे तेच पुढे गेले असते आणि ज्यांना मिळाले नाही असे कधीच पुढे गेले नसते. म्हणून राज्यघटनेच्या माध्यमातून आरक्षणाचे तत्त्व स्वीकारले आहे. ते तत्त्व अतिशय महत्वाचे आणि वैद्यानिकदृष्ट्या अशा प्रकारचे सायंट्रैफिक तत्त्व आहे. तत्त्वाच्या आधारावर आरक्षण देत असताना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक या चारही बाबींवर ज्यांचे मागासलेपण होते, अशांना आपण पहिल्यांदा आरक्षण दिलेले आहे. एस.सी, एस.टी, प्रवर्ग ज्यामध्ये सांस्कृतिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा आहे, अशा प्रकारच्या सर्व लोकांना आपण आरक्षण दिले. या माध्यमातून लेव्हल प्लेईंग फिल्ड तयार करण्याचा प्रयत्न केला. आपण एन्शुअर्ड केले आहे की, सर्वांना संधीची समानता मिळू शकेल. समान फिल्डवर समान संधी आपण देऊ. आपल्याकडे एका बाजूला वर्षानुवर्षे अत्याचारामध्ये खितपत पडलेले लोक आहेत तर दुसऱ्या बाजूला वर्षानुवर्षापासून ज्यांना सर्वच काही मिळालेले आहे, असे लोक आहेत. या दोघांना एकाच पारड्यामध्ये ठेवून पुढे जाणे शक्य होणार नाही. आज जे तत्त्व आपण स्वीकारले आहे. त्याचा हळूहळू आपल्याला परिणाम दिसून येत आहे. आपल्याला आता पहायला मिळत आहे की, अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये ओपन कॅटेगरीमधील पहिले मेरीट व एस.टी, ओबीसी प्रवर्गातील पहिले मेरीट यामध्ये केवळ १ ते २ टक्क्यांचा फरक राहिला आहे. जे तत्त्व आपण स्वीकारले, त्या तत्त्वाचा हळूहळू समाजामध्ये परिणाम होत असल्याचे दिसत आहे. त्याची फळे आता आपल्याला दिसू लागली आहेत. मात्र अजूनही आपल्याकडे मोठ्या प्रमाणात सामाजिक भेदभाव आहे. आपल्याला सर्वांना संधी द्यावयाची आहे. समाजातील मोठा वर्ग आजही वंचित आहे. जो पर्यंत समाजातील वर्ग वंचित आहे, तो पर्यंत हे तत्त्व आपल्याला स्वीकारावेच लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्यांदा ५० वर्षाकरिता आरक्षण ठेवले होते. संसदेमध्ये माननीय श्री. वाजपेयी यांचे सरकार होते त्यावेळी आरक्षणाच्या संदर्भात आढावा घेण्यात आला. त्या वेळी सगळ्यांमध्ये एकमत झाले की, आज आपला समाज मोठ्या प्रमाणात वंचित आहे. त्यांच्या करिता सामाजिक आरक्षण ठेवले पाहिजे. अशा प्रकारे आरक्षणाला मुदत वाढ देण्याचे काम वाजपेयी सरकारने केले. जो पर्यंत समाजातील एकही व्यक्ती भेदभावग्रस्त आहे तो पर्यंत हे आरक्षण आपल्याला ठेवावेच लागेल, ते ठेवलेच पाहिजे. त्याशिवाय आपला देश पुढे जाऊ शकणार नाही, हे आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज या ठिकाणी संविधानाच्या संदर्भात चर्चा केली जात आहे. या चर्चेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व देखील सदनासमोर आले. मला डॉ. आंबेडकरांच्या लंडनस्थित घराच्या लोकार्पणाच्या निमित्ताने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे जाण्याची संधी मिळाली. तेथे गेल्या नंतर मी तेथील प्राध्यापकांना भेटलो. त्यांनी आम्हाला सांगितले की, आमच्या येथील रेअर व रेव्हर्ट स्कॉलर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. यांनी त्या काळात घेतलेले शिक्षण, त्यांनी लिहिलेले प्रबंध हे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये आजही रेफर केले जातात. त्यांनी आम्हाला सहर्ष सांगितले की, आम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने रिसर्च फेलोशिप व चेअर तयार करावयाची आहे. आम्ही देखील त्यांना सहर्ष सांगितले की, याकरिता जे काही आर्थिक पाठबळ लागेल ते महाराष्ट्र शासनाकडून दिले जाईल. काय त्या व्यक्तीची बुद्धीमत्ता असेल? असे सांगितले जाते की, एकदा त्यांनी प्रबंध तयार केला होता. त्यांनी हाताने लिहिलेला प्रबंध सादर करण्यापूर्वीच तो हरवला. डॉ.आंबेडकरांनी तो संपूर्ण प्रबंध पुन्हा जसाच्या तसा लिहून काढला. अशी त्यांची स्मरणशक्ती होती. याकरिता त्यांना कोठेही पहावे लागले नाही. डॉ. आंबेडकरांच्या लंडनच्या घराचे लोकार्पण केले, त्यावेळी तेथे एक फोटो होता. त्यामध्ये एक पत्र होते. डॉ. आंबेडकरांनी बॉन विद्यापीठाला पाठवलेले ते पत्र होते. अतिशय सुंदर हस्ताक्षरामध्ये त्यांनी ते जर्मन भाषेमध्ये लिहिले होते. त्यांना जर्मन भाषा देखील अवगत होती. ते अतिशय प्रतिभाशाली व्यक्ती होते. ते एके का गोष्टीचे विवेचन करायचे.

अध्यक्ष महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ यांनी अतिशय चांगली घटना सांगितली. अशा अनेक घटना आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मोठे अर्थतज्ज्ञ होते. खरे म्हणजे त्यांच्या संविधान तयार करण्याच्या कृतीमुळे त्यांनी अर्थतज्ज्ञ म्हणून जे कार्य आहे, त्याचा आपण पाहिजे त्या प्रमाणात गौरव करू शकलो नाही. रूपीच्या कन्व्हर्टेबिलीटी बद्दल अतिशय अधिकारीक भाष्य ज्या माणसाने केले त्या व्यक्तीचे नाव होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. आज कन्व्हर्टेबिलीटी बद्दल आपण बोलत आहोत. या कन्व्हर्टेबिलीटीचा इकॉनॉमिक इम्पॅक्ट काय होईल व भारत हा कशा प्रकारे आर्थिक महासत्ता बनू शकतो या संदर्भात त्यांनी केलेले लिखाण अतिशय पथदर्शी आहे. आपल्या संविधानामध्ये आर्थिक बाबींवर तरतुदी केलेल्या आहेत. त्या एवढ्या चांगल्या आहेत की, कोणत्याही राज्याला ज्याप्रमाणे त्यांनी अधिकार दिले आहेत, त्या प्रमाणे काही जबाबदाऱ्या देखील दिल्या आहेत. देशाने व राज्याने एफआरबीएम कायदा तयार केला. राजकोषीय उत्तरदायित्व विधेयक आपण तयार केले. हे विधेयक तयार करण्याची वेळ केंद्र व राज्य शासनावर कधी तरी येईल, याची कल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना त्या काळात होती. त्याचा उल्लेखही त्यांनी केला व तशी व्यवस्था देखील राज्यघटनेच्या माध्यमातून केली. केंद्र व राज्य शासनाला ज्यावेळी जाणवले की, आपल्या वर बंधन घालून घेतले पाहिजे. त्यावेळी त्यांनी कायद्याच्या माध्यमातून आपल्यावर बंधन घालून घेतले. राज्यघटनेमध्ये आज आपण कदाचित १०० पेक्षा अधिक सुधारणा केल्या असतील. पण राज्यघटनेची मूळ तत्त्वे एवढी मजबूत आहेत, की आपल्या समोरच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर त्यामधून मिळू शकते.

अध्यक्ष महोदय, राज्यघटनेच्या संदर्भात या ठिकाणी बरीच चर्चा झाली. माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी आपले विचार मांडले. मी सन्माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ यांच्या मताशी सहमत आहे.

प्रश्न व उत्तर देण्याची ही आजची वेळ नाही. मात्र तरी देखील काही गोष्टींचा या ठिकाणी खुलासा झाला पाहिजे. सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे की, या राज्यघटनेचे बेसिक स्ट्रक्चर अमेंड होऊ शकत नाही. त्याचा उल्लेख मघाशी सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. वाजपेयी सरकारच्या काळात समिती तयार झाली होती. त्या समितीला स्पष्टपणे सांगण्यात आले होते की, तुम्हाला बेसिक स्ट्रक्चर ऑफ कॉन्स्टिट्यूशन पाहता येणार नाही. खरे तर हे कोणीच करू शकत नाही. याचे कारण असे आहे की, संसदेचे अधिकार हे व्यापक असले तरी केशवानंद भारती केसमध्ये आपल्याला कल्पना आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या १३ जजेसच्या बेंचने या देशातील लोकशाहीकरिता सर्वात पथदर्शी निर्णय दिला आहे. ज्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले आहे, त्यांना माहिती आहे की, केशवानंद भारती केसशिवाय कायद्याचे शिक्षण पूर्णच होऊ शकत नाही. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, राज्यघटनेचे बेसिक स्ट्रक्चर अमेंड करण्याचा अधिकार संसदेला देखील नाही. ती संसद आहे, घटना समिती नाही. घटना समितीने तयार केलेल्या मसुद्यावर संसद तयार झालेली आहे. त्यामुळे बेसिक स्ट्रक्चर ऑफ कॉन्स्टिट्यूशन अमेंड करण्याचा अधिकार संसदेला नाही. त्या नंतर ज्या ज्या वेळी लोकशाहीवर संकट आले, त्या त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती केसच्या आधारे हे संकट दूर करण्याचे काम केले. आपल्याला मी लक्षात आणून दिले पाहिजे की, या देशामध्ये आणिबाणी आली त्यानंतर सन १९७१ मध्ये निवडणुका झाल्या. अलाहाबाद उच्च न्यायालयामध्ये राजनारायण यांनी याचिका केली. त्या याचिकेमध्ये स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांची निवड रद्दबातल झाली. त्यानंतर संसदेमध्ये त्या काळात घटनादुरुस्ती आणून पंतप्रधान, पीठाधीश म्हणजे अध्यक्ष, राष्ट्रपती, उप राष्ट्रपती यांची निवडणूक न्यायालयाच्या कक्षेबाहेर काढण्यात आली. खरे म्हणजे लोकशाहीवर तो पहिला आघात होता. या देशाच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, बेसीक स्ट्रक्चरमध्ये हे बसत नाही. अशाप्रकारे त्यावेळी केलेल्या घटनादुरुस्तीने लोकशाहीचा जो संपूर्ण आत्मा संपवून टाकण्यात आला होता, तो लोकशाहीचा आत्मा माननीय सर्वोच्च न्यायालयाने परत केला. त्यांनी सांगितले की, अशाप्रकारची घटनादुरुस्ती करता येणार नाही. पंतप्रधानांची निवडणूक असो, राष्ट्रपतींची निवडणूक असो, कोणतीही निवडणूक असो, या संविधानाने पंतप्रधानांना संविधानाच्या वरचा दर्जा दिलेला नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारतींच्या केसचा दाखला देऊन डॉक्ट्रिन ऑफ बेसिक स्ट्रक्चरच्या अंतर्गत जी ३९ वी घटना दुरुस्ती केली होती ती रद्दबातल ठरविली.

अध्यक्ष महोदय, घटना दुरुस्ती ४२ मध्ये ३१ (घ) अनुच्छेद टाकण्यात आला होता व त्या माध्यमातून या देशाला एक बंदिशाळा बनविण्यात आले होते. या देशातील लोकशाही संपली होती. या देशातील वेगवेगळ्या विचारांच्या लोकांना मग ते त्यावेळच्या जनसंघाचे असतील, कम्युनिस्ट असतील, सर्व पक्षांच्या लोकांना जेलमध्ये टाकण्यात आले होते. पुन्हा एकदा माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, अशाप्रकारची तरतूद करण्याचा तुम्हाला अधिकार नाही. या देशातील स्वातंत्र्य जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले आहे, ते कुठल्याही घटनादुरुस्तीच्या माध्यमातून तुम्हाला काढून घेता येणार नाही. अशाप्रकारे पहिल्यांदा लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा गळा घोटून जी लोकशाही समाप्त करण्यात आली होती त्या विरुद्ध पहिले लँडमार्क जजमेंट झाले आणि त्यातून जेलमध्ये बंद असलेल्या जवळपास दोन ते अडीच लाख लोकांना सोडण्यात आले. याकरिता या संविधानाची जी काही महती आहे, ती आपण सर्वांनी समजून घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज आम्हाला या ठिकाणी काही गोष्टी सांगण्यात आल्या. भारतीय संविधानाच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने बंधुता आणि समरसता दिवस साजरा करण्यात येतो. समरसता म्हणजे काय, तर एका कोणामध्ये तरी समरस व्हायचे, आपले स्वतःचे अधिकार सोडून द्यायचे. आपल्याला माहिती असेल, लहानपणी आपण हत्ती आणि ९ आंधळ्यांची कथा ऐकली असेल. ज्याच्या हातात शेपटी आली, त्याला हत्ती म्हणजे शेपटी वाटला, ज्याच्या हातात सोंड आली त्याला हत्ती म्हणजे सोंड वाटला, पण तो खरा हत्ती नव्हता. मात्र एखाद्या शब्दाचा विपर्यास करायचे ठरविले तर कितीही केला जाऊ शकतो.

समरसतेचा मूलमंत्र देणारे श्री. बाळासाहेब देवरस यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेमध्ये अतिशय स्पष्टपणे समरसता म्हणजे काय हे सांगताना एकसंघपणे कुठलाही जाती, धर्माचा भेदभाव न करता काम करणे म्हणजे समरसता असे सांगितले आहे. जात, धर्म हा भेदभाव न करता सर्वांनी मी भारतीय आहे, या भावनेतून काम करणे म्हणजे समरसता, समरस व्हायचे आहे ते व्यक्तीमध्ये नाही तर समरस व्हायचे आहे ते देशामध्ये, समरस व्हायचे आहे ते राष्ट्रवादामध्ये, समरस व्हायचे आहे ते या सार्वभौमत्वामध्ये. परंतु, ही समरसता तुम्हाला कशी कळणार? कारण ज्याच्या मनात काळे असते, त्याला ते कधीच कळू शकत नाही. तुम्हाला कळावे म्हणून सांगतो की, या ठिकाणी समरसता याकरिता आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील सर्व लोकांनी, या भारताच्या सार्वभौमत्वामध्ये समरस व्हावे, अशाप्रकारचा विचार व्यक्त केला म्हणून ही समरसता आहे. बंधुता ही त्यांनी सांगितली म्हणून आहे.

अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे मला असे अपेक्षित होते की, आजच्या दिवसाचे औचित्य साधून एक अतिशय उच्च पातळीवरील चर्चा या ठिकाणी होईल. परंतु, दुर्दैवाने या चर्चेमध्ये थोडेसे राजकारण आले. ठीक आहे, काही हरकत नाही.

अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे याचाही काही फार खुलासा करण्याची आवश्यकता नाही परंतु, या चर्चेच्या निमित्ताने सीबीआयचा वापर कसा होतो, येथपर्यंतच्या गोष्टी सांगण्यात आल्या. आता मागच्या काळात सीबीआयचा वापर कसकसा झाला, हे जर मी सांगायला लागलो तर, मग याचा अर्थ काय तर तेव्हा तुम्ही वापर करीत होता आणि आता आम्ही वापर करीत आहोत? एखाद्याच्या विरुद्ध पुरावे मिळाले, त्याच्यावर धाड टाकली तर सीबीआयचा गैरवापर झाला. ज्यांच्या विरुद्ध पुरावे मिळाले नाहीत, त्यांना तुम्ही जेलमध्ये टाकले, तर तो गैरवापर नाही? खरे तर या संदर्भात न बोललेले बरे आहे.

आता या चर्चेच्या निमित्ताने आदरणीय सोनियाजी आणि राहुलजींच्या केसचाही दाखला दिला गेला. या संदर्भात मी हे सांगू इच्छितो की, यात शासनाचा कोणताही हस्तक्षेप नाही. ते कोर्टाचे मॅटर आहे, ते कोर्टाने काढलेले समन्स आहेत, कोर्ट त्यामध्ये जो निर्णय करायचा आहे तो, करेल. परंतु, त्याला या ठिकाणी जोडण्याची आवश्यकता नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी दिलेले संविधान हा आजचा चर्चेचा विषय आहे. या संविधानाने या देशाला खऱ्या अर्थाने एक सर्वोच्च राष्ट्र बनण्याची संधी दिली.

अध्यक्ष महोदय, सहिष्णुता आणि असहिष्णुता हा काय विषय आहे? ज्यावेळी भंडारा जिल्ह्यात एका दलित कुटुंबाला जाळून टाकण्यात येते, त्यावेळी सहिष्णुता, असहिष्णुतेची गोष्ट होत नाही. कोणी पुरस्कार परत करीत नाही? मला कधी कधी आश्चर्य वाटते की, बिहारची निवडणूक झाल्याबरोबर पुरस्कार वापसी

का बरे बंद झाली, याचे काय कारण आहे? ज्यावेळी केरळमध्ये एका प्राध्यापकाचा हात त्याने एक विशिष्ट प्रश्न विचारला म्हणून कापला जातो, तेव्हा कोणाला सहिष्णुता आणि असहिष्णुता आठवत नाही. एक गोष्ट स्पष्टपणे सांगतो. हा देश एकसंघ आहे, कारण या देशातील भारतीयाला सहिष्णुता शिकविण्याची आवश्यकता नाही. आमचे मूळ रक्तच सहिष्णू आहे. आमचा ५ हजार वर्षांचा इतिहास सहिष्णू आहे. जेव्हा जेव्हा जगातून ज्यांना ज्यांना हकलण्यात आले, त्यांना या देशाने जागा दिली. पारशी होते त्यांना बाहेर काढण्यात आले, यहुदी होते त्यांना संपूर्ण जगाने बाहेर काढले, या देशाने त्यांना जागा दिली. दुसऱ्या कोणी त्यांना जागा दिली नाही. जगत के ठुकराए हुए लोगों को लो खुला मेरा द्वार असे म्हणणारा हा देश आहे. या देशावर आक्रमणे झाली.

'ग्रीक हुण शक्यवंत टूटते थे भूमि पर,

हारते थे हौसले पंचनद के तिर पर,

पता नहीं कहा है वे अतित में समा गये,

काल के प्रवाह में खुद को वे मिटा गये.

अध्यक्ष महोदय, आम्ही कोणावर आक्रमण केले नाही. या देशाने आपल्या इतिहासात आक्रमणे झेलली परंतु, आपली संस्कृती जिवंत ठेवली आणि आक्रमणकर्त्यांनाही आपल्या हृदयात जागा दिली. त्यांच्या संस्कृतीमध्ये जे जे आहे, त्यातील चांगले असेल ते घेतले. त्यामुळे या देशाला सहिष्णुता शिकविण्याची आवश्यकता नाही. हा सहिष्णू लोकांचाच देश आहे आणि सहिष्णूच राहणार आहे, या देशाची सहिष्णुता कोणी हिरावून घेऊ शकत नाही. मी शेवटी एवढेच सांगणार आहे की, या संविधानाने आपल्याला जे अधिकार दिले आहेत, त्या अधिकारांचे पालन करताना, ते अधिकार मिळवित असताना आमच्यावर ज्या जबाबदाऱ्या आहेत, त्यांचे पालनदेखील आम्ही केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज हे सरकार आल्यानंतर खरे म्हणजे या ठिकाणी अनेक प्रश्न आहेत. मी त्यांचा आज उल्लेख करणार नाही. मात्र इंदू मिलच्या संदर्भातील, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लंडनच्या घराच्या संदर्भातील असे वेगवेगळे प्रश्न जुन्या सरकारसमोरही आले, परंतु ते सुटले नाहीत. कारण ज्यावेळेस आम्ही सामाजिक न्याय म्हणतो, तेव्हा सामाजिक न्याय केवळ भाषणात असून चालत नाही, तो कृतीत असावा लागतो, तो आपल्याला कृतीतून प्रदर्शित करावा लागतो. हो आहेत आमच्यासमोर खूप समस्या. आजही ही गोष्ट खरी आहे की, समाजात भेदभाव आहे. परंतु, हा भेदभाव संपुष्टात आणण्याची जबाबदारी या संविधानाने तुमच्यावर आणि आमच्यावर टाकली आहे. ही लढाई आपल्याला करावी लागेल. त्याकडे केवळ बोट दाखवू चालणार नाही, या लढाईमध्ये आपल्याला एकत्रितपणे उतरावे लागेल, ही लढाई लढावी लागेल आणि समाजातील भेदभाव संपुष्टात आणावा लागेल.

अध्यक्ष महोदय, आज आदरणीय (सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण) या चर्चेवर बोलत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अतिशय महत्वाचे व चांगले वाक्य सांगितले. ते असे म्हणाले की, घटना कितीही चांगली असली, तरी वापरणारी माणसे चांगली नसतील तर घटना निश्चितच वाईट

ठरते. घटना काय करते, फक्त राष्ट्राचा देह घडविते. भारताची जनता आणि तिचे निरनिराळे राजकीय नेते कसे वागतील, हे कोणी सांगावे. आपले हेतू साध्य करण्याकरिता ते घटनात्मक मार्गाचा अवलंब करतील की, क्रांतिकारक पद्धतीचा अवलंब करतील. बंडखोर मार्गाने जाण्याचे त्यांनी ठरविल्यास घटना कितीही चांगली असली तरी ती कोलमडून जाईल. तसेच हा उल्लेख करताना त्यांनी असेही म्हटले की, घटना कितीही चांगली असली, तरी ती वापरणारी माणसे चांगली असली पाहिजे. हे त्यांनी आमच्याकडे पाहून म्हटले, उपरोधिकपणे म्हटले.

अध्यक्ष महोदय, आपली घटना चांगली आहे. परंतु, देशाला स्वातंत्र्य मिळून ६५ ते ६८ वर्षे झाल्यानंतर आपल्या देशामध्ये आजही गरिबी आहे, भुकमरी आहे, बिमारी आहे. या ६५ ते ६८ वर्षामधील ६० वर्षे घटना कोणाच्या हातात होती? कोणाचे राज्य होते? घटना कितीही चांगली असली, तरी ती वापरणारी माणसे चांगली नसतील, तर घटना निश्चितच वाईट ठरते. आज या ठिकाणी एकमेकांवर कुरघोडी करण्याचा दिवस नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी तत्त्वे सांगितली, त्या तत्त्वांच्या आधारावर या देशाची निर्मिती करायची आहे आणि मला विश्वास आहे की, या राज्य घटनेत एवढी शक्ती आहे, ताकद आहे की, राज्यघटनेच्या माध्यमातून या देशाला विकासापासून कोणीही थांबवू शकत नाही. या राज्य घटनेच्या माध्यमातून आपला देश जगाला निश्चितपणे मार्गदर्शन करेल, असा मी विश्वास व्यक्त करतो आणि माझे बोलणे संपवितो.

धन्यवाद.

*****



“ निजामाच्या राजवटीखाली असलेला मराठवाडा हा त्या राजवटीतून मुक्त होण्याकरिता पुन्हा एकदा मराठवाड्यातील व देशातील देशभक्तांना लढा उभारावा लागला, यातून दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी म्हणजे जवळपास १३ महिन्यांनी भारताच्या स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण आता साजरा करतो आहोत. मराठवाड्याच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव स्वतंत्रपणे १३ महिने उशिरा आपल्याला साजरा करावा लागत आहे. या ठिकाणी आपण अभिवादनाचा प्रस्ताव आणत आहोत. हा प्रस्ताव मांडण्याची मला संधी मिळाली हा खरोखर माझाही बहुमान आहे, असे मी समजतो. या निमित्ताने स्वातंत्र्य संग्रामात सहभागी असलेल्या नाम व अनाम अशा स्वातंत्र्य संग्राम सेनानी व हुतात्म्यांना मी विनम्र अभिवादन करतो. ”

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करणे या संदर्भात उपमुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव

दिनांक १९ जुलै, २०२३

—श्री. देवेंद्र फडणवीस (तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री)

**श्री. देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री) :** सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यता संग्राम सेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठीचा प्रस्ताव मांडतो. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात आपण विविध उपक्रम हाती घेतले. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी पुढील २५ वर्षांचा काळ हा अमृत काळ संबोधला आहे. भारताला आपल्या मेहनतीच्या आणि श्रमाच्या जोरावर विकसित राष्ट्राकडे वाटचाल करायची आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, त्याचे मोलदेखील आपल्याला लक्षात ठेवावे लागेल. ज्या स्वातंत्र्य संग्राम सेनानींनी आमच्याकरिता कष्ट केले. ज्यांनी बलिदान दिले, हौतात्म्य पत्करले त्यांची आपल्याला आठवण ठेवावी लागेल. असे म्हणतात की, जो समाज आपला इतिहास विसरतो त्याला वर्तमान असते; मात्र भविष्य नसते. म्हणून इतिहासाचे सिंहावलोकन करून या सर्व स्वातंत्र्य संग्राम सेनानी व हुतात्म्यांना अभिवादन करिण्याकरिता आजचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

सभापती महोदया, आपल्याला कल्पना आहे की, दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. तो स्वतंत्र होत असताना भारताची फाळणी झाली. त्या काळी देशात वेगवेगळी राजेशाही, साम्राज्यशाही अशी संस्थाने होती. या संस्थानांना विलीनीकरणाकरिता मुभा देण्यात आली. स्वेच्छाधिकाराने त्यांनी भारतात जावे की, पाकिस्तानमध्ये जावे की, स्वतंत्र राहावे अशा प्रकारची मुभा देण्यात आली. निजामाच्या राजवटीखाली असलेला मराठवाडा हा त्या राजवटीतून मुक्त होण्याकरिता पुन्हा एकदा मराठवाड्यातील व देशातील देशभक्तांना लढा उभारावा लागला, यातून दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी म्हणजे जवळपास १३ महिन्यांनी भारताच्या स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण आता साजरा करतो आहोत. मराठवाड्याच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव स्वतंत्रपणे १३ महिने उशिरा आपल्याला साजरा करावा लागत आहे. या ठिकाणी आपण अभिवादनाचा प्रस्ताव आणत आहोत. हा प्रस्ताव मांडण्याची मला संधी मिळाली हा खरोखर माझाही बहुमान आहे, असे मी समजतो. या निमित्ताने स्वातंत्र्य संग्रामात सहभागी असलेल्या नाम व अनाम अशा स्वातंत्र्य संग्राम सेनानी व हुतात्म्यांना मी विनम्र अभिवादन करतो.

सभापती महोदया, या संग्रामाचे नेतृत्व करणाऱ्यांची अनेक नावे आपल्याला माहिती आहेत. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवि नारायण रेड्डी, भाऊसाहेब वैशंपायन, देवीसिंह चौहान, बाबासाहेब परांजपे, वेद प्रकाश, शंकरसिंग नाईक, विजेंद्र काबरा, श्रीधर वर्तक, जानकीलालजी राठी, शंकरराव जाधव, जालन्याचे जनार्दनमामा, किशनसिंह रजपूत, गोविंदभाई पानसरे, राजाभाऊ वकड, विश्वनाथजी भिसे, जयंतराव पाटील, रमणभाई पारिख, पटवर्धन, दगडाबाई शेळके. ताराबाई परांजपे, कुसुमताई जोशी, प्रतिभाताई वैशंपायन, गीताताई चाकणकर, शांताबाई कोटेचा, चंदाताई जरीवाला, कांताताई देशपांडे अशी अनेक नावे आहेत. अनेक नावे यामधून सुटलीही असतील. इतर सदस्यांच्या भाषणात कदाचित आणखी नावे येतीलही. जे ज्ञात, अज्ञात आहेत अशा अनेक स्वातंत्र्य संग्राम सेनानी व हुतात्म्यांना आज आपण अभिवादन करुया.

सभापती महोदया, भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशात ५६० पेक्षा अधिक संस्थाने होती. या संस्थानांचे विलीनीकरण भारतात करायचे होते. याबाबत तांत्रिकदृष्ट्या कोणाचेच राज्य नव्हते. यामुळे

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंध करण्याकरिता सरदार वल्लभभाई पटेल यांनी ही प्रक्रिया सुरू केली. केवळ ४० दिवसात मोठ्या प्रमाणात सर्व संस्थाने भारतात विलीन करण्याचे काम सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वात झाले. तीन संस्थाने अशी होती की, ज्यांचे विलीनीकरण होऊ शकत नव्हते. जुनागड, काश्मीर व हैदराबाद अशी ३ संस्थाने होती जेथील शासक हे भारतामध्ये विलीनीकरण करत नव्हते. ते पाकिस्तानमध्येदेखील जाणार की नाही याबाबत साशंकता होती. काहींचा कल पाकिस्तानकडे जाण्याचा होता. तर काहींचा स्वतंत्र्य राहण्याचा होता. या तिन्ही संस्थानांच्या विलीनीकरणाची कहाणी आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्याचा एक स्वतंत्र सहभाग आहे. यानंतर या सर्व संस्थानांचे विलीनीकरण पूर्ण झाले. घटनेतील अनुच्छेद ३७० काढल्यानंतर एवढ्या वर्षानंतर एक प्रकारे विलीनीकरणाची प्रक्रिया जी आपण तेव्हा सुरू केली होती ती आता पूर्णपणे झालेली आहे, असे निश्चितपणे म्हणता येईल.

सभापती महोदया, भारतीय स्वातंत्र्याचा आनंद आपण साजरा करीत होतो त्यावेळी मराठवाड्याची जनता मात्र निजामाच्या, रजाकाराच्या अधिपत्याखाली अनन्वित असे अत्याचार सहन करीत होती. भारताच्या नाभीस्थानी एक स्वतंत्र देश निर्माण करीन. अशा प्रकारे निजामाचे म्हणणे होते. जनतेने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली एक मोठा मुक्ती लढा उभारला. अत्यंत संयमाने आपल्या जुन्या पिढीने हे अत्याचार सहन करत हा लढा उभारला. मराठवाड्याची भूमी भारताचा अखंड सार्वभौमत्वाचा भाग आहे, हे सिद्ध करण्याचे काम मराठवाड्यातील स्वातंत्र्य संग्राम सेनानींनी करून दाखवले. त्यांचे योगदान अत्यंत अमूल्य आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अन्याय व अत्याचाराची परिसीमा निजामशाहीने गाठली होती. यामुळे मराठवाडा पेटून उठला होता. उंबरी बँक लूट, इस्लामपूर पोलीस स्टेशनवरील हल्ला, रेल्वेचे रूळ उखडणे अशा अनेक घटनांमधून रोष बाहेर येत होता. निजामाची मनीषा अतिशय स्पष्ट होती. आपल्या अमलाखालचा मुलुख स्वतंत्र देश निर्माण करायचा. याकरिता शेतकऱ्यांचा प्रचंड छळ होत होता. ज्यांच्या घरी झाडे असतील त्यांना असे सांगण्यात आले की, घर तुमचे असले तरी झाडांवरील अधिकार आमचा आहे. शेत तुमचे असले तरी पिकांवरील अधिकार आमचा आहे. अशा प्रकारे अनन्वित अत्याचार व छळ सुरू होता, निजामाच्या राजवटीचे वर्णन न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी ' कहाणी हैदराबाद लढ्याची' या पुस्तकात केला आहे. ते असे म्हणतात की, हैदराबाद संस्थानातील आसफिया राजवट अर्थात निजामाच्या कारभाराचा आधार हा सरंजामदारी व्यवस्थेवर होता. संस्थानाच्या एकूण क्षेत्रफळापैकी दहावा हिस्सा हा निजामाची खासगी जहागिरी होती. कार्यक्षम दिवाणी व्यवस्था अथवा न्याय व्यवस्था याचा मागमूसही या जहागिरीत नव्हता. काही जहागीरदारांना स्वतःचे तहसीलदार, तालुकादार व न्यायाधीश नेमण्याचा अधिकार होता. न्यायाधिशांच्या नेमणुका जहागीरदारांच्या मर्जीचा भाग होता. जहागिरीत खालसा मुलुखापेक्षा शेतसारा अधिक होता. राज्यात जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात नव्हती. निजामाने नेमलेला दिवाण हैदराबाद येथे बसून कारभार करीत होता. जनतेची मुख्य तक्रार नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या गळचेपीबद्दल होती. राज्यातील फार मोठ्या बहुसंख्य असलेल्या हिंदू जनतेला त्यांचे सांस्कृतिक व धार्मिक हक्कदेखील नाकारण्यात आले होते. राज्याच्या एकूण १ कोटी ६३ लाख लोकांपैकी हिंदूंची संख्या ८५ टक्के होती. देवळाच्या बांधकामावर निर्बंध होते. मशिदीसमोर वाद्य वाजविण्यास प्रतिबंध होता. मोहरमच्या काळात हिंदूंचा सण आल्यास तो सार्वजनिकरीतीने साजरा करण्यास प्रतिबंध होता. इतर धर्मांतून मुस्लीम धर्मात येण्याला उत्तेजन अशा प्रकारच्या अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागत होते. हे राज्य केवळ मुसलमानांचे आहे असे जाहीरपणे निजाम सांगत होता.

सभापती महोदया, चपळगावकर असे म्हणतात की, निजामशाहीत झालेल्या अन्यायाची, अत्याचाराची वर्णने आजही अंगावर शहारे आणतात. हैदराबाद संस्थानाचा निजामी सत्तेचा पाया लोककल्याणाचा नव्हता. मराठवाड्यातील जनतेने याला का विरोध केला हे आपण यातूनच लक्षात घेतले पाहिजे. याबद्दल प्रभाकर देव यांनी 'हैदराबाद मुक्तिसंग्राम' हे पुस्तक लिहिले आहे आणि या पुस्तकात ते म्हणतात की, निजामाला हैदराबाद संस्थान नेहमीसाठी असफिया ध्वजाखाली सार्वभौम राष्ट्र म्हणून हवे होते. दिनांक १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. निजामाने स्वतंत्र भारतीय संघराज्यात विलीन होण्यास नकार दिला. निजाम परकीय नव्हता. परंतु त्याने आपल्या प्रजेकडे न्यायदृष्टीने पाहिले नाही. उर्दूच्या विकासासाठी त्याने तेलुगू, मराठी व कानडी या भाषांची व साहित्याची गळचेपी केली. हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात जबाबदार राज्यपद्धतीची मागणी पुढे आली, पण तिला त्याने दाद दिली नाही. रझाकारांसारख्या फॅसिस्ट संघटना फोफावण्यासाठी निजामाने सक्रिय पाठिंबा दिला. या संघटनेने अनेक गावे जाळली. मुलांची मुंडकी उडवली. स्त्रियांवर बलात्कार केले. निजामाच्या अशा मनोवृत्तीमुळे त्याचे सैन्य व कारभारीही बेधुंद झाले नसतील तरच नवल!

सभापती महोदया, शहीद गोंविद विनायक पानसरे हा तरुण हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचा पूर्णवेळ संघटक म्हणून कार्यरत होता. दिनांक १४ ऑक्टोबर, १९४६ रोजी नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी येथे एका सभेत या तरुणाने केलेले भाषण निजाम सरकारला आक्षेपार्ह वाटले, त्यावर खटला भरला गेला. २१ ऑक्टोबरला बिलाली येथील दंडाधिकाऱ्याने त्याला जामिनावर सोडले. बैलगाडीतून कार्यकर्त्यांसमवेत पानसरे कुंडलवाडीकडे परत निघाले होते. वाटेत अर्जापूर येथे रझाकारांच्या टोळीने अडवून पानसरे व साथींवर तलवारीने सपासप वार सुरू केले आणि पानसरेंचे शिर धडावेगळे केले. अशा प्रकारच्या घटनादेखील त्या ठिकाणी त्यांनी नमूद केल्या आहेत. खरे म्हणजे अनेक शहिदांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. अनेकांनी छातीवर गोळ्या झेलल्या. हदगाव तालुक्यात तर अक्षरशः अनेकांची कत्तल झाली. 'इत्तेहादुल मुसलमीन' ही संघटना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात तेथे निजामाने कत्लेआम केला आणि त्यातून मुक्तिसंग्रामाचा लढा दाबण्याचा प्रयत्न होता, तो अयशस्वी झाला. निजामाने तो दाबण्याचा जेवढा प्रयत्न केला, तेवढ्या त्वेषाने तेथे समाजातील सर्व स्तरांतील लोक, जाती-धर्मांचे लोक पेटून उठले आणि त्यांनी हा लढा पुढे नेला.

सभापती महोदया, सन १९३८ ते सन १९४८ ही १० वर्षे या मुक्तिसंग्रामाकरिता खूप महत्त्वाची ठरली. सन १९४८ मध्ये पोलीस ॲक्शनमुळे हैदराबाद संस्थानचे अस्तित्व संपले आणि हैदराबाद आणि त्यांच्या अमलाखाली असलेला मराठवाडा हा भारतीय स्वराज्याचा भाग झाला. पण या लढ्याला सन १९३८ पासून मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली होती. यामध्ये आर्य समाजाने सुरू केलेले आंदोलन असेल, हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने आरंभलेला सत्याग्रह असेल, हिंदू महासभेने आरंभलेला भागानगर निःशस्त्र सत्याग्रह असेल, विद्यार्थ्यांनी सुरू केलेली वंदे मातरम् चळवळ असेल अशा अनेक चळवळी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या. आपण बघितले तर असे दिसेल की, निजामाच्या राजवटीमध्ये सन १९२० पासूनच मोठ्या प्रमाणात हाहाकार सुरू झाला होता. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अनेक मेळावे, सभा तेथे व्हायच्या. पण निजामाच्या आधिपत्याखाली कुठल्याही भागामध्ये कोणताही प्रकारचा मेळावा होऊ शकणार नाही, अधिवेशन होऊ शकणार नाही, सभा होऊ शकणार नाही, अशा प्रकारची भारतीय स्वातंत्र्यलढ्यावर निजामाने बंदी घातली होती. एवढेच नव्हे तर त्या काळात इंग्रजांचा अंमल असलेल्या अख्ख्या देशात वृत्तपत्रे काढता येत होती. पण निजामाच्या

भागामध्ये मात्र वृत्तपत्रेदेखील काढता येत नव्हती. वृत्तपत्रांवरही अशा प्रकारची बंदी निजामाने घातली होती. हैदराबाद संस्थानाविरुद्ध कोणी जर आंदोलन केले तर कुठलाही खटला न चालविता त्याची संपत्ती जप्त करण्याचे अधिकार त्याच्याकडे होते. कोणीही जर आवाज उठविला तर त्याच्यावर बंदी घालणे, त्याला मारुन टाकणे अशा प्रकारची अवस्था तेथे होती. सन १९३८ मध्ये फेब्रुवारी महिन्यात हरिपुरा येथे कॉंग्रेसचे अधिवेशन झाले आणि त्यावेळी आफ्रिका, सिलोन, चीन आदी देशांतील भारतीयांच्या संदर्भात काही प्रस्ताव संमत झाले. एवढेच नव्हे तर देशातील साम्राज्यवादाच्या विरोधात आंदोलनाचा ठरावदेखील मंजूर झाला. मात्र त्याच वेळी अनेक लोक मागणी करीत होते की, हैदराबादमध्येही अशाच प्रकारचे अत्याचार होत आहेत, त्याच्याही विरुद्ध ठराव झाला पाहिजे. काही कारणाने तो होऊ शकला नाही आणि त्यातून निजामाचा असलेला अत्याचार अधिक मोठ्या प्रमाणात वाढलेला आपण पाहिला आहे.

सभापती महोदया, निजामाच्या अत्याचाराचा लेखाजोखा घेण्याकरिता त्यावेळी महाराष्ट्र राज्य हिंदू महासभेचे अध्यक्ष अण्णासाहेब भोपटकर यांच्या अंतर्गत काही लोकांनी गोपनीय दौरा केला आणि पुढे दिनांक २३ सप्टेंबर, १९३८ रोजी सेनापती बापट यांनी थेट हैदराबादमध्ये जाऊन विरोध करण्याचे ठरविले. पण हैदराबादमध्ये पोहोचताच निजामाच्या पोलिसांनी त्यांना पकडले आणि पुण्याला परत पाठवून दिले. सेनापती बापट यांनी सातत्याने स्वतःच्या ताकदीवर, हिमतीवर जमेल तशा पद्धतीने हा सत्याग्रह सुरूच ठेवला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सन १९३८ मध्ये शनिवारवाडा येथे झालेल्या एका विशाल सभेमध्ये हैदराबाद मुक्ती आंदोलनाची सैद्धांतिक भूमिका मांडली. महाराष्ट्रातील हजारो लोकांनी वेगवेगळ्या संस्था निर्माण करून आंदोलन सुरू केले. हजारो लोकांनी तेथे सत्याग्रह सुरू केला. प्रामुख्याने निःशस्त्र अशा प्रकारचे हे आंदोलन तेथे सुरू होते. त्यामध्ये लोकशाही स्वराज्य दल, भागानगर हिंदू साहित्य समिती, हिंदू महासभा अशा वेगवेगळ्या संस्थांनी हे आंदोलन सुरू केले होते. हैदराबाद संस्थानचा निजाम अली याच्याबरोबर अगदी निर्वाणीचा करार ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड माऊंटबॅटन यांनी करण्याचा प्रयत्न केला आणि सरदार पटेल यांना त्यांनी विनंती केली की, या कराराला मान्यता द्यावी. मात्र सरदार पटेल यांना त्या करारातील काही गोष्टी मान्य नव्हत्या. त्यांनी सांगितले की, मला या गोष्टी मान्य नाहीत. पुन्हा त्यामध्ये निगोसिएशन झाले. पुन्हा त्यात काही गोष्टी अशा होत्या की, त्या सरदार पटेल यांना मान्य नव्हत्या. मात्र तरीदेखील शेवटी करार होत आहे म्हणून त्यात काही सुधारणांसह सरदार पटेल यांनी मान्य केले की, ठीक आहे, जर हा करार होत असेल आणि काही अटी-शर्ती यांच्या अधीन राहून हे संस्थान जर भारतामध्ये विलीन होत असेल तर त्यालादेखील मी मान्यता देईन. मात्र निजाम त्याच्या शब्दावरून फिरला आणि हा करार करण्याकरिता त्याने नकार दिला.

सभापती महोदया, हा इतका महत्त्वाचा मुद्दा ठरला की, त्यानंतर मात्र सरदार पटेल पेटून उठले आणि त्यांनी ठरविले की, आता काहीही झाले तरीदेखील या ठिकाणी माघार घ्यायची नाही. हैदराबादचा मुक्तिसंग्राम किंवा भागानगरचा सत्याग्रह यामध्ये अनेक संस्थांनी होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात सहभाग घेतला. यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवकदेखील त्या काळात पूर्णपणे सहभागी होते. आपण एक गोष्ट अजून लक्षात घेतली पाहिजे की, हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणाबाबत भारत सरकार आणि विशेषतः सरदार

वल्लभभाई पटेल हे पहिल्या दिवसापासून दृढनिश्चयी होते. खरे तर काही कारणांनी हा प्रश्न जटिल झाला, पण जटिल असलेला प्रश्न सरदार पटेल यांच्या निर्धाराने तो अतिशय ताकदीने सोडविण्याचे काम झाले. त्यावेळी स्वातंत्र्याची प्रक्रिया सुरू होती. इंग्रजांचे राज्य होते, लंडनच्या पार्लमेंटला काही अधिकार होते. म्हणून या निजामाने लॉर्ड माऊंट बॅटन यांचे मित्र असलेले लॉर्ड मॉक्टन यांना हाताशी धरुन थेट इंग्लंडमध्ये आपली धोरण वकिली सुरू केली. लॉर्ड माऊंटबॅटन यांचे मन त्यांचा मित्र मॉक्टन वळवू शकेल हे निजामाला माहिती होते. यासाठी त्यांनी इंग्लंडमध्ये जाऊन मॉक्टनच्या क्वॉवर्डचान्स अॅंड कंपनीसाठी १९ लाख पौंड खर्च केले. त्यांनी ब्रिटिश मीडिया व इतर देशांना हाताशी धरले. निजामाचे राज्य कसे चांगले चालले आहे व भारत कसा त्याच्यावर अधिक्षेप करण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा प्रकारचे जागतिक मत तयार करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. इतकेच नव्हे तर भारत हा कसा तकलादू देश आहे, तो कसा टिकणार नाही, याची कशी शकले होणार आहेत, वेगवेगळ्या संस्थांनाना तो कशा प्रकारे जबरदस्ती आपल्याकडे घेतो अशा प्रकारचे जागतिक मत तयार करण्याकरिता करोडो रुपये खर्च करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

सभापती महोदया, स्व. नरहर कुरुंदकर यांच्या ‘हैदराबाद विमोचन आणि विसर्जन’ या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहिले आहे की, निजामाने धोरण वकिलीसाठी केलेल्या खर्चाचे सविस्तर विवेचन केले आहे. निजामाला फक्त आपल्या स्वातंत्र्याचा घोप करून थांबायचे नव्हते, तर इस्लामी राजवटीची स्थापना करण्याचे त्याचे स्वप्न होते, वऱ्हाड म्हणजे विदर्भातील ब्रिटिशांकडे गेलेला प्रांत पुन्हा आपल्याला मिळावा यासाठी निजामाने खुद्द बॅ. महमंद अली जिना, जाफरुल्ला खान यांना त्या काळात वार्षिक हजार पौंड मोबदल्यावर दीर्घकाळ नियुक्त केले होते.

निजामाने व्हाइसरॉय यांना २० सप्टेंबर, १९२५ रोजी दिलेले पत्र आजही उपलब्ध आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, ‘ except matters relating to foreign powers and policies, the Nizams of Hyderabad have been independent in the internal affairs of their State just as much as the British Government in British India.

With the reservation mentioned by me, the two parties have on all occasions acted with complete freedom and independence in all inter-Governmental questions that naturally arise from time to time between neighbors. Now, the Berar question is not and cannot be covered by that reservation. No foreign, power of policy is concerned or involved in its examinations and thus, the subject comes to be a controversy between the two Governments that stand on the same plane without any limitations of subordination of one to the other.’ त्यांनी या पत्राद्वारे सांगितले होते की, वऱ्हाडचा जो भाग आहे तो पूर्वी निजामाचा भाग होता. या भागाशी भारत सरकारचा काही संबंध नाही. ब्रिटिश सरकार व निझाम सरकार ही दोन स्वतंत्र सरकार आहेत, त्यांनी स्वतंत्रपणे काम केले आहे. हे एक-दुसऱ्याचे शेजारी आहेत, यापूर्वी त्यांनी अनेक प्रश्न एकमेकांशी चर्चा करून सोडविले आहेत. त्यामुळे भारताचा कोणताही समावेश न करता हा वऱ्हाडचा भाग निजामाच्या संस्थेला देण्यात यावा, अशा प्रकारची मागणी त्यांनी केली होती. निजाम हा प्रचंड धर्मांध होता. त्याने साम, दाम,

दंड, भेद या मार्गाने हिंदूनी धर्मांतर करावे यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यासाठी त्यांनी एक तबलिगी खाते निर्माण केले होते. त्या खात्याला ही जबाबदारी दिली होती की, संपूर्ण निजामाचे राज्य व्हावे यासाठी राज्यातील धार्मिक लोकसंख्येचा रेशो बदलला पाहिजे व तेथे धार्मिक बहुसंख्य असलेले हिंदू यांचे धर्मांतर झाले पाहिजे असे त्या खात्याचे काम होते. हे सगळे सप्रमाण स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे माजी कुलगुरू, माजी राज्यसभा सदस्य, ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांनी लिहिले आहे. त्यांच्या लेखातून आपणाला हे पाहायला मिळते की, कशा प्रकारे धर्मांतर करण्यासाठी वेगळे खाते उघडून प्रचंड अत्याचार निजामाने त्या काळात केले. विशेषतः बहुजन समाज, दलित, महिला यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले. असे होत असताना मुक्ती लढ्यात त्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

धनंजय कीर लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चरित्र या ग्रंथात एक संदर्भ दिलेला आहे. त्या संदर्भानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हैदराबाद संस्थानातील दलित समाजाला आवाहन करताना ते म्हणतात की, ' एक गोष्ट मला सांगायची आहे ती अशी की. पाकिस्तान आणि निजामाचे हैदराबाद संस्थान यातील मुसलमानांवर किंवा मुस्लिम लीगवर विश्वास ठेवण्याने दलित समाजाचा घात होईल, पाकिस्तान आणि हैदराबादमधील दलित समाजाला इस्लाम धर्माच्या दीक्षेला त्यांनी केवळ जीव वाचविण्याच्या हेतूने बळी पडू नये. हैदराबादमधील दलितवर्गाने निजाम हा उघड उघड हिंदुस्थानचा शत्रू आहे त्याची बाजू घेऊन आपल्या समाजाच्या तोंडाला काळिमा फासू नये. 'अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी आवाहन केले होते. या आवाहनानंतर मोठ्या प्रमाणात दलित समाजाने हैदराबाद मुक्ती संग्रामात सहभाग घेतला व हौतात्म्यदेखील पत्करले. दगडाबाई शेळके या महिलेने हातात बंदूक घेऊन रझाकारांशी मुकाबला केला. यामध्ये अनेक राष्ट्रीय विचारांचे मुसलमानही होते. ते निझामाच्या विरुद्ध या लढ्यात सामील झाले होते. कंधार येथील तहसीलदार फरीह मिर्झा यांनी लेव्ही वसुलीची सक्ती होऊ दिली नाही. निजामाचे आदेश होते की, हिंदूकडून सक्तीने लेव्ही वसुली केली पाहिजे. त्यांनी सांगितले की, मी करणार नाही. त्याला राजीनामा द्यावा लागला. त्यांनी राजीनामा दिला पण ती वसूली करण्यासाठी फरीह मिर्झा यांनी नकार दिला. शोयब - उल्ला- खान यांनी या लढ्याच्या अंतिम टप्प्यात हौतात्म्य पत्करले व निजामाच्या विरुद्ध ते लढले.

या लढ्यात महिलांचा सहभागदेखील अतिशय लक्षणीय होता. अनेक महिला स्वातंत्र्य संग्रामसेनानी होत्या. त्यामध्ये दगडाबाई शेळके. ताराबाई परांजपे. कुसुम जोशी, प्रतिभाताई वैशंपायन, कांता देशपांडे, गीताबाई चाटणकर, शांताबाई कोटेचा, चंदाताई जरीवाला यांनी व अनेक नावे नाहीत अशा अनेक महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून व काही घटनांमध्ये पुरुषांपेक्षा पुढे जाऊन स्वातंत्र्य लढ्यात मोलाचा सहभाग दिला आहे. कंधार तालुक्यातील टेळकी येथे निजामाच्या सैन्याने गोळीबार केला त्यामध्ये कित्येक लोक मृत्युमुखी पडले. आपणाला कल्पना आहे की. जालियनवाला बाग अत्याचारासंदर्भात आपण बोलतो तशाच प्रकारचा अत्याचार व तशाच प्रकारचा बेछूट गोळीबार हैदराबाद मुक्ती संग्राम व मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या आंदोलनात झाला होता. शेतसारा वसूलीसाठी गावेच्या गावे लुटली गेली. भयानक क्रूर अशा प्रकारचा हा काळ होता. नांदेड झेंडा सत्याग्रह हा या सर्वांचा कळस होता. तिरंग्याची सावली आम्हाला नको म्हणून निजामाचे पाईक तिरंगा उतरवण्यासाठी आले त्यावेळी जो संघर्ष झाला त्यामुळे इतिहासाची पाने या संघर्षाला कधीही विसरु शकत नाहीत.

ज्यावेळी निजामाविरुद्ध सैनिकी कारवाई झाली त्यावेळी अत्यंत मुत्सद्देगिरीप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असा सल्ला दिला की, याला पोलीस ॲक्शन हे नाव देण्यात यावे. ते असे म्हणाले की, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची बाजू मांडण्याकरिता हे आपणाला अधिक सोयीचे होईल. इतर ठिकाणी सैन्य ॲक्शन झाली. परंतु हैदराबाद मुक्ती संग्राम किंवा मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये त्याला पोलीस ॲक्शन असे नाव देण्यात आले. या नावाने सैनिकी कारवाई झाली. दिनांक १ सप्टेंबर, १९४८ ते दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ या कालावधीत म्हणजे जवळपास १७-१८ दिवस ती कारवाई झाली आणि त्यातून हैदराबाद मुक्ती संग्राम म्हणजे मराठवाडा मुक्ती संग्राम या आंदोलनाची मुक्ती झाली आणि पलीकडच्या काळात मराठवाडा महाराष्ट्रामध्ये विलीन झाला. हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये बॅ. सिराजउल हसन तिरमिजी यांचेदेखील नाव घेतले पाहिजे. त्यांचा हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये अतिशय मोलाचा सहभाग होता. विद्यार्थ्यांचा सहभागदेखील मोठ्या प्रमाणावर होता. ज्यावेळी स्वामीजींनी भाषावार प्रांतरचनेच्या बाबतीत हैदराबाद राज्य तीन भागामध्ये विभागले गेले पाहिजे. असे भाषणातून उघडपणे सांगितले त्यावेळी पंडित नेहरू आणि मौलाना आझाद हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर नाराज झाले होते. आपण हा नवीन प्रश्न कशासाठी निर्माण करीत आहात, आता मुक्ती झालेली आहे, पुन्हा त्याची तीन शकल कशासाठी करावीत, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु त्यावेळी स्वामीजींनी सांगितले की, भाषावार प्रांतरचनेमध्ये मराठी लोक मराठी मुलुखासोबत, कानडी लोक कानडी मुलुखासोबत, तेलुगू लोक तेलुगू मुलुखासोबत गेले पाहिजेत. मला असे वाटते की, त्यावेळी स्वामी रामानंद तीर्थ यांनी ही अतिशय मोलाची भूमिका मांडल्यामुळेच पुढील काळात मराठी मुलूख तयार होताना आपल्याला या निर्णयाचे महत्त्वाचे योगदान बघावयास मिळत आहे. खरे म्हणजे आपल्याला अनेक बाबी बघावयास मिळतात. वेद प्रकाश आर्य नावाचे हुतात्मे आहेत. सुरुवातीच्या हुतात्म्यांमध्ये त्यांचे नाव घेतले जाते. ज्यावेळी हा लढा सुरू झाला त्यावेळी धाराशीव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील मौजे कुंजोटी येथे त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यातून त्या भागात मोठा लढा उभा राहिला. त्या काळात सर्व शाळा निजामाच्या आशीर्वादाने चालत होत्या. त्यामुळे तेथे स्वातंत्र्य, राष्ट्रभक्तीचा उल्लेख करण्यासाठी देखील बंदी होती. राष्ट्रीय भावनेने प्रेरीत होऊन चालविल्या जाणाऱ्या शाळा सुरू झाल्या पाहिजेत, याकरिता अनेक स्वातंत्र्य संग्रामसेनानींनी प्रयत्न केले. त्या काळात निजामाने मदरशांना स्वातंत्र्य दिले होते. परंतु शाळांना स्वातंत्र्य दिले नव्हते. मग मोठे चिंतन झाले आणि त्या चिंतनातून शिक्षणाच्या व्यवस्थादेखील राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन मिळाल्या पाहिजेत अशा प्रकारचा प्रयत्न झाला. त्यातून मोठी चळवळ तयार झाल्याचे आपण बघितले आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाचे प्रमुख नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर सन १९९९ मध्ये टपाल तिकीट काढण्यात आले. नांदेड विद्यापीठाला त्यांचे नाव देण्यात आले. ज्यावेळी आपण महापुरुषांची नावे देतो, त्यांचे स्मरण करतो त्यावेळी आपल्याला कृतज्ञतादेखील व्यक्त करावी लागते की, आपण आज स्वतंत्रतेचा जो श्वास घेत आहोत तो या लोकांमुळे घेत आहोत. खरे म्हणजे मराठवाड्याला खूप मोठी परंपरा आहे. संत एकनाथ, मुकुंदराज, दासोपंत, संत जनाबाई अशा माळकरी वारकऱ्यांपासून मोठी सहिष्णूची परंपरा मराठवाड्याला लाभलेली आहे. त्या परंपरेतच ज्यावेळी हा अन्याय आणि अत्याचार सुरू होता त्यावेळी मराठवाड्यातील लोकांनी अत्यंत संयमाने हा लढा लढला. आज आपण अमृत महोत्सवाच्या निमित्ताने या

सर्वांची आठवण करीत आहोत. ज्यावेळी आपण त्यांची आठवण काढतो त्यावेळी आपली भाषा, परंपरा, संस्कृती, शिक्षण जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी जो संघर्ष केलेला आहे तो संघर्ष आपल्या कृतीतून, निर्णयातून आणि धोरणातून आपल्याला पुढे नेता आला पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न आपण सर्वांनी केला पाहिजे.

सभापती महोदया, खरे म्हणजे आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. ज्यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा मोठा झाला त्यावेळी निजामाने अनेक फुटीर गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. त्याला धार्मिकतेचे, जातीयतेचे वळण कसे लावता येईल, जिहादचा नारा कसा देता येईल अशा प्रकारचे अनेक प्रयत्न निजामाने केले. परंतु विविध जाती, पंथाचे लोक निजामाच्या कोणत्याही प्रचाराला बळी न पडता अत्यंत संयमाने मैदानात उतरले आणि फूट पाडण्याचा त्यांचा जो प्रयत्न होता तो हाणून पाडण्याचे काम सर्व स्वातंत्र्य संग्राम  सेनानींनी केले. म्हणूनच मला असे वाटते की, हा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविला पाहिजे. स्वातंत्र्य आणि सहिष्णुता या दोन गोष्टी भारताच्या संविधानात आहेतच, परंतु भारतीय संस्कृती व भारतीयांच्या रक्तामध्ये या दोन गोष्टींचे रोपण कसे करता येईल हाच विचार या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविताना आपल्या सर्वांना करावा लागेल. मी पुन्हा एकदा मराठवाडा मुक्ती संग्रामातील ज्ञात, अज्ञात शहीदांना, स्वातंत्र्य संग्रामसेनानींना अभिवादन करतो आणि त्यांनी जो मार्ग दाखविलेला आहे, संविधानाने जो मार्ग दाखविलेला आहे त्या मार्गावर चालण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध होऊ, अशी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदया, सभागृहाने हा प्रस्ताव मान्य करावा, अशी मी सभागृहाला विनंती करून माझे दोन शब्द संपवितो.

*****



“ मी सामान्य शिवसैनिक असताना माननीय श्री. दिवाकर रावते, शिवसेना नेते हे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष होते. तेव्हा माननीय श्री. मनोहर जोशी सर आणि कै. गोपीनाथ मुंडे राज्याचे नेतृत्व करीत होते. तेव्हा माननीय श्री. लालकृष्ण अडवाणी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री होते. त्यावेळी माननीय श्री. मनोहर जोशी सर आणि कै. गोपीनाथ मुंडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन सातत्याने साजरा करण्यासाठी प्रयत्न केले होते. मी स्वतः त्याचा साक्षीदार आहे. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांना याबाबतच्या इतिहासाची चांगली जाणीव होती. ते देखील आताच्या पाकिस्तानमधून हिंदुस्थानमध्ये आलेले होते. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी त्यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामचा एक दिवस स्वातंत्र्य दिन तसेच उत्सव दिनाच्या स्वरूपात साजरा करण्यास मान्यता दिली. हा सर्व इतिहास नवीन पिढीसमोर येण्याची आवश्यकता आहे. मराठवाडा स्वतंत्र झाला तरी विकासासंबंधी उर्वरित महाराष्ट्रापासून निश्चितपणे दूर आहे. याचे कारण असे आहे की, इतर महाराष्ट्रावर इंग्रजांचे राज्य असल्यामुळे त्यांचा काही ना काही विकास सुरू होता. परंतु इंग्रजांच्या काळात त्यांचा खूप विकास झाला असे मी म्हणणार नाही. परंतु मराठवाड्यामध्ये हा विकास कोठेही पोहोचला नव्हता. ”

**माननीय उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामच्या ७५ व्या वर्षानिमित्त अभिवादनपर मांडलेल्या प्रस्तावावर बोलताना**

**दिनांक १९ जुलै, २०२३**

**श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेता)**

सभापती महोदय, मी सर्वप्रथम शासनाचे आभार मानतो की, शासनाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या ७५ व्या वर्षानिमित्त अभिवादनपर प्रस्ताव सदनामध्ये मांडलेला आहे. माननीय उपमुख्यमंत्री यांनी या अनुषंगाने बराच इतिहास सांगितलेला आहे. मी त्याचे रिपिटेशन करणार नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मराठवाडा हा एक वर्ष एक महिना आणि दोन दिवसानंतर स्वतंत्र झाला. त्यापूर्वी तब्बल २४७ वर्षे निजामाचे राज्य होते. निजामाचे राज्य हे फक्त मराठवाड्यावर नव्हे तर कर्नाटकचा एक भाग, आंध्र व तेलंगणाचा एक भाग अशा विविध भागांवर निजाम, रझाकारांचे राज्य होते, भारत स्वतंत्र झाल्यानंतर काश्मीर, जुनागढ व हैदराबादसारखी संस्थाने स्वतंत्रपणे काम करीत होती. या संस्थानांनी स्वतंत्र भारतामध्ये समाविष्ट व्हावे अशा प्रकारे तत्कालीन केंद्र शासनाने विनंती केली होती. उक्त तिन्ही संस्थानांनी तत्कालीन केंद्र शासनाच्या विनंतीला मान दिला नव्हता. तेव्हा देशाचे लोहपुरुष असलेले सरदार वल्लभभाई पटेल तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री होते. सरदार वल्लभभाई पटेल तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री असताना जुनागढ सहजरीत्या स्वतंत्र भारतात सहभागी झाले. आज काश्मीरची काय परिस्थिती आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे. हैदराबाद संस्थानला स्वतंत्र भारतामध्ये सहभागी होण्याकरिता पोलीस ॲक्शन घ्यावी लागली. मी मराठवाड्यातील आहे. माझ्या आईचे वडील कम्युनिस्ट चळवळीमध्ये आणि वडिलांचे वडील हे काँग्रेस चळवळीमध्ये काम करीत होते. त्यामुळे आमच्या घरामध्ये या इतिहासाची चांगली माहिती आहे. आज सदनामध्ये मराठवाडा मुक्ती संग्रामच्या ७५ व्या वर्षानिमित्त अभिवादनपर प्रस्तावावर चर्चा होत असताना नवीन पिढीला समजले पाहिजे की, भारत स्वतंत्र झाल्यानंतर मराठवाडा स्वतंत्र झाला आहे. नवीन पिढीला याबाबतची माहिती नाही. मी सामान्य शिवसैनिक असताना माननीय श्री. दिवाकर रावते, शिवसेना नेते हे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष होते. तेव्हा माननीय श्री. मनोहर जोशी सर आणि कै. गोपीनाथ मुंडे राज्याचे नेतृत्व करीत होते. तेव्हा माननीय श्री. लालकृष्ण अडवाणी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री होते. त्यावेळी माननीय श्री. मनोहर जोशी सर आणि कै. गोपीनाथ मुंडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन सातत्याने साजरा करण्यासाठी प्रयत्न केले होते. मी स्वतः त्याचा साक्षीदार आहे. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांना याबाबतच्या इतिहासाची चांगली जाणीव होती. ते देखील आताच्या पाकिस्तानमधून हिंदुस्थानमध्ये आलेले होते. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी त्यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामचा एक दिवस स्वातंत्र्य दिन तसेच उत्सव दिनाच्या स्वरूपात साजरा करण्यास मान्यता दिली. हा सर्व इतिहास नवीन पिढीसमोर येण्याची आवश्यकता आहे. मराठवाडा स्वतंत्र झाला तरी विकासासंबंधी उर्वरित महाराष्ट्रापासून निश्चितपणे दूर आहे. याचे कारण असे आहे की, इतर महाराष्ट्रावर इंग्रजांचे राज्य असल्यामुळे त्यांचा काही ना काही विकास सुरू होता. परंतु इंग्रजांच्या काळात त्यांचा खूप विकास झाला असे मी म्हणणार नाही. परंतु मराठवाड्यामध्ये हा विकास कोठेही पोहोचला नव्हता. १९२५ मध्ये मराठवाड्यात फक्त ६ शाळा होत्या, त्यानंतर संभाजी नगर येथे शासकीय कॉलेज झाले, उस्मानिया हे हैदराबादचे केंद्र झाले. त्यानंतर मराठवाड्यातील विद्यार्थी हळूहळू शिक्षण घेऊ लागले. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. सरदार वल्लभभाई पटेल यांनी पोलीस ॲक्शन करून संभाजीनगरमधील गुलमंडीमध्ये रझाकारांना शस्त्र खाली टाकण्यासाठी भाग पाडले. अशा प्रकारे ४८ तासांच्या पोलीस ॲक्शनमध्ये तत्कालीन गृहमंत्री श्री. सरदार वल्लभभाई पटेल यांनी रझाकारांच्या निजामाला झुकवले होते. नेहमी असे सांगितले जाते की, जो इतिहास विसरतो त्याला वर्तमान आणि भविष्यही नसते. त्यामुळे आपण सर्वांनी हा इतिहास लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामला ७५ वर्षे पूर्ण झाली त्याप्रमाणे मराठवाडा स्वातंत्र्य संग्रामाला ७५ वे वर्ष सुरू झाले आहे. मराठवाडा हा स्वातंत्र्य

संग्राम साजरा करीत असताना मराठवाड्याने त्याकरिता काय भोगले, त्यात कोणी कोणी कशा प्रकारे लढा दिला, कोणकोणत्या समाजाने लढा दिला, काँग्रेस, आर्य समाज तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यात कशा प्रकारे लढा दिला याबाबतचा सर्व इतिहास जनतेसमोर येण्याची गरज आहे. शासनाने सदरहू प्रस्ताव मांडलेला असून त्याला सपोर्ट करण्यासाठी माझीच नव्हे तर सर्व सदनाची भूमिका असली पाहिजे. याबाबतच्या इतिहासाचा विचार केल्यास त्यात हजारो लोकांचा समावेश आहे. संभाजीनगरसारख्या मोठ्या शहरापासून सेलू, लातूर, हिप्परगा तसेच झुंजवट्यासारखी गावे असोत, प्रत्येक गावांमधून एक स्वातंत्र्य लढा त्या काळात लढला गेला. यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंद श्रॉफ अग्रणी नेते होते. त्याप्रमाणे आर्य समाजाने मराठवाडा, हैदराबादच्या मुक्ती संग्रामाच्या चळवळीमध्ये मोठे नेतृत्व केले होते. मराठवाड्यातील जनतेची मानसिकता आपण समजून घेतली पाहिजे. मी त्यांच्या प्रामाणिकतेसंबंधी एक उदाहरण देतो.

मराठवाडा मुक्ती संग्राम लढा चालू असताना उमरीची बँक लुटली गेली. या बँकेतून किती रक्कम लुटली याचा आकडा आजही उपलब्ध आहे. कोणाकोणाला ही रक्कम दिली याचीदेखील नोंद आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाकरीता स्वातंत्र्यसैनिकांना मदत व निधी मिळावा यासाठी त्यांनी उमरी येथील बँक लुटली. हे पैसे वाटले त्याचा पै न पै चा हिशेब आजही उपलब्ध आहे. ही रक्कम ३० लाख ६३ हजार ७१९ रुपये १५ आणे होती. ही रक्कम कोणाकोणाला वाटली त्याची यादीदेखील माझ्याकडे आहे. १५ आण्यांचा देखील हिशेब आहे. काही स्वातंत्र्यसैनिकांना सांगितले की, १० हजार तुमच्याकडे राहू द्यावे, तुमचे काही देणेघेणे करावे. तेव्हा त्यांनी ते १० हजार रुपये स्वीकारण्यास नकार दिला. इतक्या प्रामाणिकपणे मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा लढला गेलेला आहे. हा लढा लढत असताना अनेक नावे समोर येतात. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्याबाबत उल्लेख केला आहे. दगडाबाई शेळके या बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर गावच्या होत्या, त्या काळात बहुजन समाजातील एखादी स्त्री स्वातंत्र्यलढ्यात उतरणे हे सोपे काम नव्हते. अशा काळात अशिक्षित महिला आंदोलनात उतरली. बदनापूरचे पोलीस ठाणे उडवून देणारे हरिश्चंद्र जाधवांचे यामध्ये नाव आहे. रोहिल्यांना जेरीस आणणाऱ्या बीडच्या विठ्ठलराव काटकरांचा यामध्ये समावेश आहे. परभणीचे सूर्यभान पवार यामध्ये आहेत. तसेच विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातनेश्वरकर यामध्ये आहेत. निजामाचा पंतप्रधान येणार होता तेव्हा पूल उडवून देणारे काशीनाथराव कुलकर्णी यामध्ये आहेत. धाराशीवचे होटीकर गुरुजींचे नाव आजही घेतले जाते. मोठ्या व्यक्तींची नावे तर सर्वच घेतील. बाबासाहेब परमीक यांचा सर्वांना आदर आहे. भाऊसाहेब वैशंपायन, नरेंद्र कुरुंदकर, अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ या सर्वांच्या नावाने तर पुस्तके लिहिलेली आहेत. मी उल्लेख केल्यामध्ये काही सामान्य लोकसुद्धा आहेत. पण यांनी दिलेला लढा हा आपणास विसरता येणार नाही. आ. कृ. वाघमारेदेखील यामध्ये होते. तेव्हा या लढ्यात मराठवाड्यातील महिला आघाडीवर होत्या. निजाम संस्थानमध्ये महाराष्ट्रात त्यावेळी सहा परिषदा झाल्या. मराठवाड्यात लातूर, संभाजीनगर व सेलू येथे परिषदा झाल्या, अधिवेशने देखील झाली. काशीबाई किर्लोस्कर, सुशीलाबाई किर्लोस्कर, सुशीलाबाई दिवाण, गौरी किर्लोस्कर, कमलाबाई किर्लोस्कर, पानकुंवर कटेचा, सरस्वती बोधनकर, शांताबाई पेडगावकर, संगीता चारठाणकर ह्या आघाडीवर असणाऱ्या महिला होत्या. आ. कृ. वाघमारे हे दैनिक मराठवाडा चालवत होते, त्यांच्या सुविद्य पत्नी आशाताई वाघमारे पतीच्या खांद्याला खांदा लावून लढत होत्या. भूमिगत स्वातंत्र्यसैनिक असताना मराठवाड्याच्या

आजूबाजूचा भाग नांदगाव, लासलगाव, वाशिम, येवला, शेवगाव येथून भूमिगतांना सहकार्य व मदत करावी लागते त्या कामामध्ये आशाताईंसारख्या भगिनी आघाडीवर होत्या. मराठवाड्याचा स्वातंत्र्यलढा मोठा होता. निजाम कोण होता. निजामाचा इतिहास काय आहे, याने एवढी मस्ती का केली. १७२४ पासून १९४८ पर्यंत २२४ वर्षे या निजामाची सत्ता होती, तो एवढा मस्तवाल का होता. त्याने आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या शोषण केले. कारण खऱ्या अर्थाने निजामाने समाजासमाजात भेद निर्माण केला. खरे तर तेव्हा ८५ टक्के हिंदू जनता व १२ टक्के मुस्लीम जनता होती. परंतु पूर्णपणे उर्दू भाषेचा, रझाकारीचा, निजामी राजवटीचा प्रभाव होता. परंतु भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातून प्रेरणा घेऊन मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी मोठ्या प्रमाणावर आवाज उठवला आहे.

सभापती महोदय, मराठवाडा नाव कसे पडले हा देखील विचार केला पाहिजे. मराठवाड्यात त्यावेळी चारच जिल्हे होते आता ते आठ जिल्हे झालेले आहेत. कर्नाटक राज्यातील तीन जिल्हे, आंध्र प्रदेशातील ३ जिल्हे यामध्ये होते. विदर्भाचा काही भागदेखील यामध्ये होता. तो इंग्रजांनी नंतर निजामाकडून गिळंकृत केला. बुलढाणा व वाशिम हा भागदेखील रझाकारांच्या ताब्यात होता. परंतु इंग्रजांनी हळूहळू तो भाग स्वतःच्या अखत्यारीत घेतला. मराठवाडा सातवाहन राजाचा आहे. पैठणच्या सातवाहन राजांना सर्व ओळखतात. सातवाहन राजाने ७०० गाथा एकत्रित करून संपादित केलेल्या गाथा सप्तशती या ग्रंथामध्ये मराठवाड्यातील जनतेचे राहणीमान, बोलीभाषेचा उल्लेख आहे. निजाम ही पदवी आहे. दिल्लीवरून हा भाग सांभाळण्यासाठी ज्याला नियुक्त केले जायचे त्याला निजाम म्हटले जायचे.

आंध्र प्रदेशातील तेलगू भाग, कर्नाटकातील कानडी भाग, मराठवाड्यातील मराठी भाग यात होता. त्यात लातूर, धाराशीव, गुलबर्गा, हैदराबादचा भाग होता, हा सर्व भाग मिळून मराठवाडा बनत होता. या भागात मराठी लोक राहत असल्याने मराठवाडा नाव नैसर्गिकरीत्या पडलेले आहे. दिनांक ३ मार्च, १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला. १२ जानेवारी रोजी अजिंक्यतारा किल्ल्यावर मराठेशाहीचा झेंडा पुन्हा फडकला होता. मराठे व निजामामध्ये अनेक वेळा लढाया व तहदेखील झाले. या लढाईमध्ये संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील पालखेडची लढाई जगप्रसिद्ध आहे व ही लढाई पेशव्यांनी जिंकली होती. त्या काळातील इतिहास असाही सांगतो की, शाहू महाराजांच्या साम्राज्यातील पेशवे बाजीराव चिमाजी अप्पा यांनी निजामाची भेट मांजरा नदीच्या काठी लातूर जिल्ह्यात घेतली होती. परंतु निजाम शब्द पाळणारा नव्हता तर शब्द फिरवणारा होता. म्हणून पेशव्यांशी या संदर्भात त्यांचा जास्त संपर्क झाला नाही. परंतु मराठा पेशवे तेव्हा वस्ताद होते. या निजामाला त्यांनी वेळोवेळी धडा शिकविण्याचे काम केले. त्यांनी जालना लुटले, निजामाच्या राजवटीत घुसून पेशव्यांनी जालन्याची लूट केली होती.

सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेडात सिंदखेडराजा येथे मराठे व निजामामध्ये लढाई झालेली प्रसिद्ध आहे. त्यात निजामाला मदत करण्यासाठी काही लोक आलेले असताना त्यांच्यावर मराठ्यांनी विजय प्राप्त केला होता. मराठा साम्राज्य व निजामाच्या ज्या लढाया झाल्या यातून वारणा येथे तह झाला. निजामशाही स्थिर होत गेली, पण त्यांनी अनन्वित अत्याचार सुरू ठेवला. १९२० पर्यंत मराठवाड्यात हायस्कूलची संख्या सहा होती. १९१७ मध्ये हैदराबादला उस्मानिया विद्यापीठ झाले. १९२७ मध्ये संभाजीनगरला

इंटरमिजिएट कॉलेज स्थापन झालेले आहे. त्यावेळी हिंदूची लोकसंख्या ८५ टक्के असताना सर्वात जास्त म्हणजे ९१ टक्के नोकऱ्या मुस्लिमांच्या होत्या. सन १९३५ मध्ये खासगी शाळांमध्ये परभणीचे नूतन विद्यालय, संभाजीनगरचे सरस्वती भुवन विद्यालय, शारदा मंदिर विद्यालय, हिप्परगा येथील राष्ट्रीय विद्यालय, भुंजोट येथील श्रीकृष्ण विद्यालय, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरचे ज्युबली विद्यालय, सेलूचे नूतन विद्यालय, लातूरचे राजस्थान विद्यालय, संभाजीनगरचे मराठा हायस्कूल, नांदेडचे प्रतिभा निकेतन या संस्थांनी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना समाजपरिवर्तनाचे व लढाईचे बाळकडू त्यावेळी पाजण्याचा प्रयत्न केला.

या सर्व लढाईमध्ये अनेक किस्से घडलेले आहेत. या लढाईमध्ये अनेक घटनादेखील घडलेल्या आहेत. या घटना जर सांगायच्या झाल्या तर मला असे वाटते की, आपल्याला वेळ पुरणार नाही, परंतु मी यातील महत्त्वाच्या घटना आपल्याला सांगू इच्छितो. खरे तर हा प्रदेश दुधना, पूर्णा, मांजरा, पैनगंगा, वर्धा-गोदावरीचा असा सुपीक भाग आहे. या काळामध्ये ज्या पद्धतीने घटना घडल्या, ०७ ऑगस्ट, १९४७ ते ०८ ऑगस्ट १९४७ या काळात मराठवाड्यात तिरंगा फडकवू दिला जात नव्हता. तिरंगा ध्वज लावण्याचा कोणालाही अधिकार नव्हता. अशा काळात या निजामी राजवटीत १०४६ गावात तिरंगा ध्वज फडकविण्यात आला होता. येथे जंगल सत्याग्रह झाला होता. १,२२,६०० शिंदीची झाडे त्यावेळी त्या सकारात्मक सत्याग्रहात तोडली गेली होती. ६५८८ काँग्रेस कार्यकर्त्यांनी या काळात कायदेभंग केला. निजामाने त्यांना अटकेत टाकले, ५५० खेड्यातील शेतकऱ्यांनी सारा देण्याचे नाकारून कायदेभंग केला. २७० खेड्यांनी लेव्ही देण्यास नकार दिला. ७५० लोकांनी सरकारी नोकऱ्यांचा राजीनामा दिला. २९२ पंचायत समितीच्या सदस्यांनी राजीनामे दिले. २८७ वकिलांनी कोर्टावर बहिष्कार टाकला. ४५०० हजार विद्यार्थ्यांनी कॉलेज शिक्षणाला राम राम ठोकून ६० सरकारी ऑफिसेस जाळून टाकली. या सर्व काळात निजामांची धान्याची २३ गोडावूनदेखील स्वातंत्र्यसैनिकांनी ताब्यात घेतली होती. रेल्वे लाइनचे ८३ ठिकाणचे रुळदेखील उखडून टाकले गेले होते. मी हे आता सांगत आहे, कारण आता हे चुकीचे वाटेल किंवा बरोबर वाटेल हे मला माहीत नाही. परंतु ज्या काळात निजामाचा धाक होता, त्या काळात सरकारविरोधी कृत्य करण्याकरिता ताकद व दम लागतो. ती ताकद मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी दाखवून दिलेली आहे. अनेक बसेस त्यावेळी जाळल्या गेलेल्या आहेत. करोडगिरी नागच्या नाक्यावर हल्ला केला गेला. ४७ रझाकार केंद्रांवर हल्ला केला गेला. २५००० लोकांनी आम्ही निजाम सरकारच्या राजवटीतून स्वतंत्र झालो, असे ॲफिडेव्हिट केले. आताचे ॲफिडेव्हिट आणि त्यावेळेचे ॲफिडेव्हिट वेगवेगळे आहे. निजाम सरकारची ४२ पोलीस कार्यालये नष्ट केली गेली. २५० निजामी पोलिसांना ठार केले गेले, तो स्वातंत्र्यलढा होता. समोर जो पोलीस येत होता, त्याला ठार केले जात होते. मला असे वाटते की, असे होत असताना निजाम शासनाच्या ८४४ लोकांना या स्वातंत्र्यसैनिकांनी यमसदनी पाठविले, त्याच काळात १७ कार्यकर्त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. वेदप्रकाश आर्यांचा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला. मराठवाडा स्वातंत्र्य संग्रामातील पहिले हुतात्मे जर कोणी असतील तर ते वेदप्रकाश आर्य होते. वेदप्रकाश आर्यांच्या बलिदानानंतर मला असे वाटते की, मराठवाड्यातील जनतेने एक मोठा यल्गार पुकारला होता. हुतात्मा पानसरेंचे हौतात्म्य तर मराठवाडा कधीच विसरू शकत नाही. त्या काळात चाकूरचे पोलीस ठाणे लुटले गेले. चाकूरच्या पोलिसांनी एका गावातील एका घराची झडती घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा संपूर्ण गावच त्यांच्यावर तुटून पडले होते. त्या काळात यावर एक पोवाडा रचला गेला.

इतिहास मराठ्यांच्या स्मरणात कसा नाही

तो शूरपणा आता तरुणात कसा असेन ...

शाहीर निवासराव अहंकारी यांचा पोवाडा आहे. मराठवाड्यात राहणारा मराठी माणूस मराठा होय. त्यावेळी हा इतिहास कसा स्मरणात नाही, असे आव्हान या शाहिरांनी केले होते. तो शूरपणा आता तरुणांच्या मनात कसा नाही. अशा प्रकारचे आव्हान शाहिरांनी केले त्यावेळी मराठवाड्यातील तरुण मोठ्या प्रमाणात या लढाईत उतरले होते. यामध्ये एक किस्सा आहे. गंगाराम पाटील आणि अमृतराव पाटील यांनी ५० पोती ज्वारी गोळा केली होती. शिबीर सैनिक निर्वासितांना भाकरीकरिता लागणारे दळण घरोघरी दिले जाई, त्यावेळी हे अन्न म्हणजे ज्वारी किंवा काही जर कुठून आणले गेले तर ते दळण म्हणून घरोघरी दिले जात असे. घराघरातून त्याच्या भाकरी बनवून ठिकठिकाणी जे भूमिगत आहेत, त्यांना दिले जात असे. याबाबतीतील ओवी माझ्या आजीच्या तोंडून मी ऐकलेली आहे. ही ओवीदेखील मी आता सभागृहात म्हणतो.

पहिली माझी ओवी गं क्रांतिसिंह नानाला
धाक देऊनि पळविला तांबड्या ग साहेबाला,
दुसरी माझी ओवी गं वल्लभभाई पटेलांना
आया, बाया विनविती धडा दे रे रिझवींला,
तिसरी माझी ओवी गं सुभाषचंद्र बाबूला ...

या ओव्या जर म्हणायला गेलो तर त्या फार मोठ्या आहेत. यातूनदेखील माता भगिनींच्या मनामध्ये एक परिवर्तन निर्माण करण्याचे काम झालेले आहे. या ओव्यांच्या माध्यमातून वल्लभभाई पटेल आणि क्रांतिसिंह नाना कसे घराघरांत पोहोचले, हे आपल्याला समजते.

सभापती महोदया, उद्धवराव पाटलांनी दिलेला लढादेखील मला विसरता येणार नाही. बाबासाहेब परांजप्यांचा लढा हा देखील मोठा आहे. उद्धवराव पाटलांनी काजळा कॅम्पवर होते त्यावेळी शेंद्री पोलीस ठाण्यावर हल्ला करून पोलिसांना पळवून लावलेले आहे. गोवर्धन सराळा, वांजरगाव व भामाठाण वैजापूर तालुक्यात साथी विजयेंद्र काबरा, अमृत गडकरी यांनी येवला येथील कॅम्पमधील सैनिकांच्या तुकड्या केल्या होत्या. येवला त्यावेळी मराठवाड्याच्या बाहेर होते. आताही येवला मराठवाड्याच्या बाहेरच आहे. तेथून या तुकड्या वैजापूरमध्ये पाठविल्या गेल्या होत्या. हा लढा लढत असताना तो सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचला होता. या लढ्यापुढे आजही आपण नतमस्तक झाले पाहिजे. या स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात स्वामी रामानंद तीर्थांनी म्हणजे ज्यांचा गुलबर्गा जिल्हा, कर्नाटक येथे जन्म झाला. त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ तुळजापूर येथील हिप्परगा गावात मुख्याध्यापक म्हणून एका शाळेत काम केले होते. या स्वामी रामानंद तीर्थ यांनी खऱ्या अर्थाने या लढ्याला सुरुवात केली. त्यांनी काँग्रेस कमिटीची स्थापना केली. त्यांनी गावोगाव जाण्याचा प्रयत्न केला. स्टेट काँग्रेस आणि हैदराबाद काँग्रेस यांचे थोडे वाद होत होते. परंतु त्यांनी काँग्रेसच्या नावाने गोविंदभाई श्रॉफ आणि स्वामी रामानंद तीर्थ इत्यादींनी जो लढा दिला त्याला निजामशाहीने विरोध केला परंतु तेवढ्याच ताकदीने स्वामींनी व गोविंदभाईनी हा लढा कायम ठेवला. त्या काळात स्टेट काँग्रेसवर ०७ सप्टेंबर, १९३८ रोजी बंदी घातली. ज्यावेळी ही बंदी घातली गेली, त्यावेळी काँग्रेसने कायदेभंगाच्या चळवळी या

मराठवाड्यातून उभ्या केल्या होत्या. या स्टेट कॉंग्रेसच्या आंदोलनामध्ये १,२०० सभासद नोंदविले गेले. १९६८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थांनी सत्याग्रह केला. स्वामीजींना त्यावेळी दीड वर्षे सक्तमजुरी सोपविली गेली, गुंजोटीचे वेदप्रकाश हुतात्मा झाले. माणिकचंद पहाडे, बाबासाहेब परांजपे असतील, पुरुषोत्तमराव चपळगावकर, कर्वे गुरुजी असतील त्या सर्वांनी मोलाचे योगदान या काळात मराठवाड्याच्या स्वातंत्र्यसंग्रामाला दिलेले आहे. अशा पद्धतीने स्टेट कॉंग्रेस लढत असताना त्या काळात हिंदू प्रजेवर अन्याय होत होता, हेही महत्त्वाचे आहे. त्यावेळी आर्य समाजाने या सर्व विषयाकडे लक्ष वेधले. आर्य समाजाने देखील २४ ऑक्टोबर, १९३८ पासून एक मोठा सत्याग्रह सुरू केला. आर्य समाजाच्या देखील १९४१ पर्यंत मराठवाड्यात जवळपास २४१ शाखा झाल्या होत्या. आर्य समाजाचे १२००० पेक्षा जास्त सत्याग्रही तुरुंगात गेले होते. ४०,००० एवढे आर्य समाजाचे अनुयायी त्या काळात तेलंगणा आणि मराठवाड्यात होते. मराठवाड्यात धारुर, गुंजोटी निलंगा उदगीर, उमरगा या सर्व ठिकाणी शामलाल आर्य यांनी मोठा सशस्त्र लढा उभा केलेला आहे. त्यांनी खूप मोठे संगटन उभे केले. श्यामलाल आर्यची बिदर तुरुंगात हत्या करण्यात आली. त्यावेळी अनेक लोकांच्या हत्या झालेल्या आहेत. या हत्या रझाकाराने केल्या होत्या. बिदरच्या तुरुंगात या हत्या झाल्या होत्या, हे बिदर आज कर्नाटकमध्ये आहे. ३१ जानेवारी, १९३९ रोजी आर्य समाजाच्या वतीने मराठवाड्यात सत्याग्रह झाला. नारायण स्वामी, नरदेव शास्त्री, बन्सीलाल, शेषराव वाघमारे, आनंद स्वामी, दिगंबरराव लाटकर, दिगंबरराव शिवणगीकर, निवृत्ती रेड्डी, गणपतराव कथले, शंकरराव पाटील, अंधोरीकर यांनी आर्य समाजाच्या चळवळीत एक चैतन्य निर्माण केले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांना आपण घटनेचे शिल्पकार म्हणतो.

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या मोर्चाला ताकद दिली. निजामाकडून हा लढा कमकुवत व्हावा म्हणून प्रयत्न झाले. निजामाने दलित बांधवांना सोबत घेऊन 'पश्त आक्वाम' नावाची संघटना स्थापन केली आणि दलित समाजातील लोकांना मिसगाइड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही चाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ओळखली आणि त्यानंतर शेड्युल कास्ट फेडरेशनचा स्वातंत्र संग्रामाला पूर्ण पाठींबा दिला होता. नांदेडला शेड्युल कास्ट फेडरेशन आणि 'पश्त आक्वाम' कार्यकर्त्यांमध्ये जोरदार संघर्ष झाला. त्यावेळी दलित बांधवांचे भारतीय स्तरावरील नेते पी. एन. राजभोज यांनी सिकंदराबाद येथे जाहीर सभा घेऊन हैदराबाद मुक्ती संग्रामाला पाठिंबा दिला. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हैदराबाद मुक्ती संग्रामाबाबतचे विचार स्पष्टपणे मांडले होते. हैदराबाद संस्थान स्वतंत्र म्हणजे भारताच्या विभाजनाची सुरुवात होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १७ जून, १९४७ रोजी ब्रिटिश अधिसत्तेची चिकित्सा केली. त्यांनी निवेदनात विस्तृतपणे सांगितले होते की, संस्थानिक स्वतंत्रपणे राहू शकत नाही. हैदराबाद आणि भारत यांची भौगोलिक एकता अविभाज्य आहे. ती हैदराबाद संस्थानाला नष्ट करू देता कामा नये, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे. निझाम हा शत्रू असून, त्याची बाजू घेऊ नका असेदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, १९४७ रोजी जाहीरपणे सांगितले होते. भारतात सामील होण्यास नकार देणाऱ्या निझामाला काहीही सहानुभूती दाखविण्याची गरज नाही. निझाम हा भारताचा शत्रू आहे. म्हणून अनुसूचित जातींमधील एकाही माणसाने निझामाची बाजू घेऊ नये असे देखील आवाहन केले होते. त्या काळात 'वंदे मातरम्' नावाची चळवळ मराठवाड्यात सुरू झाली. त्यावेळी 'वंदे मातरम्' बोलण्यास बंदी होती. १९३८ चा तो काळ होता. उस्मानिया विद्यापीठात सरंगल, गुलबर्गा व औरंगाबाद येथे महाविद्यालय होते. त्या महाविद्यालयातील विद्यार्थी बेचैन होते. गोविंदभाई श्रॉफ विद्यार्थ्यांना चिथावणी देत असल्यामुळे

त्यांना नोकरीतून काढून टाकले होते. म्हणून दिनांक १५ नोव्हेंबर, १९३८ रोजी विद्यार्थ्यांनी वसतिगृहामध्ये 'वंदे मातरम्' म्हणण्यास प्रारंभ केला. संभाजीनगरमध्ये आता सभागृह झालेले असून, आता तेथे 'वंदे मातरम्' म्हटले जाते. त्यावेळी सरकारने 'वंदे मातरम्' बोलण्यावर बंदी आणली होती. दिनांक १६ नोव्हेंबर, १९३८ रोजी विद्यार्थ्यांनी अन्नत्याग व संप केला होता. त्यावेळी १ हजार २०० विद्यार्थी संपावर गेले होते. त्यावेळी ३०० विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' चळवळीत भाग घेतला म्हणून त्या सर्वांना कॉलेजमधून काढून टाकले होते. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु टी.जे. केदार यांनी उदार अंतःकरणाने उस्मानिया विद्यापीठातील काढून टाकण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. अशा सर्व विद्यार्थ्यांची येवला, खामगाव व अहमदनगर येथे सोय केली. हा सशक्त, लोकसहभाग आणि ताकदीचा लढा होता. या लढ्यात रझाकाराची कासीम रिझवीची दादागिरी होती. ती स्वातंत्र्यसैनिकांनी परतावून लावली होती. त्या काळात ज्या घटना घडल्या त्या आपल्याला विसरता येणार नाहीत. शेंदुर्णीची चकमक आहे. या घटनेमध्ये दिगंबरराव बिंदू, गोविंदराव नानल, गोविंदभाई श्रॉफ, मुकुंदराव पेडगावकर, बाबासाहेब परांजपे, श्रीनिवास बोरीकर, काशिनाथ जाधव, माणिकचंद पहाडे, आ. कृ. वाघमारे, देवीसिंह चौहान, राजेंद्र दिवाण, विश्वंभरराव, देवराव कांबळे, व्यंकटेश जोशी, सीताराम पप्पू, श्यामराव बोधनकर, भगवान, नागनाथ परांजपे, रतनलाल पोटे, फुलचंद गांधी, सय्यद, भाऊसाहेब मोरे, धर्मवीर वामन नाईक, विनायकराव कोरडकर, यशवंतराव जोशी, खान, आशाताई वाघमारे, चंद्रगुप्त चौधरी, व्ही. डी. देशपांडे इत्यादी लोकांचा सहभाग आपण कधीही विसरु शकत नाही. मी आता 'वंदे मातरम्' चळवळीची माहिती दिलेली आहे. मागील वर्षी संभाजीनगरमधील सभागृहात 'वंदे मातरम्' गायीले होते. १९८२ रोजी ग्यानी झैलसिंग देशाचे राष्ट्रपती होते. त्यावेळी 'वंदे मातरम्' चळवळीची आठवण म्हणून भूमिपुजनचा कार्यक्रम झाला होता. त्या सभागृहाचे काम सन २०२२ मध्ये झालेले आहे. 'वंदे मातरम्' चळवळीमध्ये संभाजीनगरमधील बाबुसाहेब खरे यांनी लंगोटीला तिरंगा लावून तो देवगिरीच्या किल्ल्यावर फडकविला होता. बाबूसाहेब खैरे यांचा मुलगा खासदार होता. लाला लक्ष्मीनारायण जयस्वाल यांनी सुद्धा 'वंदे मातरम्' चळवळीत सहभाग नोंदविला होता. आर्य समाजाचे स्वामी नरेंद्रजी यांनीसुद्धा 'वंदे मातरम्' चळवळीत सहभाग नोंदविला होता. हा लढा खूप मोठा आहे. त्यांचा लढा भावी पिढीने लक्षात ठेवण्याची गरज आहे. मराठवाड्याच्या लढाईची माहिती देताना आपल्याला चार दिवसदेखील पुरणार नाहीत. भारताच्या स्वातंत्र्याचा लढा सर्वांना माहीत आहे. त्याच धर्तीवर मराठवाड्यातील स्वातंत्र्य संग्रामाचा लढासुद्धा खूप मोठा आहे. यामधील काही भाग महाराष्ट्रात तर काही भाग कर्नाटक आणि काही भाग तेलंगणा राज्यात गेलेला आहे. तेलंगणा राज्यात मोठा कार्यक्रम झालेला आहे. त्या कार्यक्रमास देशाच्या माननीय गृहमंत्री महोदयांनी उपस्थिती नोंदविली होती. या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी सरकारवर टीका करणार नाही. मराठवाड्याच्या मुक्ती संग्रामासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. ७५ कोटी रुपये दिले याचा अर्थ शासनाने उपकार केलेत असा नाही. मराठवाड्यातील शिक्षणाचा, विकासाचा, सिंचनाचा, वैद्यकीय सुविधेचा आणि माता-भगिनींच्या शिक्षणाचा विषय आहे. या संदर्भातील चर्चा सभागृहात करण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भात काही तरी नियोजन किंवा प्लॅन करण्याची आवश्यकता होती. महाराष्ट्रात गेल्या २२५ वर्षा पासून मराठवाडा विकासापासून वंचित राहिलेला आहे. आजही मराठवाडा प्रामाणिकपणे, ताकदीने आणि इमानदारीने लढा देत आहे. भविष्य काळात देखील लढा दिला जाईल. मी भाषणाचा समारोप करताना चार ओळी बोलून माझे भाषण संपविणार आहे.

खरा धर्म देशार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म धर्मार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म दुष्टाशी दुर्वन्ड द्यावा
खरा धर्म नेई जना मोक्ष गावा
जिवे भूमी माजी तुझा जन्म झाला
जने पोसुनी पिंड हा वाढविला शिरी ऋण बा

आज हे थोर झाले तुम्हा पाहिजे शीघ्र ते फेडियले ! एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

*****



“ मी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी गावचा सरपंच म्हणून माझ्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीचा सन २००० साली श्रीगणेशा केला. आज बरोबर २४ वर्षांनी, आमच्या पक्षसंघटनेने दिलेल्या विविध जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर, संसदीय लोकशाहीतील या उच्चासनावर आसनस्थ होताना माझ्या मनात संमिश्र भावना दाटून येत आहेत. विधिमंडळाला लोकशाहीच्या मंदिराची उपमा देणारे विधानसभेचे माजी अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब भारदे आणि हे उच्चासन समर्थपणे सांभाळणारे ‘ज्येष्ठांच्या सभागृहातील सरस्वतीपुत्र’ माजी विधानपरिषद सभापती माननीय प्राध्यापक ना. स. फरांदे सर यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील मी एक कार्यकर्ता आज या पदापर्यंत पोहोचलो हे मी माझे भाग्य समजतो आणि सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करतो. सध्याचे वर्ष अनेक ऐतिहासिक घटनांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. अशा या कालावधीत आपण या वरिष्ठ सभागृहाच्या माध्यमातून लोककल्याणासाठी योगदान देणार आहोत ही आनंदाची बाब आहे. ”

नवनिर्वाचित विधानपरिषद सभापती
माननीय प्रा. राम शिंदे यांनी विधानपरिषद सभापतीपदी
बिनविरोध निवड झाल्यानंतर सभागृहात व्यक्त केलेल्या भावना

दिनांक १९ डिसेंबर, २०२४

**मा. सभापती :** राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस, या सभागृहाचे नेते आणि उप-मुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथजी शिंदे यांनी माझी सभापतीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव सभागृहात मांडला आहे. त्यावर सभागृह नेते उपमुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते, माझे स्नेही माननीय श्री. अंबादास दानवे, माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे त्याचप्रमाणे दोन्ही बाजूंचे सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, शशिकांतजी शिंदे, ॲड. अनिलजी परब यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि माझी विधानपरिषद सभापतीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले, त्याबद्दल मी आपणा सर्वांचे सर्वप्रथम मनःपूर्वक आभार मानतो.

भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्र मोदीजी, देशाचे कणखर गृहमंत्री माननीय श्री. अमितभाई शहा आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री. जे.पी.नड्डाजी, प्रदेश अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळेजी, माननीय मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या शुभेच्छा आणि आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, माननीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आणि माननीय श्री. अजितदादा पवार यांचे मार्गदर्शन प्राप्त करीत तसेच आपणा सर्वांच्या सदिच्छा सोबत घेत मी विधानपरिषद सभापतीपदाचा कार्यभार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करून नम्रपणे स्वीकारीत आहे. या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतीपदी आपण माझी बिनविरोध निवड केली त्याबद्दल मी सर्व पक्षांच्या सन्माननीय गट नेत्यांचे आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचा ऋणी आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या सभागृहाचे सभापती म्हणून ज्यांनी कार्यभार सांभाळला ते

माननीय श्री. वि. स. पागे,

माननीय श्री. रा. सू. गवई,

माननीय श्री. जयंतराव टिळक,

माननीय प्राध्यापक ना. स. फरांदे सर,

माननीय श्री. शिवाजीराव देशमुख

यांच्या स्मृतीस मी अभिवादन करतो. त्याचप्रमाणे या सभागृहाचे विद्यमान सदस्य आणि माजी सभापती माननीय श्री. रामराजे नाईक-निंबाळकर तसेच उपसभापती महोदया माननीय डॉक्टर नीलमताई गोऱ्हे यांचे मार्गदर्शन आणि स्नेह यापुढेही मला लाभणार आहे याबद्दल आनंद व्यक्त करतो.

आपली महाराष्ट्राची भूमी शूरवीरांच्या पराक्रमाने आणि साधू-संतांच्या शिकवणुकीने पावन झालेली आहे. त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस मी नतमस्तक होत वंदन करतो.

छत्रपती शिवाजी महाराज,

राजर्षी शाहू महाराज,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,

महात्मा जोतिबा फुले,

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,

लोकमान्य टिळक,

स्वातंत्र्यवीर सावरकर,

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे,

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणादायी स्मृतीस मी नतमस्तक होत अभिवादन करतो. आज माझ्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीतील या महत्त्वपूर्ण प्रसंगी मी आमचे दिवंगत नेते आदरणीय श्री. गोपीनाथजी मुंडे त्याचप्रमाणे मला समाजकारणात आणणारे आदरणीय श्री. अण्णा डांगे यांचे कृतज्ञ स्मरण करतो.

मी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी गावचा सरपंच म्हणून माझ्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीचा सन २००० साली श्रीगणेशा केला. आज बरोबर २४ वर्षांनी, आमच्या पक्षसंघटनेने दिलेल्या विविध जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर, संसदीय लोकशाहीतील या उच्चासनावर आसनस्थ होताना माझ्या मनात संमिश्र भावना दाटून येत आहेत. विधिमंडळाला लोकशाहीच्या मंदिराची उपमा देणारे विधानसभेचे माजी अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब भारदे आणि हे उच्चासन समर्थपणे सांभाळणारे 'ज्येष्ठांच्या सभागृहातील सरस्वतीपुत्र' माजी विधानपरिषद सभापती माननीय प्राध्यापक ना. स. फरांदे सर यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील मी एक कार्यकर्ता आज या पदापर्यंत पोहोचलो हे मी माझे भाग्य समजतो आणि सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करतो. सध्याचे वर्ष अनेक ऐतिहासिक घटनांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. अशा या कालावधीत आपण या वरिष्ठ सभागृहाच्या माध्यमातून लोककल्याणासाठी योगदान देणार आहोत ही आनंदाची बाब आहे. त्यादृष्टीने मी आणि आपण सर्वच स्वतःला भाग्यशाली समजू या. हे ऐतिहासिक घटनांचे महत्त्वपूर्ण संदर्भ म्हणजे—

(१) जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या आपल्या भारताची राज्यघटनादेखील विश्वस्तरावर एक उल्लेखनीय आणि गौरवास्पद ठरलेली अशी राज्यघटना आहे. आपली ही राज्यघटना आपण स्वीकारल्याच्या ऐतिहासिक पर्वाचा अमृत महोत्सव आपण साजरा करीत आहोत. ब्रिटिशांच्या जोखडातून भारताबरोबरच १९४७ च्या सुमारास अनेक देश स्वतंत्र झाले परंतु तेथे भारताप्रमाणे संसदीय लोकशाही व्यवस्था म्हणावी तशी मूळ धरू शकली नाही. याउलट भारताचे संसदीय लोकशाहीचे उदाहरण वैश्विकस्तरावर गौरवाने दिले जाते. हे केवळ आणि केवळ भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिलेल्या राज्यघटनेमुळेच शक्य झाले आहे. मला सांगताना अतिशय आनंद होतो की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे १९२६ ते १९३७ या काळात मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे म्हणजे आताच्या विधानपरिषदेचे सदस्य होते आणि त्यानंतर १९३७ मध्ये ते विधानसभा सभागृहाचे सदस्य झाले.

(२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान केवळ महाराष्ट्र पातळीवर नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे असे आहे. आक्रमकांनी तोडफोड केलेली मंदिरे, पवित्र तीर्थस्थाने यांचा जीर्णोद्धार

त्यांनी केला. घाट, धर्मशाळा उभारल्या. एक न्यायप्रिय आणि कर्तबगार शासक म्हणून त्यांचे सदैव आदराचे स्थान आपल्या मनामध्ये आहे. सैन्यामध्ये महिलांच्या तुकडीची निर्मिती, शेतकऱ्यांना करमाफी आणि तलाव, विहिरींच्या माध्यमातून सिंचन सुविधा, गोपालनाचा पुरस्कार, दुर्मीळ ग्रंथांची हस्तलिखिते तयार करून त्यांचे जतन, विद्याप्रसार आणि ज्ञानदान याचा पुरस्कार, संस्कृत पाठशाळा, गोरगरिबांसाठी अन्नछत्र यांची उभारणी, सतीप्रथेला विरोध असा या कर्तबगार महिला शासकाच्या कार्यकर्तृत्वाचा आयाम फार मोठा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून लोककल्याणकारी राज्याची मुहूर्तमेढ रोवली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी छत्रपती शिवरायांचा कल्याणकारी राज्याचा हा विचार पुढे नेला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्माचे त्रिशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. त्यांचे कार्य आपल्याला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहील. त्यांच्या माहेरच्या वंशातील मी एक घटक असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.

(३) ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध आदिवासी बंधू-भगिनींना संघटित करून जल, जंगल आणि जमीन यांच्या रक्षणार्थ लढा उभारणारे आमचे आदरस्थान जननायक बिरसा मुंडाजी यांचे १५० वे जयंती वर्ष आपण साजरे करीत आहोत.

(४) भारताच्या संसदीय लोकशाहीच्या वाटचालीतील एक तेजस्वी पर्व म्हणजे माजी पंतप्रधान श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. 'कार्य कठन है... इसलिए करने योग्य है...साधारण कार्य तो सभी करते है' हा भगवद्‌गीतेचा संदेश श्रद्धेय अटलजी नेहमी सांगत. हे त्यांचे उद्‌गार माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना कर्तव्यपथावर अविरत मार्गक्रमण करण्याची चिरस्फूर्ती देत राहतील.

(५) आमची मातृसंस्था जिने आमच्यावर 'तेरा वैभव अमर रहे माँ... हम दिन चार रहे या न रहे...' हा संस्कार बिंबविला, त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष – १९२५ ते २०२५, आपण साजरे करीत आहोत. विशेष म्हणजे या संस्थेचे मुख्यालय असणाऱ्या नागपूर नगरीत होत असलेल्या या हिवाळी अधिवेशनात आज माझी सभापतीपदी निवड झाली आहे, हा क्षण माझ्या आयुष्यातील अत्यंत संस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरणारा आहे.

सभागृहाचे कामकाज सुरू असते तेव्हा एक प्रकारे राज्यातील जनतेचे भाग्यचक्रच गतिमान होत असते. जनतेच्या अपेक्षांना मूर्त स्वरूप देण्यासाठी सभागृह कामकाजाचा प्रत्येक क्षण आणि क्षण आपण उपयोगात आणायचा आहे. सत्ताधारी आणि विरोधी ही संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत आणि त्या रथात जनताजनार्दनाची अभिव्यक्ती विराजमान आहे. या रथाचा मार्ग विकासाच्याच दिशेने आहे, असे चित्र आपल्याला दिसले पाहिजे. सन्माननीय सदस्यांचा सभागृह कामकाजातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. या संदर्भातील मूर्तिमंत उदाहरण याच सभागृहात आपणासमोर विराजमान आहे. सन २०१४ साली माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाली, त्यावेळी ते स्वतः म्हणाले होते की, 'माझी सभागृहातील कामगिरीच मला मुख्यमंत्रीपदापर्यंत घेऊन आली...' यापुढे त्यांनी जे सांगितले होते ते तत्त्व आपण सर्वांनी प्रत्यक्षात आणले तर या वरिष्ठ सभागृहातील चर्चा अधिक फलदायी आणि लोकहितकारी होईल असा मला विश्वास वाटतो. ते पुढे म्हणाले होते – 'सन्माननीय सदस्यांनी सभागृहात असताना

समाजाचा विचार डोळ्यासमोर ठेवला पाहिजे आणि समाजात असताना सभागृहाचा विचार डोळ्यासमोर ठेवला पाहिजे...' याचा अर्थ सभागृहात आपली कायम उपस्थिती ठेवावी आणि सभागृहात बसलेले असताना समाजाचा कुठला प्रश्न नेमक्या आयुधामार्फत मांडून आपण जनतेला न्याय देऊ शकू या दृष्टीने सतत तयारी केली पाहिजे. त्याचप्रमाणे समाजात वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या ठिकाणी आपण वावरत असताना अनेक लोक आपल्याला भेटत असतात, अर्ज-निवेदने देत असतात... त्यावेळी जनतेचे हे प्रश्न सभागृहात मी कशा पद्धतीने मांडू शकेन, त्याला न्याय मिळवून देऊ शकेन याचा विचार आपण केला पाहिजे. आपले सभागृह ज्येष्ठांचे सभागृह किंवा वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते; मात्र अलीकडच्या काळात तरुण सदस्यांची वाढती संख्या लक्षात घेता ते वयोमानपरत्वे तरुण होत चालले आहेत!

आपणा सर्वांना विदित आहेच की, विधानपरिषद हे द्वितीय सभागृह देशात महाराष्ट्रासह फक्त सहा राज्यांमध्ये आहे. अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे आपले हे सभागृह, मुंबईतील टाऊन हॉलच्या दरबार हॉल येथील मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या, दिनांक २२ जानेवारी, १८६२ च्या प्रथम बैठकीपासून, आजपर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. सन १९२१ मध्ये श्री. नारायण चंदावरकर यांच्या रूपाने पहिल्यांदा भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून नियुक्ती झाली. अतः सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधानपरिषद शतकपूर्तीचा कालखंड आपण मानला आणि त्यानुषंगाने संदर्भसमृद्ध ग्रंथसंपदा प्रकाशित करण्याचा उपक्रम उपसभापती महोदया डॉक्टर नीलमताई गोऱ्हे यांच्या पुढाकाराने हाती घेतला आहे. ग्रंथनिर्मितीची ही कार्यवाही आपल्याला वेगाने पुढे न्यायची आहे.

विधानमंडळाचे कामकाज अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने आपणा सर्वांच्या सहकार्याने मी चतुःसूत्री - फोर पॉइंट प्रोग्राम अमलात आणणार आहे.

**(१) प्रश्नोत्तराच्या तासाचे विशेष महत्त्व आहे.** अधिवेशनाचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून खूप मोठी यंत्रणा प्रश्नोत्तराच्या तासासाठी आणि एकंदरीतच अधिवेशनासाठी कार्यरत असते. प्रश्नोत्तराचा तास विनाव्यत्यय पार पाडला जावा आणि रोजच्या तासाभरात किमान १० प्रश्न तरी पुकारले जाऊन चर्चा व्हावी असे अपेक्षित आहे. माननीय लोकसभा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत या संदर्भात विचारमंथन झालेले आहे. संसदीय लोकशाही व्यवस्था जनतेप्रति अधिकाधिक उत्तरदायी व्हावी असे वाटत असेल तर आपण सर्वांनी प्रश्नोत्तराचा तास आणि त्याचे गांभीर्य ओळखायला हवे.

**(२) समिती पद्धती हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.** वर्षभरात तीन अधिवेशनांचे तीन महिने झाले की उर्वरित काळात काय कामकाज होते, विधानमंडळाचे सरकारवर खरेच नियंत्रण असते किंवा कसे अशा जनमानसातील चर्चा आपल्या संसदीय लोकशाहीविषयी अकारण नकारात्मक भाव निर्माण करीत असतात. वस्तुतः दोन अधिवेशनांच्या मधील कालावधीत सुरू असलेली समिती कामकाज पद्धत हे या संदर्भातील चर्चांना योग्य उत्तर आहे. समित्यांचे गठन, समिती प्रमुखांना उचित मार्गदर्शन, सभागृहाला अहवाल सादर होणे ही कार्यपद्धती आणखी गतिमान आणि मजबूत करण्यात येईल.

**(३) कायदा निर्मिती हे विधानमंडळाचे अंगीभूत महत्त्वाचे कार्य आहे.** देशपातळीवर अनुकरणीय ठरलेले कायदे हे आपल्या विधानमंडळाचे वैशिष्ट्य आहे. कायदा निर्मितीच्या प्रक्रियेत सन्माननीय सदस्यांचा सक्रिय सहभाग असावा तसेच महत्त्वाचे विधेयक विनाचर्चा संमत होऊ नये या दृष्टीने कार्यवाही करू या.

**(४) राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे 'कल्याणकारीराज्य संकल्पनेची' प्रभावी अभिव्यक्ती होय.** अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आणि मागण्यांवरील चर्चा यांना पुरेसा अवधी मिळणे, सन्माननीय सदस्यांना आपल्या मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन आणि निधी मिळणे या दृष्टीने आपण उत्तम कार्य करू या.

Quality Debate and Diverced Views will be acknowledged... Debate and discussion are the life and blood of Parliamentary Democracy... So let us Debate, discuss and decide but do not disturb... गोंधळात सभागृह कामकाजाचा बहुमोल वेळ वाया जाणार नाही याची दक्षता आपण घेऊ या... आदरणीय बाळासाहेब भारदे हे संसदीय लोकशाही पद्धतीचे प्रभावी भाष्यकार म्हणूनदेखील ओळखले जात. त्यांच्या शब्दात सांगायचे झाले तर – **'लोकांची भलाई हीच आपली कमाई अशी भावना उभयपक्षी असेल तर काही सत्तारूढांची बेपर्वाई आणि काही विरोधकांची दांडगाई या गोष्टी कमी होऊन लोकशाहीची पुण्याई कृतार्थ होईल.'** अशा भावनेने आपण सर्व मिळून उत्तम कार्य करू या. सभागृह कामकाजाचा प्रत्येक क्षण आणि क्षण लोकहितासाठी खर्ची पडेल असे जबाबदारीपूर्ण वर्तन आपले राहील अशी काळजी घेऊ या. धन्यवाद. आपणा सर्वांचे पुनश्च एकदा आभार...

**जय हिंद, जय महाराष्ट्र, जय संविधान !**

*****



“

ब्रिटनला संसदीय कार्यप्रणालीची जननी म्हणून ओळखले जाते. राजाचे अधिकार आणि हस्तक्षेप मर्यादित होत होत तेथील लोकशाही गेल्या ८०० वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर विकसित होत गेली. प्रगल्भ आणि परिपक्व होत गेली. मात्र तरीही विन्स्टन चर्चिल यांच्यासारख्या तेथील पंतप्रधान आणि मुत्सद्द्याला–

'The best argument against democracy is a five-minute conversation with the average voter !' असे का बरे म्हणावे लागले असेल...? चर्चिलसाहेबांच्या या मार्मिक अवतरणामध्ये खूप काही दडले आहे.

'Speaker has less to speak' याची मला जाणीव आहे, कारण यापुढील काही काळ मला 'more to listen' ची भूमिका पार पाडायची आहे !

”

नवनिर्वाचित माननीय विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी त्यांच्या अभिनंदनपर प्रस्तावानंतर सभागृहात केलेले भाषण

दिनांक ३ जुलै, २०२२

भारतातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेल्या 'महाराष्ट्र विधानसभा' या राज्यातील सर्वोच्च सभागृहाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केली त्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानण्यासाठी उभा आहे. देशाचे आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी, कणखर गृहमंत्री माननीय श्री. अमितभाई शहा आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री. जे. पी. नड्डाजी यांच्या शुभेच्छा आणि आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे मार्गदर्शन प्राप्त करीत, तसेच आपणा सर्वांच्या सदिच्छांसह मी विधानसभा अध्यक्षपदाचा कार्यभार नम्रपणे स्वीकारीत आहे.

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या अमृत महोत्सवी वर्षात टिळक-गोखले-आंबेडकर-नाना पाटील-सावरकर यांसारख्या महान देशभक्तांची भूमी असलेल्या महाराष्ट्राच्या या सर्वोच्च सभागृहाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केली, हा मी माझ्या आजपर्यंतच्या सामाजिक आणि राजकीय कारकिर्दीतील सर्वोच्च बहुमान समजतो.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी त्याग आणि बलिदान दिलेल्या सर्व आदरणीय नेत्यांना आणि शूरवीरांना तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या सभागृहाचे आणि लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळणकर अशा सर्व महात्म्यांना मी या आसनावरुन नतमस्तक होत वंदन करतो.  लोकशाहीतील हे महत्त्वाचे पद मी गांभीर्याने आणि न्यायबुद्धीने सांभाळीन, अशी ग्वाही मी आपणाला देतो.

माझी या पदावर निवड झाल्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या अभिनंदनपर भावना व्यक्त केल्या ते सर्वश्री माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे, माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस, माननीय श्री. अजितदादा पवार, माननीय श्री. बाळासाहेब थोरात, माननीय श्री. सुनील प्रभू, माननीय श्री. अबू आझमी, माननीय श्री. बच्चू कडू, माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार, माननीय श्री. जयंत पाटील, माननीय श्री. नाना पटोले, माननीय श्री.आदित्य ठाकरे, माननीय श्री.दीपक केसरकर, माननीय श्री.हरीभाऊ बागडे, माननीय श्री.किशोर जोरगेवार आणि माननीय श्री. धनंजय मुंडे आणि विधानसभेचे उपाध्यक्ष तथा माननीय कार्यकारी अध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळजी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

आपली संसदीय लोकशाही सर्व प्रकारच्या राजकीय विचारछटांना स्थान देते. अभिव्यक्तीस्वातंत्र्य हा आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. जनताजनार्दन हा आपल्या मताधिकाराद्वारे सरकार निवडून आणतो किंवा आधी निवडलेले सरकार पुढल्या वेळी पराभूत देखील करतो. जनादेशाचा आदर राखणे आणि संसदीय सभ्याचार जपला जाणे आवश्यक आहे.

ब्रिटनला संसदीय कार्यप्रणालीची जननी म्हणून ओळखले जाते.  राजाचे अधिकार आणि हस्तक्षेप मर्यादित होत होत तेथील लोकशाही गेल्या ८०० वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर विकसित होत गेली. प्रगल्भ आणि परिपक्व होत गेली. मात्र तरीही विन्स्टन चर्चिल यांच्यासारख्या तेथील पंतप्रधान आणि मुत्सद्द्याला–

'The best argument against democracy is a five-minute conversation with

the average voter !' असे का बरे म्हणावे लागले असेल...? चर्चिलसाहेबांच्या या मार्मिक अवतरणामध्ये खूप काही दडले आहे.

'Speaker has less to speak' याची मला जाणीव आहे, कारण यापुढील काही काळ मला 'more to listen' ची भूमिका पार पाडायची आहे !

ज्या विधानसभेच्या अध्यक्षपदासाठी आपण माझी निवड केली त्या विधानसभेची ही पवित्र वास्तू मला जनतेने निवडून दिलेल्या कुलाबा मतदारसंघातच येते. 'विधानसभा अध्यक्ष' हे विधानसभा ज्या मतदारसंघात येते, त्याच मतदारसंघाचे आमदार हा एक दुर्लभ असा योग माझ्या बाबतीत आपणा सर्वांमुळे घडून आला आहे. अर्थात त्यामुळे सगळ्यांना सत्र काळात आणि निःसत्रकाळातही २४ × ७ उपलब्ध असलेला विधानसभा अध्यक्ष आता लाभणार आहे. विरोधी पक्षातील आमचे सर्व मित्र त्याचे निश्चितच स्वागत करतील अशी मला आशा आहे...

महाराष्ट्र विधानमंडळ हे राज्यातील १४ कोटी जनतेच्या इच्छा-आकांक्षांचे प्रतीक आहे. आपणा सारख्या लोकप्रतिनिधींच्या मार्फत या इच्छा-आकांक्षा विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सभागृहात मांडल्या जाणे आणि त्यानुसार निर्णयप्रक्रियेचे चक्र गतिमान राहणे आवश्यक आहे. जेव्हा सभागृहाचा वेळ गोंधळामुळे वाया जातो तेव्हा असे वर्तन म्हणजे एक प्रकारे जनताजनार्दनाच्या भावभावनांची आणि अपेक्षांची प्रतारणा आहे, हे लक्षात घेतले जावे. त्यादृष्टीने यापुढील काळात सभागृह कामकाजाचा क्षण आणि क्षण लोकहिताच्या कारणासाठी, निर्णयाभिमुख चर्चेसाठी, विकासाभिमुख नियोजनासाठी आणि समाजातील अंतिम घटकांच्या– शोषित वंचितांच्या उद्धारासाठी खर्ची पडेल अशी ग्वाही मी आजच्या निवडीप्रसंगी देतो. आपण सर्व सदस्य या उद्दिष्टांसाठी मला सहकार्य कराल अशी मला खात्री आहे.

कायदे करणे हे कायदेमंडळाचे महत्त्वाचे कार्य आहे. विधेयकांवर दोन्ही बाजूने सांगोपांग चर्चा होऊन येणारा नवीन कायदा अधिकाधिक परिपूर्ण असावा अशी अपेक्षा असते. दुर्दैवाने महत्त्वाची विधेयकेसुद्धा चर्चेविना संमत होणे, सभागृहातील दोन्ही बाजूंसाठी आणि विशेषतः लोकहिताचे वैशिष्ट्यपूर्ण कायदे राज्याबरोबरच देशालाही देणाऱ्या आपल्या विधानमंडळासाठी, भूषणावह नाही. या संदर्भात येत्या काळात परिस्थिती निश्चितच सुधारलेली असेल, त्या दृष्टीने काही व्यवस्था आपण तयार करू, अशी मी आपणा सर्वांना खात्री देतो.

मी आणखी एका दृष्टीने भाग्यवान विधानसभा अध्यक्ष ठरणार आहे. त्याचे कारण याच सभागृहात चार माजी विधानसभा अध्यक्ष स्थानापन्न आहेत ! मागील विधानसभेचे अध्यक्ष (१) माननीय श्री. हरिभाऊजी (नाना) बागडे, त्याअगोदरच्या विधानसभेचे अध्यक्ष (२) माननीय श्री. दिलीप वळसे-पाटील, या विधानसभेचे पहिले अध्यक्ष (३) माननीय श्री. नाना पटोले – असे तीन माजी अध्यक्ष आणि याच विधानसभेचे कार्यकारी अध्यक्ष राहिलेले उपाध्यक्ष (४) माननीय श्री. नरहरी झिरवाळ हे कार्यकारी असल्यामुळे चौथे, असे चार माजी अनुभवी अध्यक्ष मला मार्गदर्शन करण्यासाठी याच सभागृहात तत्पर असणार आहेत...

आपल्या सभागृहाला दिग्गज अध्यक्षांची अतिशय तेजस्वी आणि प्रेरक परंपरा लाभली आहे. आदरणीय गणेश वासुदेव मावळणकर, कुंदनलाल फिरोदिया, दत्तात्रय कुंटे, सयाजी सिलम, बाळासाहेब भारदे, शेषराव वानखेडे, बाळासाहेब देसाई, शिवराज पाटील अशी ही मोठी परंपरा आपल्यासमोर आहे. या मान्यवरांनी आपल्या संसदीय लोकशाहीचा सन्मान उंचावला आहे.

सन १९६२ ते १९७२ अशी सलग दहा वर्षे ज्येष्ठ गांधीवादी नेते आणि वारकरी तत्त्वज्ञान, महाराष्ट्रातील कीर्तन परंपरा यांचे अध्वर्यू आदरणीय बाळासाहेब भारदे हे या विधानसभेचे अध्यक्ष होते. त्यांनी या विधानमंडळाला 'लोकशाहीच्या मंदिराची' अतिशय समर्पक उपमा दिलेली आहे. विधानसभा म्हणजे शिळोप्याच्या गप्पांचे ठिकाण नसून ते नवभारताचे व्यासपीठ आहे, या जाणिवेने सन्माननीय सदस्य काम करतील, अशा भावनेतून जनताजनार्दन लोकशाहीच्या मंदिरात आपल्याला पाठवीत असतो, असे आदरणीय भारदेसाहेबांनी सांगून ठेवले आहे. सभागृहातील चर्चेचा स्तर दर्जेदार असायला हवा. दोन्ही बाजूंनी आपले घटनादत्त कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडावे असे आवाहन मी आपणांस करतो.

आपण सर्व सन्माननीय सदस्य अशा प्रकारे उत्तम आणि परिणामकारक वैधानिक कार्य करण्यासाठी तत्पर राहू, अशी सदिच्छा मी व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानून येथेच थांबतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

*****



"

साधारणतः या सभागृहामध्ये वयाने ज्येष्ठ असणारी माणसे येतात. आता अलीकडे हे प्रमाण हळूहळू कमी होऊ लागले आहे. मला तो दोष वाटत नाही. युवावर्गाचा या सदनातील सहभागही आवश्यक असाच आहे. युवकांचे प्रश्नही त्यामुळे तीव्रतेने चर्चेला येऊ शकतात.

महाराष्ट्राच्या संदर्भात वरिष्ठ सभागृहाचे संसदीय लोकशाहीच्या संवर्धनात अशा प्रकारे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. देशपातळीवरही राज्यसभेने अत्यंत मोलाची कामगिरी भारतीय लोकशाही अधिक परिपक्व होण्यासंदर्भात बजावली आहे.

"

*महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सव*
स्नेहमेळावा आणि परिसंवाद
दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ रोजी, (सकाळी ११.१५ ते सायं. ४.३० वा.)
मध्यवर्ती सभागृह, विधानभवन मुंबई.
डॉ. नीलम गोऱ्हे, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे भाषण

व्यासपीठावर उपस्थित तसेच सभागृहात उपस्थित सर्वांचे स्वागत. विद्यमान विधानपरिषद सदस्यांबरोबरच अनेक माजी सन्माननीय सदस्यदेखील वय-प्रकृती सांभाळत आज या ठिकाणी उपस्थित आहेत, ही पीठासीन अधिकारी म्हणून माझ्यासाठी निश्चितच अतिशय आनंदाची, समाधानाची बाब आहे. या शतकमहोत्सवी वाटचालीचे जवळचे साक्षीदार असलेल्या ज्येष्ठ पत्रकारांनाही आपण आजच्या सोहळ्यासाठी आवर्जून निमंत्रित केले आहे. ते देखील नेहमीच्याच उत्साहाने त्या काळातील आठवणींसह येथे उपस्थित आहे. या चौथ्या स्तंभाच्या आमच्या ज्येष्ठ स्नेहींचाही या ठिकाणी मनःपूर्वक स्वागत करताना मला विशेष आनंद होत आहे. आपण सर्व जण आज एक ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार ठरत आहोत याचा अभिमान आणि आनंद मला वाटतो.

देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधानपरिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड शिफारशीनुसार भारत सरकार अधिनियम १९१९ अन्वये 'Bombay Legislative Council' ची प्रारंभिक बैठक १९ फेब्रुवारी, १९२१ रोजी टाऊन हॉल, मुंबई येथे झाली. श्री. नारायण गणेश चंदावरकर यांची विधानपरिषदेच्या सभापतीपदी झालेली नियुक्ती ही एक ऐतिहासिक घटना होती. सन १८६२ ते सन १९२० पर्यंत Governor of Bombay यांच्या अध्यक्षतेखाली Council चे कामकाज चालत होते. सन १९२१ मध्ये श्री. नारायण चंदावरकर यांच्या रूपाने पहिल्यांदा भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून नियुक्ती झाली. अतः सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधानपरिषद शतकपूर्तीचा कालखंड मानता येईल.

भारताच्या घटनात्मक इतिहासातील १९१९-१९२०-२१ नंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (Government of India Act 1935) होय. या कायद्याद्वारे संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. या कायद्यान्वये विधानसभा आणि विधानपरिषद असे नामाभिधान देऊन मुंबई प्रांतात १९३७ मध्ये दोन सभागृहे अस्तित्वात आली.

विधानपरिषदेचा आरंभबिंदू ठरवायचा झाले तर आपल्याला शंभरपेक्षाही जास्त वर्षे मागे जावे लागेल. २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भूतपूर्व मुंबई प्रातांच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची (Council of Governor of Bombay) पहिली बैठक भरली होती. १८६२ ते १९३७ या पंचाहत्तर वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत—

सर्वश्री जगन्नाथ शंकरशेठ

जमशेटजी जीजीभॉय

सर माधवराव विंचूरकर

रावसाहेब विश्वनाथ

नारायण मंडलिक

रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

सर फिरोजशाह मेहता

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

गोपाळ कृष्ण गोखले

डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

नारायण गणेश चंदावरकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

अशी दिग्गज सन्माननीय सदस्यांची मालिका विधिमंडळाला लाभली आहे.

तेव्हापासून १९२१ चा संदर्भ पुढे नेत आजही विधानपरिषद कार्यरत आहे, उल्लेखनीय योगदान देत आहे. केवळ राज्यातील नव्हे तर देशातील ते एक सर्वाधिक जुने सभागृह आहे, ज्याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे.

**जागतिक संदर्भ, राज्यघटनेतील १६९ ची तरतूद—**

अमेरिकेत 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह' आणि 'सिनेट' या सभागृहांनी मिळून 'काँग्रेस' बनली आहे. इंग्लंडमध्ये 'हाऊस ऑफ कॉमन्स' आणि 'हाऊस ऑफ लॉर्ड्स' यांनी मिळून 'ब्रिटिश पार्लमेंट' बनले आहे. आणि त्याप्रमाणे भारतात 'लोकसभा' आणि 'राज्यसभा' या दोन सभागृहांनी मिळून आपली संसद बनली आहे. विधानपरिषदेला 'अप्पर हाऊस' किंवा 'ज्येष्ठांचे सभागृह' असेही म्हटलं जातं. विधानपरिषद ही संकल्पना भारतातील सर्व राज्यांमध्ये अस्तित्वात नाही. महाराष्ट्रासह, बिहार, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश अशा सहा राज्यात विधानपरिषद हे सभागृह कार्यरत आहे. सर्व राज्यात असलेल्या विधानसभा व सहा राज्यात त्या जोडीला असलेले विधानपरिषद म्हणजे 'अप्पर हाऊस' हे वरिष्ठ सभागृह अस्तित्वात आहे. भारतीय 'संसद' सुद्धा दोन सभागृहांनी मिळून बनलेली आहे. 'लोकसभा' आणि ज्येष्ठांचं सभागृह म्हणजे 'राज्यसभा' ही ती दोन सभागृहे आहेत. राज्यघटनेतील अनुच्छेद १६९ अनुसार विधानपरिषद हे दुसरे सभागृह अस्तित्वात येते. विधानपरिषदेची निर्मिती अथवा विधानपरिषदेचे विसर्जन विधानसभेच्या इच्छेवर अवलंबून ठेवले आहे. किमान दोनतृतियांश इतक्या बहुमताचा ठराव विधानसभेने यासंदर्भात संमत करणे आवश्यक आहे. या संदर्भात राज्यघटनेच्या अनुच्छेद १६९ तसेच विधानपरिषद रचनेसंदर्भात अनुच्छेद १७१ मध्ये तरतुदी दिलेल्या आहेत.

**वरिष्ठ सभागृह पद्धतीवरील टीका एकांगी—**

विधानपरिषद हे सभागृह असावे की, असू नये, विधानसभा हे सभागृह लोकांनी थेट निवडून दिलेल्या सदस्यांद्वारे तयार होत असल्याने तेच जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी ठरतात. त्यामुळे मग विधानपरिषद या सभागृहाची गरजच काय? असा प्रश्न, असे वादविवाद अधूनमधून उपस्थित केले जात असतातच. 'मागल्या दाराने प्रवेश', 'राजकीय सोय लावण्याचा उपाय' असे अनेक प्रवाद विधानपरिषद नामनियुक्त सदस्यत्वासंदर्भात जोडले गेले आहेत तर विधानपरिषदेच्या एकूणच अस्तित्वाच्या विरोधात मतप्रदर्शन करणारा

गट नेहमीच विधानपरिषदेच्या बाबतीत 'वेळकाढूपणाचे सभागृह', 'कायदयाचा कीस पाडणारे सभागृह' अशी मल्लिनाथी करीतच असतो. **परंतु या गोष्टी, या संदर्भातील टीका ही एकांगी स्वरूपाची आहे. वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आहे. पूर्ण विचारांती या प्रश्नाकडे बघितल्यास लोकशाही संवर्धन व बळकटीसाठी विधानपरिषद किंवा द्विसभागृह पद्धती ही एक आवश्यक अशी संकल्पना आहे, असेच म्हणावे लागेल.**

**It is a 'Revising Chamber'**

**and not a 'Delaying Chamber'**

***लोकशाहीतील उणीव दूर करण्याचा प्रयत्न–**

विधानसभेमध्ये थेट लोकांमधूनच सदस्य निवडून येत असतात. एकदा निवडणूक हा एक आखाडा मानला की निवडणुकीचा फड जिंकणे महत्त्वाचे ठरते. म्हणजेच 'इलेक्टिव्ह मेरिट' चा मुद्दा सर्वच दृष्टीने विचारात घेतला जातो. इलेक्टिव्ह मेरिट आणि त्याअनुषंगाने जोडल्या गेलेल्या भल्याबुऱ्या गोष्टींमुळे बऱ्याचदा लायक आणि योग्य व्यक्ती लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतेच असे नाही. किंबहुना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ, लायक व्यक्ती एक तर निवडणुक रिंगणापासून शक्यतो दूर राहतात आणि निवडणूक रिंगणात त्या उतरल्याच तर निवडून येतातच असे नाही ! त्यामुळे राज्यसभा व विधानपरिषदेसारख्या महत्त्वाच्या सभागृहांची आवश्यकता याठिकाणी आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही. या सभागृहांच्या माध्यमातून अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तींनी संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून देशविकासासाठी उल्लेखनीय योगदान दिलेले आहे.

***विविध क्षेत्राशी संबंधित नामवंत व्यक्तींना विधानमंडळ कार्यात सहभागी करून घेणे शक्य...**

साहित्य, विज्ञान, कला, सहकार चळवळ आणि समाजसेवा अशा विविधांगी क्षेत्राशी संबंधित नामवंत व्यक्तींना विधिमंडळाच्या महत्त्वाच्या कार्यामध्ये विधानपरिषदेमुळेच सहभागी करून घेता येवू शकते. राज्यघटनेच्या अनुच्छेद १७१(५) मध्ये या संदर्भात स्पष्ट उल्लेख आहे. महामहिम राज्यपाल महाराष्ट्र विधानपरिषदेच्या एकूण ७८ सदस्यांपैकी १२ सदस्यांना उपरोक्त विविध क्षेत्रांमधून नियुक्त करू शकतात. त्याचप्रमाणे विधानसभा सदस्यांद्वारे एकूण ३०, स्थानिक प्राधिकारी संस्थांनी निवडून दिलेले २२, महाराष्ट्राच्या ७ विभागाद्वारे पदवीधरांचे ७ व शिक्षकांचे ७ प्रतिनिधी विधानपरिषदेवर निवडून येतात.

***कधीही बरखास्त न होणारे स्थायी सभागृह ...**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाच वर्षांनी कार्यकाल संपताच विधानसभा बरखास्त होऊन निवडणुकीद्वारे नवी विधानसभा अस्तित्वात येते. नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांचे शपथविधीसाठीचे अधिवेशन मुंबईत घेण्यात येते. विधानपरिषद मात्र कधीही बरखास्त न होणारे, अमरत्व प्राप्त झालेले स्थायी सभागृह आहे. विधानपरिषदेच्या प्रत्येक सदस्यांचा कार्यकाल ६ वर्षाचा असून दर दोन वर्षांनी एकतृतीयांश सदस्य निवृत्त होतात.

***विधानपरिषदेच्या माध्यमातून नामवंतांची मालिका....**

एरवी राजकारणाशी संबंध न आलेल्या किंवा समाजकारणालाच प्राधान्य दिलेल्या परंतु विशिष्ट क्षेत्रातील कार्यामुळे विधानपरिषदेवरील नियुक्तीमुळे उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या अनेक नामवंतांची मालिका महाराष्ट्राला लाभलेली आहे. प्रा. ग. प्र. प्रधान, नरुभाऊ लिमये, मा. गो. वैद्य, 'गीतरामायण'कार ग. दि.माडगूळकर, प्राचार्य दोंदे, कवी ना. धों. महानोर, रामदास फुटाणे ही काही नावे त्या परंपरेतील आहेत.

***उल्लेखनीय योगदान–**

राजकीय सभ्यता, सुसंस्कृतता आणि संसदीय लोकशाहीतील प्रथांची उच्च परंपरा याबाबतीत महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावण्यामध्ये विधानपरिषदेतील विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण चर्चेचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. या सगळ्यांच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञानाचा, अनुभवाचा लोकांना, सभागृहाला फायदा व्हावा यासाठी स्वतंत्र अशा विधानपरिषद या सभागृहाची निर्मिती केलेली आहे. आदरणीय वि. स. पागे जे सलग १८ वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे १९६० ते १९७८ याकाळात सभापती होते, त्याचप्रमाणे माजी मुख्यमंत्री व राजस्थानचे माजी राज्यपाल कै.वसंतदादा पाटील, केंद्रीय मंत्री कै. शंकरराव चव्हाण, माजी केंद्रीय कृषी मंत्री, मा.श्री.शरद पवार, केरळचे माजी राज्यपाल मा. श्री. रा. सु. गवई, कै.जयंतराव टिळक, मा. श्री. गंगाधरराव फडणवीस, मा. श्री. पांडुरंगजी फुंडकर, मा. श्री. नितीनजी गडकरी, मा. श्री. दिवाकरजी रावते, मा.श्री. प्रमोद नवलकर, मा. श्री. विनोद तावडे या मान्यवरांसह अनेक सदस्यांनी विधानपरिषदेच्या माध्यमाद्वारे उल्लेखनीय कार्य केले आहे. अलीकडच्या काळातील पूर्वपीठासीन अधिकारी मा.प्रा.ना.स. फरांदे सर, मा. श्री. शिवाजीराव देशमुख, मा. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, उपसभापती राहिलेले मा. श्री. वसंतराव डावखरे यांनीही मोलाचे योगदान दिले आहे.

***पुनर्विलोकनामुळे कायदा अधिक सक्षम व परिपूर्ण बनल्याची अनेक उदाहरणे–**

प्रत्येक कायदा हा विधानसभेने संमत केल्यानंतर तो पुन्हा विधानपरिषदेकडे येणार आणि तिथे तो पुन्हा संमत व्हावा लागणार, ही वेळखाऊ अशा प्रकारची पद्धत आहे याबद्दल वाद नाही. या सभागृहात आल्यानंतर कोणत्याही धोरणांची, विधेयकाची बारकाईने चिकित्सा होते. त्याला काही लोक किचकटपणा म्हणत असले, कीस काढणे, कीस पाडणे अशा प्रकारचा शब्दप्रयोग करीत असले तरी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये अनेक वेळा असे घडलेले आहे की, या सविस्तर चर्चेमुळे त्या कायद्याचे स्वरूप जास्तीत जास्त निर्दोष असे झाले आहे. म्हणून अशा किती तरी गोष्टी आहेत की, ज्यांचे पुनर्विलोकन होणे आवश्यक ठरते. एक प्रकारे ही जबाबदारी हे वरिष्ठ सभागृह अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडताना आपल्याला दिसते. विद्यापीठ कायद्याबरोबरच रोजगार हमीचा कायदा, स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठीचा गर्भजलचाचणी प्रतिबंध कायदा, वाहतूक कंपनीच्या सरकारीकरणाचा कायदा, महाराष्ट्र कॅपिटेशन फीविरोधी कायदा, प्रकल्पग्रस्त पुनर्वसन कायदा, संघटित गुन्हेगारीविरोधी कायदा-मोक्का, डान्सबार बंदीचा कायदा, घरेलू कामगारांना संरक्षण

देणारा कायदा, शिर्डी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था कायदा, देवदासी प्रथा निर्मूलन कायदा, अंधश्रद्धा निर्मुलन कायदा, माहितीचा अधिकाराचा कायदा आदी महत्त्वपूर्ण कायद्यांबाबत विधानपरिषदेने उपयुक्त सूचना, बदल सुचवून कायदा अधिकाधिक परिणामकारक, सर्वसमावेशी करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

***स्थानिक प्राधिकारी संस्थांचे प्रतिनिधी-शहर आणि ग्रामविकास गतिमान—**

जिल्हापरिषद कायदा, ग्रामपंचायत कायदा, नगरपरिषद कायदा या कायद्यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे. जे कार्यकर्ते, नेते या क्षेत्रात काम करीत होते, ज्यांना या क्षेत्रातील बारकाव्यांचा अनुभव आहे, ज्यांना ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, नगरपरिषद येथे काम करण्याचा अनुभव आहे, त्यांना त्यामधील उणिवा लक्षात येऊ शकतात. कोणत्या योजना त्यामध्ये दिल्या पाहिजेत ? याचा अनुभव फक्त त्या क्षेत्रातील लोकांना असू शकतो. स्थानिक प्राधिकारी संस्थांमधून २२ सन्माननीय सदस्य विधानपरिषदेवर निवडले जात असल्याने त्यांच्याद्वारे नगरनियोजन आणि विकास तसेच ग्रामनियोजन आणि विकास या संदर्भात अधिक चांगले मार्गदर्शन, सूचना, सहभाग या सदस्यांद्वारे सरकारला प्राप्त होवू शकतात. या विषयाच्या संदर्भातील विधेयके विधानपरिषदेमध्ये अधिक चांगल्या प्रकारे हाताळली जातात. उणिवा दूर केल्या जातात. त्यामुळे हा होणारा कायदा जास्तीत जास्त निर्दोष असू शकतो. काही दोष त्यामध्ये राहणार, पण जास्तीत जास्त निर्दोष अशी कायदानिर्मिती असावी, अशा प्रकारची ही व्यवस्था आहे.

***दोन्ही सभागृहांत योग्य समन्वय आणि संतुलन आवश्यक—**

द्विसभागृह पद्धतीची त्यामुळे निश्चितपणे आवश्यकता आहे व दोन्हीं सभागृहांमध्ये योग्य समन्वयही असला पाहिजे, एक प्रकारे हा जगन्नाथाचा रथ समन्वयाने ओढला पाहिजे. त्यातील एक अश्व जर जोरजोरात पळायला लागला आणि दुसरा अश्व हा जर त्या रथाला मागे-मागे ओढू लागला, थांबू लागला तर त्यातील संतुलन बिघडेल. म्हणून विधिमंडळ म्हणजे लोकशाहीच्या जगन्नाथाचा रथ आहे, त्याला अधिकाधिक गती आली पाहिजे. पण गती निर्माण होताना त्यातील बारीक गोष्टींचे विस्मरण होता कामा नये. कधीकधी गतीमध्ये सुयोग्य गोष्टींचे भान राहत नाही. घाई-गडबडीमध्ये काही गोष्टी होऊन जातात, म्हणून अशा प्रकारच्या वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आहे आणि त्यांच्यातील समन्वयाचीही आवश्यकता निश्चितपणाने आहे.

***जबाबदारीपूर्ण वर्तनाची अपेक्षा !**

वरिष्ठ सभागृह, वरिष्ठ सभागृह म्हणायचे आणि खालच्या सभागृहात जेवढा गोंधळ होत नाही तेवढा गोंधळ जर उद्या येथे होऊ लागला तर वरिष्ठ सभागृह म्हणवून घेण्याचा आपल्याला अधिकार राहणार नाही. याचा अर्थ, योग्य कारणासाठी आपण आपला संताप, तीव्र भावना व्यक्त करू नये असे नव्हे... पण सभागृहाची मान आणि मर्यादा यांचा कधीही विसर पडू देता कामा नये. सत्ताधारी आणि विशेषकरून विरोधी

पक्षाचेही वर्तन अशा प्रकारे जबाबदारीपूर्ण असले पाहिजे. म्हणून या सभागृहाला जे महत्त्व आहे ते ओळखून अतिशय शांतपणाने, चौफेर आणि सखोल विचारविनिमय करून या ठिकाणी निर्णय घेणे आवश्यक असते.

***ज्येष्ठांच्या सभागृहात युवा जनप्रतिनिधींचे स्वागत...**

साधारणतः या सभागृहामध्ये वयाने ज्येष्ठ असणारी माणसे येतात. आता अलीकडे हे प्रमाण हळूहळू कमी होऊ लागले आहे. मला तो दोष वाटत नाही. युवावर्गाचा या सदनातील सहभागही आवश्यक असाच आहे. युवकांचे प्रश्नही त्यामुळे तीव्रतेने चर्चेला येऊ शकतात.

महाराष्ट्राच्या संदर्भात वरिष्ठ सभागृहाचे संसदीय लोकशाहीच्या संवर्धनात अशा प्रकारे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. देशपातळीवरही राज्यसभेने अत्यंत मोलाची कामगिरी भारतीय लोकशाही अधिक परिपक्व होण्यासंदर्भात बजावली आहे.

वरिष्ठ सभागृहाचे संसदीय लोकशाहीतील महत्वत्त्वपूर्ण योगदान या विषयाचे हे विविधांगी पैलू विधानपिरषद शतक महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित स्नेहमेळावा तसेच परिसंवाद यानिमित्ताने आणखी चांगल्या प्रकारे दृश्यमान व्हावेत अशी अपेक्षा आहे. भारतातील संसदीय लोकशाहीच्या इतिहासाचा विचार करता महाराष्ट्र हे आपले राज्य निश्चितच भाग्यवान असे आहे हे मी या ठिकाणी नमूद करते. विधानपरिषदेचे त्या संदर्भातील महत्त्वाचे कार्य या दृष्टीने निश्चितच कौतुकास्पद आहे, यात शंका नाही.

आपणा सर्वांना पुढील वाटचालीसाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

**जयहिंद,**

**जय महाराष्ट्र !**

*****



“

* सार्वजनिक कार्य और विधानमंडल का काम...संतुलन आवश्यक...

और मैं यह कहता हूं कि one has to strike a balance, कई बार हमें दो तरह के लोग दिखाई देते हैं—there are few people who are the best parliamentarians but inaccessible. और कुछ लोग ऐसे होते हैं जो सुबह 6 बजे से उठकर रात 12 बजे तक लोगों में रहते हैं, लेकिन उनका हाऊस में कोई वजूद नहीं होता, कोई परफॉर्मेन्स नहीं होता। चुनकर तो दोनों टाइप के लोग आ सकते हैं, लेकिन जो परिवर्तन हमें करना है, वह परिवर्तन शायद हम नहीं कर सकते। इसलिए हमें संतुलन बनाना होगा। हमारा सार्वजनिक काम और हमारे विधानमंडल का काम इन दोनों के बीच बैलेंस बनाना बहुत महत्वपूर्ण है।

”

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य इनका एमआईटी, पुणे में आयोजित राष्ट्रीय विधायक सम्मेलन को मार्गदर्शक संबोधन

शनिवार, दिनांक 8 फरवरी, 2025

सभी को बहुत-बहुत नमस्कार। इस राष्ट्रीय विधायक सम्मेलन में मंच पर उपस्थित हम सभी की मार्गदर्शिका और लोकसभा की पूर्व अध्यक्ष आदरणीय सुमित्राताई महाजन, महाराष्ट्र विधान परिषद के सभापति श्री. राम शिंदे जी, उत्तर प्रदेश विधानसभा के अध्यक्ष आदरणीय सतीश महाना जी, हमारे डिप्टी चेयरपर्सन नीलमताई गोऱ्हे, पूर्व अध्यक्ष राजस्थान विधानसभा सीपी जोशी जी, जिनके तत्त्वावधान में एक बहुत ही अच्छा कार्यक्रम शुरू हुआ, ऐसे भाई राहुल कराड जी, डॉक्टर आर. एम. चिटनिस जी, परिमल माया सुधाकर जी, मंचासीन सभी महानुभाव और देश के अलग-अलग राज्यों से यहां पर पधारे सभी हमारे एमएलए, एमएलसी बहनों और भाइयों।

सबसे पहले, आप सभी का महाराष्ट्र की इस सांस्कृतिक नगरी पुणे में महाराष्ट्र सरकार की ओर से मैं बहुत-बहुत स्वागत और अभिनंदन करता हूं। मैं राहुल जी को बधाई देना चाहता हूं कि उन्होंने लगातार देश के लोकतंत्र में गुणात्मक परिवर्तन और वैल्यू एडिशन के लिए कई नवाचार किए। एमआईटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट भी इसी सोच का एक उपक्रम था, जिससे राजनीति और सरकार में प्रशिक्षित लोग शामिल हो सकें। इस संस्थान ने हमें अच्छे लोकप्रतिनिधि और जनप्रतिनिधि दिए, साथ ही सरकार में विभिन्न पदों पर कार्य करने वाले अधिकारी और सपोर्ट स्टाफ भी प्रदान किए।

राष्ट्रीय छात्र संसद के रूप में उन्होंने जो उपक्रम शुरू किया, वह युवाओं के मन की बात को रखने के लिए एक महत्वपूर्ण मंच बना। यह राजनीति में युवाओं के लिए एक कॉमन सोच तैयार करने का माध्यम बना। इसी क्रम में महिला प्रतिनिधित्व को भी बढ़ावा मिला। पिछले वर्ष से शुरू हुआ राष्ट्रीय विधायक सम्मेलन (एनएलसी) भी एक बहुत बड़ी पहल है। राहुल जी, आप यह जो कार्य कर रहे हैं, वह लोकतंत्र की सशक्त सेवा है, और इसके लिए मैं आपको दिल से बधाई देता हूं।

इस कार्यक्रम में सम्मिलित सभी विधायकों को मैं विशेष रूप से बधाई देना चाहता हूं। यह कार्यक्रम कैपेसिटी एनहैंसमेंट प्रोग्राम है, जो हमारी क्षमता को और विकसित करने का अवसर देता है। अक्सर हमारे देश में यह मानसिकता होती है कि राजनेताओं के पास पहले से ही सारी जानकारी और क्षमता होती है, लेकिन जब हम इस सोच से बाहर निकलते हैं, तभी हम बेहतर विधायकों और राजनेताओं के रूप में उभर सकते हैं।

आप सभी ने यह समझा कि हमें अपनी क्षमता का विकास करना चाहिए, नई सोच अपनानी चाहिए, चाहे वह लोकतंत्र के क्षेत्र में हो या बदलती दुनिया में हमारे बदलते हुए रोल के संदर्भ में। यही सोच हमें यहां लाई है, और इसके लिए मैं आप सभी को बधाई देता हूं। लाखों लोग हमें चुनकर भेजते हैं, और हम में नेतृत्व की क्षमता तो है ही All of us are leaders. If there would not have been a Leadership quality in each one of us, we would not have been here. That quality, that capacity is always there. There is always a ground touch; we are sons and daughters of the soil, and we always have that feel. We always know what the aspirations of the people are. When we decide that we want to enter politics and contest elections, we, to ourselves, resolve that we will take care of the

aspirations of the people. But somehow, our policy is such that after elections, many of us are carried away, and at the end of five years, when we look back, when we reflect on what we really decided, what our aim was to be a legislator, we feel—and in most cases, we come to know—that half of the things for which we are here, we did not even attempt to do.

*** रामभाऊ नाईक इन्होने दिया हुआ मंत्र...**

मुझे लगता है सबसे महत्त्वपूर्ण यह है कि हम क्या सोचकर आए थे इसको मन में रखते हुए उसके लिए कार्य करना और मुझे आज भी याद है, जब मैं पहली बार विधायक चुना गया था, तब दिल्ली में लोकसभा द्वारा एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित किया गया था। यह वर्ष 1999 की बात है। उस प्रशिक्षण में मार्गदर्शन के लिए रामभाऊ नाईक जी आए थे। उन्होंने हमें एक महत्वपूर्ण मंत्र दिया था—जब आप अपने निर्वाचन क्षेत्र में होते हैं, तो हमेशा विधानसभा को याद रखें। जब लोग अपनी समस्याएं बताते हैं, तो सोचें कि विधानसभा में कौन सा माध्यम अपनाकर आप उनकी माँगों को सरकार तक पहुँचा सकते हैं। और जब आप विधानसभा में होते हैं, तो अपनी कॉन्स्टिटुएन्सी को याद रखें और यह विचार कीजिए कि यह जो विषय आ रहे हैं इन विषयों में कोई ऐसा विषय है कि जो मेरी कॉन्स्टिटुएन्सी से रिलेट होता है तो मैं उसको यहाँ पर उठाऊँ। मुझे लगता है कि यह जो मंत्र दिया था कि when you are in constituency, you should remember about your work in assembly and when you are in assembly while transacting business you should think about your constituency.

इसलिए कहना चाहता हूं कि कई बार हम सब लोग यह सोचते हैं और कई विधायक मुझे कहते भी हैं कि साहब, विधानसभा के कामकाज से कोई चुनकर नहीं आता। एक मानसिकता यह भी बनी है—हम तो शादियाँ अटेंड करते हैं, मौत-मिट्टी पर जाते हैं, इससे हम चुनकर आते हैं। विधानसभा का कामकाज नहीं, वो तो करना ही चाहिए। शादी में जाते हैं, मौत-मिट्टी करते हैं, समाज के कार्यक्रमों में जाते हैं—यह तो है ही महत्वपूर्ण।

*** विधानसभा के कार्य को गंभीरता से लो...**

लेकिन एक बार अपने अस्त्र के रूप में विधानसभा के कार्य और कामकाज को इस्तेमाल करके देखा जाए तो ध्यान में आएगा कि जो वैल्यू एडिशन हम में होता है और लोगों के बीच हमारी प्रतिमा जो तैयार होती है, हमारी इमेज जो बनती है, वह कितनी महत्वपूर्ण होती है। मैंने कई साल विपक्ष में काम किया है, लेकिन विपक्ष में काम करते समय जो विधानसभा के कामकाज की सक्रियता थी, उसके कारण मुझे प्रशासन में कभी तकलीफ नहीं आई। प्रशासन भी देखता है कि कौन विधानसभा के कार्य को गंभीरता से लेता है। प्रशासन को यह पता होता है कि कहीं न कहीं विधानसभा के आयुध का इस्तेमाल करके कोई हमारा पर्दाफाश कर सकता है। इसलिए वे भी हमें सक्रियता से मदद करते हैं।

तो मैं यह कहना चाहता हूं कि हमारा जो एक विधायक के रूप में कार्य है, वह बहुत महत्वपूर्ण है। हमारे जनसंपर्क के साथ-साथ यह भी जरूरी है कि यह व्यक्ति अच्छा है, यह जनसंपर्क से होता है, लेकिन यह विधायक अच्छा है, यह विधानसभा के कामकाज से सिद्ध होता है। तो मुझे लगता है कि इस दृष्टि से भी ध्यान देना बहुत जरूरी है।

***Primary Business is to Legislate...**

और मैं मानता हूं कि सबसे महत्वपूर्ण चीज यह है—और माननीय स्पीकर्स यहां पर हैं, उनकी क्षमा मांगते हुए मैं कहता हूं—इसमें कोई आपका दोष नहीं है, पर हमारी विधानसभा इस बात को भूल गई है कि हमारा Primary business क्या है। हमारा Primary business is to legislate कानून बनाना हमारा primary कार्य है। दूसरा प्राथमिक कार्य है वित्तीय मामलों का निपटारा— To Transact Financial Business.

हम तीन सत्र क्यों लेते हैं? इन तीनों सत्रों में वित्तीय विषयों पर चर्चा होती है। यह दो जरूरी काम हमारे होते हैं, और मैं ऐसा मानता हूं कि इन पर सबसे कम रुचि होती है।

कई बार हम लोग देखते हैं कि गिने-चुने विधायक ही बिलों पर बोलते हैं, कानून पर चर्चा करते हैं। और मेरे अनुभव से मैं बताता हूं कि कानून पर बोलना सबसे आसान काम है, कोई कठिन कार्य नहीं है। अगर हम सिर्फ उसमें दिए गए Objects और Reasons को पढ़ लें, तब भी कानून समझ में आ जाता है। लेकिन कई बार मैंने ऐसे विधायक देखे हैं, जो पूरे पांच साल में एक भी कानून पर चर्चा नहीं करते। हम लोग भारत के संविधान के अनुरूप कार्य करने के लिए चुनकर आए हैं। भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जी ने हमारे संविधान की रचना इतनी सुंदर की है कि इसमें बनाए गए कानून एक प्रकार से मुट्ठी भर लोगों द्वारा निर्मित होते हैं—कई बार 400 विधायक, कई बार 300, कई बार 200, कई बार 70, कई बार 60।

*** कानून और बजट पर बोलना चाहिएँ...**

मतलब, मुट्ठी भर लोग मिलकर जो कानून बनाते हैं, वही उस राज्य का कानून बनता है। इसलिए हमें क्यों चुना गया है? ताकि मेरे राज्य का जो आखिरी व्यक्ति है, उसके सपने और आकांक्षाएं भी इस कानून में परिलक्ष्यीत हों। इसलिए मुझे चुनकर दिया है तो अगर मैं वह Reflect ही नहीं करूंगा तो वह कानून सबके लिए कैसे बनेगा। और उसके साथ-साथ जो फाइनेंशियल बिजनेस है, कुछ लोग, चंद लोग होते हैं, जो बजट पर बोलते हैं। बाकी लोग बजट के ऊपर बोलते समय अपनी constituency का बोलते हैं। वो भी बोलना चाहिए, पर मैं आपको बताना चाहता हूं कि बजट पर बोलने के लिए और बजट को समझने के लिए अर्थशास्त्री होने की आवश्यकता नहीं है।

**You don't have to be economic or financial expert** बस उसकी कोई बेसिक चीजें अगर हम लोग समझ लें—कोई दुकान चलाता है, कोई घर चलाता है—ऐसा ही है। घर में भी तो

आमदनी जितनी हो, उतना खर्चा करना है। और आमदनी से ज्यादा खर्चा करना है तो कर्जा लेना है। और कर्जा लेना है तो कर्जा कैसे वापस करना है, इसका विचार करना है। राज्य में भी जितनी आमदनी है, उतना खर्चा करना है। ज्यादा खर्चा करना है तो कर्जा लेना है। कर्जा लेना है तो कैसे वापस करना—यही बजट है। इससे अलग बजट क्या है?

मैंने 2005 में एक किताब लिखी है, बिल्कुल 30 पन्ने की किताब है, 'बजट को कैसे पढ़ें।' मैं देने का प्रयास करूंगा इसका इंग्लिश वर्जन, अगर मेरे पास प्रिंट में होगा। और मैं ऐसा मानता हूं कि कोई भी व्यक्ति जो 12वीं क्लास भी पढ़ा हो, अगर इस किताब को पढ़े, तो बजट को पढ़ सकता है और बजट समझ सकता है।

*** लिंक सें हटकर काम करों...**

यह जो सारी चीजें हैं, यह हमारे बीच Value addition करती हैं। देखिए, राजनीति तो हमारी लगे जिंदाबाद-मुर्दाबाद में। और कई बार हम लोगों को लगता है कि हम गांव में जाते हैं, गाड़ी से उतरते हैं, लोग जमा होते हैं, माला डालते हैं, पैर छूते हैं—यहीं राजनीति है? यह राजनीति नहीं है! दुनिया में उन्हीं लोगों को याद रखा जाता है जो लिंक से हटकर काम करते हैं, जो those who make a mark उन्हीं को याद रखा जाता है।

*** आलोचना नही, जनता काम याद रखती है...**

और मैं तो हमेशा कहता हूँ, आलोचना होती है। दुनिया में ऐसा कोई नेता नहीं जिसकी आलोचना नहीं हुई। लेकिन लोग आलोचना याद नहीं रखते, लोग किया हुआ काम याद रखते हैं। लोग यह याद रखते हैं कि हमारे लिए इस व्यक्ति ने क्या किया है। आज भी जितने नेता हैं, हमारे देश के, किसी भी पार्टी के, जो लोगों के दिल में बसते हैं, ऐसे कोई भी नेता हों, उनके जीवन में उन्होंने बहुत आलोचना सहन की है। लेकिन अब किसी को यह याद नहीं है कि उनकी क्या आलोचना होती थी। लोगों को याद है कि इसने देश के विकास में क्या काम किया। तो मुझे लगता है कि इस बात को हमें ध्यान में रखना होगा।

*** लोगों की आकांक्षांओं पर काम करो....**

और मैं तो हमेशा कहता हूं, क्योंकि आजकल हम लोगों में टॉलरेंस थोड़ा कम हुआ है। मैं तो यह कहता हूं कि राजनीति में उसी व्यक्ति को आना चाहिए जिसको गाली खाने की आदत हो या गाली खाने का शौक हो। अगर गाली खाने की आदत नहीं और गाली खाने का शौक नहीं है तो राजनीति में आइए मत। देखिए, एक बात पक्की है कि हम लोगों की आकांक्षाओं पर काम कर रहे हैं। और यह जो आकांक्षाएं हैं, अगर हम उन्हें पूरा नहीं कर पाए तो स्वाभाविक रूप से हमें गाली पड़ेगी।

*** They judge you by your intentions...**

लेकिन यह बात याद रखिए, मैं हमेशा कहता हूं, जो गाली देते हैं, उन्हें भी यह पता होता है कि हर

चीज नहीं हो सकती। They judge you by your intentions. आपका प्रयास क्या है, आपका प्रयत्न क्या है, आपका इरादा क्या है? आप व्यक्तिगत अपने लिए कर रहे हैं या समाज के लिए कर रहे हैं? इस प्रकार की भावना से वे आपको जज करते हैं। और जब उन्हें यह लगता है कि नहीं, प्रयास किया है, प्रामाणिकता से किया है, तो शायद उसका काम नहीं भी हुआ, तो भी आपको वोट देते हैं।

*** सार्वजनिक कार्य और विधानमंडल का काम...संतुलन आवश्यक...**

और मैं यह कहता हूं कि one has to strike a balance, कई बार हमें दो तरह के लोग दिखाई देते हैं—there are few people who are the best parliamentarians but inaccessible. और कुछ लोग ऐसे होते हैं जो सुबह 6 बजे से उठकर रात 12 बजे तक लोगों में रहते हैं, लेकिन उनका हाऊस में कोई वजूद नहीं होता, कोई परफॉर्मेन्स नहीं होता। चुनकर तो दोनों टाइप के लोग आ सकते हैं, लेकिन जो परिवर्तन हमें करना है, वह परिवर्तन शायद हम नहीं कर सकते। इसलिए हमें संतुलन बनाना होगा। हमारा सार्वजनिक काम और हमारे विधानमंडल का काम इन दोनों के बीच बैलेंस बनाना बहुत महत्वपूर्ण है।

*** तंत्रज्ञान को नजरअंदाज मत करना...**

इसलिए मुझे लगता है, मैं आज भी इतने सालों से काम कर रहा हूं, कई पदों पर काम कर चुका हूं, लेकिन जब भी कोई नई चीज सीखने का मौका मिलता है, मैं तुरंत उस पर काम करने के लिए तैयार हो जाता हूं। अगर कोई नई चीज सीखने को मिलेगी, तो मैं वहां बैठकर, घंटों बैठकर, उस चीज को सीखने का प्रयास करता हूँ।

क्योंकि जिस दुनिया में हम लोग हैं, यह दुनिय टेक्नोलॉजी बदल रही है। देखिए, टेक्नोलॉजी हमारे नेतृत्व को कभी भी obsolete कर सकती है। टेक्नोलॉजी ने जिस प्रकार से हमें घेरा है और अब भारत जैसा देश, जहां गांव-गांव तक स्मार्टफोन पहुंच गया है, वहाँ पर आप टेक्नोलॉजी को दरकिनार नहीं कर सकते।

और मैं कई बार कहता हूं कि पहले मीडिया था, अब सोशल मीडिया है। और यह जो सोशल मीडिया है, इससे अब हम परे नहीं रह सकते। क्योंकि हर व्यक्ति अब व्यक्त हो रहा है। if every citizen is expressing और हम लोग यह कहें कि सोशल मीडिया हमारा काम नहीं है, यह कहना अब संभव नहीं है।

देखिए, अमेरिका में 2016 में जब ट्रंप चुनकर आए थे, तो 2016 का जो चुनाव था, वह दुनिया के चुनाव की दिशा तय करने वाला था। क्योंकि उस समय टेक्नोलॉजी का ऐसा उपयोग हुआ, जिससे लोगों की इच्छाओं को भांप लिया गया।

### * ट्रम्प, एआय और 2016 का चुनाव...

अगर आप यूट्यूब पर कोई पहलवान की कुश्ती वाली रील देखते हैं, तो ऑटोमेटिक आपको वही वीडियो मिलेंगे। जितना स्वाइप करेंगे, हर दो रील के बाद कुश्ती वाली ही मिलेगी। किसी को खाना बनाने का शौक है, वह दो-तीन बार खाना बनाने वाली रील देख ले, तो उसे वही मिलती रहेंगी। यही Artificial Intelligence है, यही टेक्नोलॉजी की ताकत है। यह आपके मूड को भांप लेता है और इसका उपयोग 2016 में ट्रंप ने किया और उस माध्यम से अमेरिका के लोगों के मूड और उनके सेंटीमेंट का उन्होंने एनालिसिस किया। उस एनालिसिस के माध्यम से एक आम अमेरिकी आदमी को किस बात से डर लगता है और किस बात से खुशी होती है, इसका मैपिंग किया। फिर उन्होंने पूरी रणनीति तैयार की कि जिस चीज से डर लगता है, वह कैसे डेमोक्रेट्स करते हैं और जिस चीज से उनको खुशी होती है, वह कैसे रिपब्लिकन करेंगे। इस प्रकार की रणनीति तैयार करके सोशल मीडिया से उसे पुश किया गया और परिणाम यह हुआ कि यह मैपिंग व्यक्तिगत स्तर तक चली गई।

यहाँ तक कि देवेंद्र फडणवीस को क्या पसंद है और क्या नहीं, वहाँ तक यह चला गया। इसके चलते 2016 में ट्रंप चुनाव जीते। अब यह अमेरिका तक सीमित नहीं है। आज हमारे देश में भी चुनाव में गांव-गांव तक यूट्यूब जिस प्रकार का नैरेटिव तैयार करता है, वह सच्चा हो या झूठा, कई बार झूठा भी हो सकता है। पहले प्रिंट मीडिया था, अगर गलत खबर छपी तो अगले दिन उसका खंडन करना पड़ता था। फिर इलेक्ट्रॉनिक मीडिया आया, जिसमें गलत खबर चलाई तो दो घंटे में स्पष्टीकरण देना पड़ता था। फिर डिजिटल मीडिया आया, जहाँ यूट्यूबर्स और अन्य माध्यमों पर कोई अंकुश नहीं है।

इसलिए वे नैरेटिव तैयार करते हैं, जो कई बार सही भी होते हैं और कई बार गलत भी। यह टेक्नोलॉजी हमारे लिए एक चुनौती भी है और अवसर भी। विशेष रूप से इसलिए कि 2020 में हम दुनिया के सबसे युवा देश बने। दुनिया की सबसे ज्यादा युवा आबादी हमारे पास है। हमारी डेमोग्राफी में 18 से 35 साल का जो सेगमेंट है, वह सबसे बड़ा है। यह सेगमेंट अब अखबार नहीं पढ़ता और इलेक्ट्रॉनिक मीडिया पर भी ज्यादा भरोसा नहीं करता क्योंकि वे भी इसे नहीं देख रहे। यह केवल अपने मोबाइल को देख रहा है और उसी से नैरेटिव तैयार हो रहा है।

### * तंत्रज्ञान : चुनौती भी और अवसर भी...

टेक्नोलॉजी ने हमारे सामने नए प्रश्न खड़े किए हैं। पहले जब भाषण होता था तो अगले दिन वह छपता था। अब भाषण होते ही मीडिया उसे लाइव दिखाता है। हम भी अपने कार्यकर्ताओं और सोशल मीडिया टीम को बोलते हैं कि भाषण को तुरंत सोशल मीडिया हैंडल पर डाल दें। इससे लोग देख पा रहे हैं कि हम क्या कर रहे हैं।

मुझे लगता है कि टेक्नोलॉजी ने हमें एक नई चुनौती दी है और एक नया अवसर भी दिया है। इस पर हमें मंथन करना होगा। अगर इस बदलाव को स्वीकार नहीं किया तो हमारा नेतृत्व धीरे-धीरे हाशिए पर

चला जाएगा और कोई नया नेतृत्व आ जाएगा। राहुल जी, मैं आपसे निवेदन करना चाहता हूं कि टेक्नोलॉजी पर और इसके प्रभाव पर भी हमारे विधायकों के बीच मंथन होना चाहिए।

मुझे जो समय दिया गया था, उससे अधिक समय मैंने लिया, इसके लिए क्षमा चाहता हूँ। इस अच्छे प्लेटफार्म पर बोलने का अवसर देने के लिए धन्यवाद। मुझे बीच में सूचना मिली थी कि अंग्रेजी में बोलना चाहिए, इसलिए थोड़ा अंग्रेजी में बोला। लेकिन बाद में महसूस किया कि मन की बात अपनी भाषा में जितनी अच्छे से कही जा सकती है, उतनी अंग्रेजी में नहीं। इसलिए मैंने फिर अपनी भाषा में बात की।

आपका बहुत-बहुत आभार कि आपने हमें यह प्लेटफार्म दिया। मुझे विश्वास है कि जब यह कार्यक्रम समाप्त होगा, तो हम सब यह महसूस करेंगे कि हमने कुछ नया सीखा और कुछ नया करने की कोशिश करेंगे। इसी विश्वास के साथ, बहुत-बहुत धन्यवाद।

**जय हिंद, जय भारत।**

*****


अर्थसंकल्प
सोप्या भाषेत..!
देवेंद्र फडणवीस

# अर्थसंकल्प

## सोप्या भाषेत..!

देवेंद्र फडणवीस

**अर्थसंकल्प - सोप्या भाषेत**
**लेखक - देवेंद्र गंगाधरराव फडणवीस**

**email:** info@devendrafadnavis.in

**हक्क लेखकाधीन**

**पहिली आवृत्ती -** दिनांक ४ मार्च २०२०

**मुद्रक व प्रकाशक :**
**लाखे प्रकाशन**
सौ. संध्या चंद्रकांत लाखे
मुकुंदराज पथ, महाल, नागपुर
०७१२- २७६८८१४

**मूल्य - १०० रुपये**

# प्रस्तावना

निर्मला सीतारामन
वित्त एवं कार्पोरेट कार्य मंत्री
भारत सरकार

Nirmala Sitharaman
Minister of Finance and Corporate Affairs
Government of India



## शुभेच्छा

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व धडाडीचे तरुण नेते देवेंद्र फडणवीस यांच्या पुस्तकास प्रस्तावना लिहिताना आनंद होत आहे. वित्तमंत्री या नात्याने अर्थसंकल्पावरील हे पुस्तक सादर करण्याचा आनंद आगळाच आहे. अर्थसंकल्प उलगडून दाखविणारे हे पुस्तक देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य नागरिकांसाठी लिहिले आहे. या पुस्तकास मी प्रस्तावना लिहावी म्हणून विनंती करणाऱ्या त्यांच्या पत्रात त्यांनी लिहिले आहे की, 'जेव्हा सामान्य माणसाला लोकशाही प्रक्रिया व त्यांचे महत्त्व याचे ज्ञान होते तेव्हाच लोकशाही सुदृढ होते'. हा विचार प्रशंसनीय आहे.

सामान्य व्यक्तींसाठी वित्त मंत्र्यांचे भाषण व माध्यमांमधील चर्चा एवढ्या पुरताच अर्थसंकल्प मर्यादित राहतो. या चर्चांचा मुख्य भर हा नागरिकांच्या जीवनावर ज्याचे दृश्य परिणाम दिसून येतात असे कर आणि महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी केलेल्या तरतुदी यावरच असतो. खरं तर अर्थसंकल्प म्हणजे या पलीकडे बरेच काही. अर्थसंकल्प म्हणजे सरकारचे हेतू आणि प्राथमिकता दर्शविणारे सर्वात महत्त्वाचे धोरण असते. असा हा अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग होईल.

अर्थसंकल्प तयार करण्याच्या व त्यास मंजुरी देण्याच्या प्रक्रियांमध्ये अधिकार व उत्तरदायित्त्व यामध्ये योग्य संतुलन साधणारी रचना भारतीय संविधानाने निर्माण केली आहे. तर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखे ठेवण्याची एक विशिष्ट रचना आखून दिलेली आहे. या पुस्तकात देवेंद्र यांनी या प्रक्रिया सामान्य माणसाच्या भाषेत समजावून सांगितल्या आहेत. सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांनी या प्रक्रिया समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. आपले मुद्दे कधी, कोठे व कोणत्या माध्यमातून उपस्थित करता येतील हे समजून घेण्यासाठी या प्रक्रियांचे ज्ञान मोलाचे ठरेल.

सरकारची धोरणे व अर्थसंकल्प या संदर्भात अधिक संशोधन व विश्लेषण करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक मुलभूत दिशादर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. देवेंद्र फडणवीस यांना या पुस्तकासाठी व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**( निर्मला सीतारामन )**

Office : 134, North Block, New Delhi-110001 Tel. : 23092810, 23092510 Fax : 23092828
Residence : 15, Safdarjung Road, New Delhi - 110011, Tel. : 23793791 Fax : 23793792

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्य मंत्री
महाराष्ट्र



मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
१३ फेब्रुवारी २०२०

## शुभेच्छा

अर्थसंकल्पासारखा क्लिष्ट विषय आपण "अर्थसंकल्प - सोप्या भाषेत" या पुस्तकाच्या माध्यमातून साध्या सोप्या भाषेत नागरिकांना, सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांना समजावून सांगत आहात ही खरच खुप आनंदाची आणि कौतूकाची गोष्ट आहे.

अर्थसंकल्प समजून घेणे हे सर्वसामान्य माणसाला सहज शक्य नसते. अर्थसंकल्प कशाला म्हणतात, त्यातील तरतूदी कशा समजून घ्याव्यात, यातील तांत्रिक गोष्टी काय असतात आणि वित्तीय संज्ञा कशाप्रकारे समजून घ्याव्यात हे समजून घेण्यासाठी आपले पुस्तक नक्कीच उपयुक्त सिद्ध होईल असा विश्वास वाटतो.

अर्थसंकल्प सादर होतो तेंव्हा त्यासोबत विविध प्रकाशने ही दिली जातात. व्हाईट बूक, ग्रीन बूक, संक्षिप्त अर्थसंकल्प.. या प्रकाशनांचे काय महत्व असते, ते कशासाठी आवश्यक असतात आणि ही प्रकाशने कशी समजून घ्यायची याचा अर्थबोध झाला तर राज्याचा आर्थिक ताळेबंद नेमका कसा असतो, तो तुटीचा आहे की शिलकीचा हे समजू शकेल. राज्याचं उत्पन्न, खर्च आणि राज्यासमोरची आव्हाने लक्षात येऊ शकतील. महसुली जमा म्हणजे काय, महसूली खर्च म्हणजे काय, भांडवली जमा, भांडवली खर्च म्हणजे काय, वित्तीय तुट, राजकोषीय तुट नेमकी कशी असते, त्याचे राज्य अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर होणारे परिणाम कसे समजून घ्यावेत यासाठी आपले पुस्तक सर्वच स्तरातील वाचकांसाठी दिशादर्शक ठरेल. राज्याची वर्तमानातील वाटचाल आणि भविष्याचे नियोजन त्यातून समजून घेणे शक्य होईल.

आपण अतिशय सुंदर उपक्रम या पुस्तकाच्या माध्यमातून हाती घेतला आहे. पुर्वीच्या आवृत्तीत कालपरत्वे होणारे बदल नोंदवून आपण नवीन पुस्तकाचे लिखाण करत आहात. ही बाब ही खुप स्वागतार्ह आहे.

मी आपल्या "अर्थसंकल्प - सोप्या भाषेत" या पुस्तकास मन:पूर्वक शुभेच्छा देतो. सजग आणि सुदृढ लोकशाहीसाठी हे एक उत्तम माध्यम ठरेल असं मला वाटते.

आपला नम्र,

(उद्धव बाळासाहेब ठाकरे)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४



सत्यमेव जयते

## उप मुख्यमंत्री
### महाराष्ट्र राज्य

दि. २८ फेब्रुवारी २०२०.

### शुभेच्छा

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभेतील विद्यमान विरोधी पक्षनेते सन्माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस लिखित 'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' पुस्तक प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला.

'अर्थसंकल्प' कुटुंबाचा असो, महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याचा असो की देशाचा, अर्थसंकल्पाचं महत्वं अनन्यसाधारण आहे. राज्याचा व देशाचा अर्थसंकल्प समाजजीवनावर प्रभाव टाकत असतो. जनतेच्या आशा-आकांक्षा-अपेक्षांना न्याय देण्याचं काम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून होतं. अर्थसंकल्प सर्वसामान्यांसाठी असतो आणि सगळ्यांना समजणं व सोप्या भाषेत समजणं हा हक्कच आहे. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी लिहिलेल्या 'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' पुस्तकाने नागरिकांना त्यांचा हा महत्वाचा हक्क प्राप्त होण्यास मदत होईल, असा मला विश्वास आहे.

श्री. देवेंद्रजी फडणवीस हे राजकारण, समाजकारण, अर्थकारणाचा प्रदीर्घ अभ्यास असलेले लोकप्रतिनिधी आहेत. नगरसेवकपदापासून मुख्यमंत्रीपदापर्यंत तसेच विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. उत्तम प्रशासक अशीही त्यांची ओळख आहे. राज्याची आर्थिक स्थिती, आर्थिक नियोजन, विकासाचा प्राधान्यक्रम याची त्यांना जाण आहे. त्यांनी लिहिलेल्या 'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' पुस्तकातून अर्थव्यवस्थेच्या सद्यस्थितीसह अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया व सामान्य माणसाला त्याचा होणारा उपयोग सर्वांसमोर येण्यास मदत होईल.

सर्वसामान्य माणसाला अर्थसंकल्प समजला पाहिजे तो त्यांनी समजून घेतला पाहिजे, यासाठी श्री. देवेंद्रजी फडणवीस सातत्यानं प्रयत्नशील आहेत. वर्ष २००५ मध्ये त्यांनी लिहिलेल्या 'अर्थसंकल्प म्हणजे काय ?' पुस्तकाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता त्यांच्याकडून नवीन पुस्तकाची अपेक्षा होती. ती अपेक्षा 'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' पुस्तकाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे, याचा आनंद आहे.

'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' पुस्तकात संविधानातील अर्थसंकल्पविषयक तरतुदी, अर्थसंकल्पविषयक संज्ञा व त्यांचे अर्थ, अर्थसंकल्प तयार करण्याची तसेच मंजूर करण्याची प्रक्रिया, अर्थसंकल्पविषयक प्रकाशने व अर्थसंकल्प सोप्या पद्धतीने कसा समजून घ्यावा, याचा अंतर्भाव केल्याने हे पुस्तक निश्चितंच वाचनीय, संदर्भ व संग्राह्यमूल्य असलेले असेल, याची खात्री आहे.

'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' हे पुस्तक राजकारण, समाजकारण, अर्थकारणाचा अभ्यास करणाऱ्या व्यक्ती, संशोधक, विश्लेषक, लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, सार्वजनिक जीवनात कार्य करणारे कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांना उपयोगी ठरेल, असा विश्वास आहे.

अर्थसंकल्पासारख्या महत्वाच्या व समाजोपयोगी विषयावर पुस्तक लिहिल्याबद्दल सन्माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन. त्यांच्या राजकीय व साहित्यिक वाटचालीला मनापासून शुभेच्छा. 'अर्थसंकल्प—सोप्या भाषेत' पुस्तक उपक्रमास मन:पूर्वक शुभेच्छा.

(अजित पवार)




“ साधारणपणे १५ वर्षांपूर्वी, आम्ही तरुण आमदारांनी एक अनौपचारिक ‘युथ फोरम’ स्थापन केले होते. एका बैठकीत अर्थसंकल्पाच्या बॅग भरून मिळणाऱ्या पुस्तकांचे करायचे काय यावर विनोद आणि खुमासदार चर्चा झाल्यानंतर काहीजणांनी माझ्याकडे “अर्थसंकल्प कसा वाचायचा हे आम्हाला शिकव” असे म्हटले. त्यातूनच २००५ मध्ये, मी ‘अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय?’ हे पुस्तक लिहिले. विशेष म्हणजे या पुस्तकास सामान्य नागरिकांचाही चांगलाच प्रतिसाद मिळाला. अपेक्षा नसताना त्या पुस्तकाची दुसरी आवृत्तीही मला प्रकाशित करावी लोगली होती. आज पुन्हा, बदललेल्या संदर्भांसह या पुस्तकाचे पुनर्लेखन करण्याचा योग आला आहे. त्यानिमित्ताने आपल्याशी संवाद साधता येतोय, याचा मला अतिशय आनंद आहे. ”

अर्थसंकल्प सोप्या भाषेत ...!

श्री. देवेंद्र फडणवीस

# दोन शब्द...



साधारणपणे १५ वर्षांपूर्वी, आम्ही तरुण आमदारांनी एक अनौपचारिक 'युथ फोरम' स्थापन केले होते. एका बैठकीत अर्थसंकल्पाच्या बॅग भरून मिळणाऱ्या पुस्तकांचे करायचे काय यावर विनोद आणि खुमासदार चर्चा झाल्यानंतर काहीजणांनी माझ्याकडे "अर्थसंकल्प कसा वाचायचा हे आम्हाला शिकव" असे म्हटले. त्यातूनच २००५ मध्ये, मी 'अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय?' हे पुस्तक लिहिले. विशेष म्हणजे या पुस्तकास सामान्य नागरिकांचाही चांगलाच प्रतिसाद मिळाला. अपेक्षा नसताना त्या पुस्तकाची दुसरी आवृत्तीही मला प्रकाशित करावी लागली होती. आज पुन्हा, बदललेल्या संदर्भांसह या पुस्तकाचे पुनर्लेखन करण्याचा योग आला आहे. त्यानिमित्ताने आपल्याशी संवाद साधता येतोय, याचा मला अतिशय आनंद आहे.

अर्थसंकल्प म्हटले की, भल्याभल्यांना तो केवळ अर्थमंत्र्यांच्या भाषणापुरता मर्यादित विषय वाटतो. खरं तर अर्थसंकल्प हा केवळ ताळेबंदाचा दस्तावेज नाही, तर सरकारच्या धोरणाचे आणि कामगिरीचे ते एक प्रगटीकरण आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मुख्य प्रवाहातील माध्यमांमुळे व समाज माध्यमांमुळे माहिती व विश्लेषण सामान्यांना सहज उपलब्ध होऊ लागले आहे. तरीही अर्थसंकल्पासंदर्भात मात्र माध्यमांमध्ये ज्या चर्चा होतात त्या साधारणपणे त्या त्या व्यक्तीच्या समजेवर (perception) आधारित असतात. अर्थसंकल्पाचे तांत्रिक विश्लेषण करून, आकडेवारीच्या आधारावर या चर्चा होत नाहीत.

म्हणूनच, अर्थसंकल्प कसा वाचायचा हे अधिकाधिक लोकांनी समजून घेतले पाहिजे असे मला वाटते. इन्टरनेट कसे वापरायचे हे एकदा समजले की, जसे माहितीचे मायाजाल आपल्या पुढे खुले होते तसेच अर्थसंकल्पाचे आहे. कोणत्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात काय पहायचे आणि माहितीची सांगड कशी घालायची हे कळले, तर हा विषय वाटतो तितका अवघड नाही. लोकप्रतिनिधींना तर जमिनी वास्तविकतांची (ground realities) अधिक चांगली जाण असते. अर्थसंकल्पातील आकडयांचा अधिक चांगला अन्वयार्थ ते लावू शकतात. अर्थशास्त्राचे विद्यार्थी, चिकित्सक दृष्टीने संसदीय कामकाजाचा अभ्यास करणारे चिंतक आणि समाजकारणात रुची ठेवणारा सामान्य नागरिक यांना अभ्यासपूर्ण माहिती या पुस्तकातून मिळेल, असा मला विश्वास वाटतो.

माझे वडिल विधानपरिषदेचे माजी सदस्य स्व. गंगाधरराव फडणवीस आणि त्यांच्या पश्चात माझ्या पाठिशी खंबीरपणे उभी माझी आई सरिता फडणवीस यांना हे लेखन मी समर्पित करतो. या पुस्तकाला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामनजी यांनी आशिर्वाद दिले व मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे आणि वित्त मंत्री अजित दादा पवार यांनी शुभेच्छा दिल्या. मी त्यांचे आभार व्यक्त करतो. मला नेहमीच प्रोत्साहन देणारी माझी पत्नी अमृता व कन्या दिविजा यांचेही मी आभार मानतो. मला सातत्याने नवीन काहीतरी करण्याची ऊर्जा देणारा मित्रपरिवार व या पुस्तकाच्या निर्मितीमध्ये मला सहाय्य करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांना धन्यवाद. आपण या उपक्रमाचे स्वागत कराल, हा विश्वास बाळगतो. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा.

**आपला,**
**देवेंद्र फडणवीस**

# या पुस्तकात काय वाचाल


१. अर्थसंकल्प समजून घेण्यापूर्वी... ९

२. अर्थसंकल्प विषयक संज्ञा
मराठी व इंग्रजी शब्दप्रयोग ११

३. काही महत्त्वाच्या संकल्पनांचे स्पष्टीकरण १४

४. संविधानात अर्थसंकल्प विषयक तरतुदी १९

५. अशी असते अर्थसंकल्पाची रचना २५

६. असा तयार होतो अर्थसंकल्प ३१

७. अर्थसंकल्पीय प्रकाशने ३४

८. अशी मिळते अर्थसंकल्पास मंजुरी ४१

९. अर्थसंकल्प कसा वाचावा आणि समजून घ्यावा ४९


संदर्भ:


- अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय? (माझे स्वत:चे पुस्तक)
- महाराष्ट्र विधानसभा नियम, बारावी आवृत्ती
  (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय प्रकाशन)
- अर्थसंकल्प म्हणजे काय व विधिमंडळातील अर्थसंकल्प विषयक कार्यपद्धती
  (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय प्रकाशन)
- Fundamantals of Government Budgeting in India, S. P. Ganguly

१

# अर्थसंकल्प समजून घेण्यापूर्वी...

बजेट हा अलिकडे इतका परवलीचा शब्द झाला आहे की, लहानथोरांच्या तोंडी तो आपण सर्रास ऐकतो. महाविद्यालयीन विद्यार्थी असो, काटकसरीने संसार करणारी गृहिणी असो, किंवा वार्धक्याकडे झुकलेले दाम्पत्य असो, प्रत्येकालाच आपापल्या बजेटची मोठी चिंता असते. जमेच्या मर्यादित स्त्रोतांच्या तुलनेत खर्चाला तोंड देताना आपल्या सगळ्यांना जी कसरत करावी लागते, थोड्याफार फरकाने तशीच कसरत राज्याच्या वित्त मंत्र्याला आणि सचिवालाही करावी लागते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या व्यक्तिगत बजेटचा परिणाम आपल्यापर्यंत किंवा आपल्या कुटुंबापर्यंत मर्यादित असतो. शासकीय अर्थसंकल्पाचे परिणाम मात्र दूरगामी असतात. शासनाने केलेली गुंतवणूक, तरतूद, कर आकारणी या सर्वांचा परिणाम प्रत्येक नागरिकावर होत असतो. म्हणूनच आपल्या सगळ्यांसाठी केंद्र किंवा राज्य सरकारचे बजेट हा उत्सुकतेचा विषय. येथे आपण त्याबद्दलच अधिक समजून घेणार आहोत. या विषयाच्या खोलात शिरण्यापूर्वी आपण थोडे या शब्दाच्या उत्पत्तिबाबत जाणून घेऊ.

थोडे मागे डोकावून पाहिले तर 'बजेट' या शब्दाची उत्पत्ती फ्रेंच भाषेतील 'bougette' म्हणजे 'चामड्याचे पाकीट' या शब्दापासून झालेली आहे. खरं तर या शब्दाचा आर्थिक-जमा खर्चाशी तसा काहीएक संबंध नाही. वित्त मंत्री चामड्याचे बॅगेतून आपल्या अर्थसंकल्पीय भाषणाची प्रत सभागृहात आणण्याची प्रथा असल्याने 'बजेट' हा शब्द रूढ झाला असेल कदाचित.

लोकसभेत असो किंवा विधानसभेत, अर्थसंकल्प जाहीर होण्यापूर्वी आणि विशेषत: तो जाहीर झाल्यानंतर माध्यमांमध्ये त्यावर सांगोपांग चर्चा घडत असतात. सर्व समाजघटक अगदी शेतकऱ्यांपासून ते उद्योजकांपर्यंत आणि विद्यार्थ्यांपासून ते गृहिणींपर्यंत प्रत्येक जण अर्थसंकल्पात स्वत:शी संबंधित तरतुदी काय, हे समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतात आणि या चर्चांची, जीज्ञासांची उत्तरं ही मुख्यत: वित्त मंत्र्यांच्या भाषणातून शोधण्याचा

प्रयत्न केला जातो. संपूर्ण देशाचा किंवा एखाद्या राज्याचा आणि तोही पूर्ण वर्षभराचा हा संपूर्ण ताळेबंद अवघ्या तास-दीडतासांत सांगणे ही सुद्धा खरं म्हणजे वित्तमंत्र्यांसाठी एक कसरतच असते.

शासनाकडून वेळोवेळी अनेक घोषणा केल्या जातात. या घोषणांचे प्रतिबिंब हे अर्थसंकल्पात असणे अभिप्रेत असते. मात्र या घोषणांचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात उमटले नाही म्हणजेच या घोषणांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक तरतूद अर्थसंकल्पात केली गेली नाही, तर या घोषणा निव्वळ कागदावरच राहण्याची शक्यता असते. या अर्थाने पाहिले तर अर्थसंकल्प म्हणजे वार्षिक सोपस्कार नाही तर ते शासनाचे महत्त्वाचे धोरण असते. यावरून शासनाच्या प्राथमिकता (priorities) समजून घेता येतात. आगामी वर्षासाठी केलेल्या घोषणा, तरतुदीच नाहीत, तर गेल्या अर्थसंकल्पांमध्ये केलेल्या घोषणांचे, तरतुदींचे काय झाले, याचा सुद्धा लेखाजोखा त्यात असतो आणि सजग नागरिकांनी तो आवर्जून वाचायला हवा.

पण, ढीगभर पानांमध्ये सामावलेले हे दस्तावेज नेमके वाचायचे कसे, हाच अनेकांपुढे प्रश्न असतो. परिणामी लोकशाही प्रक्रियेतील हे महत्त्वपूर्ण दस्तावेज फार थोडी लोकं वाचतात आणि मुख्यत्त्वे वित्त मंत्र्यांचं भाषण तेवढं लक्षात राहतं. वित्त मंत्र्यांच्या भाषणापलीकडे अर्थसंकल्प ज्यांना समजून घ्यायचा आहे, अशा सामान्य नागरिकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी, चिकित्सक अभ्यासकांसाठी, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांसाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो. अर्थसंकल्पाशी संबंधित संवैधानिक तरतुदी, विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे प्रयोजन, मागील वर्षी केलेल्या घोषणांची सद्यस्थिती, विविध निकषांवर राज्याची आर्थिक स्थिती, विविध क्षेत्रांसाठी किंवा समाजघटकांसाठी केलेल्या तरतुदी हे सगळं अर्थसंकल्पात कसं वाचायचं, याची माहिती हे पुस्तक देईल. या पुस्तिकेचे लिखाण करताना राज्याचा अर्थसंकल्प केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे.

## २

# अर्थसंकल्प विषयक संज्ञा
# मराठी व इंग्रजी शब्दप्रयोग

दैनंदिन जीवनामध्ये अर्थसंकल्प विषयक इंग्रजी शब्द अधिक रूढ आहेत असे माझे निरीक्षण आहे. यासाठी विषयाला हात घालण्यापूर्वी महत्त्वाच्या संज्ञा मराठी व इंग्रजी मध्ये येथे देत आहे.

| क्र | मराठी शब्दप्रयोग | इंग्रजी शब्दप्रयोग |
|---|---|---|
| १ | अर्थसंकल्प | Budget |
| २ | वित्त विधेयक | Finance Bill |
| ३ | एकत्रित निधी | Consolidated Fund |
| ४ | आकस्मिकता निधी | Contingency Fund |
| ५ | लोकलेखा | Public Accounts |
| ६ | हमी | Guarantee |
| ७ | भारित खर्च | Charged Expenditure |
| ८ | दत्तमत खर्च | Voted Expenditure |
| ९ | वार्षिक वित्तविषयक विविरणपत्र | Annual Financial Statement |
| १० | महसुली जमा / खर्च | Revenue Receipts / Expenditure |
| ११ | भांडवली जमा / खर्च | Capital Receipts / Expenditure |
| १२ | कपात सूचना | Cut Motion |
| १३ | विनियोजन विधेयक / अधिनियम | Appropriation Bill / Act |
| १४ | अनुदानाची मागणी | Demand for Grants |

| क्र | मराठी शब्दप्रयोग | इंग्रजी शब्दप्रयोग |
|---|---|---|
| १५ | पुरवणी मागणी | Supplementary Demand |
| १६ | लाक्षणिक मागणी | Token Demand |
| १७ | अधिक खर्चाची मागणी | Excess Demand |
| १८ | लोकलेखा समिती | Public Accounts Committee |
| १९ | लेखानुदान | Vote on Account |
| २० | अग्रिम | Advance |
| २१ | भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक | Comptroller and Auditor General of India (CAG) |
| २२ | महालेखापाल | Accountant General |
| २३ | लेखे | Accounts |
| २४ | कर | Tax |
| २५ | अनुदान | Grant-in-Aid |
| २६ | व्याज | Interest |
| २७ | ऋण | Debt |
| २८ | कर्ज व आगाऊ रकमा | Loans and Advances |
| २९ | भविष्य निर्वाह निधी | Provident Fund |
| ३० | ठेवी | Deposits |
| ३१ | वित्त आयोग | Finance Commission |
| ३२ | शिल्लक | Surplus |
| ३३ | महसुली तूट / अधिक्य | Revenue Deficit / Surplus |
| ३४ | अर्थसंकल्पीय तूट / अधिक्य | Budgetary Deficit / Surplus |

| क्र | मराठी शब्दप्रयोग | इंग्रजी शब्दप्रयोग |
|---|---|---|
| ३५ | राजकोषीय तूट | Fiscal Deficit |
| ३६ | प्राथमिक तूट | Primary Deficit |
| ३७ | पुनर्विनियोजन विधेयक | Re-appropriation Bill |
| ३८ | नियतव्यय | Outlay |
| ३९ | अर्थसंकल्पीय अंदाज | Budget Estimate |
| ४० | सुधारित / सुधारलेले अंदाज | Revised Estimate |
| ४१ | प्रत्यक्ष रकमा | Actuals |
| ४२ | सकल राष्ट्रीय उत्पन्न | Gross Domestic Product |
| ४३ | उपकर | Cess |
| ४४ | शास्ती | Fine or Penalties |
| ४५ | राखीव निधी | Reserved Fund |
| ४६ | सर्वसाधारण सेवा | General Services |
| ४७ | सामाजिक सेवा | Social Services |
| ४८ | आर्थिक सेवा | Economic Services |
| ४९ | मुख्य शीर्ष | Major Head |
| ५० | गौण शीर्ष | Minor Head |
| ५१ | उप शीर्ष | Sub Head |
| ५२ | तपशीलवार शीर्ष | Detailed Head |
| ५३ | मत्ता | Asset |
| ५४ | दायित्त्व | Liability |

३

## काही महत्त्वाच्या संकल्पनांचे स्पष्टीकरण

काही संकल्पनांचे ढोबळ अर्थ माहीत असतील तर विषय समजणे सोपे होईल या दृष्टीकोनातून महत्त्वाच्या संज्ञा / संकल्पना येथे स्पष्ट करीत आहे. पुस्तकात पुढेही त्यांचा उल्लेख येईल तेव्हा काही प्रमाणात पुनरावृत्ती होऊ शकते. मात्र त्याला इलाज नाही.

**आर्थिक वर्ष:** दिनांक १ एप्रिल ते दिनांक ३१ मार्च या कालावधीस 'आर्थिक वर्ष' समजले जाते. दिनांक १ एप्रिल २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२१ म्हणजेच २०२०-२१ या वर्षासाठीचा अर्थसंकल्प २०१९-२० या वर्षाच्या अखेरीस मांडला जातो. या उदाहरणात २०२०-२१ हे आगामी आर्थिक वर्ष व २०१९-२० हे चालू आर्थिक वर्ष समजले जाते.

**वित्त विधेयक:** कर आकारणी, कर रचनेतील बदल, कर्ज उभारणी, हमी, एकत्रित निधी, आकस्मिकता निधी, भारित खर्च, लोकलेखेतील जमा, लेखापरीक्षण, आदी बाबींसंदर्भातील विधेयके 'वित्त विधेयके' समजली जातात. वित्त विधेयक व इतर विधेयक यांच्या मंजुरीची प्रक्रिया वेगवेगळी असते. ती पुढे स्पष्ट केलेली आहे. विधेयक मंजूर झाले की, त्याचा कायदा (अधिनियम) बनतो.

**वार्षिक वित्तविषयक विवरणपत्र (अर्थसंकल्प):** हे विवरणपत्र म्हणजे संसद व विधिमंडळाच्या सभागृहांसमोर मांडला जाणारा आर्थिक वर्षाच्या जमा खर्चाच्या अंदाजाचा ताळेबंद. या विवरणपत्रास आपण सामान्य भाषेत 'अर्थसंकल्प' असे म्हणतो.

**एकत्रित निधी (राज्याची तिजोरी):** शासनाला कर व इतर मार्गाने प्राप्त होणारा सर्व महसूल जसे अनुदाने, व्याज, इत्यादी तसेच शासनाने घेतलेली कर्जे, शासनाने दिलेल्या कर्जाच्या परतफेडीतून शासनास प्राप्त झालेला निधी याचा अंतर्भाव 'एकत्रित निधी' मध्ये होतो. एकत्रित निधी म्हणजे जणू राज्याची तिजोरी.



**विनियोजन विधेयक (तिजोरीची चावी):** विधिमंडळाने अर्थसंकल्प मंजूर केल्यानंतर हे विधेयक मांडले जाते. याचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतरच शासनाला एकत्रित निधीतून खर्च करण्याची परवानगी मिळते. हे वित्त विधेयक असते. एकत्रित निधीची तिजोरी उघडण्याची ही चावी आहे.

**लोकलेखा:** भविष्य निर्वाह निधी, ठेकेदारांकडून मिळालेल्या ठेवी अशा जमा जेथे शासनाची भूमिका बँकरची आणि विश्वस्ताची असते, अशा निधीस 'लोकलेखा' म्हणतात.


**आकस्मिकता निधी:** अर्थसंकल्पात समाविष्ट नसलेल्या अनपेक्षित व तातडीच्या खर्चासाठी हा निधी वापरला जातो.

**लेखानुदान:** नवीन आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी विनियोजन विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले नाही तर १ एप्रिलपासून शासनाला एकत्रित निधीतून खर्च करता येत नाही. यासाठी विधानसभा शासनाला खर्चासाठी अग्रिम देण्यास मान्यता देते. या प्रक्रियेस 'लेखानुदान' म्हणतात.

**भारित खर्च:** राज्यपाल, न्यायाधीश, विधानसभा अध्यक्ष व उपाध्यक्ष, विधानपरिषद सभापती व उपसभापती यांचे पगार, भत्ते, शासनाने घेतलेल्या कर्जावरील व्याज, न्यायालयांच्या आदेशानुसार करावयाचा खर्च अशा काही खर्चाच्या बाबी विधानसभा नाकारू शकत नाही. या खर्चास 'भारित खर्च' म्हणतात. या खर्चाच्या अंदाजाची अनुदानाची मागणी विधानसभेत मतदानासाठी टाकली जात नाही.

**दत्तमत खर्च:** एकत्रित निधीमधून भारित खर्चाव्यतिरिक्त करण्यात येणारा इतर सर्व खर्च म्हणजे 'दत्तमत खर्च' होय. अशा सर्व खर्चाचे अंदाज म्हणजेच त्या खर्चाच्या अनुदानाच्या मागण्या या विधानसभेत मतदानाला टाकल्या जातात.

**महसुली जमा:** महसुली जमेचे कर महसूल व करेतर महसूल असे दोन भाग असतात. राज्य शासनाचे स्वत:चे कर, सेस, शुल्क या माध्यमातून मिळणारे





उत्पन्न, केंद्रीय कर व शुल्कातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणजे राज्याचा कर महसूल. या शिवाय शासनास मिळणारे व्याज, शास्ती, केंद्र शासनाकडून मिळणारी अनुदाने म्हणजे करेतर महसूल होय.

**महसुली खर्च:** वेतन, निवृत्ती वेतन, राज्याचे प्रशासन, विधिमंडळ, कर वसुली, कर्जाची परतफेड, व्याज प्रदान, स्थानिक स्वराज्य संस्था वा इतर संस्थांना देण्यात येणारी अनुदाने, शासनाच्या विविध विभागांतर्गत प्रशासकीय खर्च या सर्वांचा समावेश महसुली खर्चामध्ये होतो.

**महसुली तूट किंवा शिल्लक:** महसुली जमेपेक्षा महसुली खर्च अधिक असल्यास अर्थसंकल्प महसुली तुटीचा मानला जातो. तर महसुली जमा महसुली खर्चापेक्षा अधिक असल्यास अर्थसंकल्प महसुली शिलकीचा मानला जातो.

**भांडवली जमा:** शासनाने उभारलेली कर्जे, दिलेल्या कर्जाच्या वसुलीतून मिळालेल्या रकमा व मत्तेच्या विक्रीतून प्राप्त झालेले उत्पन्न यांचा समावेश भांडवली जमेमध्ये होतो.

**भांडवली खर्च:** मत्ता निर्माण करण्याकरिता किंवा प्राप्त करण्याकरिता केलेला खर्च म्हणजे ‘भांडवली खर्च’ होय. जमीन अधिग्रहण, रस्ते पुलांची बांधकामे, पाटबंधारे वा ऊर्जा निर्मितीवरील खर्च, कर्ज रोख्यातील गुंतवणूक अशा खर्चाचा भांडवली खर्चात समावेश होतो. ज्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च किंवा गुंतवणूक अधिक तो अर्थसंकल्प अधिक चांगला समजला जातो.

**अर्थसंकल्पीय तूट किंवा शिल्लक:** एकूण जमा (महसुली अधिक भांडवली) व एकूण खर्च (महसुली आधिक भांडवली) यातील फरक म्हणजे ‘अर्थसंकल्पीय तूट किंवा शिल्लक’.




**राजकोषीय तूट:** अर्थसंकल्पीय तूट अधिक कर्ज व दायित्त्वांच्या रकमा मिळून राजकोषीय तूट बनते.

**प्राथमिक तूट:** राजकोषीय तुटीमधून व्याज प्रदानाच्या रकमा वजा केल्यास जी रक्कम येते त्यास ‘प्राथमिक तूट’ असे म्हणतात.

**अनुदानाची मागणी:** अर्थसंकल्पात समाविष्ट केलेला अपेक्षित खर्च त्याच्या उद्दिष्टांसह अनुदानाच्या मागणीच्या स्वरुपात विधिमंडळासमोर मंजुरीसाठी मांडला जातो. साधारणपणे प्रत्येक विभागासाठी प्रस्तावित केलेल्या अनुदानासाठी स्वतंत्र मागणी केली जाते. प्रत्येक मंत्र्याला आपल्या विभागाचे बजेट मागणी स्वरुपात सभागृहासमोर ठेऊन मान्य करून घ्यावे लागते.

**पुरवणी मागणी:** अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नव्हती असा खर्च उद्भवल्यास किंवा अंदाजित केल्यापेक्षा अधिक खर्च होणार असल्यास असा खर्च त्याच्या स्पष्टीकरणासह विधिमंडळासमोर पुरवणी मागण्यांच्या स्वरुपात मांडला जातो.



**लाक्षणिक मागणी:** ज्या खर्चास मंजुरी घेतलेली आहे, अशा मंजूर रकमेतील शिल्लक रक्कम नवीन कामासाठी वापरायची असेल तर त्यास विधिमंडळाची परवानगी घेण्यासाठी लाक्षणिक मागणी केली जाते.

**अधिक खर्चाची मागणी:** विनियोजन अधिनियमाच्या मर्यादेपलीकडे मागील वर्षात होऊन गेलेला खर्च नियमात बसविण्यासाठी लेखापरीक्षणानंतर तो विधिमंडळासमोर मान्यतेसाठी सादर केला जातो. त्यास अधिक खर्चाची मागणी असे संबोधतात. पुरवणी व लाक्षणिक मागणी ही नेहमी चालू आर्थिक वर्षासाठी असते तर अधिक खर्चाची मागणी ही मागील वर्षांसाठी असते.

**पुनर्विनियोजन विधेयक:** विनियोजन विधेयकाची प्रक्रिया पुरवणी मागण्यांसंदर्भातही राबविली जाते. पुरवणी मागण्यांसंदर्भातील विधेयकास 'पुनर्विनियोजन विधेयक' असे म्हणतात.

**नियतव्यय:** विनियोजन विधेयकानुसार खर्चास घालून दिलेली नियोजित मर्यादा म्हणजे 'नियतव्यय'.

**अर्थसंकल्पीय अंदाज:** आगामी आर्थिक वर्षासाठीचे जमा-खर्चाचे अंदाज वार्षिक वित्तविषयक विवरणपत्राद्वारे सादर केले जातात. या अंदाजांना 'अर्थसंकल्पीय अंदाज' असे म्हणतात.

**सुधारित अंदाज:** येत्या वर्षाचे जमाखर्चाचे अंदाज देताना त्यासोबत चालू वर्षाची जमा-खर्चाची स्थिती सांगितली जाते. वर्ष पूर्ण झालेले नसते त्यामुळे अचूक जमाखर्च सांगणे शक्य नसते. साधारणपणे दहा महिन्यांचा जमा-खर्च व उर्वरित दोन महिन्यांसाठीचा अंदाज या आधारे 'सुधारित अंदाज' दिले जातात.

**प्रत्यक्ष रकमा:** येत्या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज, चालू वर्षाचे सुधारित अंदाज या सोबत मागील वर्षात झालेला जमा-खर्चही सांगितला जातो. मागील वर्षीच्या प्रत्यक्ष जमा-खर्चास 'प्रत्यक्ष रकमा' म्हटले जाते.

(मार्च, २०१९ मध्ये अर्थमंत्र्यांनी २०१९-२० आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मांडला. २०१९-२० या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज वर्तविताना, २०१८-१९ या चालू वर्षाचे सुधारित अंदाज व २०१७-१८ या वर्षाच्या प्रत्यक्ष रकमा यांची माहितीही अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये दिलेली असते.)

**कपात सूचना:** शासनाने सादर केलेल्या दत्तमत अनुदानाच्या मागण्यांशी संबंधित कोणतेही अनुदान कमी करण्यासाठी, त्यातील एखादी बाब वगळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी विधानसभा सदस्यांना कपात सूचना देता येते. यावर चर्चा व मतदान होते.

GDP/ GSDP

**सकल राष्ट्रीय / राज्य उत्पन्न (जीडीपी / जीएसडीपी):** संबंधित आर्थिक वर्षात संबंधित देशाच्या/राज्याच्या नागरिकांनी देशात/राज्यात उत्पादित केलेल्या वस्तू, सेवा, मत्ता यांचे एकूण मूल्य म्हणजे सकल राज्य उत्पन्न. राज्य उत्पन्नाच्या वाढीचा दर हा राज्याच्या विकासाचा मापदंड समजला जातो. साधारणत: राज्याची आर्थिक स्थिती समजून घेण्याचे निर्देशांक राज्य सकल उत्पन्नाच्या तुलनेत मापले जातात. जसे कर्जाचे, राजकोषीय तुटीचे सकल उत्पन्नाशी प्रमाण.

**४**

## संविधानात अर्थसंकल्प विषयक तरतुदी




संसदीय लोकशाही मार्गाने राज्यकारभार करताना लोकशाहीच्या प्रत्येक स्तंभाचे अधिकार, कर्तव्ये, त्यांच्यातील परस्पर संबंध, एकमेकांप्रती उत्तरदायित्त्व याचे सखोल मार्गदर्शन भारताच्या संविधानात आपण पाहतो. राज्यकारभाराचे नियम संविधानाने आखून दिलेले आहेत. यामध्ये देशाच्या, राज्याच्या आर्थिक कारभाराविषयी नियमांचाही समावेश आहे. अर्थसंकल्प तयार करणे किंवा सादर करणे हा शासनाचा अधिकार नसून कर्तव्य आहे. केंद्रात संसदेची आणि राज्यात विधिमंडळाची अर्थसंकल्पास मान्यता घेणे शासनास बंधनकारक आहे. शासन प्रत्येक पैशाच्या खर्चासाठी विधिमंडळास उत्तरदायी असते.

संविधानातील अर्थसंकल्प विषयक महत्त्वाचे अनुच्छेद व त्यातील तरतुदी ढोबळमानाने पुढीलप्रमाणे आहेत. जेथे संसद व विधिमंडळ या संदर्भात स्वतंत्रपणे तरतुदी आहेत, तेथे पुनरावृत्ती टाळण्यासाठी संबंधित दोन्ही अनुच्छेद एकत्र नमूद केले आहेत.

### अनुच्छेद ११२ व २०२:

प्रत्येक आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजाचा ताळेबंद म्हणजेच अर्थसंकल्प संसद व विधिमंडळाच्या सभागृहांसमोर मांडण्याचे बंधन या अनुच्छेदाने शासनावर घातलेले आहे. राष्ट्रपती वा राज्यपालांच्या वतीने संबंधित शासन अर्थसंकल्प सादर करते.

संविधानात कोठेही अर्थसंकल्प असा शब्द वापरलेला आपल्याला आढळत नाही. त्याऐवजी वार्षिक वित्तविषयक विविरणपत्र म्हणून उल्लेख असून या विवरणपत्रात एकत्रित निधीतून करावयाचा भारित व दत्तमत आणि महसुली व भांडवली खर्च स्वतंत्रपणे दाखविण्याचे बंधन आहे.

**अनुच्छेद ११३ व २०३:**

एकत्रित निधीतून करावयाचा दत्तमत खर्च अनुदानाच्या मागणीच्या स्वरुपात शासनाने सभागृहास सादर केल्यानंतर त्यावर मतदान घेऊन त्यास मान्यता देण्याचा, मागणी नाकारण्याचा वा त्यात कपात करण्याचा अधिकार संसद वा विधिमंडळास आहे. भारित स्वरूपाच्या खर्चावर सभागृहात चर्चा झाली तरी त्यावर मतदान मात्र होऊ शकत नाही.

**अनुच्छेद ११४ व २०४:**

अनुच्छेद ११३ व २०३ अनुसार अनुदानाच्या मागण्या संमत झाल्यानंतर एकत्रित निधीमधून खर्च करण्यासाठी शासन विनियोजन विधेयकाच्या माध्यमातून संसद किंवा विधिमंडळाची मान्यता मिळविते. या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतरच शासनास वार्षिक वित्तविषयक विविरणपत्रात नमूद केलेल्या अंदाजाच्या मर्यादेत खर्च करता येतो.

**अनुच्छेद १०९ व १९८:**

या अनुच्छेदांतील तरतुदींनुसार वित्त विधेयक राज्यसभा वा विधानपरिषदेत मांडता येत नाही. लोकसभा किंवा विधानसभेने वित्त विधेयक मंजूर केल्यानंतर ते राज्यसभा वा विधानपरिषदेत पाठविले जाते. राज्यसभा व विधानपरिषदेस विधेयक नाकारण्याचा अधिकार नाही, ते केवळ सुधारणा सुचवू शकतात. राज्यसभा वा विधानपरिषदेने पाठविलेल्या शिफारशी स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार लोकसभा वा विधानसभेचा असतो.

**अनुच्छेद ११० व १९९:**

या अनुच्छेदांत वित्त विधेयकाची व्याख्या करण्यात आलेली आहे. कर आकारणी, कर रचनेतील बदल, कर्ज उभारणी, हमी, एकत्रित निधी, आकस्मिकता निधी, भारित खर्च, लोकलेखेतील जमा, लेखापरीक्षण, आदी बाबींसंदर्भातील विधेयके वित्त विधेयके समजली जातात. एखादे विधेयक वित्त विधेयक आहे किंवा नाही या संदर्भात प्रश्न निर्माण झाल्यास लोकसभा वा विधानसभा अध्यक्षांचा त्या संदर्भातील निर्णय अंतिम समजला जातो.

**अनुच्छेद ११५ व २०५:**

विनियोजन अधिनियमाच्या मर्यादेपलीकडे अधिकचा खर्च करण्याची शासनास आवश्यकता भासल्यास किंवा एखादी नवी सेवा अंतर्भूत केल्यास त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी पुरवणी मागण्या करण्याची तरतूद या अनुच्छेदात आहे. ज्या खर्चास पूर्वीच मंजुरी घेतलेली आहे, अशा मागणीतील शिल्लक रक्कम नवीन कामासाठी वापरायची असेल तर त्यास संसद वा विधिमंडळाची परवानगी घेण्यासाठी लाक्षणिक मागणी केली जाते. जर खर्च होऊन गेला असेल तर असा खर्च नियमात बसविण्यासाठी लेखापरीक्षणानंतर तो लोकलेखा समिती समोर सादर केला जातो. समितीच्या अहवालानुसार त्यानंतर हा खर्च अधिक खर्चाच्या मागण्यांच्या स्वरुपात संसद वा विधिमंडळासमोर मान्यतेसाठी सादर केला जातो.

**अनुच्छेद ११६ व २०६:**

नवीन आर्थिक वर्ष सुरु झाल्यानंतर, विनियोजन विधेयकाच्या मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वित्तविषयक विवरणपत्रातील अंदाजाच्या मर्यादेत शासनाला खर्चासाठी लेखानुदानाद्वारे अग्रिम मिळविण्याची तरतूद या अनुच्छेदांत करण्यात आली आहे.

**अनुच्छेद ११७ व २०७:**

राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या शिफारशीशिवाय वित्तविषयक विधेयक सादर करता येत नाही. असे विधेयक राज्यसभा वा विधानपरिषदेत पूर:स्थापित (introduce) करता येत नाही.

**अनुच्छेद १५०:**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक म्हणजेच शासनाचे ऑडीटर (CAG) यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींनी ठरवून दिल्यानुसार केंद्र व राज्य शासनाला लेखे ठेवण्याचे बंधन या अनुच्छेदाने घातलेले आहे.

**अनुच्छेद १५१:**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक राष्ट्रपती वा राज्यपालांना लेखापरीक्षण अहवाल सादर करतात. ते संसद वा विधिमंडळाच्या सभागृहांपुढे सादर करण्याचे बंधन शासनावर असते.

**अनुच्छेद २६५:**

कायदेशीर प्राधिकरणाशिवाय कुणालाही कर आकारता येत नाही वा कराची वसुली करता येत नाही.

**अनुच्छेद २६६:**

या अनुच्छेदांतर्गत एकत्रित निधी व लोकलेखा यांची निर्मिती करण्यात आली आहे. शासनाला कर व इतर मार्गाने प्राप्त होणारा सर्व महसूल (अनुदाने, व्याज, इत्यादी), शासनाने घेतलेली कर्जे, शासनाने दिलेल्या कर्जाच्या परतफेडीतून शासनास प्राप्त झालेला निधी या सर्वांचा अंतर्भाव 'एकत्रित निधी' मध्ये होतो. याशिवाय शासनास प्राप्त होणारा निधी (जसे भविष्य निर्वाह निधी, ठेकेदारांकडून मिळालेल्या ठेवी) लोकलेखा अंतर्गत जमा होतो. या निधीच्या बाबतीत शासनाची भूमिका बँकरची आणि विश्वस्ताची असते. यातून करण्यात येणाऱ्या खर्चास संसद वा विधिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता नसते.

**अनुच्छेद २६७:**

या अनुच्छेदाद्वारे आकस्मिकता निधीची निर्मिती करण्यात आलेली आहे. राष्ट्रपती व राज्यपालांच्या अखत्यारीतील हा निधी अनपेक्षित व तातडीच्या खर्चासाठी वापरला जातो. या निधीतून करण्यात आलेल्या खर्चाला पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून विधिमंडळाची कार्योत्तर मंजुरी घेतल्यानंतर एकत्रित निधीतून तेवढी रक्कम पुन्हा आकस्मिकता निधीमध्ये जमा केली जाते.

**अनुच्छेद २७५:**

वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्राच्या एकत्रित निधीतून राज्यांना अनुदान देण्याची तरतूद या अनुच्छेदात करण्यात आली आहे.

**अनुच्छेद २८० व २४३:**

या अनुच्छेदांतील तरतुदीनुसार राष्ट्रपती व राज्यपाल दर पाच वर्षांनी अनुक्रमे केंद्रीय वित्त आयोगाचे व राज्य वित्त आयोगाचे गठन करतात. केंद्र शासनाच्या करातील राज्यांचा हिस्सा व केंद्राच्या एकत्रित निधीतून राज्यांना द्यावयाच्या अनुदानाची तत्त्वे या संदर्भात केंद्रीय वित्त आयोग शिफारशी करतो. तर राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावयाच्या अनुदानाच्या संदर्भातील शिफारशी राज्य वित्त आयोग करतो.

**अनुच्छेद २८१:**

वित्त आयोगाच्या शिफारशींवर शासनाने कार्यपालन अहवाल सादर करण्याचे बंधन या अनुच्छेदाने घातलेले आहे.

**अनुच्छेद २९२:**

संसदेने कायद्याद्वारे घालून दिलेल्या मर्यादेत एकत्रित निधीच्या हमीवर कर्ज उभारण्याचा वा कर्जास हमी राहण्याचा अधिकार या अनुच्छेदाद्वारे शासनास प्राप्त झाला आहे.

या सर्व तरतुदी पाहिल्यावर आपल्या लक्षात येईल की, लेखे ठेवण्याची पद्धत, स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे हस्तांतरण, अर्थसंकल्प सादर करून खर्चास पूर्व परवानगी घेणे, मंजुरीपेक्षा अधिक झालेला खर्च नियमानुकूल करून घेणे या सर्वांसाठी शासन / प्रशासन वित्त आयोग वा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यासारख्या संवैधानिक यंत्रणा किंवा विधिमंडळ जबाबदार असते. त्याचवेळी शासनास लेखानुदान किंवा कर्ज उभारण्याचा अधिकार देऊन आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी सक्षमही केले गेले आहे. अशाप्रकारे संविधानाने जबाबदाऱ्या, अधिकार यांच्यामध्ये योग्य नियंत्रण व संतुलन राखलेले आहे.

५

## अशी असते अर्थसंकल्पाची रचना

राष्ट्रपतींनी संमत केलेल्या व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी ठरवून दिलेल्या पद्धतीनेच शासनास आपले लेखे ठेवावे लागतात. यामुळे लेख्यांचे व्यवस्थापन व नियंत्रण प्रभावीपणे होऊ शकते.

अर्थसंकल्पाचे तीन प्रमुख भाग असतात.

**एकत्रित निधी:** महसुली जमा, भांडवली जमा, महसुली खर्च, भांडवली खर्च, ऋण शीर्षाखालील जमा (कर्जे व आगाऊ रकमा), ऋण शीर्षाखालील खर्च, आकस्मिकता निधीकडे केलेली हस्तांतरणे यांचा समावेश यामध्ये असतो.

**आकस्मिकता निधी:** संविधानाच्या अनुच्छेद २६७ अनुसार, स्थापन करण्यात आलेला हा निधी विशिष्ट रकमेचा असतो. अनपेक्षित व तातडीचा खर्च यातून भागविला जातो. नंतर विधिमंडळाची त्या खर्चास मान्यता घेऊन सदर रकमेची एकत्रित निधीतून आकस्मिकता निधीमध्ये भरपाई केली जाते. या निधीची सध्याची मर्यादा रु. १५० कोटी आहे.

**लोकलेखा:** एकत्रित निधीमध्ये अंतर्भूत रकमा वगळता शासनाला प्राप्त होणाऱ्या इतर रकमा, जेथे शासनाची भूमिका बँकरची असते, अशा जमा व त्यासंदर्भातील खर्च यांचा समावेश लोकलेखा विभागात होतो. भविष्य निर्वाह निधी, ठेकेदारांकडून प्राप्त ठेवी तसेच राज्य मार्ग निधी, शिक्षण उपकर निधी यासारखे राखीव निधी याद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमा व त्या संबधितांना परत करण्यासंदर्भातील व्यवहार या विभागात मोडतात.

एकत्रित निधीतील जमा खर्चाचे महसुली व भांडवली असे वर्गीकरण असते. तर खर्चाचे भारित व दत्तमत असेही वर्गीकरण केलेले असते. लेखे ठेवण्यासाठी पुढीलप्रमाणे विशिष्ट रचना ठरवून देण्यात आलेली आहे.

**क्षेत्र:** सर्वसाधारण सेवा, सामाजिक सेवा, आर्थिक सेवा

**उपक्षेत्र:** जसे प्रशासकीय सेवा, आरोग्य व कुटुंब कल्याण, पाटबंधारे व पूर नियंत्रण

**मुख्य शीर्ष:** प्रत्येक मुख्य शीर्ष हा चार अंकी आकडा असतो. ० व १ ने सुरु होणारी मुख्य शीर्षे महसुली जमेची असतात. २ व ३ ने सुरु होणारी महसुली खर्चाची, ४ व ५ ने सुरु होणारी भांडवली खर्चाची तर ६ व ७ ने सुरु होणारी शीर्षे कर्ज व अग्रीमांशी संबंधित असतात. तर ८ अंकाने सुरु होणारे मुख्य शीर्ष आकस्मिकता निधी व लोकलेखा यांचेशी संबंधित असते.

**उदाहरणार्थ:** गृहनिर्माणातून शासनास मिळणारा करेतर महसूल ०२१६ या मुख्य शीर्षाखाली, गृहनिर्माणावर होणारा महसुली खर्च २२१६ या मुख्य शीर्षाखाली, गृहनिर्माणावर होणारा भांडवली खर्च ४२१६ या मुख्य शीर्षाखाली, गृहनिर्माणासाठी घेतलेली कर्जे ६२१६ या शीर्षाखाली दाखविली जातात.

**गौण शीर्ष:** हा दोन अंकी आकडा असतो व यावरून खर्च कोणत्या प्रकारच्या कार्यासाठी अभिप्रेत आहे, हे समजू शकते. मुख्य शीर्षाद्वारे कार्य समजते तर गौण शीर्षाद्वारे कार्यक्रम समजतो.

**उप शीर्ष:** राज्य शासन आपल्या अधिकारात आवश्यकतेनुसार उप शीर्षे तयार करते. उप शीर्षाद्वारे योजना समजते.

**तपशीलवार शीर्ष:** याद्वारे खर्चाचे अचूक प्रयोजन समजते.

उदाहरण: राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्यासंदर्भातील खर्च अर्थसंकल्पात कसा दाखविला जाईल हे आपण पाहू:

| शीर्ष | तपशील |
|---|---|
| क्षेत्र | सामाजिक सेवा |
| उपक्षेत्र | शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती |
| मुख्य शीर्ष | २२०२, सर्वसाधारण शिक्षण |
| गौण शीर्ष | ८०, सर्वसाधारण |
| उप शीर्ष | ८००, इतर खर्च |
| तपशीलवार शीर्ष | ०४, अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी |


एकत्रित निधीतील महसुली व भांडवली जमा खर्चाच्या घटकांची (उपघटकांची) तसेच लोकलेखामधील जमा- खर्चाची शीर्षे यांची उदाहरणे येथे वाचकांच्या माहितीसाठी देत आहे.

**महसुली जमा:**

- राज्याचा स्वत:चा कर महसूल (जमीन महसूल, मुद्रांक व नोंदणी फी, राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर, राज्य वस्तू व सेवा कर, वाहनांवरील कर, वीजेवरील कर व शुल्क)
- करांव्यतिरिक्त / करेतर महसूल (व्याजाच्या जमा रकमा, करांव्यतिरिक्त इतर महसूल जसे शासकीय मुद्रणालयाचे उत्पन्न, कारागृहात तयार केलेल्या वस्तूंची विक्री)
- केंद्रीय करांतील हिस्सा (निगम कर, संपत्ती कर, केंद्रीय उत्पादन शुल्क, सेवा कर, केंद्रीय वस्तू व सेवा कर) केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने

**भांडवली जमा:**

- संकीर्ण भांडवली जमा (जसे शासनाने एखादी मत्ता विकल्यामुळे प्राप्त झालेले उत्पन्न)
- सरकारी ऋण (राज्य शासनाने उभे केलेले देशांतर्गत कर्ज व केंद्र शासनाकडून घेतलेले कर्ज वा आगाऊ रकमा)
- राज्य शासनाने दिलेल्या कर्जाची झालेली वसुली
- लोकलेखातून खर्च वजा जाता निव्वळ जमा



**महसुली खर्च:** या खर्चाचे विकास व विकासेतर खर्च असे दोन प्रकारे वर्गीकरण होते.

- महसुली विकास खर्च

  सामाजिक सेवांवरील खर्च (शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, पोषण आहार, समाजकल्याण, इत्यादी)

आर्थिक सेवांवरील खर्च (कृषी, पाटबंधारे, ऊर्जा, उद्योग, वाहतूक व दळणवळण, इत्यादी)

स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने व अंशदाने

- महसुली विकासेतर खर्च

सर्वसाधारण सेवांवरील खर्च (राज्याची अंगे, प्रशासकीय सेवा, निवृत्ती वेतन यावरील खर्च)

व्याज प्रदान व कर्जाच्या परतफेडीवरील खर्च

**भांडवली खर्च:** या खर्चाचेही विकास व विकासेतर खर्च असे दोन प्रकारे वर्गीकरण होते.

- भांडवली विकास खर्च

मत्ता निर्माण करण्यासाठी होणारा खर्च

राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा

- भांडवली विकासेतर खर्च

राज्य शासनाने उभे केलेले देशांतर्गत कर्ज ,

केंद्र शासनाकडून घेतलेले कर्ज वा आगाऊ रकमा यांची परतफेड करण्यासाठी येणारा खर्च

राज्य शासनाची आर्थिक वाटचाल शाश्वत (sustainable) व योग्य दिशेने सुरु आहे किंवा नाही, हे विकास खर्चाचे प्रमाण पाहून लक्षात येते.


- **लोकलेखा:** यामध्ये खालील शीर्षांच्या माध्यमातून जमा होते, त्याच्याशी संबंधित उद्दिष्टांसाठी रकमा संवितरित (disburse) केल्या जातात.
  - भविष्य निर्वाह निधी
  - विमा व निवृत्ती वेतन निधी
  - व्याजी व बिनव्याजी ठेवी

- आगाऊ रकमा
- विविध राखीव निधी (रोजगार हमी निधी, शिक्षण उपकर)

अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी ही रचना समजून घेणे महत्त्वाचे आहे. अर्थसंकल्पीय विवरणपत्रे / प्रकाशने एका विशिष्ट स्वरुपात (format) तयार केलेली असतात. अर्थसंकल्पाची रचना समजल्याशिवाय ती वाचता व समजून घेता येणार नाहीत. अर्थसंकल्पाची रचना भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी ठरवून दिलेली असल्यामुळे, एकदा ती समजली की कोणत्याही राज्याचा किंवा केंद्र शासनाचा अर्थसंकल्प समजणेही सोपे होते.

तक्ता 1

## अर्थसंकल्पाची रचना



६

# असा तयार होतो अर्थसंकल्प

सर्वात आधी हे लक्षात घेतले पाहिजे की, अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नव्हे. तर वर्षभरात गाठावयाची उद्दिष्टे आणि त्यासाठी उपलब्ध संसाधने (resources) यांचा तो ताळेबंद असतो. आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने जमा (उत्पन्न) व खर्च यांचे वस्तुनिष्ठ अंदाज तयार करणे आवश्यक असते. मार्च महिन्यात अर्थसंकल्प सादर होत असला तरी तो तयार करण्याची व त्याचा सातत्याने आढावा घेण्याची प्रक्रिया वर्षभर सुरु असते.

- **अर्थसंकल्पाचे वेळापत्रक:**

  आगामी वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया साधारणपणे सप्टेंबर महिन्यात सुरु होते. म्हणजे वर्ष २०२०-२१ चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम सप्टेंबर २०१९ मध्येच सुरु झालेले असते. अर्थसंकल्प तयार करण्यासाठी प्रशासनाने राबवावयाच्या प्रक्रियेचे वेळापत्रक व सूचना वित्त विभाग जारी करतो. प्रत्येक विभागांतर्गत येणारी सर्व राज्याबाहेरील, राज्यस्तरीय व क्षेत्रीय कार्यालये आपापले खर्चाचे अंदाज संबंधित विभाग प्रमुखांना सादर करतात. मागील व चालू वर्षातील खर्चाचे कल (trends), येत्या वर्षातील गरजा लक्षात घेऊन हे अंदाज तयार होतात. विभाग प्रमुख छाननी नंतर सदर अंदाज वित्त विभागास सादर करतात. खर्चाप्रमाणे महसूल व जमा याचाही अंदाज अशाच पद्धतीने तयार केले जातात. याशिवाय, केंद्र शासनाकडून मिळणारी अनुदाने, करातील हिस्सा आदी बाबीही लक्षात घेतल्या जातात. या अंदाजांचे महसुली व भांडवली आणि भारित व दत्तमत असे वर्गीकरण केले जाते.

  संपूर्ण आर्थिक वर्षामध्ये जमा खर्चाचा आढावा घेतला जात असतो. जो खर्च अपेक्षिला नव्हता, त्यासाठी ज्याप्रमाणे पुरवणी मागण्या केल्या जातात, त्याचप्रमाणे जेथे अंदाजित केल्याप्रमाणे खर्च होण्याची परिस्थिती नसेल, अशा ठिकाणी रकमा परत घेतल्या जातात. जेणेकरून त्यांचे पुनर्विनियोजन होऊ शकेल. आगामी वर्षाचे अंदाज तयार करण्यापूर्वी चालू वर्षाचे सुधारित अंदाजही तयार केले जातात.

- **आर्थिक शिस्तीसाठी अचूक अंदाज महत्त्वाचे**

  जमा वा खर्चाचे अंदाज फुगवून दाखविणे किंवा अपेक्षेपेक्षा जाणीवपूर्वक कमी दाखविणे हे आर्थिक बेशिस्तीचे द्योतक आहे. यामुळे ज्याप्रमाणे कर रचनेतील बदलाबाबत वास्तववादी निर्णय घेता येणार नाही, त्याचप्रमाणेच कदाचित राज्याच्या विकासासाठी आवश्यक खर्चालाही कात्री लागण्याची किंवा अनावश्यक खर्च अंतर्भूत होण्याची शक्यता निर्माण होते.

  वाढता खर्च भागविण्यासाठी अधिकची साधनसंपत्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने कर रचनेत बदल किंवा नवीन कर आकारणी याबाबत विचार केला जातो. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर सदर बदलाचा काय परिणाम होईल व समाजातील कोणत्या घटकावर हा परिणाम होईल याचा विचार महत्त्वाचा ठरतो. तसेच मर्यादित साधनांमध्ये अधिक प्रभावीपणे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी प्रशासकीय बदल, तंत्रज्ञानाचा अवलंब अशा बाबी विचारात घेतल्या जातात. खर्चाच्या प्राथमिकता तपासल्या जातात.

- **विकास योजनेचे नियोजन:**

  खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना प्रथम स्टँडींग चार्जेस जसे आस्थापना, वेतन, व्याज यावरील खर्चाचा विचार केला जातो. असा हा बांधील खर्च वगळल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या साधनसंपत्तीचा विचार करून विकास योजनेचे नियोजन केले जाते. अशा बांधील खर्चाचाही प्रशासनाने वेळोवेळी आढावा घेण्याची गरज असते. काळाच्या ओघात, तंत्रज्ञानाचा उपयोग करून यापैकी काही खर्च कमी होत असतील तर तसे करून झालेली बचत विकास कामांसाठी वापरता येऊ शकते.

  २०१५ मध्ये नीती आयोगाची स्थापना होईपर्यंत नियोजनाची प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावर नियोजन आयोग, राष्ट्रीय विकास परिषद व राज्य स्तरावर राज्य नियोजन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असे. विकासाचे नियोजन पंचवार्षिक योजनेच्या स्वरुपात होत असे. अर्थसंकल्पात योजनांतर्गत खर्च (म्हणजे पंचवार्षिक योजनेत नमूद विकास

कामांवरील खर्च) व योजनेतर खर्च अशी विभागणी केली जात असे. या ऐवजी आता खर्चाची विभागणी विकास खर्च व विकासेतर खर्च अशी करण्यात येते. राज्य स्तरावर नियोजन उपसमिती अर्थसंकल्पातील विकास योजनांसंदर्भात निर्णय घेते.

जिल्ह्याचे नियोजन, राज्याचे नियोजन व अनुशेषाचे नियोजन अशा तीन स्तरांवर विकास योजनेचे नियोजन होते. उपलब्ध साधनसंपत्तीच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीस विशिष्ट आर्थिक मर्यादेत नियोजनाचा आराखडा बनविण्यास कळविले जाते. या नियोजनास राज्यशासन मंजुरी देते. राज्यस्तरावरील नियोजन हे संबंधित विभाग, तज्ञ व्यक्ती यांच्याशी चर्चा करून केले जाते. अनुशेषाचे नियोजन राज्यपालांच्या निर्देशांनुसार केले जाते.

अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया किचकट आहे हे खरे. मात्र ती जेवढ्या जागरूकतेने, बारकावे लक्षात घेऊन राबविली जाते तेवढा अर्थसंकल्प वास्तववादी बनतो. अन्यथा अंदाज कोलमडतात. आर्थिक शिस्त राखण्यासाठी अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया काळजीपूर्वकरित्या राबविणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

## ७

# अर्थसंकल्पीय प्रकाशने



अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर विधिमंडळ सदस्यांना एका सुटकेसमध्ये अर्थसंकल्पीय प्रकाशने दिली जातात हे फारसे कुणाला माहित नसते. विविध प्रकारची अर्थसंकल्पीय माहिती देणारी ही प्रकाशने कोणती हे आपण समजून घेऊ.

- **वित्तमंत्र्यांचे भाषण:** या भाषणाचे दोन भाग असतात. पहिल्या भागात राज्याची आर्थिक स्थिती, शासनाने हाती घेतलेल्या महत्त्वाच्या योजना, शासनाची कामगिरी, आगामी वर्षात हाती घ्यावयाची महत्त्वाची कामे, महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय आदी विषयांवर प्रकाश टाकला जातो. भाषणाच्या दुसऱ्या भागात विविध करांसंदर्भातील धोरणे, सवलती, नवे कर, कर रचनेतील बदल आदी बाबींचे विवेचन केलेले असते.
- **राज्याची आर्थिक पाहणी:** हे प्रकाशन त्या अर्थाने अर्थसंकल्पीय प्रकाशन नाही. मात्र अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना यातील माहिती सहाय्यभूत ठरत असते. साधारणपणे अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी आर्थिक पाहणी स्वतंत्रपणे सादर केली जाते. शासनाच्या नियोजन विभागांतर्गत अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे प्रकाशन तयार करते. देशाच्या तुलनेत राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासाची स्थिती यावरून समजते. राज्याचे सकल उत्पन्न, विविध क्षेत्रातील विकासाचा दर, विविध निकषांवर राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासाची गती, सामाजिक व

आर्थिक निर्देशांकांवर (Socio-Economic Indicators) इतर राज्यांशी तुलना, लोकसंख्या, महागाई, रोजगाराच्या उपलब्धतेनुसार कामगारांचे वर्गीकरण, शेतीतील उत्पादकता, शिक्षण, आरोग्य, आदी अनेक विषयांवरील विश्लेषण आर्थिक पाहणीत केलेले असते. हे अत्यंत महत्त्वाचे प्रकाशन असून विद्यार्थी, विविध क्षेत्रातील तज्ञ यांनी ते आवर्जून वाचले पाहिजे.

- **संक्षिप्त अर्थसंकल्प:** नावाप्रमाणेच अत्यंत संक्षिप्त स्वरुपात राज्याच्या आर्थिक स्थितीची माहिती या प्रकाशनात दिलेली असते. या प्रकाशनात आलेख व तक्त्यांच्या स्वरुपात दिलेली माहिती समजून घेणे व तिचे विश्लेषण करणे सोपे जाते. विविध प्रकारचा विकास व विकासेतर खर्च व त्यांचे वर्षागणिक कल समजून घेण्यासाठी हे प्रकाशन अत्यंत महत्त्वाचे ठरते.



- **वार्षिक वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक):** हे विवरणपत्र म्हणजे खरा अर्थसंकल्प. संविधानातील तरतुदीनुसार आर्थिक वर्षाच्या जमा खर्चाच्या अंदाजाचा जो ताळेबंद विधानसभेसमोर सादर करण्याचे बंधन शासनावर आहे, तो ताळेबंद (balance sheet) म्हणजेच वार्षिक वित्तविषयक विवरणपत्र. या प्रकाशनाचे मुखपृष्ठ हिरव्या रंगाचे असल्यामुळे यास ग्रीन बुक असेही म्हणतात. हे विवरणपत्र चार भागात विभागलेले असते.

पहिल्या भागात मागील आर्थिक वर्ष, चालू आर्थिक वर्ष व आगामी आर्थिक वर्षाची वित्तीय स्थिती स्पष्ट करणारी प्रास्ताविक टीप असते. तसेच मागील वर्षाचे जमा-खर्चाचे सुधारित अंदाज व प्रत्यक्ष रकमा यामध्ये ज्या मुख्य शीर्षांखाली मोठी तफावत दिसून येते, त्या तफावतींचे स्पष्टीकरण दिलेले असते. चालू वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज यातील तफावती व त्यांचे स्पष्टीकरण यांचाही समावेश पहिल्या भागात असतो.

विवरणपत्राच्या दुसऱ्या भागात चालू वर्षातील जमा-खर्चासंदर्भात महत्त्वाच्या बाबी जसे महसुली जमा, महसुली खर्च, भांडवली खर्च याची माहिती तसेच चालू वर्षाचे सुधारित अंदाज व आगामी वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज यांच्यातील तफावती व स्पष्टीकरण दिलेले असते. यासोबतच आगामी वर्षाचा विकास कार्यक्रम, क्षेत्रनिहाय तरतुदी, जमा, खर्च, तूट यांचे विवरण, प्रादेशिक विकास मंडळांना दिलेला नियतव्यय यांचा तपशील दिलेला असतो.

विवरणपत्राच्या तिसऱ्या भागात एकत्रित निधीचे मुख्य शीर्ष निहाय विवरण दिलेले असते. मागील वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रकमा, चालू वर्षाचे अर्थसंकल्पीय व सुधारित अंदाज व आगामी वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज यांचे स्वतंत्र स्तंभ (column) असतात. आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा स्तंभ हिरव्या रंगात दिलेला असतो.

विवरणपत्राच्या चौथ्या भागात ऋण व ठेवींच्या शीर्षांतर्गत जमा व संवितरित (Receipt and Disbursement) रकमांचे विवरण असते.

- **अर्थसंकल्पीय अंदाज (व्हाईट बुक):** पांढऱ्या रंगाचे मुखपृष्ठ असल्यामुळे या प्रकाशनास व्हाईट बुक म्हणतात. ग्रीन बुक मधील अर्थसंकल्पीय तरतुदींचे विस्तृत विवरण या प्रकाशनात सापडते. अर्थसंकल्पातील प्रत्येक पै न् पै कुठून येते व कुठे खर्च होते, याची संपूर्ण माहिती या प्रकाशनात सापडते. याचे तीन भाग असतात व ते स्वतंत्र पुस्तकांच्या स्वरुपात छापले जातात.
    - **भाग एक -** राज्याच्या तिजोरीत पैसा कुठून येतो म्हणजेच राज्याचा महसूल व इतर जमा याचे तपशील या भागात दिलेले असतात. मागील वर्षीचे प्रत्यक्ष उत्पन्न, चालू वर्षाचे उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज व येत्या वर्षाच्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज येथे दिलेले असतात.

- **भाग दोन -** या भागात पैसा कुठे खर्च होतो याचे तपशील दिलेले असतात. शासनाच्या प्रत्येक विभागाच्या खर्चाचे विवरण, मागील वर्षाच्या प्रत्यक्ष रकमा, चालू वर्षाचे अर्थसंकल्पीय व सुधारित अंदाज व येत्या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज या स्वरुपातच दिलेले असते. वर अर्थसंकल्पाची रचना या भागात स्पष्ट केल्याप्रमाणे खर्चाचा तपशील हा मुख्य शीर्ष, गौण शीर्ष, उप शीर्ष, तपशीलवार शीर्ष याप्रमाणे विस्ताराने दिलेला असतो. शासनाच्या प्रत्येक विभागाचे एक पुस्तक असते. प्रत्येक विभागाला इंग्रजी वर्णमालेतील अक्षराचा संकेतांक दिलेला आहे. जसे A - सामान्य प्रशासन विभाग, B - गृह विभाग, इत्यादी. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत नवीन कामांचे स्वतंत्र पुस्तक दिले जाते.

  याशिवाय याच भागात सर्व विभागांचा एकत्रित खर्च दर्शविणारे खर्चाचा **प्रधान शीर्षवार - नि - विभागवार सारांश व लोकलेखा** असे एक पुस्तक असते. यामध्ये मुख्य शीर्षवार खर्च दिलेला असतो. प्रत्येक मुख्य शीर्षाखाली ज्या-ज्या विभागांमध्ये खर्च झाला आहे किंवा अंदाजित आहे, त्याचा सारांश या पुस्तकात मिळतो. उदाहरणार्थ: २२०२, सर्वसाधारण शिक्षण या मुख्य शीर्षांतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, आदिवासी विकास विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग असे अनेक विभाग खर्च करीत असतात. असा एकत्रित खर्च समजण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग होतो.

या सोबतच प्रत्येक जिल्ह्याचा नियोजन आराखडा प्रस्तुत करणारी जिल्हा योजनांची पुस्तकेही याच भाग दोनमध्ये मोडतात.

- **भाग तीन -** अर्थसंकल्पीय अंदाजाच्या भाग तीन अंतर्गत अनेक परिशिष्टे सादर केली जातात. यात प्रत्यक्ष काम निहाय तरतुदींचा उल्लेख दिलेला असल्यामुळे सदस्यांना (आमदारांना) आपल्या मतदार संघातील विकास कामांसाठी दिलेला निधी जाणून घेण्यासाठी या परिशिष्टांचा उपयोग होतो. विविध परिशिष्टांमधून पुढीलप्रमाणे माहिती समजते -

- परिशिष्ट अ - जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना द्यावयाची अनुदाने व कर्जे
- परिशिष्ट ब - १) बांधकामे - रस्ते व पूल, २) बांधकामे - इमारती
- परिशिष्ट क - जलसंपदा विभागाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट बांधकामे
- परिशिष्ट ड - आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट बांधकामे
- परिशिष्ट ई - नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावयाची विशिष्ट अनुदाने तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त थेट अनुदाने
- परिशिष्ट फ - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट जिल्हा योजनेसंदर्भातील तरतुदी

विभागवार ३३ पुस्तके, जिल्हावार ३६ पुस्तके व कामांचे तपशील देणारी जाडजूड परिशिष्टे यामुळेच अर्थसंकल्पीय पुस्तके सदस्यांना देण्यासाठी सुटकेसची गरज भासते.

- **अर्थसंकल्पविषयक निवेदन (ब्लू बुक):**

निळया रंगाचे मुखपृष्ठ असणारे हे दोन खंड असतात. पहिल्या खंडामध्ये जमा (भाग एक) व खर्चाचे (भाग दोन) चालू वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज आणि आगामी वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज यांच्यातील तफावतीची तपशीलवार स्पष्टीकरणे दिलेली असतात. ही स्पष्टीकरणे विभागवार व गौण शीर्षानुसार दिलेली असतात. विविध राखीव निधींसंदर्भातील स्पष्टीकरणे लोकलेखा अंतर्गत दाखविली जातात.

खंड दोन मध्ये आगामी आर्थिक वर्षात राबवावयाच्या नवीन बाबींची माहिती दिलेली असते. या बाबी विभागवार व मुख्य शीर्षनिहाय दिलेल्या असतात.

- **मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र व प्रकटीकरणे:**

  महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमानुसार शासनास आगामी काळासाठीच्या वित्तीय धोरणाची माहिती विधिमंडळास सादर करावी लागते. राज्यात आर्थिक सुस्थिती राखण्यासाठी विविध वित्तीय निर्देशांकांवर अपेक्षित कामगिरी करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे व त्यासाठीची गृहीतके यांची माहिती या प्रकाशनातून मिळते.

- **कार्यक्रम अंदाजपत्रक:** इतर सर्व अर्थसंकल्पीय प्रकाशने वित्तीय म्हणजे आकड्यांच्या भाषेत सादर केली जातात. हे प्रकाशन मात्र अर्थसंकल्प ज्या उद्दिष्टांसाठी तयार केला जातो, त्या उद्दिष्टांची माहिती देते. अर्थसंकल्पीय तरतुदी कशासाठी खर्च होणार आहेत, हे या विभागवार प्रकाशनातून समजते. संबंधित विभागाची आस्थापना, विविध योजना, ठरविण्यात आलेली लक्ष्ये व साध्ये अशी माहिती या प्रकाशनात दिलेली असते.

- **वाणिज्यिक किंवा अर्धवाणिज्यिक स्वरूपाचा व्यवहार करणाऱ्या महत्त्वाच्या शासकीय योजनांचे आर्थिक अंदाज दर्शविणारे विवरणपत्र:** शासनाच्या ज्या योजनांतर्गत वाणिज्यिक (commercial) स्वरूपाचा व्यवहार होतो, जसे कापूस एकाधिकार योजना, शासकीय दूध योजना, अशा योजनांचे विवरण, नफा-तोटा यांचे अंदाज, त्यावरील प्रशासकीय खर्च आदी बाबींचा समावेश या प्रकाशनात असतो.

- **मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीच्या योजना:** सामाजिक न्याय विभागामार्फत हे प्रकाशन दिले जाते. या विभागांतर्गत मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजना तसेच अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत इतर विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना यांचा तपशील व आर्थिक तरतुदी या प्रकाशनात दिलेल्या असतात.

- **खर्चाचे पूरक विवरणपत्र:** अर्थसंकल्प सादर झाल्यापासून त्या पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पासोबत सुधारित अंदाज देईपर्यंत साधारण तीन वेळा पुरवणी मागण्या सादर केल्या जातात. पुरवणी मागण्या खर्चाचे पूरक विवरणपत्र या प्रकाशनाद्वारे सादर केल्या जातात. संबंधित विभाग, शीर्ष, रक्कम आदी तपशिलासह मागणीचे स्पष्टीकरणही दिले जाते.


  राज्यातील प्रादेशिक अनुशेष दूर करून समतोल विकास साधण्याची विशेष जबाबदारी संविधानातील अनुच्छेद ३७१ (२) अनुसार राज्यपालांवर आहे. त्यानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. पुढील दोन प्रकाशने या तरतुदीच्या अनुषंगाने विधिमंडळात मांडण्यात येतात.

- **विभागनिहाय व विकास मंडळनिहाय अनिवार्य विकास खर्च:** संबंधित वर्षाच्या विकास योजनेचे प्रादेशिक विकास मंडळनिहाय विभाजन व अविभाज्य हिस्सा यांची विभागवार व मुख्य शीर्षनिहाय माहिती या प्रकाशनाद्वारे देण्यात येते.

- **अनुपालन अहवाल:** संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) (ब) अनुसार राज्यपाल प्रादेशिक अनुशेष निर्मुलनासाठी करावयाच्या तरतुदींसंदर्भात शासनास निर्देश देत असतात. या निर्देशांवर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल अर्थसंकल्पीय प्रकाशनांसोबत सदस्यांना दिला जातो.

८

# अशी मिळते अर्थसंकल्पास मंजुरी



विधिमंडळात अर्थसंकल्प सादर होतो म्हणजे वित्त मंत्री अर्थसंकल्पाचे भाषण वाचून दाखवितात व त्यावर इतर सदस्य भाषण करतात अशीच अनेकांची सर्वसाधारण कल्पना असते. प्रत्यक्षात मात्र या प्रक्रियेत अर्थसंकल्प सादर करणे, तो मंजूर करणे, त्याचे कायद्यात रुपांतर होणे, शासनास राज्याच्या एकत्रित निधीतून खर्च करण्यास परवानगी मिळणे असे अनेक टप्पे असतात. तसेच ही प्रक्रिया प्रामुख्याने अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घडत असली तरी उर्वरित अधिवेशनांमध्येही पुरवणी मागण्या, अधिक खर्चाच्या मागण्या या माध्यमातून अर्थसंकल्प विषयक कामकाज होत असते.

ज्याप्रमाणे राज्यपालांच्या मान्यतेने अधिवेशनाची तारीख ठरवली जाते, त्याच प्रमाणे विधानसभेत अर्थसंकल्प सादर करण्याचा दिवसही राज्यपाल नेमून देतात. त्यादिवशी वित्त मंत्री विधानसभेत तर वित्त राज्यमंत्री विधानपरिषदेत एकाच वेळी अर्थसंकल्पीय भाषण वाचून दाखवितात. वार्षिक वित्तविषयक विवरणपत्र व इतर अर्थसंकल्पीय प्रकाशने सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात म्हणजे सभागृहात सादर केली जातात.

- **चर्चेचे टप्पे:**

  विधानसभेत अर्थसंकल्पावर दोन टप्प्यात चर्चा होते. एक - सर्वसाधारण चर्चा व दोन - अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा (म्हणजेच विभागवार चर्चा) व मतदान. विधानपरिषदेत चर्चा झाली तरी मतदान होत नाही.

अर्थसंकल्प सादर झाल्यापासून सात दिवसानंतर विधानसभेत जास्तीतजास्त सहा दिवस व विधानपरिषदेत जास्तीतजास्त पाच दिवस संपूर्ण अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने सर्वसाधारण चर्चा होणे अपेक्षित असते. ही सात दिवसांची मुदत सर्व सहमतीने शिथिल केली जाऊ शकते. वित्त मंत्री सर्वसाधारण चर्चेच्या अखेरीस उत्तर देतात व सर्वसाधारण चर्चा समाप्त होते.

साधारणपणे प्रत्येक विभागासाठी प्रस्तावित केलेल्या अनुदानासाठी (म्हणजेच प्रत्येक विभागाच्या अर्थसंकल्पासाठी) स्वतंत्र मागणी केली जाते. या मागण्या अर्थसंकल्पीय अंदाज या विभागवार पुस्तिकांच्या माध्यमातून सदस्यांना दिल्या जातात. या सर्व मागण्यांवर मतदान होते. चर्चा मात्र निवडक विभागांवर होते. विभागांचा प्राथम्यक्रम (Priority of Departments) म्हणजेच चर्चेसाठी कोणते विभाग घ्यायचे, याचा निर्णय विरोधी पक्ष नेत्याशी चर्चा करून अध्यक्ष घेतात. नियमाप्रमाणे अर्थसंकल्प सादर झाल्यापासून दहा दिवसानंतर जास्तीतजास्त अठरा दिवस अनुदानाच्या मागण्यांवर विभागवार चर्चा व मतदान होऊ शकते.

या विभागवार चर्चेदरम्यान सदस्य संबंधित विभागांच्या ध्येय धोरणांवर, कामकाजावर, अर्थसंकल्पावर विस्ताराने बोलू शकतात, प्रश्न उपस्थित करतात. या चर्चेला संबंधित विभागाचे मंत्री उत्तर देतात. चर्चा संपताच मागण्या मतास टाकल्या जातात.

विभागवार चर्चेसाठी ठरविण्यात आलेल्या दिवसांपैकी शेवटच्या दिवशी कामकाज संपण्यापूर्वी अर्धा तास अगोदर चर्चा थांबविण्यात येते. ज्या सर्व विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान झाले असेल ते वगळता इतर सर्व विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर मतदान घेऊन त्या संमत केल्या जातात. या प्रक्रियेला चर्चारोध लावणे किंवा Guillotine लावणे असे म्हणतात.

- **कपात सूचना:**

  विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर मतदान सदस्यांनी दिलेल्या कपात सूचनांच्या अनुषंगाने होते. साधारणपणे कपात सूचना हे आयुध विरोधी पक्षाच्या सदस्यांमार्फत वापरले जाते. विधानसभेला ज्यावर मत देण्याचा अधिकार नाही, अशा भारित खर्चासंदर्भात कपात सूचना देता येत नाही. केवळ दत्तमत स्वरूपाच्या खर्चासंदर्भात अनुदान कमी करण्याबद्दल, अनुदानातील एखादी बाब वगळण्याबद्दल कपात सूचना देता येते. मात्र एखाद्या बाबीवर अनुदान वाढविण्यासाठी किंवा अनुदानाचा उद्देश बदलण्यासाठी कपात सूचना देता येत नाही.

  संबंधित मागणी चर्चेला येण्यापूर्वी चार दिवस आधी कपात सूचना दाखल करावी लागते. ज्या मागणीवर सदस्यांनी कपात सूचना दिली आहे अशी मागणी मतदानाला आल्यावर सूचना मांडण्याची परवानगी अध्यक्ष देतात व त्यावर मतदान होते. कपात सूचना तीन प्रकारच्या असतात.

१) **एक रुपयाची कपात:**

हे अत्यंत गांभीर्यपूर्वक वापरावयाचे आयुध आहे. यास धोरणात्मक कपात किंवा Disapproval of Policy Cut असेही म्हणतात. शासनाने सादर केलेल्या अनुदानाच्या मागणीशी संबंधित धोरणाविषयी प्रश्न या कपात सुचनेद्वारा उपस्थित केला जातो. या कपात सूचनेस अविश्वास ठरावाचा दर्जा असतो. शासनावर अविश्वास व्यक्त करावयाचा असेल तेव्हा अशी सूचना दिली जाते. या कपात सूचनेवर मतदान होऊन ती मंजूर झाली तर शासनास राजीनामा द्यावा लागतो.

२) **लाक्षणिक कपात (Token Cut):**

संबंधित विभागाच्या सर्वसाधारण धोरणावर, शासनाच्या सर्वसाधारण कारभारावर चर्चा उपस्थित करण्यासाठी ही १०० रुपयांची कपात सूचना दिली जाते. ही कपात सूचना सभागृहात मंजूर झाल्यास त्याचा अर्थ सभागृहाने शासनाच्या धोरणावर असमाधान व्यक्त केले असा होतो.

### ३) **विशिष्ट रकमेची कपात (Economy Cut):**

संबंधित अनुदानाच्या मागणीतील विशिष्ट बाबीशी संबंधित विशिष्ट रकमेवर कपात सुचवायची असल्यास अशी सूचना दिली जाते. अशी सूचना देताना ही कपात कशी करता येईल, हे सदस्यास दाखवून द्यावे लागते. अशी सूचना मंजूर झाल्यास कमी केलेल्या रकमेच्या अनुदानाच्या मागणीवरच मतदान होते.

महाराष्ट्र विधानसभेत एक रुपयाची कपात सूचना घ्यायची नाही, असा पायंडा आहे. उर्वरित कपात सूचनांना संबंधित विभागाने लेखी उत्तर देण्याची प्रथा आहे.

- **विनियोजन विधेयक:**

विभागवार अनुदानाच्या मागण्या मतदान होऊन मंजूर झाल्यानंतर वित्त मंत्री विधानसभेत विनियोजन विधेयक मांडतात. या विधेयकात मंजूर झालेल्या सर्व मागण्या व ज्यावर मतदान होत नाही अशा भारित मागण्या अशा सर्व बाबींचे संपूर्ण विवरण असते. याशिवाय महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चाचे अंदाज व ऋण विभागांतर्गत खर्चाचे अंदाज स्वतंत्रपणे नमूद केलेले असतात. विनियोजन विधेयकातील रक्कम, वार्षिक वित्तविषयक विवरणपत्रातील रकमेपेक्षा अधिक असू शकत नाही.

विधानसभेने हे विधेयक मंजूर केल्यानंतर ते विधानपरिषदेकडे शिफारशीसाठी जाते. वित्त विधेयक असल्यामुळे विधानपरिषदेला त्यावर मतदान करण्याचा अधिकार नसतो. विधानपरिषद ते नाकारू शकत नाही, मात्र सुधारणा सुचवू शकते. विधानपरिषदेने सुधारणा सुचविल्यास त्या विधानसभेत मांडल्या जातात. त्या स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे अधिकार विधानसभेला असतात. अशाप्रकारे विधानसभेने अंतिमत: मंजूर केलेले विधेयक राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविले जाते. राज्यपालांनी त्यास संमती दिल्यानंतर या विधेयकाचे कायद्यात (अधिनियमात) रुपांतर होऊन शासनास राज्याच्या एकत्रित निधीतून खर्च करण्याची परवानगी मिळते.

- **लेखानुदानः**

आर्थिक वर्ष ३१ मार्च रोजी संपते. तोपर्यंत विनियोजन विधेयकाची प्रक्रिया पूर्ण न झाल्यास शासनास १ एप्रिलपासून खर्च करण्यासाठी एकत्रित निधीतून पैसे खर्च करण्याची परवानगी रहात नाही. अशावेळी संपूर्ण अर्थसंकल्पास मंजुरी मिळेपर्यंतच्या कालावधीत जो खर्च करावा लागणार आहे त्यासाठी शासनास आगाऊ अनुदान दिले जाते. या प्रक्रियेस लेखानुदान असे म्हणतात. यामध्ये अर्थसंकल्प मंजूर होईपर्यंत आवश्यक खर्चाचा तपशील वित्त मंत्री सभागृहासमोर मांडतात. त्यावर सर्वसाधारण चर्चा होऊन त्यास मंजुरी दिली जाते. लेखानुदानाद्वारे केवळ चालू कामे व सध्या मंजूर असलेल्या आस्थापनेवरील खर्च यालाच मान्यता घेतली जाते. नवीन बाबींवरील खर्चास मंजुरी मिळविण्यासाठी विनियोजन विधेयक मंजूर होईपर्यंत शासनास थांबावे लागते.

- **पुरवणी मागण्याः**

सर्वसाधारणपणे अर्थसंकल्प विषयक कामकाज अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पार पडते. मात्र संबंधित आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर वर्षभराच्या कालावधीत अनेकदा एखाद्या बाबीसाठी करण्यात आलेली तरतूद अपुरी असल्याचे आढळून येते तर काही वेळा आधी कल्पना केलेली नव्हती, असा खर्च उद्भवतो. तर काही वेळा आकस्मिकता निधीतून केलेल्या अकल्पित व तातडीच्या खर्चाची भरपाई पुन्हा आकस्मिकता निधीत करावयाची असते. अशा सर्व प्रयोजनांसाठी पुरवणी मागण्या विधिमंडळात खर्चाचे पूरक विवरणपत्र या प्रकाशनाद्वारे सादर केल्या जातात. चालू आर्थिक वर्षात पावसाळी, हिवाळी व (पुढील अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी) अर्थसंकल्पीय अधिवेशनात अशा तीन वेळा पुरवणी मागण्या मांडल्या जातात.

मूळ मागण्या मांडल्या जातात, तेव्हा विभागावर धोरणात्मक चर्चा करता येते, त्यामुळे सर्व विषय मांडता येतात. पुरवणी मागण्यांमध्ये केवळ खर्चाच्या बाबीपुरते मर्यादित बोलावे लागते.

- **पुनर्विनियोजन:**

  अर्थसंकल्प मंजूर होण्यासाठी लागू होणारी संपूर्ण प्रक्रिया पुरवणी मागण्यांच्या मंजुरीसाठीही लागू होते. राज्यपालांनी नेमून दिलेल्या दिवशी पुरवणी मागण्या सादर करण्यापासून कपात सूचना, चर्चेसाठी विभागांचा प्राथम्यक्रम, चर्चारोध, मतदान अशी सर्व प्रक्रिया पार पाडली जाते. पुरवणी विनियोजन विधेयक म्हणजेच पुनर्विनियोजन विधेयक मांडले जाते. विनियोजन विधेयकाची वर नमूद केलेली सर्व प्रक्रिया पुनर्विनियोजन विधेयकासाठीही पार पडते. त्यानंतर त्याचे अधिनियमात रुपांतर होते.

- **लाक्षणिक मागण्या:**

  अनेकदा असेही होते की, विनियोजन विधेयकाद्वारे मंजुरी घेतलेल्या एखाद्या मागणीतील रक्कम शिल्लक राहते, ही रक्कम त्याच मागणी अंतर्गत नवीन कामासाठी वापरणे शक्य असते किंवा ज्यासाठी मंजुरी घेतलेली होती, त्या कामाच्या स्वरुपात काही बदल करणे आवश्यक असते. अशा वेळी निधी उपलब्ध असलेले नवीन काम किंवा बदललेले काम विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक असते. यासाठी लाक्षणिक मागणी केली जाते. अशा मागण्यांचा समावेशही खर्चाचे पूरक विवरणपत्र या प्रकाशनामध्येच केलेला असतो. पुनर्विनियोजन झाल्यानंतर शासनास सदर रक्कम नवीन काम किंवा बदललेल्या कामासाठी वापरता येते.

- **अधिक खर्चाच्या मागण्या:**

  पुरवणी मागण्या किंवा लाक्षणिक मागण्या या नेहमी चालू आर्थिक वर्षाशी संबंधित असतात. काही वेळा मंजूर विनियोजनापेक्षा अधिक खर्च होऊन गेल्याची बाब आर्थिक वर्ष संपल्यानंतर निदर्शनास येते. असा खर्च नियमात बसविण्यासाठी अधिक खर्चाच्या मागण्या सादर केल्या जातात.

वर्षभरातील सर्व खर्चाची लेखापरीक्षा महालेखापाल करीत असतात. त्यांनी तयार केलेला लेखापरीक्षा अहवाल विधिमंडळास सादर केला जातो. त्यामधील मंजुरीपेक्षा अधिक खर्च झाल्याच्या बाबी विधिमंडळाच्या लोकलेखा समितीकडून तपासण्यात येतात. सदर अधिक खर्च कोणत्या परिस्थितीत झाला यावर प्रशासनाने दिलेल्या स्पष्टीकरणाने समितीचे समाधान झाल्यास असा खर्च नियमानुकूल करण्याची शिफारस समिती करते. अनेकदा या तपासणीच्या निमित्ताने समिती प्रशासनावर ताशेरे ओढते. अर्थसंकल्पीय प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व उत्तरदायित्त्व यावे यासाठी सुद्धा शिफारशी करते.

समितीच्या अहवालानुसार अधिक खर्चाच्या मागण्या राज्यपालांनी नेमून दिलेल्या दिवशी विधानसभेत सादर होतात. लोकलेखा समितीने मागणीची छाननी केलेली असल्यामुळे सहसा विधानसभेत त्यावर विशेष चर्चा होत नाही. अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्या मंजूर करण्याकरिता जी प्रक्रिया अवलंबिली जाते तीच प्रक्रिया अधिक खर्चाच्या मागण्या मंजूर करण्याकरिता अवलंबिली जाते.

अर्थसंकल्प मंजूर करण्याच्या प्रक्रियेतील विधिमंडळाचे महत्त्व वाचकांच्या लक्षात आलेले असेलच. राज्याची तिजोरी जरी शासनाकडे असली तरी ती उघडण्याची चावी मात्र विधिमंडळाकडे असते. विधिमंडळाने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला शासन उत्तरदायी असते. हेच खरे या सार्वभौम सभागृहाचे बळ आहे आणि आपल्या लोकशाहीची सुंदरता आहे.

**तक्ता 2**

## अर्थसंकल्प मंजुरी प्रक्रिया

**अर्थसंकल्प सादरीकरण**

- वित्त मंत्र्यांचे विधानसभेत व वित्त राज्यमंत्र्यांचे विधानपरिषदेत अर्थसंकल्पीय भाषण
- संबंधित अर्थसंकल्पीय कागदपत्र / प्रकाशने सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात

**चर्चा व मतदान**

- विधानसभा व विधानपरिषदेत अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा व वित्त मंत्र्यांचे उत्तर
- दोन्ही सभागृहात प्रथाम्यक्रमानुसार अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा
- विधानसभेत अनुदानाच्या मागण्यांवर कपात सूचनांच्या माध्यमातून मतदान
- चर्चारोध - उर्वरित सर्व अनुदानाच्या मागण्यांवर मतदान
- अर्थसंकल्पास मंजुरी

**लेखानुदान**

- आर्थिक वर्ष संपेपर्यंत विनियोजन विधेयकाची प्रक्रिया पूर्ण होणार नसल्यास शासनास १ एप्रिलपासून खर्च करण्यासाठी एकत्रित निधीतून पैसे खर्च करण्यासाठी आगाऊ अनुदान

**विनियोजन विधेयक व अधिनियम**

- वित्त मंत्र्यांकडून विधानसभेत विनियोजन विधेयक सादर
- विधानसभेने मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेकडे शिफारशीसाठी
- विधानपरिषदेने सुचविलेल्या सुधारणा विधानसभेत सादर
- विधानसभेने अंतिमत: मंजूर केलेले विधेयक राज्यपालांच्या मान्यतेसाठी
- राज्यपालांनी संमती दिल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रुपांतर
- शासनास राज्याच्या एकत्रित निधीतून खर्च करण्याची परवानगी

९

## अर्थसंकल्प कसा वाचावा आणि समजून घ्यावा



संविधानात अर्थसंकल्पाबाबत काय नीती नियम घालून दिलेले आहेत, अर्थसंकल्प कसा तयार होतो, तो कसा मंजूर होतो, कोणत्या प्रकाशनात काय माहिती मिळते हे सर्व समजून घेतल्यानंतर आता या सर्व माहिती आधारे अर्थसंकल्प समजून कसा घ्यायचा? असा प्रश्न वाचकांसमोर नक्कीच निर्माण झाला असेल. साधारणपणे अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्प शिलकीचा आहे की तुटीचा, वित्त मंत्र्यांनी कोणत्या नवीन घोषणा केल्या, कराचा बोजा वाढला की कमी झाला, काय महागणार आणि काय स्वस्त होणार या विषयीच्या चर्चा माध्यमांमध्ये होतात. सर्वसामान्यांसाठी हेच महत्त्वाचे मुद्दे असतात. या प्रकरणात आपण पाहू की, राज्याची आर्थिक स्थिती कशी समजून घ्यावी. राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा तसेच वित्त आयोगाने राज्याची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी काही मापदंड (indicators) दिलेले आहेत.

मुळात हे समजून घेऊ की जी तत्त्वे एखाद्या व्यक्तीच्या खाजगी आर्थिक नियोजनास लागू होतात, तीच तत्त्वे राज्याच्या आर्थिक नियोजनासही लागू होतात. कर्जाचे उदाहरण घेऊ. बँका व्यक्तिगत कर्ज देताना व्यक्तीचे उत्पन्न पाहतात, जास्त उत्पन्न असलेल्या व्यक्तीची कर्ज फेडण्याची क्षमता अधिक म्हणून त्या व्यक्तीस अधिक कर्ज मिळू शकते आणि त्यातून ती व्यक्ती स्वत:चा अधिक विकास घडवून आणू शकते. तसेच राज्याचे आहे. राज्याच्या सकल उत्पन्नातील वाढीच्या प्रमाणात, राज्याने अधिक कर्ज उभारण्यात काहीही गैर नाही. राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार राज्याच्या सकल

उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत शासन कर्ज उभारू शकते. त्यामुळे राज्यावर अमूक एवढ्या कर्जाचा बोजा आहे असे जेव्हा आपण वाचतो तेव्हा तो राज्याच्या उत्पन्नाच्या तुलनेत किती आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. या सोबतच आणखी एक मुद्दा समजून घेतला पाहिजे. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीने कर्ज घेतले परंतू त्यातून मालमत्ता विकत न घेता किंवा उद्योग सुरु न करता तो त्या रकमेतून दैनंदिन खर्च करू लागला तर ते जसे वाईट तसेच राज्याच्या कर्जाचे आहे. शासनाने उभे केलेले कर्ज भांडवली विकास खर्चासाठी वापरले गेले पाहिजे. जर ते महसुली खर्च भागविण्यासाठी वापरले जात असेल तर तो कर्जाचा अनुत्पादक उपयोग किंवा दुरुपयोग समजला पाहिजे.

राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार राज्य शासनाने महसुली अधिक्य कायम ठेवणे अपेक्षित असून, राजकोषीय तूट सकल उत्पन्नाच्या तुलनेत ३ टक्के व कर्ज २५ टक्के मर्यादेत ठेवणेही अपेक्षित आहे. एकूण खर्चापैकी विकास खर्च व विकासेतर खर्चाचे प्रमाण, महसुली जमेच्या तुलनेत वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यावरील खर्चाचे प्रमाण असे निदर्शकही राज्याची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी उपयोगी ठरतात.


विविध विभाग वा क्षेत्रांसाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी व मागील वर्षांचे कल पाहून शासनाच्या प्राथमिकता समजू शकतात. जेव्हा एखाद्या क्षेत्रासाठीच्या तरतुदी समजून घ्यायच्या असतील, तेव्हा अर्थसंकल्पातील तरतुदींना इतर सांख्यिकीय माहिती, शासनाचे निर्णय, व इतर माहिती यांचीही जोड द्यावी लागते. उदाहरणार्थ अनुसूचित जमातीतील मुलींच्या उच्च शिक्षणासाठी शासनाची एखादी योजना असल्यास त्या योजनेसाठी केलेली तरतूद पुरेशी आहे किंवा नाही हे समजून घेण्यासाठी शासनाची योजना काय आहे, प्रत्येक मुलीला किती रकमेचा लाभ मिळणे अपेक्षित आहे, अनुसूचित जमातीच्या किती मुली शालेय शिक्षण पूर्ण करतात, त्यातील किती मुली सध्या उच्च शिक्षण घेतात आदी सर्व माहिती घ्यावी लागेल. केवळ अर्थसंकल्पातील रकमांचे त्याशिवाय विश्लेषण करता येणार नाही.

तसेच एखाद्या क्षेत्रासाठीच्या तरतुदी केवळ संबंधित विभागासाठी केलेल्या तरतुदीवरून समजू शकत नाहीत. उदाहरणार्थ शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्याला शालेय शिक्षणावर शासन किती खर्च करते, हे केवळ त्या विभागाचा अर्थसंकल्प पाहून समजणार नाही. तर त्यासाठी शालेय शिक्षणाशी संबंधित सर्व मुख्य शीर्षांवर शालेय शिक्षण व इतरही विभागांतर्गत किती खर्च होतो आहे, हे पहावे लागेल.

ज्याप्रमाणे आगामी वर्षाच्या तरतुदी पाहणे महत्त्वाचे असते, त्याच प्रमाणे यापूर्वीच्या अर्थसंकल्पात शासनाने केलेल्या घोषणांचे काय झाले हे पाहणे सुद्धा महत्त्वाचे ठरते. खर्चाचे सुधारित अंदाज पाहून ते आपल्याला समजते. योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची माहिती आपल्याकडे असेल तर त्या माहितीची जोड देऊन सुधारित अंदाजाच्या आकड्यांचे प्रभावी विश्लेषण करता येऊ शकते.

पुरवणी मागण्यांचे विश्लेषण शासनाच्या आर्थिक शिस्तीवर प्रकाश टाकते. सहज कल्पना करता येईल अशा खर्चासाठी पुरवणी मागणी करण्यात आल्यास त्यातून आर्थिक बेशिस्त लक्षात येते. याशिवाय रोख शिल्लक रकमेचे व्यवस्थापन, कर्ज व्यवस्थापन यावरूनही आर्थिक शिस्त लक्षात येते.

अर्थसंकल्प कसा समजून घ्यायचा याची ही काही उदाहरणे झाली. विश्लेषणाच्या उद्देशाप्रमाणे अधिक खोलात जाता येते.


BUDGET IN BRIEF
2019-2020
संक्षिप्त अर्थसंकल्प
२०१९-२०
वित्तविषयक विवरणपत्र
FINANCIAL STATEMENT
(अर्थसंकल्प)
(BUDGET)
OF THE
GOVERNMENT OF MAHARASHTRA
FOR THE YEAR
२०१९-२०२०
2019-2020
CIVIL BUDGET ESTIMATES
अर्थसंकल्पीय अंदाज
२०१९-२०२० / 2019-2020
PART II—DETAILED BUDGET ESTIMATES OF EXPENDITURE
O-PLANNING DEPARTMENT
ओ–नियोजन विभाग
DISTRICT PLAN—YAVATMAL
जिल्हा योजना — यवतमाळ
CIVIL BUDGET ESTIMATES
अर्थसंकल्पीय अंदाज
2019-2020
२०१९-२०२०
PART III—APPENDICES
भाग तीन — परिशिष्टे
CIVIL BUDGET ESTIMATES
अर्थसंकल्पीय अंदाज
2019-2020
२०१९-२०२०
PART II—DETAILED BUDGET ESTIMATES OF EXPENDITURE
L-WATER RESOURCES DEPARTMENT
CIVIL BUDGET ESTIMATES
अर्थसंकल्पीय अंदाज
2019-2020
२०१९-२०२०
G-FINANCE DEPARTMENT
जी–वित्त विभाग
CIVIL BUDGET ESTIMATES
अर्थसंकल्पीय अंदाज
2019-2020
२०१९-२०२०
K-INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT
CIVIL BUDGET ESTIMATES
अर्थसंकल्पीय अंदाज
2019-2020
२०१९-२०२०
O-PLANNING DEPARTMENT
ओ–नियोजन विभाग

# देवेंद्र गंगाधरराव फडणवीस

महाराष्ट्राचे लोकप्रिय माजी मुख्यमंत्री
सध्या विधानसभा विरोधी पक्षनेता
सलग पाच वेळा विधानसभेवर निवडून
नागपूरमधून नगरसेवक म्हणून
राजकीय कारकीर्दीस सुरुवात
महाराष्ट्रातील पहिले मेयर इन कौन्सिल
विधिमंडळाच्या विविध समित्यांवर प्रतिनिधीत्व
कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनचा
सर्वोत्कृष्ट संसदपटूचा मान
ग्लोबल पार्लमेंट या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर
प्रतिनिधित्व करणारे पहिले भारतीय लोकप्रतिनिधी
नीती आयोगाच्या शेतीविषयक
उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष
भाजयुमोचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष
महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे माजी अध्यक्ष
कायदा आणि व्यवस्थापन विषयांचे विद्यार्थी
जर्मनीमधून प्रोजेक्ट मॅनेजमेंटचे शिक्षण
कठिण विषय सोपा करून सांगणारा ओजस्वी वक्ता
केंद्रीय व राज्य अर्थसंकल्पाचे अभ्यासक, व्याख्याते



इ-बुक साठी स्कॅन करा

/Devendra.Fadnavis /Dev_Fadnavis /DevendraFadanvis email: info@devendrafadnavis.in



“ अध्यक्ष महोदय, वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीबाबतदेखील अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते व्यक्त केली. त्यांची भूमिका येथे मांडण्याचा प्रयत्न केला. एक गोष्ट खरी आहे, विकास दर साडेसात टक्के असताना वन ट्रिलियन डॉलरचे स्वप्न का दाखविता, असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. गेली १० वर्षे माननीय श्री. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान असताना त्यांनी जगामध्ये आपली अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणलेली आहे. आता ती तिसऱ्या क्रमांकावर आणण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. तिसऱ्या क्रमांकावर येताना ती ५ ट्रिलियन डॉलरवर आणण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्यावेळेस तुमचे माझे राज्य आर्थिक बाबतीत इतर राज्यांच्या दृष्टीने सक्षम असल्यामुळे आपण वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दिष्ट घेतलेले आहे. सन २०२५-२०२६ पर्यंत ही अर्थव्यवस्था तेथपर्यंत नेण्याचा आपला प्रयत्न आहे. महाराष्ट्राचीच भूमिका यामध्ये महत्त्वाची राहणार आहे. याकरिता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सन २०२८ पर्यंत वन ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत आणखी जास्त ट्रिलियन डॉलर करण्याचे आमचे ध्येय आहे. ”

सन २०२४-२०२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा

दिनांक ५ जुलै, २०२४

—श्री. अजित पवार उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री

**श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री) :** अध्यक्ष महोदय, काही दिवसांपूर्वी मी सन २०२४- २५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. तो विधिमंडळाने आणि राज्यातील तमाम जनतेने पाहिला असेल. राज्याच्या दृष्टीने ऐतिहासिक अर्थसंकल्प सादर करण्याचे भाग्य मला लाभले, याचा मला सार्थ अभिमान आहे.

अध्यक्ष महोदय, मी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर दिनांक २, ३ आणि ४ जुलै अशी एकूण ३ दिवस सर्वसाधारण चर्चा झाली. मी मुद्दाम गेल्या १५ वर्षांचे रेकॉर्ड काढून पाहिले असता दिसून आले की, गेल्या १५ वर्षांमध्ये जेवढे अर्थसंकल्प सादर झाले त्यावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये कधीही दोन्ही बाजूंच्या ७० सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला नाही. आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात असे घडलेले आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये ७० सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला. मागील रेकॉर्ड पाहिले असता दिसून येते की, ५५, ४१, ४३ एवढ्या सदस्यांनी भाग घेतलेला आहे. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला. बहुतेक सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावर चांगली प्रतिक्रिया व्यक्त केली. अर्थात, विरोध करणे हे विरोधकांचे कामच आहे. तरीदेखील त्यांनीही काही चांगल्या गोष्टींचा उल्लेख चांगल्या पद्धतीने केला. त्यांना ज्या त्रुटी जाणवल्या त्याही त्यांनी मांडल्या. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेची सुरुवात माननीय विरोधी पक्षनेते श्री. विजय वडेट्टीवार यांनी केली. मी असेही म्हणू शकतो की, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विजय वडेट्टीवार आणि इतर ६९ सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला. परंतु तसे न करता इतर सर्व सन्माननीय सदस्यांची नावे रेकॉर्डवर आणणे मला योग्य वाटते.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विजय वडेट्टीवार, सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे, श्री. जयंत पाटील, श्रीमती ऋतुजा लटके, श्री. रवि राणा, श्री. रोहित पवार, श्री. प्रताप अडसड, श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. योगेशदादा कदम, श्री. सुनील प्रभू, श्री. शेखर निकम, सौ. मंजुळा गावित, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्रीमती गीता जैन, डॉ. किरण लहामटे, श्री. अमिन पटेल, श्री. सिद्धार्थ शिरोळे, श्री. अबु आजमी, श्री. बाळासाहेब आजबे, श्री. विक्रमसिंह सावंत, श्री. कैलास पाटील (घाडगे), श्री. अशोक पवार, डॉ. विश्वजीत कदम, श्री. भीमराव (अण्णा) तापकीर, डॉ. नितीन राऊत, डॉ.भारती लव्हेकर, श्री. अनिल देशमुख, श्री. किशोर जोरगेवार, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. महेश (दादा) लांडगे, श्री. दिलीपराव बनकर, श्री. राजेश एकडे, श्री. रमेश कोरगावकर, श्री.रत्नाकर गुट्टे, श्रीमती मनीषा चौधरी, श्री. हिरामण खोसकर, श्री. रईस शेख, श्री. विश्वनाथ भोईर, श्री. संदीप क्षीरसागर, श्री. सचिन कल्याणशेट्टी, श्रीमती सुलभा खोडके, श्री. सुनील भुसारा, श्री. यशवंत माने, श्री. कृष्णा गजबे, श्री. दीपक चव्हाण, डॉ. देवराव होळी, श्री. अतुल बेनके, श्रीमती श्वेता महाले, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजभैया नवघरे, ॲड. आशीष जयस्वाल, श्री. चेतन तुपे, श्री. सुभाष धोटे, श्री. अतुल भातखळकर, श्री. सुनल शेळके, श्री. उदयसिंग राजपूत, डॉ. विनय कोरे, श्री. अमित झनक, श्री.हरिभाऊ बागडे, श्रीमती सरोज अहिरे, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. रमेश बोरनारे, श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती मेघना साकोरे - बोर्डीकर, श्री. बाळासाहेब पाटील, श्री. राजेश पाटील, श्री. राजेश पवार, श्रीमती मोनिका राजळे, सौ. सीमा हिरे, ॲड. आकाश फुंडकर आणि श्री. सुरेश भोळे अशा एकूण ७० सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सहभाग घेतला.

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

अध्यक्ष महोदय, काल उशिरापर्यंत सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरू होती. आपण निर्देश दिले होते की, कालच अर्थसंकल्पावरील चर्चा संपवून आज माझे उत्तर होईल. त्यानुसार उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी भाषणाच्या सुरुवातीलाच एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो. माननीय विरोधी पक्षनेते श्री. विजय वडेट्टीवार आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी अर्थसंकल्प फुटल्याबाबतचे वक्तव्य केले. दोन्ही सन्माननीय सदस्य अतिशय ज्येष्ठ आहेत. अर्थसंकल्पापूर्वी वर्तमानपत्रांमध्ये नेहमीच वेगवेगळ्या बातम्या येत असतात. अर्थसंकल्पातील तरतुदी वर्तमानपत्रांमध्ये छापून आल्याबद्दल त्यांनी आक्षेप घेतला. मला आश्चर्य वाटते की, दोन्ही सन्माननीय सदस्य एवढे ज्येष्ठ असताना आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी तर नऊ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडलेला असताना... अर्थसंकल्पातून नागरिकांच्या काही अपेक्षा असतात आणि त्यांचा कानोसा घेऊन माध्यमांमध्ये चर्चा होत असते. त्याच अनुषंगाने वेगवेगळ्या बातम्या छापून येत असतात. ते लोकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब असते. अर्थात, यात माध्यमांचाही काही दोष नाही. उलट ते आपले काम चोखपणे करण्याचा प्रयत्न करीत असतात.

त्यामुळे अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी काही बातम्या वर्तमानपत्रामध्ये किंवा Electronic Media मध्ये आल्या तर अर्थसंकल्प फुटला असे म्हणता येणार नाही. सन्माननीय सदस्य तसे म्हणत असतील तर ते जनतेवर किंवा माध्यमांवर अन्याय करण्यासारखे आहे. अर्थमंत्री म्हणून मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, अर्थसंकल्प कुठेही फुटलेला नाही. अर्थसंकल्पाची गोपनीयता पूर्णपणे राखली गेली आहे, हे मी सुरुवातीलाच निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, एकंदरीतच या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी भाग घेत असताना आपापल्या मतांप्रमाणे काही मते या ठिकाणी व्यक्त केली आहेत. मी त्या सर्व मतांचा आदर करतो. ज्या चांगल्या सूचना असतील त्यांचे मी स्वागत करतो. सरकारही त्यांचे स्वागत करीन. तसेच या अर्थसंकल्पातून सुचविलेल्या योजना नीटपणे राबविण्याकरिता ज्यांचा उपयोग होईल त्या सूचनांचा मी आदर करीन आणि त्यांचेही स्वागत मी या निमित्ताने करतो.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी या अर्थसंकल्पाचे कौतुक केल्याचे मी सुरुवातीलाच सांगितले. विरोधी बाकावरील काही सन्माननीय सदस्यांनी टीका केली. मी दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. आपण केलेल्या सूचनांची मी आणि वित्त विभागाने नोंद घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सुमारे ७० सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार मांडले आणि त्या सर्वांचे विचार ऐकण्याचा मी प्रयत्न केला. सर्वात जास्त ज्येष्ठ मान्यवरांनी मांडलेले विचार मी जास्तीत जास्त ऐकून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार काही दुरुस्त्या करायच्या असतील तर त्याबद्दलही मी माझ्या विभागाला सूचना दिल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, अलीकडे सर्वसाधारणपणे फेब्रुवारी महिन्यात देशाचा अर्थसंकल्प नेहमी मांडला जातो. अर्थसंकल्प मांडण्याची बहुतेक वेळा २८ तारीख असायची. आता ती १ फेब्रुवारी केली आहे. केंद्र शासनाने त्यांचा अर्थसंकल्प मांडला की, त्यानंतर आपण राज्याचा अर्थसंकल्प मांडतो आणि हे वर्षानुवर्षे घडत आले

आहे. यावेळी लोकसभेच्या निवडणुकीमुळे फेब्रुवारी महिन्यातच केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर झाला. त्यानंतर आता अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला आहे.

अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प सादर करीत असताना सरकारने जाणीवपूर्वक राज्याचा सर्वांगीण विकास व्हावा, समाजातील प्रत्येक घटकाला त्या विकासाच्या प्रवाहामध्ये संधी मिळावी, मग त्यामध्ये शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा, युवती सर्वसामान्य जनतेच्या अडचणी दूर व्हाव्यात, ही आपल्या सर्वांचीच अपेक्षा आणि इच्छा असते. राज्यातील प्रत्येक घटकाच्या अर्थसंकल्पातून काही अपेक्षा असतात, त्यातील जास्तीत जास्त अपेक्षा पूर्ण करण्याचा आणि प्रत्येक समाजघटकाला न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून या महायुतीच्या सरकारने केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाते. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवीत असताना आपले राज्य आर्थिक आघाडीवरदेखील सुस्थितीत राहावे, आर्थिक शिस्त पाळली जावी, असाही सरकारचा प्रयत्न आहे. या सर्व बाबी नजरेसमोर ठेवून आम्ही हा अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये वारकरी, महिला, शेतकरी, दुर्बळ घटक, युवा पिढी या सर्वांचा हा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना बळ देणारा हा अर्थसंकल्प आहे. महिलांना सशक्त करणारा हा अर्थसंकल्प आहे, ही बाब आपण सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेतलेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ७० सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देऊ शकणार नाही. परंतु जे महत्त्वाचे प्रश्न आहेत आणि बहुतेकांनी ज्यांचा उल्लेख केला आहे त्यासंबंधी मी उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या अर्थस्थितीबाबत माननीय विरोधी पक्षनेते किंवा समोरच्या बाकावरील काही सन्माननीय सदस्यांनी केवळ महसूल आणि राजकोषीय तूट, कर्जाचा बोजा आणि एकूणच राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत चर्चा केली व काही प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत, तसे त्यांनी करणे साहजिकच आहे. त्या संदर्भात मला या सभागृहाला सांगायचे आहे की, आजपर्यंत या सभागृहामध्ये एक रेकॉर्ड सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे होते. ते म्हणजे नऊ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडण्याचे आहे.

**श्री. जयंत पाटील (खाली बसून) :** मी सलग नऊ वेळा अर्थसंकल्प मांडला.

**श्री. अजित पवार :** होय. आपण सलग मांडला. ते तर रेकॉर्ड आहेच. जसे स्व. वसंतराव नाईक यांचे सलग ११ वर्षे होते. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे मी अभिनंदन करतो.

**श्री. जयंत पाटील (खाली बसून) :** आज काही तरी वेगळा मूड दिसतो.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, मोठी जबाबदारी वाढल्यावर मूड बदलावा लागतो. कारण दुसऱ्याच्या हाताखाली काम करताना सर्व ढकलता येते की, हे त्यांनी केले... मी कुठे काय केले ?...

अध्यक्ष महोदय, परंतु मला पहिल्यांदा नाही, दुसऱ्यांदा नाही, तिसऱ्यांदा नाही, चौथ्यांदा नाही, पाचव्यांदा नाही, सहाव्यांदा नाही, सातव्यांदा नाही, आठव्यांदा नाही, नव्यांदा नाही तर दहाव्यांदा अर्थसंकल्प मांडण्याची संधी मिळाली आहे. इतरांच्या एवढा नसेल, पण आम्हाला काही तरी थोडाबहूत अनुभव आहे. त्यामुळे मी

महाविकास आघाडीमध्ये होतो तरीदेखील मला अर्थसंकल्प मांडण्याची संधी द्यायचे. महायुतीमध्ये आलो तरी अर्थसंकल्प मांडण्याची संधी मला मिळाली, ही वस्तुस्थिती आहे. पण महाविकास आघाडी सरकारकडून अर्थसंकल्प मांडला की त्यावेळेस महायुती विरोध करायची आणि आता महायुतीकडून अर्थसंकल्प मांडला तर महाविकास आघाडी विरोध करते. परंतु हरकत नाही. तो मनुष्य स्वभाव आहे.

त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. पण एकंदरीत मी सुरुवातीलच तुटीबद्दल सांगितले आहे. Print Media, Electronic Media यांनीदेखील याबद्दल चर्चा केली, वृत्तपत्रांमधूनही वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या आहेत. राज्याच्या विकासासाठी अशी चर्चा नेहमीच पोषक असते. त्यामुळे मी त्या सर्व चर्चेचे स्वागत करतो. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे थोडे फार समाधान करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, महसुली जमा ही मागील वर्षाच्या तुलनेत १३ हजार कोटींनी जास्त आहे आणि ती ज्या दराने वाढणे अपेक्षित आहे त्या दराने वाढते, अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित केला होता. खरे म्हणजे २०१९-२० मध्ये २ लाख ८३ हजार १९० कोटी महसुली जमा होती. सन २०२१-२२ मध्ये ती २ लाख ७९ हजार ४६८ इतकी होती. तेव्हा कोरोनाचा काळ असल्यामुळे ती कमी झाली. सर्व जगाने तो काळ अनुभवला होता. परंतु त्यानंतर सातत्याने महसुली जमा वाढतच गेली, असे मला माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगायचे आहे. सन २०२१-२२ मध्ये ३ लाख ३३ हजार ३१२ कोटी इतकी झाली. २०२२-२३ मध्ये ती ४ लाख ५ हजार ६७८ कोटी रुपये झाली. २०२३-२४ मध्ये ती अर्थसंकल्पाच्या अंदाजानुसार ४ लाख ४९ हजार ५२३ कोटी रुपये इतकी होती. परंतु त्याचे अद्यापि आकडे समोर येणे शिल्लक आहेत. म्हणून त्याची निश्चित आकडेवारी मला आता सांगता येणार नाही. ती आकडेवारी आल्यानंतर मी सभागृहाला अवगत करीन. सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये अर्थसंकल्पाची अंदाजित महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६२ कोटी रुपये इतकी आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही रक्कम ११.१० टक्के इतकी वाढली आहे आणि यामध्ये नेहमी तशाच पद्धतीची वाढ झालेली आहे. एकदा फक्त कोरोनाच्या काळात ४.८५ टक्के महसुली जमा कमी झाली होती. त्यानंतर २०२१-२२ मध्ये एकदम २३.६९ टक्के वाढ झाली. कारण कोरोना गेला होता आणि त्यानंतर अर्थव्यवस्थेला एक वेगळ्या प्रकारची कलाटणी मिळाली होती.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पातील आकडेवारीची तुलना करता मागील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाची देखील तुलना केली पाहिजे. त्यामुळे सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार महसुली जमा ही मागील वर्षापेक्षा ४९,९३९ कोटींनी जास्त आहे आणि टक्केवारीच्या बाबतीत ११.१० टक्क्यांनी जास्त आहे हे देखील मी सांगितले आहे. मी या सभागृहाला असेही सांगू इच्छितो की, केंद्र शासनाच्या महसुली करामध्येही वाढ होत आहे. त्यामुळे केंद्राकडून राज्याला मिळणाऱ्या कराच्या हिश्श्यातही देखील मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. आता १५ व्या वित्त आयोगाची मुदतदेखील पुढच्या वर्षी संपणार आहे. १६ व्या वित्त आयोगाच्या निमित्ताने सर्वच राज्यांना अधिकचा निधी मिळणार आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

अध्यक्ष महोदय, GST, VAT आणि व्यवसाय कर यांचा एकत्रितपणे विचार करता त्यात सातत्याने वाढ होत आहे. दरवर्षी साधारणपणे ३० ते ३५ कोटी रुपयांची वाढ होत असल्याचे आपल्याला पाहायला

मिळते. म्हणून ४ लाख ४९ हजार ५२३ कोटी रुपये हा महसुली जमेचा अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४ मध्ये मी व्यक्त केला होता आणि सुधारित अंदाजानुसार तो ४ लाख ८६ हजार ११६ कोटी रुपये इतका झाला आहे. आता अर्थसंकल्पीय अंदाज ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी म्हणजे ११ टक्के इतका जास्त धरलेला आहे. आता कराचे उत्पन्नदेखील बऱ्यापैकी वाढत आहे. यासाठी राज्य सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे. सरकार जेव्हा खर्च करते, तेव्हा उत्पन्नाचे resources वाढविण्याचा देखील प्रयत्न करते.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी आता तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. बिहार व आंध्र प्रदेश राज्याला विशेष दर्जा दिला आहे. असे मध्यंतरीच्या काळात ऐकण्यास मिळाले. राज्यात व केंद्रात एकाच विचाराचे सरकार असल्यामुळे तो दर्जा महाराष्ट्राला देखील मिळाला पाहिजे, यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. पुढील काळात केंद्र सरकारच्या विचाराचे सरकार पुन्हा राज्यात आले पाहिजे, असा विचार जनतेने निश्चितपणे केला पाहिजे. (अडथळा...) एक मिनिट... त्यामध्ये आंध्रप्रदेश देखील आहे. ठीक आहे. आपण त्या चष्म्यातून बघा, आम्ही चांगल्या चष्म्यातून पाहतो. आम्हाला त्याबद्दल काहीही बोलायचे नाही. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना मी अनेक वर्षांपासून ओळखतो आणि ते देखील मला ओळखतात.

अध्यक्ष महोदय, मागील आर्थिक वर्षापेक्षा या वर्षी महसुली जमा १३ हजार कोटी रुपयांनी जास्त आहे. महसूल जमा ज्या दराने वाढायला पाहिजे, त्या दराने वाढत नाही, असा मुद्दा माननीय विरोधी पक्षनेता यांनी मांडला होता. परंतु तो दर कसा वाढतो, ते मघाशीच सांगितले आहे. सन २०२४- २०२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार महसुली जमा ४९ हजार ९३९ कोटी इतकी वाढलेली आहे. मला वाटते महसुली जमा बऱ्यापैकी वाढलेली आहे. ती आणखी कशी वाढेल, यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्ष हे लोकशाहीचे दोन स्तंभ आहेत. त्याच स्तंभावर लोकशाही उभी आहे. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी त्यांच्या भाषणात काही चांगले मुद्दे मांडलेले आहेत. त्याचबरोबर काही चांगल्या सूचनादेखील केलेल्या आहेत. त्या सूचनांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची महायुती सरकारची भूमिका आहे. त्याबद्दल मी आपणास चार ओळी ऐकवू इच्छितो.

'प्यार करोगे तो प्यार करेंगे.

हाथ मिलाओगे तो हाथ भी मिलायेंगे

गले मिलोगे तो गले मिलायेगे

सितम करोगे तो सितम करेंगे

आदमी हैं तुम्हारे जैसे जो तुम करोगे वह हम करेंगे

(अडथळा...) सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस हे माझ्यावर डोळे झाकून विश्वास ठेवतात. मी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देत असताना दुसरीदेखील महत्त्वाची कामे सुरू आहेत.

कारण आम्हाला हे राज्य झपाट्याने पुढे घेऊन जायचे आहे. (अडथळा...) आपण त्या चष्म्यातून पाहता, त्याला मी काय करू शकतो?

अध्यक्ष महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण व इतरही काही सन्माननीय सदस्यांनी अंतरिम अर्थसंकल्प व अतिरिक्त अर्थसंकल्पाचा थोडा ऊहापोह केला आहे. परंतु आम्हीदेखील त्या गोष्टीचा विचार केला आहे. त्याकरिता भविष्यामध्ये या कार्यपद्धतीमध्ये बदल करावयाचा झाल्यास सुधारित कार्यपद्धतीला विधिमंडळाच्या अंदाज समितीची मान्यता घ्यावी लागते. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण आपण म्हणता ते बरोबर आहे आणि वित्त व नियोजन विभागाने देखील तसा विचार केला आहे. दोनदा-दोनदा करण्याचे काहीही कारण नाही. त्यामुळे पुढील वेळी या गोष्टीचा निश्चितपणे विचार केला जाईल. हा विषय विधिमंडळाच्या अंदाज समितीपुढे घेऊन जावा लागेल. परंतु आता अंदाज समिती अस्तित्वात नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांनी महसुली खर्च आणि महसुली तूट वाढलेली आहे, असा मुद्दा मांडला. परंतु सन २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये अपेक्षित आहे. महसुली खर्चात ११.५७ टक्क्यांनी वाढ झाली, असे दिसून येते. परंतु तो खर्च कशावरील आहे, हे देखील आपण पाहिले पाहिजे. व्याज, वेतन व निवृत्तिवेतन या सर्व गोष्टी महसुली खर्चामध्ये येतात. व्याज प्रदानाची महसुली जमेची टक्केवारी ११.३ टक्के आहे. वेतन व निवृत्तिवेतनातील खर्चाची टक्केवारी ५८ टक्के आहे. मला सभागृहाला एक बाब जरूर सांगायची आहे की, राज्य शासन पद भरती करीत नाही, असा विरोधी पक्षाकडून अनेक वेळा आरोप केला जातो. परवाच माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या लक्षात आणून दिले व मी पण या चर्चेच्या निमित्ताने आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजीपर्यंत एकूण १ लाख ९ हजार पात्र उमेदवारांना शासकीय सेवेत रुजू करून घेत आहोत. जवळपास ३०-३२ वर्षांपासून मी या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करीत आहे. माझ्या राजकीय कार्यकाळात एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर भरती कधीही केली नाही. परंतु या वर्षी मात्र सर्वात जास्त पदांची भरती केलेली आहे. परंतु एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, व्याज, वेतन व निवृत्तिवेतनावरील एकूण खर्च ५८ टक्के आहे. मोठ्या प्रमाणावर पदे भरल्यामुळे या खर्चामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे. खर्च वाढत आहे, म्हणून भरती करायची नाही, अशी या सरकारची भूमिका नाही. आमचे सरकार resources वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. हा बांधील खर्च आहे. तो टाळता येण्यासारखा नाही. त्यामुळे चालू वित्तीय वर्षात महसुली तूट २० हजार ५१ कोटी रुपये दिसून येत आहे. मागील वर्षी ती १६ हजार १२२ कोटी रुपये इतकी होती.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सरकारने लोककल्याणकारी राज्याची संकल्पना निश्चितपणे स्वीकारली आहे.शासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचारी हे आपल्याच राज्याचा भाग आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, शेतकऱ्यांना देखील एसडीआरएफच्या निकषापेक्षा जास्त मदत केलेली आहे. तसेच त्यांच्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या योजनादेखील आणलेल्या आहेत. त्या योजनांचा उल्लेख मी करणारच आहे. लोककल्याणकारी राज्याचा विचार करून अनेक योजना आणलेल्या आहेत. त्या योजनांसाठी देखील बराच खर्च होतो. शेतकरी, महिला व इतर दुर्बल घटकांकडे देखील शासनाचे विशेष लक्ष आहे. या घटकांसाठी

देखील निधीची तरतूद करावी लागते. जरी २० हजार ५१ कोटी रुपये महसुली तूट दिसली, तरी वर्षाअखेरपर्यंत खर्चावर काही प्रमाणात नियंत्रण आणून ती तूट कमी करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. महसुली तूट ही राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या ०.४७ टक्के आहे. सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्याचे स्थूल उत्पन्न ४२ लाख ६७ हजार ७७१ कोटी रुपये इतके आहे. त्यामुळे महसुली तूट कमी झाली पाहिजे, या मताचे तुम्ही आहात, तसे आम्हीदेखील आहोत.

अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मागील १० वर्षांची आकडेवारी पाहिली तर सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या दोन वर्षांचा अपवाद वगळता आठ वर्षांत महसुली तुटीचाच अर्थसंकल्प सादर केलेला आहे. महसुली खर्च व महसुली तूट, व्याज प्रदानाची महसुली रकमेच्या जमेची टक्केवारी ११.३६ इतकी आहे. व्याज, वेतन व निवृत्तिवेतन यावरील खर्चाच्या जमेची टक्केवारी ५८ टक्के इतकी आहे.

अध्यक्ष महोदय, मी मागील दहा वर्षांतील महसुली तुटीची तुलना सभागृहापुढे मांडू इच्छितो. सन २०१५-२०१६ मध्ये ८.८९ टक्के तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला होता. सन २०१६-२०१७ मध्ये ४.१७ टक्के, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ मध्ये तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला नाही. सन २०१९- २०२० मध्ये पुन्हा ६.०४ टक्के इतका तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला होता. सन २०२०-२०२१ मध्ये कारोना महामारीचे संकट होते. त्यामुळे त्या वर्षी १५.२७ टक्के इतका तुटीचा अर्थसंकल्प मांडावा लागला. सन २०२१-२०२२ मध्ये ४.९१ टक्के, सन २०२२-२०२३ मध्ये ०.४८ टक्के, सन २०२३-२०२४ मध्ये ४.०२ टक्के व सन २०२४ २०२५ मध्ये ४.०१ टक्के तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता व इतर काही सन्माननीय सदस्यांनी मागील वर्षीपेक्षा चालू वर्षी भांडवली जमा कमी कशी दाखवली, असा प्रश्न उपस्थित केला. सन २०२२-२०२३ मध्ये प्रत्यक्ष भांडवली जमा ५५ हजार ४७२ कोटी रुपये होती. सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्पीय अंदाज ९७ हजार ९२७ कोटी इतका आहे आणि सन २०२३-२०२४ चा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज १ लाख १४ हजार कोटी रुपये इतका आहे. सन २०२४-२०२५ चा अर्थसंकल्पीय अंदाज १ लाख १ हजार ५३१ कोटी रुपयांचा आहे. अशा पद्धतीची भांडवली जमा आहे. आपण जो अंदाज करतो त्यापेक्षा नेहमीच जमा जास्त होते हा आजपर्यंतचा अनुभव आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना मला अर्थसंकल्पीय अंदाजाची तुलना पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाशीच केली पाहिजे. तशी पहिल्यापासून पद्धत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अर्थसंकल्पीय अंदाजाची सुधारित अंदाजाशी सोयीस्कर तुलना केली. त्यामुळे ती मागील वर्षापेक्षा आपल्याला कमी दिसत आहे. सन २०२४-२०२५ च्या सुधारित अंदाजात देखील निश्चितपणे भांडवली जमा मागील वर्षापेक्षा जास्त दिसून येईल. या सर्व संदर्भात मला भांडवली खर्चाबद्दलची गोष्ट सभागृहाला अवगत करावयाची आहे.

अध्यक्ष महोदय, आकड्यांची जगलरी करून या सरकारला भांडवली खर्च कमी करायचा आहे, असा आरोप माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आमच्यावर केला. हा आरोपदेखील सोयीची आकडेवारी समोर ठेवून केलेला आहे. कारण सन २०२३-२०२४ मध्ये ८१,८०५ कोटी रुपये एवढा भांडवली खर्च अंदाजित होता. सन २०२४-२०२५ मध्ये त्यात वाढ होऊन भांडवली खर्च ९२,७८० कोटी रुपये इतका अपेक्षित आहे. भांडवली खर्चातही साधारण १३.४२ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. उलट अर्थसंकल्पात आम्ही भांडवली कामासाठी तरतुदीमध्ये वाढ केलेली आहे. त्यामुळे हा भांडवली जमाखर्च जो काही आपण पाहिला... मघाशी मी आकडे सांगितले किंवा राजकोषीय तूट यामध्ये सन २०२४-२०२५ चा एकूण खर्च ६ लाख, १२ हजार, २९३ कोटी रुपये इतका अंदाजित असून त्यापैकी महसुली खर्च ५ लाख, १९ हजार, ५१३ कोटी रुपये व भांडवली खर्च ९३ हजार, ७८० कोटी रुपये इतका अंदाजित आहे. त्यामध्ये राजकोषीय तूटही १५.५५ टक्के आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या दरम्यान राजकोषीय तुटीबाबत ज्याला fiscal deficit म्हणतो त्याबाबत चिंता व्यक्त केली गेली. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मागील वर्षी ९५ हजार, ५०१ कोटी रुपये एवढी राजकोषीय तूट अर्थसंकल्पीय अंदाजानुसार होती. सुधारित अंदाजानुसार ती १ लाख, ११ हजार ९५६ कोटी रुपये इतकी झाली. सन २०२४-२०२५ मध्ये ती १ लाख, १० हजार, ३५५ कोटी रुपये अपेक्षित धरलेली आहे. मागच्या वर्षापेक्षा १४ हजार ८५४ कोटी रुपयांनी राजकोषीय तूट वाढली आहे, हे खरे आहे. परंतु, महसुली तुटीची जी कारणे मी आपल्याला सांगितली, तीच राजकोषीय तुटीसाठीदेखील आहेत.

अध्यक्ष महोदय, आपल्या सर्वांना माहीत आहे की, राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये, अशा पद्धतीने सर्वच राज्यांना केंद्राने कळविलेले आहे. त्यातच आम्ही हे सर्व बसविण्याचा प्रयत्न करीत असतो. सन २०२४-२०२५ मध्ये राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.५९ टक्के अंदाजित आहे, म्हणजेच ३ टक्क्यांची मर्यादा आम्ही पाळलेली आहे. सन २०२३-२०२४ मध्ये ते २.४६ टक्के होते. राज्याचा अर्थसंकल्प तुटीचा नसावा या मताचा मी आहे. परंतु, माहितीसाठी सांगतो की, राजकोषीय तुटीची गत १० वर्षांची आकडेवारी पाहिली तर राजकोषीय तुटीचाच अर्थसंकल्प सादर झालेला आहे. सन २०१५-२०१६ पासून सर्व आकडेवारी माझ्याकडे आहे. ती वाचून मी आपल्या सर्वांचा वेळ घेणार नाही. ही काही वेगळी पद्धत नाही. त्याबाबतीत तसे पाहिले तर आपले राज्य सक्षम आहे, असा आमच्या सरकारचा दावा आहे.

अध्यक्ष महोदय, वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीबाबतदेखील अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते व्यक्त केली. त्यांची भूमिका येथे मांडण्याचा प्रयत्न केला. एक गोष्ट खरी आहे, विकास दर साडेसात टक्के असताना वन ट्रिलियन डॉलरचे स्वप्न का दाखविता, असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. गेली १० वर्षे माननीय श्री. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान असताना त्यांनी जगामध्ये आपली अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणलेली आहे. आता ती तिसऱ्या क्रमांकावर आणण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. तिसऱ्या क्रमांकावर येताना ती ५ ट्रिलियन डॉलरवर आणण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्यावेळेस तुमचे माझे राज्य आर्थिक बाबतीत इतर राज्यांच्या दृष्टीने सक्षम असल्यामुळे आपण वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दिष्ट घेतलेले आहे. सन २०२५-२०२६ पर्यंत ही अर्थव्यवस्था तेथपर्यंत नेण्याचा आपला प्रयत्न आहे. महाराष्ट्राचीच

भूमिका यामध्ये महत्त्वाची राहणार आहे. याकरिता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सन २०२८ पर्यंत वन ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत आणखी जास्त ट्रिलियन डॉलर करण्याचे आमचे ध्येय आहे.

अध्यक्ष महोदय, वन ट्रिलियन डॉलर म्हणजे सध्याच्या डॉलरच्या दराने विचार केला तर, ८२ लाख, ९४ हजार कोटी रुपये होतात. राज्य चालविणाऱ्यांनी नेहमीच मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सर्व ताकद पणाला लावली पाहिजे. तशाच पद्धतीचा विचार महायुतीचा आहे. भारतीय अर्थव्यवस्था अंदाजे साडेतीन ट्रिलियन डॉलर इतकी आहे. राज्याचे सध्याचे एकूण सकल उत्पन्न ४० लाख, ४४ हजार कोटी रुपये इतके आहे. देशाच्या सकल उत्पन्नाच्या जीडीपीत राज्याचा वाटा १४ टक्के आहे. यासाठी राज्य सरकारकडून काही उपाययोजनादेखील आम्ही केलेल्या आहेत व करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, अपूर्ण सिंचन प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी नाबार्डने आम्हाला १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक... पूर्वीच्या काळातील बऱ्याच ठिकाणच्या कालव्यांमध्ये खूप झाडेझुडपे झालेली आहेत. खूप घाण साठलेली आहे. तुम्ही जायकवाडी कॅनॉलचे उदाहरण घेऊ शकता किंवा इतरही निरा डावा कालवा, उजवा कालवा, खडकवासलाची उदाहरणे घेऊ शकता. आमच्या नगर जिल्ह्यातील अशा खूप कालव्यांचा आम्हाला उल्लेख करता येईल की, जे फार वर्षांपूर्वी झालेले आहेत. अशा कालव्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आम्ही ५ हजार कोटी रुपये खर्च करीत आहोत. यातून आता जे काही क्षेत्र ओलिताखाली आहे त्यापेक्षा मोठ्या जेथे प्रमाणावर काही पटीने क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते. तशा पद्धतीचा अनुभव स्वच्छता केलेली आहे, जेथे आधुनिकीकरण केलेले आहे, तेथे आलेला आहे. आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेनेही १.१ अब्ज डॉलरची गुंतवणूक सुरक्षित केलेली आहे. त्यामध्ये ५ लाख ... जवळपास साडेआठ लाख शेतकऱ्यांना सौर पंप दिले जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, दिवसाची वीज मिळण्याच्या हमीबाबत कालच माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितलेले आहे. 'मित्र' आणि ऊर्जा विभाग... जागतिक आर्थिक मंचासोबतही आपण काम करीत आहोत. राज्यात ग्रीन हायड्रोजन क्षेत्रात गुंतवणूक सुलभ होईल. अशा पद्धतीचे निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्यात गुंतवणूकदार येतील. आतापर्यंत १० मोठ्या गुंतवणूकदारांनी नोंदणी केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, स्मार्ट प्रकल्पांतर्गत ७६७ शेतकरी उत्पादन कंपन्यांना १५४१ कोटी, ६४ लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे. पोखरा २ मधून ७०० मिलियन डॉलरची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. आरोग्य, सेवा प्रणाली मजबूत करण्याकरिता आशिया विकास बँकेच्या साहाय्याने ५०० मिलियन डॉलरचा प्रकल्प राबविला जात आहे. पर्यटनाचा प्रचार व जिल्ह्यातील उद्योग व G2B सेवांची सुविधा सुधारण्यासाठी २२०० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, याशिवाय आर्थिक सल्लागार परिषदेने सांगितल्याप्रमाणे राज्याच्या सरासरीपेक्षा वार्षिक दरवाढ कमी असल्याने १८ जिल्ह्यांना सन २०२४-२०२५ पासून जिल्हा वार्षिक योजनेत किमान २५ टक्के निधी वापरण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये नंदुरबार, वाशिम, धाराशिव, गडचिरोली या ४ जिल्ह्यांत केंद्र सरकारचा आकांक्षित जिल्हा कार्यक्रम आपण राबवीत आहोत. त्याच धर्तीवर आता आपण १५ जिल्हे

व २७ तालुक्यांमध्ये राज्य सरकारकडून आकांक्षित तालुका कार्यक्रम राबवीत आहोत. आपले राज्य निर्धारित वेळेत वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दिष्ट गाठेल, अशा पद्धतीचा मला विश्वास वाटतो. तशा पद्धतीने राज्य सरकारने अतिशय गतीने काम सुरू केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प सादर करीत असताना आपल्या सर्वांना माहीत आहे की, तूट कमी करण्यासाठीही शासन प्रयत्न करीत आहे. त्यामध्ये मुद्रांक व नोंदणी फी असेल, राज्य उत्पादन शुल्क असेल, राज्य वस्तू व सेवा कर ज्याला आपण जीएसटी म्हणतो ही राज्याची प्रमुख उत्पन्नाची साधने आहेत. आपण आकडेवारी पाहिली तर, सातत्याने महसुली उत्पन्नाचे कल वाढलेले आपल्याला दिसत आहेत. जीएसटी आल्यापासूनदेखील करदाते वाढले आहेत. येणाऱ्या वर्ष-दोन वर्षांच्या काळात करदाते आणखी वाढतील. त्यामुळे निश्चितपणे राज्याच्या कर उत्पन्नात भर पडेल, त्याबद्दल मला खात्री आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्यात ३ लाख, २० हजार कोटी रुपये एवढा जीएसटी, एसजीएसटी, सीजीएसटी व आयजीएसटी जमा केलेला आहे. ही रक्कम देशातील सर्व राज्यांपेक्षा जास्त आहे. ही वाढ मागील वर्षाच्या तुलनेत १८.४ टक्के इतकी आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात जमा होणारा देश पातळीवरचा जीएसटीचा वाटाही १५.८ टक्के आहे. कर चुकवेगिरीला आळा घालण्यासाठीही आपण कठोर पावले उचललेली आहेत. पूर्वी कर चुकविणाऱ्यांना अटक करण्याची तरतूद नव्हती. सरकारने नंतर अटकेची तरतूद केली. त्याचा सकारात्मक परिणाम जीएसटीच्या वसुलीमध्ये दिसून आला. आपण आकडेवारी पाहिली तर राज्याच्या प्रत्येक कर स्त्रोतामध्ये २ ते ५ हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे. माझ्या अनुभवानुसार अपेक्षित धरण्यात आलेल्या वाढीमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येईल व वित्तीय तूट कमी होण्यास मदत होईल.

अध्यक्ष महोदय, ठाणे, नागपूर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड अशा सर्व मोठ्या शहरांमध्ये मेट्रोचे जाळे तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये केंद्र सरकारचा २० टक्के, राज्य सरकारचा २० टक्के, १० टक्के संबंधित महानगरपालिकेचा व ५० टक्के वित्तीय संस्थांचा सहभाग राहील. या माध्यमातून प्रदूषण कमी होईल, दळणवळणाची गती वाढेल. मुंबईत अनेक ठिकाणी मेट्रोची कामे सुरू असल्याने लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यांना मी विश्वास देतो की, त्यांनी आणखी काही दिवस धीर धरावा. त्यांनी आजपर्यंत सहनशीलता दाखविली आहे त्याप्रमाणे आणखी काही दिवस सहनशीलता दाखवावी. मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर दळणवळण गतीने होईल, व्यापार, उद्योगांमध्ये वाढ होईल, विदेशी गुंतवणूक आकर्षित होईल, वाहनांची संख्या कमी होऊन इंधनाची बचत होईल व राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. या क्षेत्रात आणखी काही वर्षे गुंतवणूक करावी लागणार आहे. त्यामुळे वित्तीय तूट दिसेल पण अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढल्यानंतर कर उत्पन्न वाढून राज्याची अर्थव्यवस्था निश्चितपणे मजबूत होईल, याबद्दल माझ्या मनात नव्हे तर कोणाच्याही मनात तिळमात्र शंका असण्याचे कारण नाही. राज्याची अर्थव्यवस्था चिंताजनक झाली आहे, असा संदेश कोठेही जाता कामा नये याची काळजी आपण सर्वजण घेऊ. राजकीय जीवनात आपण एकमेकांच्या विरोधात लढत असलो तरी हे राज्य आपल्या सर्वांचे आहे. शिव-शाहू- फुले-आंबेडकर यांच्या विचाराचे हे राज्य आहे. आपल्या राज्याच्या संदर्भात चुकीचे आरोप करून राज्याची बदनामी कोणी करता कामा नये, अशी माझी सर्वांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहाला मी पायाभूत सुविधांच्या बाबतीत अर्थसंकल्पाच्या बाहेरील कामांची माहिती देईन. शासनाने पायाभूत सुविधांच्या विकासावर अधिक लक्ष दिले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे रेवस ते रेड्डी सागरी मार्ग २६ हजार कोटी रुपये, विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका ६३, हजार ६१८ कोटी रुपये, पुणे चक्राकार मार्ग ५८ हजार कोटी रुपये, जालना-नांदेड महामार्ग २७ हजार कोटी रुपये, नागपूर-गोंदिया महामार्ग २२ हजार कोटी रुपये, भंडारा-गडचिरोली महामार्ग १२ हजार कोटी रुपये व नागपूर-चंद्रपूर महामार्ग २० हजार कोटी रुपये खर्च करून अशा पद्धतीने दळणवळण सुविधा मजबूत करण्याकडे राज्य सरकार लक्ष देत आहे. शिवडी-न्हावाशेवा या महत्त्वाच्या अटल सेतू प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. शिवडी-वरळी उड्डाणपुलाचे काम गतीने सुरू आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मुंबई कोस्टल मार्गाला स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात आले असून ते काम अंतिम टप्प्यात आहे. मरीन लाइन्स-वरळी भुयारी रस्त्याचे काम सुरू आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष सातत्याने आरोप करीत असतो म्हणून श्वेतपत्रिका काढली जाईल, असे उद्योगमंत्री महोदयांनी सांगितले आहे. या राज्यातून अनेक प्रकल्प गुजरात राज्यात गेले असे विरोधी पक्ष सांगत आहे परंतु प्रत्यक्षात तसे नाही. त्यांनी कारण नसताना Fake Narrative सेट करण्याचा प्रयत्न करू नये.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारच्या पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीत वाढवण बंदर येथील ७७ हजार २०० कोटी रुपयांच्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामध्ये राज्य सरकारचा २६ टक्के व केंद्र सरकारचा ७४ टक्के सहभाग असणार आहे. एवढा मोठा प्रकल्प साकारण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्याचे सुपुत्र माननीय श्री. नितीन गडकरी यांच्याकडे तिसऱ्यांदा भूपृष्ठ परिवहन मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राज्यात रस्त्यांचे मोठे जाळे विकसित होत आहे. त्याचा आपणास खूप मोठा फायदा होणार आहे. राज्य सरकारने अनेक राज्य महामार्ग राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित केले आहेत. मुंबई-गोवा महामार्गाच्या संदर्भात वन विभागाच्या काही अडचणी होत्या, काही शहरातून रस्ता जातो तेथील लोकांचा त्यास विरोध आहे. माझ्या माहितीनुसार डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असल्यापासून सदर महामार्गाचे काम सुरू आहे. त्यानंतर १० वर्षांचा कालावधी गेला. परंतु सदर महामार्गाच्या बाबतीत काय झाले हे तपासलेच पाहिजे. सदर कामासाठी उशीर लागत आहे. अभिनेता अमिताभ बच्चन व अभिनेत्री अरुणा इराणी यांचा बॉम्बे टू गोवा चित्रपट आला होता, तो आपल्याला आठवत असेल. त्याप्रमाणे बॉम्बे टू गोवा नॅशनल हाय-वे यावर चित्रपट काढावा लागेल किंवा पुस्तक लिहावे लागेल...( अडथळा )... माझा हा प्रामाणिकपणा कायम राहील... ( अडथळा)...

अध्यक्ष महोदय, सदर रस्त्याच्या कामासाठी सर्वच जबाबदार आहेत. काहींनी तेथे जाऊन पाहणी केली, तेथील खड्ड्यांचे फोटो काढले, ते दाखविले. तेथून परत आल्यानंतर पुढे काही नाही... सर्वांनी आपापल्या परीने त्याचा फायदा घेतला आहे. अनेकांनी आम्हाला आमदार किंवा खासदार केल्यास आम्ही रस्त्याचे काम पूर्ण करू, अशी आश्वासने दिली. अनेक जण आमदार व खासदार झाले पण रस्त्याच्या कामाचे पुढे काही झाले नाही. आता माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले आहे की, काहीही झाले तरी या टर्ममध्ये मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करूनच दाखवतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री बाळासाहेब थोरात, रईस शेख व आणखी काही सन्माननीय सदस्य यांनी मुंबई-ठाणे-भिवंडी-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडीचा मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्या श्रीमती देवयानी फरांदे यांनीदेखील सदर मुद्दा उपस्थित केला होता, त्या संदर्भात मला पत्रही दिले आहे. सदर महामार्गावरून माननीय मंत्री श्री. दादाजी भुसे, माननीय मंत्री श्री. रवींद्र चव्हाण, माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ हे प्रवास करीत असतात. सदर प्रकरणी मी सोमवारी किंवा मंगळवारी बैठक आयोजित करून सर्व संबंधिताशी चर्चा करतो व जे काही करता येणे गरजेचे आहे ते करण्यासाठी त्यांना कामाला लावतो. सदर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करून नागरिकांची अडचण दूर करण्यासाठी सर्व यंत्रणा, सर्व लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना तातडीने देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाकडून सातत्याने सांगण्यात येते की, राज्यावर ७.८२ लाख कोटी रुपये कर्ज झाले आहे. या संदर्भात मी सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य व राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, राज्यावर सन २०२३-२०२४ मध्ये अंदाजित ७ लाख ०६ हजार ४४२ कोटी रुपये इतके कर्ज होते ते सन २०२४-२०२५ मध्ये अंदाजित ७ लाख ८२ हजार ९९१ कोटी रुपये इतके झाले असून सदर कर्जात १०.६७ टक्के वाढ दिसून येत आहे. वित्तीय निर्देशानुसार राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्के मर्यादेत कर्ज घेता येते. उक्त मर्यादा सन २०२४-२०२५ मध्ये १८.३५ टक्के इतकी ठेवण्यात आली आहे. आणखी एका निर्देशानुसार राज्य सरकारला स्थूल राज्य उत्पादनाच्या ३ टक्के मर्यादेत वार्षिक कर्ज उभारणी करता येते ती सन २०२४- २०२५ मध्ये २.३२ टक्के एवढीच ठेवली आहे. या दोन्ही निर्देशांचे राज्य सरकारने तंतोतंत पालन केले आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठी क्षमता आहे तिला कमी लेखण्याचे काम कृपा करून कोणी करू नये. धोरणकर्त्यांनी राज्याची आर्थिक वाढ करण्यासाठी भांडवली खर्चात वाढ करण्याचा प्रयत्न करावयाचा असतो.

अध्यक्ष महोदय, या वर्षीचा अर्थसंकल्प पाहिला तर त्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत भांडवली खर्चामध्ये वाढ केली आहे. मी राज्यातील अनेक विकास कामांची माहिती देत असताना त्यामध्ये एमएमआरडीएची विकास कामे सांगितली नाहीत. त्यांचा राज्य सरकारशी संबंध नसला तरी या सर्व यंत्रणांचा फायदा राज्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी होत असतो. मी सांगितलेल्या दोन्ही निर्देशांचे सरकार कसोशीने पालन करीत आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठी क्षमता आहे, तिला कमी लेखण्याचा प्रयत्न करू नका. राज्य सरकारने भांडवली खर्चामध्ये निश्चितपणे वाढ केली आहे, त्याकरिता कर्ज उभारणी करणे आवश्यक ठरते. अनेक प्रगत राज्यांवरदेखील कर्ज आहे. मी कर्जाचे समर्थन करतो, असे समजू नका.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समाधान आवताडे)**

केंद्र शासनाच्या अर्थ विभागाने रेशियो ठरवून दिलेला आहे. मी या ठिकाणी त्या राज्यांचा उल्लेख करीत नाही. पण एक राज्य असे आहे की, त्यांना पगार करता आले नाहीत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. जरी ते ३ टक्क्यांच्या पुढे गेले, तरी कर्मचाऱ्यांचे पगार करावेत, असे न्यायालयाने सांगितले. आंध्र प्रदेशमध्ये तेथील सरकारी कर्मचारी, अधिकारी यांचे पाच महिने पगार झाले नाहीत. (अडथळा) रोजगार मोठ्या प्रमाणात निर्माण होतो. अर्थव्यवस्थेला चालना मिळते, उत्पादनात वाढ होते. आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी लक्ष द्यावे. सन २०१५-१६ मध्ये आपल्या राज्याचे स्थूल उत्पन्न १९ लाख ६६ हजार २२५ कोटी

रुपये होते. राज्यावरील कर्ज ३ लाख २४ हजार कोटी रुपये होते. नंतर २०१९-२० मध्ये महाविकास आघाडीचे सरकार आले. तेव्हा स्थूल उत्पन्न २६ लाख ५६ हजार ८०६ कोटी रुपये होते. राज्यावरील कर्ज ४ लाख ५१ हजार कोटी रुपये होते. सन २०२०-२०२१ मध्ये ५ लाख १९ हजार कोटी रुपये स्थूल उत्पन्न होते. राज्य उत्पन्नाची टक्केवारी १६, १७, १८, १९ टक्के अशीच आहे. आता जरी आपले कर्ज ७ लाख ८२ हजार ९९१ कोटी रुपये दिसत असले तरी आपले स्थूल उत्पन्न ४२ लाख ६७ हजार आहे. म्हणजे १८.३६ टक्के आहे. स्थूल उत्पन्न व राज्य उत्पन्नाशी संबंधित आकडेवारी माझ्याकडे आहे. मी जनतेला सांगू इच्छितो की, राज्याचे स्थूल उत्पन्न जसे वाढेल तसे कर्जदेखील वाढते. मागील आकडेवारीशी तुलना करता आपण ते प्रमाण वाढू दिलेले नाही. ते मर्यादितच ठेवलेले आहे. काही जण फेक नरेटिव्ह सेट करण्याकरिता तसे सतत सांगतात. (अडथळा) ३१ जागा आल्या त्यामुळे आम्ही हादरून गेलो. हे फेक नरेटिव्हमुळेच झाले. कोणत्या तीन घटकांनी मतदान केले नाही, हे आपल्यालाही माहीत आहे.

अध्यक्ष महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी फिस्कल रिस्पॉन्सिबिलीटी अँड मॅनेजमेंट या बाबत सांगितले. एफआरबीएमनुसार चालू किमतीचा विकास दर स्थिर किमतीचा विकास दर ०.५ टक्के आहे. हा दर चिंताजनक असल्याची भूमिका मांडली. आमच्या विभागाचे असे मत आहे की, सन २०२३-२४ मध्ये स्थिर किमतीनुसार पायाभूत वरील दर ११.१२ टक्के आहे. राज्य स्थूल उत्पन्नाचा वृद्धी दर ७.६ टक्के अपेक्षित असून चलनवाढीचा प्रभाव अंतर्भूत नाही. चालू किमतीनुसार चलन वाढीच्या प्रभावासह राज्य उत्पन्न ४०.४४ लाख कोटी रुपये अपेक्षित असून आधीच्या वर्षीच्या तुलनेत त्यात १०.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. त्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. वाटल्यास आपल्याला ती माहिती मी बघण्यास देतो.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी आणखी एक गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. आम्ही योजना तयार करतो. काल सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विजय वडेट्टीवार यांनी कुर्ला येथील जमिनीबाबत असे सांगितले की, सरकारने खूप मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. वास्तविक धारावीच्या प्रकल्पामध्ये राज्य शासनाचाही हिस्सा आहे. अदाणी ग्रुपचा देखील हिस्सा आहे. कोणाला स्पेशल ट्रीट केले जात नाही. आताच सन्माननीय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील सांगत होते की, कॅबिनेटने याबाबत निर्णय घेतलेला आहे. ते आपल्याला या बाबत अवगत करतील. आवश्यकता असल्यास आपण बसून चर्चा करू. काल आम्ही माननीय विरोधी पक्ष नेते यांचे हावभाव पाहिले. ते पाहिल्यानंतर असे वाटले की, माननीय श्री. वडेट्टीवार यांना मोठे घबाड सापडलेले आहे. मात्र तसे काहीही नाही. त्याचे कारण मी आपल्याला सांगतो. त्याचे उत्तर माननीय मंत्रीदेखील देतील.

अध्यक्ष महोदय, शासन पारदर्शक प्रशासनावर भर देत आहे. ज्या लाभार्थ्यांना लाभ देणार आहे तो थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. हजारो कोटी रुपयांचा लाभ देत असताना डीबीटीमुळे प्रत्येक रुपया त्यांच्या खात्यात जाणार आहे. विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्तीची रक्कम असो, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील रक्कम असो, मुख्यमंत्री युवा-युवतींच्या प्रशिक्षणार्थींना दिला जाणारा स्टायपेंड असो, मुलींना उच्च व्यावसायिक शिक्षणाकरिता दिली जाणारी शिष्यवृत्ती असते, हे सर्व लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. अन्नपूर्णा योजनेत तीन मोफत सिलेंडर देण्याची योजना तयार करण्यात

आली. ही रक्कम देखील लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. धान, सोयाबीन, कापूस, कांदा इ. पिकांकरिता अनुदान, दुधाकरिता अनुदान इ. साठी शासनाने मदत दिली असून ती डीबीटीद्वारे थेट त्यांच्या खात्यात जमा होत आहे. लाभार्थ्यांना लाभ देताना भ्रष्टाचारममुक्त धोरणाची अंमलबजावणी करून योजनेचा १०० टक्के फायदा लाभार्थ्यांना थेट त्यांच्या खात्यावर देण्यावर शासनाचा भर आहे. कृपा करून ही गोष्ट आपण लक्षात ठेवावी.

अध्यक्ष महोदय, व्याज प्रदानाच्या संबंधी शासनाने दरडोई उत्पन्नाबाबत जे केले त्याबाबत या ठिकाणी टीका केली गेली. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले की, राज्य अकराव्या क्रमांकावर गेले. आपण जेव्हा मुख्यमंत्री होता तेव्हा मी आपल्या शासनामध्ये उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री होतो. माननीय श्री. जयंत पाटील, माननीय श्री. भास्कर जाधव असे अनेक जण तेव्हा मंत्रिमंडळात होते. लहान राज्ये, केंद्रशासित राज्ये, जी राज्ये शहरे आहेत उदा. दिल्ली त्यांचा आपण विचार करीत नाही. हे वर्षानुवर्षे चालत आलेले आहे. आपल्याला माझे म्हणणे १०० टक्के पटेल असा माझा दावा नाही. व्याज प्रदान करीत असताना २०२४-२५च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ५६ हजार ७२७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या वर्षात महसुली ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये जमा होणार आहे. जमेच्या व्याजाची टक्केवारी ११.३३ आहे. इतर आकडेवारी माझ्याकडे आहे. व्याज प्रदान खर्चामध्ये वाढ झालेली नाही. दर वर्षीप्रमाणे ती १२ ते १३ टक्के आहे. एकदाच कोरोनाच्या काळात ते प्रमाण १४ टक्के झाले होते. पुन्हा १२ टक्के, १०.५ टक्के, १० टक्के आहे. आता सन २०२४ मध्ये ११ टक्के आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेता महसुली जमेच्या तुलनेत व्याजाची टक्केवारी फारशी वाढलेली नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पीय शिल्लक ११ हजार २९९ कोटी रुपये ही रक्कम कोणत्या हेडखाली दाखवली असा प्रश्न केला. सन २००१-०२, २००२-०३, २००३-०४ व सन २००४-०५ अशी ४ वर्षे ते या राज्याचे अर्थमंत्री होते. राज्याची एकूण महसुली व भांडवली जमा तसेच महसुली व भांडवली खर्च, अर्थसंकल्पीय शिल्लक किंवा तूट दाखवली जाते याची आपल्याला कल्पना आहे. ती स्वतंत्रपणे कोणत्याही लेखाशीर्षाखाली दाखवली जात नाही. अग्रिमाद्वारे ती विनियमित केली जाते. मागील २४ वर्षांची आकडेवारी पाहिली तर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील अपवाद सोडला तर प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पीय तूट होती किंवा शिल्लक होती. २००१-०२, २००२-०३, २००३-०४ व सन २००४-०५, २००९-१०, २०१०-११, २०११-१२ २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित असल्याचे दिसत आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण अर्थमंत्री असताना बजेट एस्टिमेट व रिव्हाइज्ड एस्टिमेट यामध्ये तशीच परिस्थिती होती. माझ्याकडे त्याची स्पष्ट आकडेवारी आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विभागाबद्दल मागील वर्षापेक्षा कमी तरतूद केली. त्यांनी अर्थसंकल्पातील कोणती आकडेवारी पाहून मत मांडले आहे, हे मला माहीत नाही. सर्व महत्त्वाच्या आणि इतरही विभागांना आम्ही अधिकचा निधी दिला आहे. माझ्याकडे आकडेवारी आहे. जिल्हा वार्षिक योजना बळकट करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत असतो. (... अडथळा...) मला सन्माननीय सदस्य डॉ. नितीन राऊत यांनी जागेवर बसून प्रश्न विचारला आहे. मी त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यास बांधील नाही. परंतु ते आमचे सहकारी आहेत म्हणून सांगू इच्छितो की, सन २०२३-२४ चा सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचा

अर्थसंकल्पीय अंदाज २१ हजार ९१ कोटी रुपयांचा होता. तो या वर्षी २२ हजार ९११ कोटी रुपयांचा आहे. जिल्हा वार्षिक योजना बळकट करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत असतो. याबाबत आम्ही दरवेळी आढावा घेत असतो. त्याकडे आमचे विशेष लक्ष आहे. सन २०२४-२५ मध्ये सर्व जिल्ह्यांमधील जिल्हा वार्षिक योजनेत २० टक्के वाढ केली असून १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय दिला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी त्यांच्या भाषणात कविवर्य विं. दा. करंदीकर यांची कविता वाचून दाखविली आहे. त्यामुळे मलाही कविवर्य विं. दा. करंदीकर यांची एक कविता वाचून दाखविण्याचा मोह होत आहे. कवितेचे शीर्षक 'एवढे लक्षात ठेवा' असे आहे.

उंची न आपुली वाढते, फारशी वाटून हेवा ।
श्रेय ज्याचे त्यास द्यावे; एवढे लक्षात ठेवा ॥
ती पूर्वजांची थोरवी, त्या पूर्वजांना गौरवी ।
तीन कामी आपुल्या, एवढे लक्षात ठेवा ।।
जाणते जे सांगती, ते ऐकून घ्यावे सदा ।
मात्र तीही माणसे; एवढे लक्षात ठेवा ॥
चिंता जगी या सर्वथा, कोणा न येई टाळता ।
उद्योग चिंता घालवी; एवढे लक्षात ठेवा ॥
विश्वास ठेवावाच लागे. व्यवहार चाले त्यावरी ।
सीमा तयाला पाहिजे; एवढे लक्षात ठेवा ॥
दुपटीने देतसे जो, ज्ञान आपण घेतलेले ।
तो गुरूचे पांग फेडी; एवढे लक्षात ठेवा ।।
माणसाला शोभणारे, युद्ध एकच या जगी ।
त्याने स्वतःला जिंकणे; एवढे लक्षात ठेवा ॥

अध्यक्ष महोदय, अनेकांनी माझ्यावर टीका केली आहे. तो त्यांचा अधिकार आहे. लोकसभा निवडणूक निकालानंतर मला संत तुकाराम महाराजांची आठवण झाली, असे आमच्यातील काही ज्येष्ठ मान्यवरांनी सांगितले आहे. मी सांगू इच्छितो की, संत तुकाराम महाराजांचे विचार ३५०-४०० वर्षे होऊनही आजही तितकेच समर्पक आणि मार्गदर्शक आहेत. प्रसंगी कासेची लंगोटी देण्याची आणि नाठाळांच्या माथी काठी हाणण्याची ताकद ठेवणारे ते संत होते. तुकाराम महाराज विद्रोही संत होते. त्यांचे आणि आमचे वर्षानुवर्षाचे नाते आहे. संत तुकाराम महाराजांची पालखीची वारी ही बारामतीतून जाते. पालखीचा बारामतीमध्ये एक दिवस मुक्काम असतो. आमच्या काठेवाडीत मेंढ्यांचे गोल रिंगण करून आम्ही पालखीचे स्वागत करतो. त्यामुळे संत तुकाराम महाराज आम्हाला नवे नाहीत. ते आमच्या विचारात, श्वासात, रक्तात, ध्यासात आहेत. ते आम्हाला आठवावे लागत नाहीत. लोकसभा निवडणुका येतील, जातील. निवडणुकीत कोणालाही चांगले यश मिळाले तर आनंद वाटत असतो. तो आनंद आज विरोधकांना वाटत आहे. हे मी नाकारत नाही. विधानसभा निवडणुकीतही असेच होत असते. परंतु संत तुकाराम महाराजांचे विद्रोही विचार कायम आमच्यासोबत आहेत. संत तुकाराम महाराज, संत सोपानकाका, संत जगदाळे महाराज यांच्या पालख्याही

माझ्या मतदारसंघातून जातात. आमच्यावर संत महात्म्यांचे संस्कार आहेत. त्यामुळे विरोधकांनी केलेल्या आरोपात तथ्य नाही, हे मला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही लोकांना मदत केली व मोठे केले. आता त्यांचे पंख फडफड करत आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी दरडोई उत्पन्नाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबद्दल मी सांगू इच्छितो. महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीशी दरडोई उत्पन्नाची तुलना करताना देशातील काही निवडक अथवा महत्त्वाच्या राज्यांच्या माहितीचा समावेश केला जातो. हे राज्य निवडताना मोठे राज्य आणि महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या राज्यांची निवड केली जाते. हरियाणा राज्याचे उत्पन्न जास्त असल्याने तेही विचारात घेतले जाते. याचा अर्थ आर्थिक पाहणी अहवालात चुकीची माहिती दिली, असा होत नाही. मी त्याबाबत सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना अशाच प्रकारची आकडेवारी सादर केली जात असे. गोवा, सिक्कीम ही राज्ये लहान आहेत. दिल्ली, चंडीगड, पाँडेचेरी हे केंद्रशासित प्रदेश आहेत. केरळ हे छोटे राज्य आहे. त्यामुळे या राज्यांचा विचार केला जात नाही. या राज्यांचा विचार केला तर सन्माननीय सदस्य पृथ्वीराज चव्हाण यांनी उल्लेख केल्यानुसार आपल्या राज्याचा ११ वा क्रमांक येतो. मी मागील काळातील अहवाल विरोधकांना दाखवू इच्छितो. त्यानुसार ६ वा क्रमांक येतो, ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, वारकरी संप्रदायाकरिता सरकारने या वर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. आपण स्वतः पंढरपूरचे प्रतिनिधित्व करीत आहात. पांडुरंगाच्या दर्शनाकरिता राज्यातील आणि शेजारच्या राज्यातील नागरिकही दर्शनासाठी येत असतात. वारकऱ्यांसाठी आम्ही काही घोषणा केल्या आहेत. पंढरपूर वारीला एक वेगळा इतिहास आहे. मी यावर बोलत असतानाच आपण माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावर विराजमान झालात. हा योगायोग आहे. देश-विदेशातील लोक वारीमध्ये सामील होण्यासाठी येतात. विविध ठिकाणांहून वारकरी पंढरपूरला दिंडी घेऊन जातात. यात त्यांना अनेक अडचणी येतात. त्यावर उपाययोजना व्हावी. याकरिता मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळाची आणि २० हजार रुपये अर्थसाहाय्य देण्याची संकल्पना पुढे आली आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आळंदी येथे दर्शन घेऊन त्या पालखीची सुरुवात केली आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस हे देखील पुणे येथे गेले होते. मला तेथे जाता आले नाही. उद्या बारामती येथे पालखी मुक्कामाला येणार आहे. परवा मी सकाळपासून पालखीसोबत काठेवाडी येथे चालत जाणार आहे. आपणसुद्धा यात सहभागी झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे माझ्यासोबत आले तर मी त्यांना निश्चितपणे घेऊन जाईन. जागतिक नामांकन मिळाले पाहिजे, अशी या वारीला परंपरा लाभली आहे. युनेस्कोकडे याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छितो. आतापर्यंत अनेक मुख्यमंत्री झाले आहेत. आम्हीदेखील मागच्या काळात सरकारमध्ये होतो. वारीला येणाऱ्या मोठ्या समाजाबद्दल अ◌ापुलकी, आपलेपणा, जिव्हाळा दाखविण्याचे काम या सरकारने माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली केले आहे. देहू ते पंढरपूर, आळंदी ते पंढरपूर हे पालखी मार्ग मोठा

करण्याचे काम सुरू आहे. ते राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडचे काम आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी ते केले आहे. आता झाला तसा विचार या अगोदर कधी झाला नाही, हे आपण विसरून जातो परंतु मला वाटते की ते लक्षात ठेवले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पावर बोलताना अनेकदा सांगितले गेले की, हा चुनावी जुमला आहे. हे अमुक आहे... हे तमुक आहे... यांना आताच कसे सुचले ? मला वाटते की कोणतेही राज्यकर्ते सरकार चालविताना दरवर्षी काही नवनवीन योजना आणि कार्यक्रम देण्याचा प्रयत्न करीत असतात. आपल्या सर्वांनाच माहिती आहे की, राज्यातील महिला आणि मुली सक्षम झाल्या पाहिजेत, हा विचार केंद्रस्थानी ठेवून सरकारने काही योजनांची घोषणा केली आहे. खरे तर, विरोधी पक्षाने या गोष्टीचे स्वागत करायला पाहिजे होते. परंतु तसे न करता त्यांनी या योजनेलाही विरोध केला आणि आमची थट्टा केला. अर्थात, विरोधी पक्षाचा तो अधिकार आहे. परंतु राज्यातील चित्र वेगळे आहे. राज्यातील महिला आणि सर्वसामान्यांनी या योजनेचे मनापासून स्वागत केले आहे. 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजने'चे ताजे उदाहरण आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी माता-भगिनींनी अक्षरशः रांगा लावल्या आहेत. पहिल्या दिवशी आम्ही या योजनेचा लाभ २१ ते ६० वर्षे वयोगटातील महिला-भगिनींना देण्यात येईल असे सांगितले होते आणि अर्ज करण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली होती. त्यावेळी नोंदणी केंद्रांवर महिलांच्या रांगा लागल्या होत्या. काही गोष्टी चुकीच्या झाल्या, हेही मान्य आहे. काही ठिकाणी काही लोकांनी पैसे घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात आली. त्याच वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी काही गोष्टी सांगितल्या आणि आजदेखील या उत्तराच्या निमित्ताने मी राज्यातील तमाम माता-भगिनींना, मुलींना म्हणजे या योजनेच्या लाभार्थ्यांना सांगू इच्छितो की, या योजनेचा लाभ मिळण्यासाठी कोणालाही १ रुपयाची दमडीही देऊ नका. देण्याचे अजिबात कारण नाही. कोणी मागणी केल्यास ती बाब आमच्या लक्षात आणून द्या. एखादी नवीन योजना आणल्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी राहत असतात. या योजनेमध्येदेखील आमच्याकडून काही त्रुटी राहिल्या.आमच्या सहकाऱ्यांनी आणि भगिनीवर्गाने आमच्या लक्षात आणून दिले की, २१ ते ६० वर्षे वयोगटातील महिला-भगिनींना या योजनेचा लाभ दिला तर ६० ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांसाठी कुठलीही योजना नाही. ६० ते ६५ वयोगटातील वयस्कर महिलांनाही मदतीची गरज असते. ही बाब विचारात घेऊन आम्ही तात्काळ या योजनेच्या लाभार्थ्यांची वयाची अट २१ ते ६५ वर्षे अशी केली. काही लोकांना तेवढीच सवय असते की, कुठेतरी काहीतरी करायचे, त्याचा व्हिडीओ काढायचा आणि तो समाजमाध्यमांवर टाकायचा. तेवढाच उद्योग आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, ते उद्योग सोडून द्या. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, इतर खूप काही उद्योग करता येतात. वेगवेगळी कामे दाखविता येतात... (अडथळा...) आमचे म्हणणे आहे की, आम्ही एवढे जीव तोडून सांगतो... आमच्या पाठीला डोळे नाहीत. चांद्यापासून बांद्यापर्यंत लक्ष ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत, अधिकाऱ्यांना सतर्क करण्याचा प्रयत्न करीत आहोत, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्याचा प्रयत्न करीत आहोत, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि प्रशासनाला कडक भाषेमध्ये जे सांगायचे तेही सांगत आहोत. माझी माता-भगिनींना आणि मुलींना पुन्हा विनंती आहे की, या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणालाही एक रुपयाही देण्याची गरज नाही. या योजनेचे पैसे थेट तुमच्या खात्यावर जमा केले जाणार आहेत. जुलै महिन्यात

पैसे आले नाहीत आणि ऑगस्ट महिन्यामध्ये आले तरी १ जुलैपासूनचे पैसे मिळतील. त्यामुळे काळजी करण्याचे काहीही कारण नाही. या योजनेच्या अंमलबजावणीचा संपूर्ण कार्यक्रम आम्ही तयार केलेला आहे... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यभर लाभार्थी महिलांच्या रांगा लागल्यानंतर आम्ही अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली. त्याबाबत विरोधी पक्षाला देखील या सभागृहामध्ये माहिती देण्यात आली.

अध्यक्ष महोदय, शासकीय दस्तावेजांवर आईचे नाव बंधनकारक करण्याचा निर्णय घेऊन महिलांना सन्मान मिळवून देण्याचा आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केला. महिलांबद्दल सर्वांनाच मान-सन्मान आहे. एक गोष्ट मान्य करावी लागेल की, केंद्रामध्ये आतापर्यंत अनेक सरकारे आली परंतु महिलांना संसदेमध्ये राखीव जागा ठेवण्याचे विधेयक कोणालाही मंजूर करता आले नाही. ते विधेयक माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मंजूर करून सन २०२९ च्या निवडणुकांपासून महिलांसाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली. माझे मत आहे की, आपण वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे. नवीन कायद्यानुसार आपल्या राज्यातील महिलांनाही संसदेमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळेल.

अध्यक्ष महोदय, लेक लाडकी योजना, मोफत सिलेंडर देण्यासाठी अन्नपूर्णा योजना, पिंक ई-रिक्षा, शुभमंगल सामूहिक विवाह, महिलांसाठी स्टार्ट अप, जल जीवन मिशन, लखपती दीदी, मुलींना मोफत उच्च शिक्षण, महिलांच्या आरोग्याच्या योजना या सर्व योजना महिलांना आधार देणाऱ्या आहेत. समाजामध्ये ५० टक्के भगिनीवर्ग आहे. त्यांना ज्या पद्धतीने मदत व्हायला पाहिजे त्या पद्धतीनेच मदत करण्याचा प्रयत्न या सरकारने केलेला आहे. मला विश्वास आहे की, महिला आणि मुलींकडून या प्रत्येक योजनेचे स्वागत होईल व महाराष्ट्रातील आया-बहिणींना यातून सन्मान मिळेल.

अध्यक्ष महोदय, मी या निमित्ताने आजही सभागृहाला सांगतो की, यापुढेही आपल्याला जर वाटले की एखाद्या योजनेमध्ये काही दुरुस्ती करण्याची गरज आहे तर त्यासाठी हे महायुतीचे सरकार सकारात्मक आहे. आम्ही निश्चितपणे आया-बहिणींची आणि मुलींची अडचण दूर करण्याचा प्रयत्न करू.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य यापूर्वी सत्तेमध्ये होते व आता आम्ही सत्तेत आहोत. त्यामुळे आपणा सर्वांनाच माहिती आहे की, कोणतीही योजना नव्याने सुरू केल्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी राहतात. आपण त्यात आवश्यकतेप्रमाणे सुधारणा करीत असतो. या योजनेमध्येदेखील निकष बदलण्याची आणि कालमर्यादा वाढविण्याची आवश्यकता होती. त्याबाबत निर्णय घेण्यास सरकारने एक दिवसाचाही विलंब न लावता कार्यवाही केली आहे. मी विश्वासाने सांगतो की, शेवटच्या पायरीवरील महिला, परित्यक्ता, विधवा, घटस्फोटित, निराधार, घरेलू कामगार महिला आणि आदिवासी, डोंगराळ, दुर्गम भागातील हाताला काम नसलेल्या महिलांना 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना' एक आधार निर्माण करेल. यासाठी महिला भगिनी सरकारला आशीर्वाद देतील. या योजनेसाठी सरकारने ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ही तरतूद कमी आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्यांमध्ये मी ही तरतूद वाढवून देणार आहे. त्याची खात्री मी सभागृहाला देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, आम्ही १० हजार पिंक ई- रिक्षा खरेदीसाठी योजना जाहीर केली. त्यामध्ये १७ शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे. काही सन्माननीय सदस्यांच्या शहरांचा यामध्ये समावेश नसेल व तेथे पिंक ई-रिक्षा देण्याची गरज असेल तर या योजनेचा विस्तार मी आता जाहीर करीत आहे. या योजनेचा विस्तार जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत महिला व बालकल्याणासाठीच्या ३ टक्के निधीतून जिल्हा व तालुका स्तरावर करण्यात येईल. यामध्ये प्रत्येक जिल्ह्याचे आकारमान पाहून ५०० पर्यंत रिक्षा घेऊ शकता. त्यासाठी १० टक्के निधी जिल्हा विकास व नियोजन समितीचा असेल, २० टक्के लाभार्थी हिस्सा आणि ७० टक्के निधी बँकेकडून मिळेल. ही ई-रिक्षा असल्यामुळे तिला डिझेल किंवा पेट्रोलची आवश्यकता नाही. फक्त चार्जिंग करून ही पिंक ई- रिक्षा चालवायची. समजा वाशिम जिल्ह्यामध्ये पिंक ई- रिक्षा हव्या असतील तर त्या जिल्ह्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये प्रत्येकी किती पिंक ई-रिक्षा आवश्यक आहेत त्या पाहाव्यात. नाहीतर असे व्हायला नको की, रिक्षांच्या संख्येमध्ये अवाच्या सव्वा वाढ होऊन कोणाचाच धंदा होणार नाही. सर्वांचाच धंदा बसवून टाकाल. शहरांचा आवाका बघून तेथील किती महिलांना रिक्षा दिल्या तर अगोदरच्या रिक्षाधारकांच्याही व्यवसायावर गदा येणार नाही आणि नवीन रिक्षाधारकांनाही व्यवसाय मिळेल याची दक्षता घ्यावी. प्रत्येक पालकमंत्री महोदयांना याबाबतचे अधिकार दिलेले आहेत.

राज्यातील १७ शहरांना १० हजार पिंक ई- रिक्षा देण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. या माध्यमातून महिला भगिनी स्वयंपूर्ण होतील. त्यांना या रिक्षासाठी प्रत्येक महिन्याला ६ हजार ५०० रुपये खर्च आहे. म्हणजे सरासरी दररोज सुमारे २०० रुपये बाजूला काढून ठेवावे लागतील. ई-रिक्षा असल्यामुळे डिझेल किंवा पेट्रोलचा खर्च शून्य आहे. एकूणच ही योजना अतिशय चांगली आहे. पिंक ई-रिक्षा याचा अर्थ ती रिक्षा महिलाच चालवतील. रात्री उशिरा एखादी महिला भगिनी घरी जात असेल तर पिंक ई-रिक्षा पाहून ती विश्वासाने त्यात बसू शकते. कारण महिला रिक्षाचालक दुसऱ्या महिलांना सुरक्षितपणे घेऊन जातील. अशा प्रकारे ही अतिशय चांगली योजना आणली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 'महिलांना १ हजार ५०० रुपये काय देत आहात, ५ हजार रुपये द्या.' मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही तर दमडीही दिली नाही आणि आम्हाला कुठे ५ हजार रुपये देण्याबाबत सांगत आहात ? शेवटी स्वतःच्या खिशामध्ये किती पैसे आहेत ते पाहूनच ओवाळणी टाकावी लागते. खिसाच मोकळा आणि फाटका असेल तर त्यातून दमडी तरी देता येईल काय ? सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे मला विशेष वाटते. कारण त्यांनी सांगितले की, केंद्रामध्ये आमचे सरकार आले असते तर आम्ही प्रत्येक महिलेला प्रत्येक वर्षी १ लाख रुपये देणार होतो. १ लाख रुपये प्रत्येक वर्षी म्हणजे महिन्याला सुमारे ८ हजार ५०० रुपये होतात... (अडथळा...) आम्ही महिन्याला दीड हजार रुपये तर वर्षाला १८ हजार रुपये देतो. त्या १८ हजार रुपयांपोटी शासनाला ४६ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. अडीच कोटी महिलांचा विचार केला तर... सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण असे म्हणाले की, आमचे सरकार आल्यानंतर आम्ही महिलांना वर्षाला १ लाख रुपये देऊ.

**श्री. पृथ्वीराज चव्हाण (खाली बसून) :** अध्यक्ष महोदय, ...

**श्री. अजित पवार :** काल आपण आपल्या भाषणातून देणार म्हणून सांगितले असून ते रेकॉर्डवर

आहे. महिन्याला साडेआठ हजार रुपये द्यायचे म्हटले तर वर्षाला १ लाख रुपये होतात आणि त्याचा हिशेब केला तर आपल्याला अडीच लाख कोटी रुपये लागतील. त्यामुळे आपले बजेट किती रुपयांचे आहे... त्यामुळे लोकांना पटेल असे काही तरी सांगा. (अडथळा...)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**श्री. अजित पवार :** आता थांबा. आपल्याला Right to reply वर बोलता येईल.

अध्यक्ष महोदय, मला महाराष्ट्रातील सर्व आया-बहिणींना सांगायचे आहे की, मी दहा वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे. मी कधी खोटे बोलत नाही. मी शब्दाचा पक्का आहे. 'हा अजित पवारचा वादा आहे, असा तसा वादा नाही.'

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष (श्री. समाधान आवताडे) :** मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, माननीय उपमुख्यमंत्री यांचे बोलणे पूर्ण होऊ द्यावे.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले की, वर्षाला १ लाख रुपये देतो. त्याचा हिशेब काढला तर... सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपणही विचार करा.

**ॲड. यशोमती ठाकूर (खाली बसून) :** ते केंद्रातील आहे.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्या ॲड. यशोमती ठाकूर यांना सांगू इच्छितो की, काल सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी आपल्या भाषणातून म्हटले की, आम्ही आता विधानसभेला देखील जाहीरनाम्यामध्ये ते आणणार आहे. मी आपल्याला रेकॉर्ड काढून दाखवितो.

**श्री. पृथ्वीराज चव्हाण :** एक लाख रुपये काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यातील घोषणा आहे.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण सांगतात त्याप्रमाणे केंद्रातील योजना असली तरी हिशेब करा आणि आपले १० टक्के धरले आणि १०० टक्के तिकडच्या महिला धरल्या तर २५ लाख कोटी रुपये होतात. आपल्या देशाचे आणि राज्याचे GST चे उत्पन्न २२ लाख कोटी इतके आहे. अन् हे म्हणतात की, २५ लाख कोटी देण्यात येतील. म्हणजे न पटेल असे काहीही बोलतात. मला त्यांनी सांगितले की, 'लबाडाघरचे आवतण जेवल्याशिवाय खरे कळत नाही.' तसे त्यांचे आहे.

अध्यक्ष महोदय, सन २००३-०४ मध्ये तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे होते. त्यावेळी आम्हीदेखील त्या सरकारमध्ये होतो. पण तेव्हा आमचे जास्त चालत नव्हते. आम्ही तेव्हा ज्येष्ठ नव्हतो. मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण दुसऱ्या लाइनमध्ये तेव्हा बसत होतो. त्यावेळी मोफत वीज बिल देण्याचा निर्णय घेतला. एक बिल मोफत दिले आणि त्यानंतर सरकार आल्यावर म्हणाले की, 'ही चुनावी घोषणा होती, ते खरे नव्हते' आणि त्यानंतर ते मागे घेण्यात आले. ही गोष्ट खरी आहे. मी त्याचा साक्षीदार आहे. म्हणून मला महाराष्ट्राला सांगायचे आहे की, मागे त्यांनी ती घोषणा पूर्ण

केली नाही. पण मी आज सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही १ HP पासून ७.५० HP पर्यंत वीज बिल माफ केले आहे. ते काही एका बिलाकरिता नाही तर पुढे कायम ठेवायचे आहे. आम्हीच ती योजना राबविणार आहोत म्हणून आम्हालाच पुन्हा या बाकावर पाठवायचे आहे तर ती योजना कायमस्वरूपी होईल. यांना पाठविले तर हे ती योजना मागे घेतील. म्हणून यांना या ठिकाणी पाठवून काही उपयोग नाही.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगतो की, मी आणि उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत फार बारकाईने अभ्यास केला. तुम्ही म्हणाल की, पुढे कसे करणार आहात ? काल त्याबाबत उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आपण ९ हजार मेगावॅट वीज सौर ऊर्जेवर तयार करीत आहोत. त्यासाठी सर्व जमिनी वगैरे दिल्या आहेत आणि त्यांच्या निविदाही निघाल्या आहेत. तेवढी वीज आपल्याला प्रति युनिट २.८० ते ३.०० रुपयांनी मिळणार आहे. आताच्या विजेकरिता आपल्याला ७ रुपये द्यावे लागतात. शेतकऱ्यांना अनुदान देणे वगैरे हा सर्व भार शासनाला सहन करावा लागतो. ही वीज देताना त्यातील १४ हजार कोटी रुपयांचा भार राज्य शासनाने उचलला आहे. परंतु दर वर्षी हा भार १४ हजारानंतर १३ हजार आणि १२ हजार कोटींच्या प्रमाणात कमी कमी होत जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, काल या सभागृहाला स्वतः ऊर्जामंत्री महोदयांनी सांगितले आहे की, या गोष्टीला दीड वर्षे लागणार आहेत. त्यामुळे ती कामे जोरात सुरू आहेत. त्या उद्योगपतींना केंद्र शासनाकडून ३० टक्के अनुदान मिळवायचे आणि ते अनुदान मिळविण्याकरिता त्यांना तो प्रकल्प मर्यादित काळात मार्गी लावणे गरजेचे आहे. जमीन आपणच त्यांना दिलेली आहे. त्यामुळे तो प्रश्न उद्‌भवला नाही. म्हणून आता त्यांनी सांगितलेला 'चुनावी जुमला' आहे. आम्ही सांगितलेला 'चुनावी जुमला' नाही, हे देखील मी सभागृहाला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, गॅस सिलेंडर ५००/- रुपयांमध्ये देण्याचा विचार करावा. उलट मला सभागृहाला आणि या सभागृहाच्या मार्फत संपूर्ण राज्याला सांगायचे आहे की, आम्ही ज्या चांगल्या चांगल्या योजना दिलेल्या आहेत त्या लोकोपयोगी योजना आहेत, लोकांचे भले करणाऱ्या योजना आहेत. परंतु त्यामध्ये जाणीवपूर्वक आडकाठी घालण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जातो. महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर जशी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २०१६ पासून देशपातळीवर सुरू आहे. तशाच प्रकारे मे २०२४ पर्यंत या योजनेतून ५२ लाख १६ हजार कुटुंबांची गॅस सिलेंडरची जोडणी झाली आहे. याचा विचार करता आम्ही राज्यातील ५२ लाख १६ हजार कुटुंबांना राज्य सरकारतर्फे ३ गॅस सिलेंडर मोफत देणार आहोत. खुल्या बाजारात त्या सिलेंडरची किंमत ८३०/- रुपये आहे. म्हणजे उज्ज्वलामधून लाभार्थ्यांना ३०० /- रुपये केंद्र शासन देते. त्यातून १२ सिलेंडरमागे त्यांना लाभार्थ्यांना ५३०/- रुपये द्यावे लागतात. आम्ही ८३०/- रुपये देतो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले की, मोफत सिलेंडर देण्याऐवजी त्या सिलेंडरची किंमत ५००/- रुपये करावी. तसे केले तर ३०/- रुपयांप्रमाणे फक्त १२ महिन्यांचे ३६०/- रुपयेच त्या महिलेला फायदा मिळतो. आम्ही ८३०/- रुपये देतो म्हणजे त्यातून ३०० /- रुपये वजा केले तरी ५३०/- रुपयांनाच लाभार्थ्यांना सिलेंडर

पडतो. त्यामध्ये ३६०/- त्यांचा फायदा होतो. या योजनेकरिता आम्ही ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही रक्कम थेट त्यांच्या बँकेतील खात्यावर जमा होणार आहे. मध्ये कोणी तरी त्यात गडबड केली असे समोर येणार नाही.

अध्यक्ष महोदय, सर्व घटकांचा विचार करीत असताना आमच्या लक्षात युवा पिढी आली. युवक आणि युवतींचा विचार करताना त्यांनी पदवी घेतल्यानंतर किंवा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना लगेच नोकरीची संधी मिळत नाही. त्यामुळे बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टीने आम्ही मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली. या योजनेतून प्रशिक्षण देत असताना सुमारे १० लाख युवा-युवतींचा त्यामध्ये समावेश होणार आहे. त्यांनी वर्षभर या योजनेचा लाभ घ्यायचा. त्यानंतर ते बाजूला होतील आणि पुढच्या वर्षी नवीन १० लाख युवक-युवती त्यामध्ये समाविष्ट केल्या जाईल. असे करत करत आम्ही ही योजना सुरू ठेवणार आहोत. १ वर्षे त्यांनी apprenticeship केल्यानंतर कदाचित ते कंपनीवालेच म्हणतील की, हा चांगला मुलगा किंवा मुलगी आहे. त्यामुळे तो त्याच्या कंपनीत कामाला लावून घेईन किंवा त्याला अनुभव आल्यानंतर त्याचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यातून तो स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकेल किंवा तो दुसऱ्या कंपनीत देखील सांगू शकेल की, मला १ वर्षे कामाचा अनुभव आहे. म्हणजे माझी पाटी कोरी नाही. मला अनुभव आहे. अशा प्रकारे बेरोजगारी कमी करण्याचा मोठा क्रांतिकारी निर्णय या महायुतीच्या शासनाने घेतला आहे. मूळ चांगल्या योजनेकडे दुर्लक्ष करून विरोधकांनी टीका जरी केली तरीही राज्यातील युवकांसाठी रोजगाराची संधी निर्माण झाली आहे, ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, मुलींना मोफत शिक्षण ही योजना फसवी असल्याचे माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले. ही योजना फसवी आहे, असे माननीय विरोधी पक्षनेते कसे काय म्हणाले ते मला कळत नाही. या योजनेतून २ लाख ५ हजार मुलींना फायदा होणार आहे. त्या शेतकरी आणि गरिबांच्या मुली असतील, त्यात सगळ्या जाती धर्मांच्या मुली असतील. पण येथे वेगळ्या प्रकारचा Fake Narrative set करण्याकरिता सांगितले जाते की, अमक्या समाजाला लाभ दिला नाही, तमक्या समाजाला लाभ दिला नाही. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, या सर्व योजना सर्व जाती धर्मांच्या लोकांसाठी शासनाने राबविण्याचा निर्धार केला आहे. यामध्ये आदिवासी, मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांबरोबरच अठरापगड जातीच्या लोकांचा समावेश आहे. अल्पसंख्याक लोकांचाही यामध्ये समावेश आहे. (अडथळा...)

भावांनाही रोजगाराच्या माध्यमातून लाभ देण्याचा या शासनाने प्रयत्न केला आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारने भावांना काय काय दिले, हे थोड्या वेळातच सांगणार आहे. हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. हवामान बदलाचा परिणाम शेतीवर होतो. सातत्याने येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे माझा शेतकरी बळीराजा नेहमी अडचणीमध्ये येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने धाडसी निर्णय घेतले आहेत. ते निर्णय आमच्या भावांसाठी, वडिलांसाठीच आहेत. नमो शेतकरी सन्मान योजना, भावांसाठी नाही काय, गोपीनाथ मुंडे काय, एक रुपयांत पीक विमा योजना, ही भावांसाठी नाही काय, शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, भावांसाठी नाही काय, शेतकऱ्यांना शून्य टक्के दराने पीक कर्ज उपलब्ध करून देणे, ही योजना भावांसाठी नाही काय, बियाणांवरील अनुदान, पीक कर्ज, नुकसानभरपाई या योजना भावांसाठी नाहीत काय, हमी भावाने मालाची खरेदी यासारख्या योजना

आमच्या भावांसाठी नाहीत काय ? या सर्व योजना आणखी सक्षमपणे राबविण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. या व्यतिरिक्त आणखी काही धाडसी निर्णय घेण्याची गरज होती. त्यामुळे अतिशय विचारपूर्वक माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व माझ्या सरकारने काही सवलती व योजना शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, नमो शेतकरी सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून आजपर्यंत ९२ लाख ४३ हजार शेतकऱ्यांना ५ हजार ३१८ कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. हे अनुदान भावांसाठी नाही काय ? गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेच्या माध्यमातून २ हजार ६९४ शेतकऱ्यांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे वाटप केले आहे. कर्ज मुक्ती योजनेच्या माध्यमातून १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना ५ हजार १९० कोटी रुपयांचे वाटप केले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना कोणतीही मदत दिली नाही, असे विरोधी पक्षाकडून वारंवार सांगितले जाते. परंतु मी आपल्यासह सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्य सरकारने दुष्काळापोटी शेतकऱ्यांना ४ हजार कोटी रुपयांचे वाटप केले आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेसाठी ६ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. एका रुपयात पीक विमा योजनेपोटी ५ हजार ५०० कोटी रुपये राज्य शासनाने विमा कंपन्यांना दिलेले आहेत. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजार रुपयांचे अनुदान देत आहोत. मागील काळात राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जवळपास ८५० कोटी रुपयांचे वाटप केले आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांतील धान उत्पादक शेतकऱ्यांना २२ कोटी रुपये अनुदान दिले आहे. तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३०० कोटी रुपये अनुदान दिले आहे. तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध पावडर निर्यात करण्यास परवानगी देण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळ घेत आहे. त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या दुधाला प्रति लिटर ५ रुपये भाव वाढवून दिला आहे. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्यासाठी १५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. असे मिळून जवळपास ४० हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले आहेत. तरीदेखील राज्यातील शेतकऱ्यांना शासनाने मदत केली नाही, असा आरोप विरोधी पक्षाकडून केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या तमाम बळीराजाला माझी विनंती आहे की, राज्य सरकार तुमच्या पाठीशी आहे. त्यामुळे आपण कृपाकरून आत्महत्येचा विचार करू नका. जे जे तुमच्यासाठी करणे शक्य आहे, ते ते महायुती सरकारने केले आहे. त्यामुळे राज्यातील कोणत्याही शेतकऱ्यांनी मनामध्ये भीतीची भावना आणू नये. राज्य सरकार खंबीरपणे तुमच्या पाठीशी आहे. आपल्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडून आत्महत्येचा विचार करू नका, अशी माझी कळकळीची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने सिंचनाबरोबर नैसर्गिक आपत्तीला देखील प्राधान्य दिले आहे. कांदा उत्पादकांसाठी २०० कोटी व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी २०० कोटी असा एकूण ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सोलार पंप उपलब्ध करून द्यावा, अशी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विनंती केली आहे. त्याचबरोबर अनेक शेतकरीदेखील अशीच मागणी करीत आहेत. परंतु यामध्ये अडचण अशी आहे की, शेतकऱ्यांकडील जुन्या मोटारी या विजेवर चालणाऱ्या आहेत. त्यांच्या शेजारच्या शेतकऱ्याने सोलार पंप घेतला तर तो पंप दिवसभर चालतो. परंतु विजेवर चालणारा

पंप दिवसभर चालू शकत नाही. कारण महावितरणकडून निम्मे दिवस रात्री व निम्मे दिवस दिवसा वीज पुरवठा केला जातो. आम्हाला सर्वच शेतकऱ्यांना सोलार पंप द्यायचे आहेत. परंतु त्यासाठी काही शेतकऱ्यांना दीड वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. सध्या ८ लाख ५० हजार सोलार पंप उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यामध्ये राज्य सरकार भावांसाठी फार महत्त्वाची जबाबदारी उचलत आहे, ती बाब सभागृहाने लक्षात घ्यावी, अशी मी विनंती करतो. ३ अश्वशक्ती क्षमतेची सोलारवर चालणारी मोटार २ लाख ३० हजार रुपयांना, ५ अश्वशक्ती क्षमतेची सोलावर चालणारी मोटार ३ लाख २० हजार रुपयांना, ७.५ अश्वशक्ती क्षमतेची मोटार ४ लाख ५० हजार रुपयांना आहे. परंतु अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांनी ५ टक्के व इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांनी १० टक्के रक्कम भरल्यानंतर त्यांना सोलारवर चालणारी मोटार उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एकूण १०० टक्क्यांपैकी संबंधित शेतकरी ५ व १० टक्के, केंद्र सरकार ३० टक्के व उर्वरित ६० व ६५ टक्के रक्कम राज्य सरकार भरणार आहे. देशातील कोणत्याही राज्यामध्ये ही योजना नाही. या योजनेचा लाभ ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना होणार आहे. दीड वर्षानंतर उर्वरित सर्वच शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. हा फार मोठा आणि क्रांतिकारी निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एवढे वीज बिल कसे भरू, बिल भरले नाही तर माझी वीज खंडित केली जाईल, आता मला आत्महत्येशिवाय पर्याय नाही, असा विचार कोणत्याही शेतकऱ्याला करण्याची गरज नाही. कारण महायुतीचे सरकार तुमचे आहे. हे सरकार सर्वसामान्य जनतेचे आहे. त्यामुळे आता कोणीही आत्महत्या करण्याचे कारण नाही. (अडथळा... ) ५ हजार कोटी रुपये दिले आहेत. तुम्ही सारखेच काय रडता? राज्य सरकारने ९ हजार मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यातून ८ लाख ५० हजार कृषी पंपाना वीज जोडणी दिली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, शेळी-मेंढी, कुक्कुटपालन यांच्यासह समाजातील सर्वच घटकांसाठी योजना आणलेल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी 'अटल बांबू समृद्ध योजना' ही एक योजना आणलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून १० हजार हेक्टरवर बांबू लावणार आहोत. (अडथळा...) मी शेतकरी आहे. ग्रामीण भागामध्ये उसाची लागवड करतो, असे कोणीही म्हणत नाही. आम्ही ऊस लावला किंवा लावणार आहे, असेच म्हणतात. जसे ऊस लावतो म्हणतात तसे मी बांबू लावणार आहे, असे म्हटले आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रतिरोप १७५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. नंदुरबार जिल्ह्यामध्ये १ लाख २० हजार क्षेत्रावर बांबूची लागवड केली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने पायाभूत सुविधांमध्येदेखील वाढ केलेली आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी आवश्यक निर्णय घेतलेले आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी बेरोजगारीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन २०२०-२०२१ मध्ये बेरोजगारीचा दर ३.७ टक्के होता. सन २०२१-२०२२ मध्ये तो दर ३.५ टक्के होता. सन २०२२-२०२३ मध्ये ३.१ टक्के होता. यावरून आपल्या लक्षात येईल की, बेरोजगारीचा दरदेखील कमी होत आहे. या सर्व योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर ती टक्केवारी अजून कमी होईल.

अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, उद्योग विभागाचे मंत्रिमहोदय या संदर्भातील श्वेतपत्रिका काढणार आहेत. महाराष्ट्रामध्ये उद्योग येत नाहीत, असे वारंवार म्हटले जात आहे. बल्क ड्रग पार्कसंदर्भात सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. परंतु मी आपणास सांगू इच्छितो की, गुजरात, आंध्र

प्रदेश व हिमाचल प्रदेश या तीन राज्यांतून बल्क ड्रग पार्कसाठी गुजरात राज्याची निवड झाली. असे असले तरी हा प्रकल्प राज्य सरकारच्या निधीतून करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रियादेखील सुरू केलेली आहे. टाटा एअर बस प्रकल्पासंदर्भात महाराष्ट्र राज्याच्या उद्योग विभागाचा केंद्रीय उद्योग मंत्रालयाशी कोणताही पत्रव्यवहार झाला नव्हता किंवा टाटा कंपनी यांच्याशी देखील झाला नव्हता. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रकल्प इतर राज्यांत गेला, अशी चुकीची माहिती सांगू नका. त्याचबरोबर Saffron Project देखील कधीही महाराष्ट्रामध्ये आलेला नाही. माननीय केंद्रीय मंत्री श्री. राजनाथ सिंह यांनी तो Project हैदराबाद येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. याचा अर्थ राज्यातील कोणताही प्रकल्प बाहेर गेला नाही. उलट राज्य शासन वेगवेगळे प्रकल्प महाराष्ट्रामध्ये आणत आहे. महाराष्ट्र राज्यात ७७ हजार २०० कोटी रुपये किमतीचा वाढवण बंदर प्रकल्प आला नाही काय ? या प्रकल्पाच्या माध्यमातून १० ते १२ लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. तो प्रकल्प सुरू होईपर्यंत जवळपास १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल. केंद्र सरकार या प्रकल्पासाठी ७० टक्के रक्कम देणार आहे. ७० हजार कोटी रुपये कशाला म्हणतात?

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र हे परदेशी गुंतवणुकीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. हे सांगून सांगून दमलो आहे, तरी आपण ऐकायला तयार नाही. आपण फक्त नाही, नाही, नाही, असेच म्हणत आहात. परंतु मी आपणास सांगू इच्छितो की, आता आपण डिक्शनरीमधील नाही, नाही हा शब्द काढून टाका आणि होय, होय म्हणायला शिका. अमरावती टेक्सटाइल पार्कमध्ये अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्राला... १०७६ हेक्टर क्षेत्रावर वस्त्रोद्योग संकुल विकसित करण्यात आले आहे. त्यामध्येही आता १६ कारखान्यांचे उत्पादन सुरू आहे. इतर काही कारखाने पाइपलाइनमध्ये आहेत.

अध्यक्ष महोदय, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना अशा अनेक योजना सर्व जातिधर्माच्या लोकांकरिता हे सरकार राबवीत आहे. पुढील ५ वर्षांत ३५ लाख ४० हजार घरकुले बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी अर्थसंकल्पात ७४००. नाही हो साडेबाराला सुरू झाले आहे. अहो ७० लोक बोलल्यावर तेवढा वेळ लागणारच ना. निधी उभारण्यासाठीही आम्ही हा सर्व पैसा देत आहोत.

अध्यक्ष महोदय, पेट्रोल, डिझेलबाबतदेखील आम्ही मुंबई, ठाणे, नवी मुंबईमध्ये पेट्रोलला ६५ पैसे व डिझेलला २ रुपये, ६० पैसे .... अरे समजले तरी सारखे-सारखे सांगावे लागते तेव्हा तुमच्या डोक्श्यात शिरतंय...(हशा)... आम्ही एकदा सांगून निवांत होतोय, तो तुम्ही लगेच आमच्या मागे 'फेक नरेटिव्ह', 'फेक नरेटिव्ह' करू लागता. आता आम्हालाही समजले आहे, आता निवडणुका होईपर्यंत हेच ऐकायचे आहे. लोकांच्या डोक्यात सारखे बिंबवणार आहे. काळजीच करू नका.

अध्यक्ष महोदय, मोठ्या प्रकल्पांसाठी निधीची उपलब्धतादेखील करीत आहोत. महागाई भत्त्यामध्ये आम्ही वाढ केलेली आहे. सीमा भागातील शाळांना आर्थिक मदत, सीमावासीयांना आवश्यक ती सर्व मदत करण्याचा तसेच, या लढ्यात त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे. त्या

भागात ज्या मराठी शाळा आहेत, तेथे भरीव आर्थिक मदत केली जाईल. तशा पद्धतीने पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली जाईल, हे देखील मी जाहीर करतो.

अध्यक्ष महोदय, मधल्या काळात ५ टक्के क्रीडापटूंना नोकरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला. काही काही जण खेळामध्ये खूप नाव कमवितात. ते आपल्या देशाचे, राज्याचे, त्यांच्या कुटुंबाचेही नाव मोठे करतात. प्रावीण्यप्राप्त खेळाडूंना थेट नियुक्तीबाबत सांगावयाचे झाले तर श्रीमती कविता राऊत किंवा इतर अनेक सन्माननीय खेळाडूंबाबत परवाच कॅबिनेटने एक निर्णय घेतला. खेळाडूंच्या थेट नियुक्तीसाठी पात्र क्रीडा स्पर्धा व क्रीडा अर्हता यामध्ये सुधारणा करण्यात आली. खेळाडूंना त्यांच्या अर्हतेनुसार क्लास १. क्लास २. क्लास ३ मधील संवर्गात नियुक्तीसाठी ५५१ पदांच्या आकृतिबंधाला शासनाने मान्यता दिलेली आहे. काही टॉपचे खेळाडू थोडेसे नाराज होते. काही जण इतर राज्यांत गेले. त्यामुळे राज्य सरकारने हा फार महत्त्वाचा निर्णय त्यांच्याकरिता घेतला आहे. आता त्यांना त्यांच्या क्वॉलिफिकेशनप्रमाणे क्लास १. क्लास २. क्लास ३ मधील संवर्गात नोकऱ्या मिळतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनय कोरे व सर्वच कोल्हापूरवासीयांनी जोतिबा प्राधिकरण स्थापन करण्याबाबत मागणी केली होती. श्री जोतिबा मंदिर परिसराचा खूप चांगला आराखडा तयार केला आहे. त्याच्या आजूबाजूच्या डोंगर परिसरातील गावांचा विकास आराखडा तयार करण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन प्राधिकरणाची आवश्यकता आहे, यावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे. मी या उत्तराच्या भाषणात श्री जोतिबा मंदिर व परिसर विकास उत्कर्ष प्राधिकरणाची स्थापना करण्यात येईल, असे जाहीर करतो.

अध्यक्ष महोदय, तसेच, जगद्‌गुरु संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर, नाशिकबाबत नाशिकमधील सर्वच सन्माननीय सदस्यांची सतत मागणी होती. जगद्‌गुरु संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज हे वारकरी संप्रदायातील संतांचे मोठे गुरुबंधू मानले जातात. त्यांच्या समाधिस्थळ असलेल्या ठिकाणी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखडा तयार करून त्यासदेखील आवश्यक तो निधी दिला जाईल, हे देखील मी जाहीर करतो. अनेक शिक्षण प्रसारक मंडळ... पुसद यवतमाळ येथे ११० वर्षांपेक्षा जास्त जुनी संस्था आहे. ती फार जुनी संस्था आहे. तेथेदेखील त्यांच्याकरिता इमारत व मूलभूत सोयींकरिता २ कोटी रुपयांचा निधी मी जाहीर करतो.

अध्यक्ष महोदय, अमरावती शहरामध्ये आय.टी. कंपन्यांकरिता 'वर्क फ्रॉम टाऊन' ही संकल्पना अमलात आणण्यासाठी युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याची घोषणादेखील मी आजच्या उत्तराच्या भाषणात करतो. सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता... नाही नाही थोडे अजून राहिले आहे. अहो काही काही थोडक्यात जाते. ५५ पर्यंत आले होते, किती ५६ वर आले होते ना आपले शेवटचे, ४८... त्यामुळे ते राहू द्या, कधी काय होईल सांगता येत नाही.

अध्यक्ष महोदय, सांगली जिल्ह्यात आदर्श शाळा बांधण्यात आलेल्या आहेत. तो प्रकल्प सातारा जिल्ह्यात मुख्यमंत्री महोदय व माननीय मंत्री श्री. शंभुराज देसाई राबवीत आहेत. राज्यात आपण सगळीकडे ही योजना राबवीत आहोत. सर्व पालक मंत्रिमहोदयांना त्याबाबत सांगण्यात आले आहे. सर्व जिल्ह्यांत आदर्श

शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी व ग्रामपंचायतीच्या इमारती उभ्या राहतील. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तेथे ज्या पद्धतीने झाले आहे, त्याचे अनुकरण सगळीकडे करावयाचे आहे. आता इथून पुढे तुम्ही माझे अनुकरण करा. मी तुमचे एक ऐकले. आता, माझे एक ऐका.

अध्यक्ष महोदय, शहीद तुकाराम ओंबळे स्मारक... जावळी तालुक्यात त्यांचे गाव आहे. सन्माननीय सदस्य, छत्रपती श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी त्याबाबत मागणी केली होती. त्याकरिताही निधी दिला जाईल. मी मघाशी सांगितले की, १ लाख ८ हजार ५०६ पदांच्या बाबतीत दिले ना... सातारा जिल्ह्यामध्ये पुनावळे गावातील धरणापासून जवळ येथे एक प्रोजेक्ट आहे. त्यालाही जल पर्यटनाकरिता निधी दिला जाईल, असेही मी जाहीर करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता माझ्या भाषणाचा समारोप करतो. मला सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारानेच चालणारे हे सरकार आहे. कारण नसताना गैरसमज पसरवत जाऊ नका. दुर्बल घटकांचे राहणीमान उंचावले पाहिजे, याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य या अर्थसंकल्पामध्ये आम्ही दिलेले आहे. आदिवासी विकास उपयोजनेतून राबविल्या जाणाऱ्या योजनांना देखील सरकारने कुठेही कधीही निधी कमी पडू दिलेला नाही. आमचा मागासवर्गीय समाज असेल, इतर मागासवर्गीय समाज असेल, विमुक्त जाती, भटक्या जाती, विशेष मागास प्रवर्ग यासाठी देखील निधीची कुठेही कमतरता भासू दिली जाणार नाही. धनगर समाजाच्या आरक्षणात न्यायालयीन आडकाठी आलेली आहे. परंतु, या समाजाला देखील न्याय देण्यासाठी सरकारने आदिवासी समाजासाठी असलेल्या सर्व योजनांचा लाभ धनगर समाजाला देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वसमावेशक विकास हेच या सरकारचे धोरण आहे. त्यामुळे जात, धर्म, पंथ न पाहता सर्व समाजघटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून त्यांचा विकास करण्याचा या सरकारचा प्रयत्न आहे, हे मला या महाराष्ट्रातील तमाम जनतेला सांगावयाचे आहे. अल्पसंख्याक समाजाला देखील या अर्थसंकल्पातून काहीच दिले नाही, अशा प्रकारची दिशाभूल करणारी टीका काही सन्माननीय सदस्यांनी केली. वस्तुस्थितीचा विपर्यास करून जनता एक वेळ फसू शकते; मात्र ती सारखी सारखी फसणार नाही, हे लक्षात ठेवा.

अध्यक्ष महोदय, मी आज या ठिकाणी हे लक्षात आणून देतो की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी अधिकचा निधी महामंडळाकडे असला पाहिजे, यासाठी शासनाने हमीची मर्यादा ३० कोटींवरून ५०० कोटी रुपये केलेली आहे. साहजिकच ज्या ३० कोटींच्या मर्यादेत या योजना समाजासाठी राबविल्या जात होत्या. त्या आता ५०० कोटी रुपयांपर्यंत राबविल्या जातील. त्यातून समाजातील तरुण-तरुणींना संधी मिळणार आहे.

अध्यक्ष महोदय, अशाच प्रकारे समाजातील सर्व दुर्बल घटकांचा विचार करताना निराधार, विधवा, दिव्यांग, वृद्ध अशा वेगवेगळ्या समाजघटकांसाठीही देखील शासनाने महामंडळे निर्माण केलेली आहेत. त्यांच्यासाठीही अर्थसंकल्पामध्ये पुरेसा निधी राखून ठेवलेला आहे. बारी समाज जो वर्षानुवर्षे पान, पिंपरी व मुसळीचे उत्पादन करतो, त्यांचाही आम्ही विचार केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, समाजातील कुठल्याही घटकाला आम्ही बाजूला ठेवलेले नाही. तृतीयपंथीयांचाही सर्वात पहिला विचार जर कोणी केला असेल तर तो या सरकारने केला आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण आखले आहे. शासकीय सेवेची दारे त्यांना बंद होती, ती आम्ही उघडली आहेत. आपले राज्य सामाजिक सुधारणा करणारे पुरोगामी राज्य आहे. त्यामुळे तृतीयपंथीयांना शासन अंगीकृत व्यवसाय, तसेच नोकरीची संधी देण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, महात्मा जोतीराव फुले जन आरोग्य योजनेतील उपचार दीड लाख रुपयांवरून पाच लाख रुपये केलेले आहेत. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प मांडला आहे, अशी टीका विरोधक करतात. सर्व समाजांना न्याय देणारा, ठोस योजना देणारा अर्थसंकल्प मांडल्यानंतरदेखील अशी टीका करण्यात येत आहे. मला वाटते विरोधकांच्या मनामध्ये काही तरी वेगळेच आहे. राज्यात निवडणुका, सरकारे येतील व जातील. यश मिळेल किंवा मिळणार नाही. हा विचार करण्यापेक्षा राज्यातील जनतेला प्रगतिपथावर नेणारा निर्धारात्मक अर्थसंकल्प सादर केला आहे. हा 'निर्धार अर्थसंकल्प' आहे. त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. विरोधकांवर अर्थसंकल्पाची जबाबदारी कोणत्याही परिस्थितीत येणार नाही. सदर अर्थसंकल्पाची अंमलबजावणी आम्हीच करणार आहोत, आमचेच सरकार पुन्हा सत्तेत येईल. त्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा करू. या सरकारचा हा निर्धाराचा अर्थसंकल्प आहे. मी माझ्या उत्तराच्या भाषणाचा समारोप करताना एवढेच सांगतो की,

'आहे माझा निर्धार
येईल माझ्या मातीला आधार
आहे माझा निर्धार
देईल बळीराजाला मदतीचा हात
आहे माझा निर्धार
मायमाऊलींना मिळून देईल सन्मान
आहे माझा निर्धार
महाराष्ट्र करीन सुजलाम् सुफलाम्!'

अध्यक्ष महोदय, सन २०२४- २०२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सभागृहामध्ये अतिशय चांगली चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी भाग घेतल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. धन्यवाद!

**तालिका सभाध्यक्ष (श्री. समाधान आवताडे) :** अतिरिक्त अर्थसंकल्पावरील चर्चा समाप्त झाली आहे.

*****



“ अलीकडच्या काळात कोणीही फाइलची जबाबदारी स्वतःवर घेत नाही, अशा प्रकारची मानसिकता तयार झाल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. कोणताही लिपिक किंवा अधिकारी आपण जे काम करीत आहोत त्यामध्ये आपण कसे अडकणार नाही याचा विचार करूनच फाइलचे नोटिंग करतात. या संदर्भात आता फार जागरूकता आलेली दिसते. सकारात्मक दृष्टिकोनातून फाइल पुढे पाठविण्याऐवजी त्या फाइलच्या बाबतीत विविध शंका उपस्थित करून ती फाइल खाली परत पाठविणे, हाच अलीकडे सुरक्षित मार्ग झाल्याचे दिसते. वास्तविक पाहता आजच्या काळात प्रशासनामध्ये आपली फाइल लवकरात लवकर पुढे कशी जाईल हे बघण्याची गरज निर्माण झाली आहे. ”

**' राज्याचा अर्थसंकल्प माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात '**
**दिनांक ५ व ६ ऑक्टोबर २०२१, मध्यवर्ती सभागृह विधान भवन, मुंबई**
**अर्थसंकल्पातून होणारी विकास कामे, त्यांचे नियोजन**
**आणि पाठपुरावा!**

**श्री. जयंत पाटील, (तत्कालीन जलसंपदा मंत्री)**

माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, माननीय उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, माननीय गृहमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील, माननीय संसदीय कार्यमंत्री ॲड.अनिल परब, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले, व्यासपीठावरील मान्यवर, सन्माननीय सदस्य, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे पदाधिकारी आणि बंधू भगिनींनो.

माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी विस्तृत मार्गदर्शन केले आहे. आपल्याला तपशीलवार बजेट कसे असले पाहिजे आणि कोणती प्रकाशने असतात याची माहिती मिळालेली आहे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्या प्रश्नांचे उत्तर देणे मला जास्त सोपे झाले असते. परंतु माननीय सभापतींनी मला भाषण करण्याबाबत सूचना दिलेली आहे. मी जास्त वेळ घेणार नाही. 'अर्थसंकल्पातून होणारी विकास कामे, नियोजन आणि पाठपुरावा!' हा विषय मला दिलेला आहे. नव्याने निवडून आलेल्या सदस्यांना विकास कामे कशी करून घ्यावीत, ती कामे अर्थसंकल्पात कशी येतील याबाबत माहिती नसते. तो सदस्य अभ्यासू नसेल तर यामध्ये दोन-तीन टर्म जातात. परंतु अभ्यास केला तर मतदारसंघातील विकास कामे करून घेण्यासाठी काय केले पाहिजे हे एक-दोन वर्षात लक्षात येते. जिल्हास्तरीय योजनांमध्ये काम समाविष्ट करावयाचे असेल तर ते नियोजन मंडळाच्या माध्यमातून शक्य आहे. या वर्षी नियोजन मंडळासाठी ११ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिलेले आहेत. मला आठवते की, सन १९९९-२०००, २०००-२००१ दरम्यान नियोजन मंडळासाठी ६०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले जात होते. त्यानंतर १ हजार कोटी रुपये, २ हजार कोटी रुपये अशी त्यामध्ये वाढ झाली आणि आता ११ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम जिल्ह्याच्या नियोजनासाठी उपलब्ध करून दिली जाते. पूर्वी अशी व्यवस्था होती की, जिल्हा नियोजन मंडळाने कोणती कामे करावयाची आहेत हे ठरविल्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरू होत होती. सन २००४-०५ दरम्यान असे लक्षात आले की, जिल्हा नियोजन मंडळाने जी आकडेवारी दिलेली आहे ती खर्च होत नाही. मी फेब्रुवारी महिन्यात अकोला जिल्ह्याचा आढावा घेण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी केवळ १७ टक्के रक्कम खर्च झाली होती. मी माहिती घेतली त्यावेळी असे लक्षात आले की, जिल्हा नियोजन मंडळाच्या सर्वच गोष्टी पुन्हा मंत्रालय स्तरावर मंजुरीसाठी येतात आणि मंत्रि महोदयांची स्वाक्षरी झाल्यानंतर जिल्ह्यात काम सुरू करावयाचे अशी पद्धती होती. मध्यंतरी आपण नियमात बदल केले. जिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले. आपण या संदर्भात सन २००७ मध्ये ऑर्डर काढली. जिल्हा नियोजन मंडळाने जी कामे ठरविली त्या कामाची प्रशासकीय मान्यता त्याच जिल्ह्यात मिळाली पाहिजे आणि काही गोष्टी विभागीय आयुक्तांच्या स्तरावरून मान्यता घेऊन करावयाच्या आहेत.

महाराष्ट्रात सन २००७ नंतर प्राथमिक आरोग्य केंद्रे, बालवाड्या व इतर लहान व छोट्या गोष्टी इतक्या झपाट्याने पूर्ण झाल्या की, मतदारांचे समाधानाचे प्रमाण सन २००७ नंतर सन २०१०,२०१२ व २०१४ पर्यंत अतिशय चांगले वाढले. स्थानिक पातळीवर निर्णय घेतल्यामुळे स्थानिक बाबी तातडीने पूर्ण होऊ लागल्या. जिल्हा नियोजन मंडळाकडून स्थानिक स्तरावरील आपले अधिकार पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या कामकाजाकडे लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा नियोजन मंडळात अलीकडील काळात लोकशाहीप्रमाणे निवडणुका घेऊन ते मंडळ तयार होते. जिल्हा नियोजन मंडळात जिल्हा परिषद सदस्य असतो, नगरपालिकेचा नगरसेवक असतो, त्या जिल्ह्यातील विधिमंडळ सदस्य हे जिल्हा नियोजन

मंडळाचे सदस्य असतात. आपण ठरविलेली कामे पूर्ण होण्यासाठी वर्षभरात तरतूद झाली व वेळेत निविदा निघाली तर ते काम पूर्ण होते. आता बऱ्याच वेळा दुर्लक्षामुळे डिसेंबरपर्यंत टेंडर निघत नाहीत. सन २००७ मध्ये ही प्रथा कमी झाली. आता जे ठरेल त्याला तातडीने मान्यता देऊन टेंडर काढून ते काम ३१ मार्चच्या आत पूर्ण करून १०० टक्के पैसा खर्च व्हायला पाहिजे असे बंधन घालण्यात आले. अलिकडील काळात हा निधी ९० ते १०० टक्क्यांदरम्यान खर्च होतो. जिल्हाधिकारी ज्यांना जबाबदार धरावे असे ठरल्यावर जवळपास सर्व जिल्ह्यात ९८, ९९, १०० टक्के पैसे खर्च झाले आहेत.

दुसरा स्तर म्हणजे आपण आपल्या मागण्या मंत्रिमहोदयांकडे देतो. बऱ्याच वेळा मंत्रिमहोदयांना पत्र दिले की, अमुक अमुक धरणासाठी बजेटमध्ये तरतूद करावी. मंत्री त्यावर लिहितात की, धरण बजेटमध्ये धरण्यात यावे. ते पत्र मंत्रिमहोदयांकडून समजा गोदावरी महामंडळाकडे गेले. त्यांच्याकडून ते पत्र संबंधित विभागाकडे जाते. त्या विभागातील अधीक्षक अभियंता यांच्याकडून त्या भागातील सर्व्हे करणे, प्लॅन करणे अशी कामे केली जातात. ही प्रोसिजर फार मोठी आहे. बांधकामाबाबत बांधकाम मंत्रिमहोदयांना पत्र देण्यात येते की, आम्हाला या ठिकाणी पूल करून पाहिजे. ते पत्र संबंधितांकडे गेल्यावर तेथील भागाचा सर्व्हे केला जातो व एस्टीमेट करून ते काम प्रस्तावित करण्यात येते. त्याच्या प्लेट्स वर पाठविल्या जातात. अर्थमंत्री महोदयांनी बांधकाम मंत्रिमहोदयांना त्या वर्षात बजेट दिले असते. उदाहरणार्थ त्यांना ७ हजार कोटी रुपये बजेट दिले असेल. परंतु बांधकाम मंत्रिमहोदयांकडे १२ ते १३ हजार कोटी रुपयांच्या मागण्या आलेल्या असतात. काही वेळा २० हजार कोटी रुपयांच्या मागण्या आलेल्या असतात. त्यामध्ये प्राथमिकता ठरविण्याचा अधिकार मंत्रिमहोदयांचा असतो. त्यामुळे मंत्रिमहोदयांना सारखे भेटण्यात अर्थ नाही पण बजेटिंग होईल अशा योग्य वेळी म्हणजे नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये भेटून त्यांना आठवण करून देणे महत्त्वाचे असते. साधारणतः बजेटची कामे सप्टेंबर महिन्यात सुरू होतात. माहिती संकलन करणे, पुढील एस्टिमेट करणे, पुढील वर्षात किती कर गोळा होणार, तुमचा विभाग किती कर गोळा करणार, कर जेथून गोळा होतो त्यांना प्रश्न विचारण्यात येतात. एस्टिमेट करण्याची कामे त्यावेळी केली जातात. जुनी कामे किती आहेत, ३१ मार्चपर्यंत किती रक्कम खर्च होईल. त्यामुळे वित्त विभागाकडून बजेटची कामे सप्टेंबर महिन्यात सुरू होतात. वित्त विभाग फेब्रुवारी महिन्यात बजेट मांडते. केंद्रीय बजेट मांडल्यानंतर राज्य शासनाचे बजेट मांडण्याचा आपण प्रयत्न करतो. बजेट सादर करणाऱ्या विभागाला कळते की, केंद्र शासनाकडून आपल्या राज्याला किती निधी येणार आहे. वित्त विभागाला कळते की, केंद्र शासनाच्या या नवीन योजना आहेत व आपला हिस्सा म्हणून इतका निधी राज्य शासनाला द्यावयाचा आहे. केंद्रीय बजेट मांडल्यानंतर राज्य शासनाचे बजेट मांडले तर जास्त चांगले बजेट तयार करता येते. त्यामुळे जानेवारी महिन्यात आमचा अमुक रस्ता व अमुक पूल घ्यावयाचा आहे ही बाब मंत्रिमहोदयांना आग्रहाने सांगितली तर मंत्रिमहोदयांना रिमाइंडर होते. त्यामुळे ही कामे बजेटचा भाग होण्याची शक्यता जास्त असते. बजेट सादर झाल्यावर सुदैवाने आपले काम बजेटमध्ये आले. बजेटमध्ये काम आल्यावर त्या बजेटचा पाठपुरावा करणे. मघाशी उल्लेख करण्यात आला की, बजेटमध्ये पैसे धरण्यात आले आहेत, त्याचे टेंडर निघून ते काम सुरू होणे महत्त्वाचे असते. मघाशी असा प्रश्न विचारण्यात आला की, काम थांबलेले आहे, छोट्याशा कारणामुळे असेल, तेथील पुनर्वसनाचे काम अडले असेल, पाणी वाढेल म्हणून गावातील लोक विरोध करतात की, अगोदर आमचे पुनर्वसन करा नंतर धरणाची भिंत वाढवा. पुलाचे काम असेल, छोटा पूल असतो त्याचे थोडे काम राहिलेले असते, त्या वर्षी पैसे आलेले नसतात,

त्यामुळे विभागाने जे लास्ट माइल्स प्रोजेक्ट आहेत त्यांना अगोदर पैसे दिले पाहिजेत. विभागाने नवीन प्रोजेक्ट सुरू करण्याअगोदर लास्ट माइल्स प्रोजेक्ट पूर्ण करायचे असतात. लास्ट माइल्स प्रोजेक्ट पूर्ण करून आपल्याकडे असलेली किती टक्के कामे पूर्ण केली, हे शेवटी वित्त व नियोजन विभागाला सांगावे लागते. बांधकाम, जलसंपदा किंवा कोणत्याही विभागाला ते सांगावे लागते. आपला विभाग शिल्लक राहिलेली कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो.

दुसरा एक महत्त्वाचा भाग असा आहे की, बजेटच्या पुस्तकासोबत एक पुस्तक देण्यात येते. त्यामध्ये राज्यपाल महाराष्ट्र यांचे निदेश असतात. विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे कलम ७ अन्वये हा वार्षिक कार्यक्रम सन २०२०-२०२१ देण्यात येतो. त्यामधील अनुशेषाबाबत राज्यपालांची टिप्पणी सभागृहाला बजेट-बरोबर सादर होते. ती टिपणी राज्यपाल महोदय बजेटच्या अगोदर सरकारकडे पाठवितात. त्यामुळे अशी बंधने आहेत की, अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी कोणता विभाग प्रथम प्राधान्य देतो. आपण एखादे काम बजेटमध्ये धरले व त्याला रक्कम कमी मिळाली तर ते काम प्रलंबित होण्याची शक्यता जास्त असते. एखादे काम सुरू झाले की, वर्ष, दीड वर्षे किंवा दोन वर्षांत पूर्ण होते. त्या विभागाला बजेट कमी मिळतो, काही वेळा काम बजेटमध्ये धरले परंतु ४० टक्क्यांचा कट आला तर ६० टक्के निधी येतो. समजा, १० कोटी रुपयांच्या कामाला या वर्षी ६ कोटी रुपये मिळणार असतील तर ते काम त्या वर्षी पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे विधानमंडळ सदस्यांना अनुत्तरित व अर्धवट कामासाठी मंत्रालयात संबंधित मंत्रिमहोदयांकडे किंवा विभागाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

मघाशी राजकोषीय मध्यम मुदत धोरणाबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. राजकोषीय धोरणाप्रमाणे आपण चाललो नाही तर केंद्र शासनाकडून यासाठी मिळणारे अनुदान काही वेळा कमी मिळते. तुम्ही तुमच्या ट्रॅकवर चालता किंवा नाही हे फार महत्त्वाचे आहे. राजकोषीय मध्यम मुदत धोरण ते एमटीएफआरपी मीडियम टर्म फिस्कल पॉलिसी याप्रमाणे सरकारला काम करावे लागते. ज्यावेळी महापूर येतो, नैसर्गिक संकट येते त्यावेळी डेव्हिएशन होते. त्यामुळे या धोरणापासून आम्ही का डायव्हर्जन केले या करेक्टिव्ह मेजर्स प्लॅनिंग कमिशन किंवा केंद्र शासनासमोर सांगाव्या लागतात. पुन्हा त्यामध्ये दुरुस्त्या करण्याचे काम प्रत्येक राज्याला करावे लागते. अर्थसंकल्पात एखादी बाब आपण मांडतो किंवा सभागृहात बोलतो तेव्हा शक्यतोवर सर्व आमदार आपल्या मतदारसंघासाठी काय आले हे पाहण्याचा प्रयत्न करतात. सन १९९० मध्ये आम्ही आमदार झालो, त्यावेळी बजेटची बॅग उघडीत होतो व बांधकाम खात्यामध्ये आपल्या मतदारसंघात कोणती कामे आली, त्याखाली अंडरलाईन करीत होतो. त्यातून भाषण करीत होतो व आपल्या तालुक्यापुरते बोलायला सुरूवात करीत होतो. सन १९९० मध्ये असे करीत असताना हळूहळू लक्षात आले की, आपल्या मतदारसंघापेक्षा महाराष्ट्रात इतके प्रश्न आहेत त्या सर्व प्रश्नांचा आपण अभ्यास केला पाहिजे. अर्थमंत्र्यांच्या बजेटच्या भाषणात विरोधी पक्षातील लोक चुका शोधण्याचा प्रयत्न करतात. सत्तारूढ पक्षाबाबत विरोधी पक्षाकडून कौतुकाची विधाने फार क्वचित व अभावाने येतात. २० ते ३० वर्षांपूर्वी चांगले काही झाले असेल तर सभागृहात स्पोर्ट्समन स्पिरिट होते, कौतुक होत होते. पण आता बोलायला वेळच कमी मिळतो. त्यामुळे कौतुकाला १० मिनिटे आणि आपले प्रश्न मांडायला ४ मिनिटे हेही आमदार महोदयांना परवडत नाही आणि मग सुरुवात करतानाच माझे हे हे राहिले आहे आणि तुम्ही ते ते करायला पाहिजे ही भूमिका सर्व आमदार महोदय घेतात. आपणा सर्वांना त्यामध्ये आपला मतदारसंघ जास्त महत्त्वाचा असतो. मतदारसंघातील गाऱ्हाणी

मांडली नाहीत तर मतदारांना देखील आपले आमदार आपल्या प्रश्नांबाबत बोलत नाहीत असे वाटत असते. त्यामुळे विधानसभेचे सन्माननीय सदस्य त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देतात आणि ते काही चुकीचे आहे असे वाटत नाही. काही आमदार महोदय आपल्या जिल्ह्यातील, आपल्या विभागातील काही महत्त्वाच्या प्रकल्पांविषयीदेखील पाठपुरावा करतात आणि त्यातून हळूहळू फार चांगल्या पद्धतीने अनेक मुद्दे पुढे येतात.

सभागृहात माननीय मंत्र्यांनी आपल्या समोरच्या बाजूच्या वक्त्यांची भाषणे ऐकून आपल्या बजेटिंगमध्ये, प्रोसिजर्समध्ये सतत सुधारणा करणे हा सभागृहातील चर्चेचा महत्त्वाचा भाग आहे असे मी समजतो. आपल्या विकास कामांचे नियोजन करणे, त्याविषयी पाठपुरावा करणे हा प्रत्येक विधानसभा, विधानपरिषद सन्माननीय सदस्यांचा महत्त्वाचा भाग आहे. नियोजन विभाग नियोजन करतो. पूर्वी नियोजन आयोग योजना करीत होता. प्लॅनिंग कमिशन नावाची व्यवस्था दिल्लीत होती. मोदीसाहेब आल्यानंतर प्लॅनिंग कमिशनबाबत एक दिवस अशी बातमी आली की, प्लॅनिंग कमिशन आता बंद करण्यात आले आहे. निती आयोग या नावाने त्यांनी नवीन व्यवस्था आणली. आज राज्य सरकारला निती आयोगासमोर जावे लागते आणि आमचे राज्य सरकार पुढील अर्थसंकल्प करणार आहे किंवा अमुक मुद्द्यावर आम्ही आमचे बजेटिंग करणार आहोत हे सांगावे लागते. राज्य सरकार केंद्र सरकारकडून मदतही मागते. त्यावेळी निती आयोगाचे लोक सांगतात की, तुमच्या राज्यात अमुक मुद्द्यावर, सोशल सेक्टरवर जास्त भर असतो, गरिबीचे प्रमाण कमी झालेले नाही, इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये कमी आहात. निती आयोगाकडून असे मुद्दे काढले जात असतात. त्यांचा आपल्या राज्याबाबत अधिक अभ्यास झालेला असतो. आपल्याला ते आपल्या चुका किंवा कमतरता दाखवितात आणि निक्षून सांगतात की, या सुधारणा पुढील वेळी कराव्यात. ही चर्चेची प्रक्रिया झाली की नियोजनात योजना किती असाव्यात हा निश्चित आकडा दिल्लीहून येताना अर्थमंत्री घेऊन येतात आणि त्या योजनांप्रमाणे राज्याचा अर्थसंकल्प बनविताना प्लॅनचा भाग तयार होतो.

मला असे वाटते की, मी यापेक्षा जास्त बोलण्यापेक्षा आपल्याला काही प्रश्न असतील तर मी त्यांचे उत्तर देणे जास्त संयुक्तिक होईल.

**यापुढे झालेली प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे –**

**प्रश्न :** कोणत्याही बजेटेड वर्क्समध्ये बजेटेड कामे वाटप झालेली असतात. कोणत्याही विभागामध्ये २० टक्के शासनाचा खर्च त्याच कामातून वसूल करण्याची प्रक्रिया असते. शासन हजार कोटी रुपये कामावंर खर्च करते आणि २०० कोटी रुपये त्याच कामातून परत घेते. सदर बाबतीत काही पर्याय राहू शकतो का ? कारण फक्त बजेट वाढलेले दिसते. कर, रॉयल्टी असे वसुलीचे स्वरूप असते. फक्त कामाची किंमत वाढलेली असते. बऱ्याच वेळा बजेटमध्ये कामे सुटलेली असतात. त्यामुळे पुरवणी मागण्यांमध्ये काही नवीन कामे टाकता येतात का, बजेटमध्ये सुटलेल्या कामांचा पुरवणी मागण्यांमध्ये क्रमांक लागतो का आणि तो तुम्ही लावाल का ?

**श्री. जयंत पाटील :** मी तो लावणार का हा विधानसभेचा भाग होऊ शकतो. त्यामुळे तो प्रश्न येथे विचारता येणार नाही. पण तसा क्रमांक लावता येतो. आपला पहिला प्रश्न वाळूवरील कर किंवा रॉयल्टी किंवा जीएसटी वगैरे विषयांबाबत आहे. बऱ्याचदा सरकारी काम, निमसरकारी काम किंवा खासगी काम

यातील फरक कर गोळा करणाऱ्याला माहीत नसतो. आपण असे करू लागलो तर रॉयल्टी कोणाला भरता येणार नाही किंवा ते भरणार नाहीत. सर्वांना कररचना समान असली की कर गोळा करताना तो एफिशिअन्टली गोळा करता येतो. सरकारचे बांधकाम असो किंवा खासगी बांधकाम असो, कर भरावा लागतो. सरकार एकीकडे १०० कोटी रुपये देते आणि दुसरीकडे २० कोटी रुपये कररुपाने काढून घेते. लोक सांगू शकतात की, आम्ही सरकारी कामासाठी वाळू घेऊन चाललो आहोत. परिणामी कर वसूल करणाऱ्यांची देखील गल्लत होते. त्यामुळे तसे नाइलाजाने करावे लागते.

**प्रश्न :** लेखाशीर्ष ३०५४ मध्ये मिळणारा निधी व्हीआर रोडला कमी असतो. ग्रामीण रस्त्यासाठीचा निधी बजेटमध्ये टाकू शकतो का ? शिवरस्ते व पाणंद रस्ते हे अत्यंत महत्त्वाचे असे रस्ते प्रत्येक गावात आहेत, यांना आमदार निधी पुरू शकत नाही, अपुरा असतो. कारण जवळपास ३० ते ३३ फुटांची रुंदी असते. शिवरस्ते व पाणंद रस्त्यांना बजेटमध्ये काही तरतूद करू शकता का ?

**श्री. जयंत पाटील :** हे स्थानिक नियोजनाचे काम आहे. डीपीडीसीमधून पाणंद रस्त्यांसाठी नियोजन व्हायला पाहिजे होते. मी तांत्रिक बाब सांगत आहे. मी सोपा मार्ग सांगत आहे. लेखाशीर्ष ३०५४ मधून डीपीडीसीतून पैसे गेले तर जास्त व्यवस्थितपणे मॅनेज होते. पुरत नाही हे बरोबर आहे. पण तो निधी जास्त दिला पाहिजे हे मला मान्य आहे.

लेखाशीर्ष २५१५ ची आठवण काढण्यात आली. लेखाशीर्ष २५१५ ही मी काढलेली योजना आहे. पूर्वी कोणत्याही गावात गावाच्या अंतर्गत कोणालाही पैसे खर्च करता यायचे नाहीत. आमच्याकडे जतला जिल्हा परिषदेची निवडणूक लागली होती. तालुक्याचे गाव होते. पण ते ग्रामपंचायत होते. मी तेथे जाऊन भाषण केले. आमचा उमेदवार निवडून आला पाहिजे होता म्हणून मी भाषण केले की, तुम्ही यांना निवडून द्यावे. मी तुमच्या जतचा चेहरामोहरा बदलतो. उमेदवार ७ मतांनी निवडून आला. त्यावेळी तो माझ्याकडे येऊन बसला. पण ग्रामपंचायत असल्यामुळे आतमध्ये निधी देता येत नव्हता. गावात पैसे देण्याची कोणतीही योजना नव्हती. मी श्री. एस.एस.गायकवाड यांना म्हणालो की, आता अडचण झाली आहे. पैसे द्यायचे आहेत. कारण माझा शब्द गेला आहे. काहीही करायचे पण पैसे द्यायचे असे आहे. लेखाशीर्ष २५१५ हे जलसंधारणमध्ये होते. त्यावेळी एकदम टाइट परिस्थिती होती. विभागाचे म्हणणे होते की, नॉर्मल ग्रामविकास विभागामध्ये दिले तर ते इतके आवरणार नाही. त्यामुळे जलसंधारण विभागामध्ये २५१५ हे लेखाशीर्ष आले. ते तेथील लेखाशीर्ष आहे. तेथे पैसे दिले आणि तेथून मी जतला पैसे दिले, विक्रम सावंत यांच्या गावात पैसे दिले.

मी उन्हाळ्यात गेलो, तेव्हा गावामध्ये सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते झाले होते. लोक उन्हाळ्यात सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर येऊन झोपू लागले होते, एवढे चांगले रस्ते त्या गावात पहिल्यांदा झाले होते. त्याचा पहिला वापर तेथे झाला आणि त्यानंतर तो हेड सर्व ठिकाणी वापरू लागलो. आता २५१५ हे लेखाशीर्ष गावातील लोकोपयोगी योजनांची महत्त्वाची बाब आहे. बाकी काही आमदार महोदयांना हे लागत नाही. २५१५ लागते तसे हे ३०५४ चे रस्ते आहेत. आता शहरात उत्तम रस्ते होऊ लागले आहेत, लेखाशीर्ष ३०५४ चे पाणंद रस्ते आहेत. पाणंद रस्त्यांवरदेखील पैसे खर्च झाले पाहिजेत. पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांचे फार हाल होतात. त्यामुळे त्यासाठी अधिकचे पैसे दिले पाहिजेत.

**प्रश्न :** काही कामे गरजेची असतात. पण त्यासाठीची टेबलांची संख्या जास्त वाटते. फाइलसाठी एखाद्या टेबलची गरजच वाटत नाही. शेवटची सही झाली की त्याच मार्गाने पुन्हा शेवटपर्यंत ती फाईल येते. किमान काही टेबल कमी करून शेवटच्या टेबलकडून सरळ संबंधितांना फाइल सही करून देता येईल अशी घटनात्मक व्यवस्था आपण तयार करू शकतो. दुसरी बाब अशी की, जिल्हा परिषदेच्या शाळा, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा विभागीय आयुक्त कार्यालय इत्यादी सरकारी कार्यालयांना सुद्धा विजेचे देयक भरावे लागते. मुळात वीज विभाग हा शासनाचाच विभाग आहे. वास्तविक पाहता त्या कार्यालयांच्या वीज देयकांचे पैसे राज्याच्याच तिजोरीतून जात असतात. परंतु या प्रक्रियेमुळे सर्व अधिकाऱ्यांचा वेळ खर्च होतो, कागदपत्रांवरही खर्च होतो. मुळात या प्रक्रियेमागील मर्म माझ्या लक्षात येत नाही. आपण अशा गोष्टींना अर्थसंकल्पातून घटनात्मक कट लावू शकतो काय ?

**श्री. जयंत पाटील :** अलीकडच्या काळात कोणीही फाइलची जबाबदारी स्वतःवर घेत नाही, अशा प्रकारची मानसिकता तयार झाल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. कोणताही लिपिक किंवा अधिकारी आपण जे काम करीत आहोत त्यामध्ये आपण कसे अडकणार नाही याचा विचार करूनच फाइलचे नोटिंग करतात. या संदर्भात आता फार जागरूकता आलेली दिसते. सकारात्मक दृष्टिकोनातून फाइल पुढे पाठविण्याऐवजी त्या फाइलच्या बाबतीत विविध शंका उपस्थित करून ती फाइल खाली परत पाठविणे, हाच अलीकडे सुरक्षित मार्ग झाल्याचे दिसते. वास्तविक पाहता आजच्या काळात प्रशासनामध्ये आपली फाइल लवकरात लवकर पुढे कशी जाईल हे बघण्याची गरज निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. आपण विनाकारण मोठ्या प्रमाणावर टेबल तयार करून ठेवले आहेत. माझ्या जलसंपदा विभागात मला अशी बाब आढळून आली की, अनेक प्रकल्प पाच-पाच, सात-सात वर्षे प्रशासकीय मान्यतेच्या प्रतीक्षेत आहेत. एखादे छोटेसे कारण निदर्शनास आले की, तो प्रस्ताव लगेच खाली परत पाठवून दिला जातो. उदाहरणार्थ गंगापूरचे एखादे काम असल्यास त्या कामाच्या संदर्भात मागणी नसताना कामाची मागणी कशी करण्यात आली, असे कारण देऊन ती फाइल परत पाठविण्यात येते. मुळात कामाची मागणी नसताना मागणी कशी करण्यात आली, या कारणाचे उत्तरच कोणी देऊ शकत नाही. त्यामुळे काढण्यात आलेल्या आक्षेपाचे उत्तर देण्यात चार-पाच महिन्यांचा कालावधी जातो. अशा प्रकारे प्रशासकीय कामकाजात विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी प्रत्येक फाईलला क्लॉक लागला पाहिजे. ती फाइल किती तारखेला त्या टेबलवर आली आणि त्या टेबलवरून किती तारखेला पुढे पाठविण्यात आली, हे बघण्याची आपल्याकडे पद्धत आहे. त्यावरून फाइल कधी कोणत्या टेबलवरून कुठे गेली हे समजते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार कमीत कमी टेबलवरून फाइलचा प्रवास होऊन ती पुढे गेली पाहिजे. परंतु यासाठी खऱ्या अर्थाने विश्वासाची गरज आहे. परंतु हल्लीच्या सिस्टीममध्ये अविश्वासाचा इतका प्रसार झाला आहे की, प्रत्येकजण सांगतो की, मी कोणत्याही बाबतीत थेट कार्यवाही करणार नाही, तुम्ही खालून लिहून आणा. आपणास सांगू इच्छितो की, पूर्वीच्या काळात अधिकारी थेट समोरासमोर चर्चा करून विषय मार्गी लावायचे. एखाद्या फाइलवर विभागाचे चार अधिकारी सही करणार असतील तर त्यांनी एकत्र बसून आपापले शेरे नमूद करून फाइल दोन दिवसांत क्लीअर करणे, ही आयडियल सिच्युएशन आहे. परंतु आता तसे होताना दिसत नाही. त्यामुळेच सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत तीच मुळात अडचण आहे.

तसेच दुसरी बाब अशी की, विद्युत विभागाची कंपनी ही स्वतंत्र कंपनी आहे. शासकीय कार्यालयांना विजेच्या देयकात सबसिडी द्यायची असेल तर सरकारने त्या विभागांना पैसे द्यावेत व त्यातून विभागाने विजेचे देयक भरावे. परंतु अकाऊंटेबिलिटी किंवा अकाऊंटिंगसाठी विजेचा वापर झाला असेल तर ज्या कंपनीकडून वीज घेतली असेल त्यांना त्या विभागाकडून विजेचे देयक आलेच पाहिजे. सरकारकडे ती जबाबदारी दिली तर सरकारकडून देयक भरण्यास विलंब होऊ शकेल. परिणामी, त्यातून कोळसा विकत घेण्यापासून इतर अनेक प्रश्न निर्माण होतील. शेवटी पैशाचा फ्लो हा कंटिन्यूअस त्या त्या ठिकाणी गेलाच पाहिजे.

**प्रश्न :** महोदय, मतदारसंघातील एखाद्या प्रकल्पाची मुख्य अर्थसंकल्पात नोंद होण्यासाठी त्या संदर्भातील प्रस्ताव किती कालावधीपूर्वी सादर करावयास पाहिजे, असा काही नियम आहे काय ? मला येथे माझ्या मतदारसंघातील एक विषय निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. दक्षिण-मध्य मुंबईत आम्हाला सर्वात मुख्य प्रश्न हा ड्रग्ज ॲडिक्टचा भेडसावत आहे. तरुण पिढी पूर्णतः ड्रग्जच्या आहारी जात आहे. मी जे. जे. हॉस्पिटल येथील मोठ्या कॉम्प्लेक्सच्या ठिकाणी नशामुक्ती केंद्र आणि पुनर्वसन प्रकल्प करण्याचा अनेकदा प्रयत्न केला. परंतु तो प्रकल्प अद्यापपर्यंत पूर्णत्वास आलेला नाही. मी जाणून घेऊ इच्छितो की, हा प्रकल्प अर्थसंकल्पात येण्यासाठी किती दिवस अगोदर तो सादर केला पाहिजे किंवा तो कशा स्वरूपात सादर करावयास पाहिजे ?

माझा दुसरा प्रश्न हा पूरक मागण्यांच्या बाबतीत आहे. आम्ही पूरक मागण्यांवरील चर्चेच्या वेळी काही मागण्या सभागृहात मांडतो. आम्ही मांडलेल्या मागण्या पूर्ण होण्याची कार्यवाही कशी होते, पूरक मागण्यांचा निधी लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी नेमके काय केले पाहिजे ?

**श्री. जयंत पाटील :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मुंबई जिल्ह्याचा पालकमंत्री असताना मी जे. जे. हॉस्पिटल येथे बऱ्याच योजना डीपीसीच्या माध्यमातून केल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी हा प्रकल्प डीपीसीच्या निदर्शनास आणून दिल्यास त्यांच्या माध्यमातून हा प्रकल्प होऊ शकतो. आपणास या प्रकल्पासाठी सरकारकडे येण्याची काही गरज नाही. या प्रकल्पासाठी आपण जे. जे. हॉस्पिटलला त्यांचा एखादा हॉल डेडिकेट करण्यास सांगावे. त्या हॉलच्या सुधारणांसाठी डीपीसीकडून निधी घेण्यासाठी माननीय पालकमंत्र्यांकडे बैठक आयोजित करून सदरहू प्रकल्पाचे काम करणे गरजेचे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. मुळात जे. जे. हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनासुद्धा व्यसनमुक्ती केंद्र आणि पुनर्वसन प्रकल्पाची आवश्यकता असेल. जर त्यांनी नकार दिला तर राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये या बाबतीत योजना समाविष्ट करावी लागेल. पण त्यासाठी जे. जे. हॉस्पिटलला मागणी करावी लागेल व त्यानंतर त्यांना निधी देण्यात येईल.

तसेच पूरक मागण्यांच्या अनुषंगाने आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या बाबतीत सांगतो की, आपण पूरक मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने भाषण करताना काही मागण्या केल्यानंतर त्यासाठी निधीची तरतूद केलीच पाहिजे हे सरकारवर बंधनकारक नाही. आपण पूरक मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने केवळ आपली मागणी सरकारच्या निदर्शनास आणून दिलेली असते. जर माननीय मंत्री आणि सरकारला आपली मागणी योग्य वाटली आणि आपण केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मंत्रिमहोदयांना स्मरणपत्र दिले तर त्यासाठी निधी मिळू शकतो. केवळ भाषण करून काहीच उपयोग होत नाही. यामध्ये स्मरणपत्र ही अत्यावश्यक बाब आहे.

**प्रश्न :** 'राज्याचा अर्थसंकल्प आणि माझा मतदारसंघ' या विषयावरील चौथ्या सत्रामध्ये माननीय नामदार श्री. जयंतरावजी पाटील यांनी मतदारसंघातील कामे, त्याचे नियोजन आणि पाठपुरावा, या तीन गोष्टी अतिशय सोप्या पद्धतीने या ठिकाणी विशद केल्या आहेत. या संदर्भातील नियोजन करीत असताना जिल्हास्तरीय योजना हे पहिले नियोजन त्यांनी सांगितले. या संदर्भात आतापर्यंत वेगवेगळे बदल घडत गेले. मंत्रिमहोदयांनी २००७ मध्ये झालेला बदल त्यांच्या भाषणातून सांगितला.

महोदय, मी नमूद करू इच्छितो की, जिल्हा नियोजन मंडळासाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी आमच्या संभाजीनगर म्हणजेच औरंगाबाद जिल्ह्यासाठी २२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या मंडळामध्ये जिल्हा परिषदेचे सदस्य असतील, नगरपालिकेचे सदस्य असतील, सर्व निमंत्रित आमदार असतील. डीपीसीमध्ये एकूण १६ हेड असून, १७ वे हेड हे 'नावीन्यपूर्ण' असे आहे. या नावीन्यपूर्ण हेडमध्ये काही हेडचा समावेश सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केल्यामुळे लेखाशीर्ष-५०५४ अंतर्गत रस्ते किंवा डांबरीकरणाच्या ज्या योजना दिल्या आहेत त्यावर जिल्हा परिषद जास्त हक्क गाजविते, परिणामी आमदारांना अशा विकास कामांपासून वंचित राहावे लागते. पहिली अशी तरतूद होती की, लेखाशीर्ष-५०५४ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काम केले जात होते. लेखाशीर्ष-५०५४ हे पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केले तर त्यामुळे आमच्यासारख्या आमदारांच्या मतदारसंघातील कामे मार्गी लागू शकतील. लेखाशीर्ष-५०५४ व्यतिरिक्त असलेले अंगणवाड्यांची कामे, शाळा दुरुस्तीची कामे, जलसंधारणाची कामे, सिंचनाची कामे इत्यादी कामांचे हेड जिल्हा परिषदेकडे ठेवावेत. परंतु लेखाशीर्ष-५०५४ हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केल्यास त्यातून ग्रामीण भागातील आणि आमच्या मतदारसंघातील जास्तीत जास्त कामे लवकरात लवकर पूर्ण होण्यास मदत होईल. बऱ्याच वेळा असे होते की, डिसेंबर महिना उलटून गेला तरी कामाला प्रशासकीय मान्यता मिळत नाही. याला वेगवेगळी कारणे असू शकतात. परंतु डिसेंबरपर्यंत प्रशासकीय मान्यता मिळत नाही आणि शेवटी घाईघाईत प्रशासकीय मान्यता मिळवून दोन-तीन महिन्यात ते काम केवळ कागदोपत्री पूर्ण करण्यात येते. या सर्व बाबींचा आपण विचार करण्याची गरज आहे.

मंत्रिमहोदय, आपण दुसरा मुद्दा असा सांगितला की, मतदारसंघातील वेगवेगळ्या कामांच्या बाबतीत संबंधित मंत्रिमहोदयांकडे पाठपुरावा केला पाहिजे. परंतु आमच्यासारखे काही गरीब स्वभावाचे आमदार हे मंत्रिमहोदयांकडे जास्तीत जास्त पाठपुरावा करण्यात कमी पडतात. परिणामी, आमची कामे जास्त प्रमाणात मार्गी लागत नाहीत. मी आपल्याला एक उदाहरण सांगतो. २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पात माझ्या मतदारसंघात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एकूण २८ कामांना मंजुरी मिळाली होती. तद्नंतर २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात जवळजवळ ३२ कोटी रुपयांचा निधी रस्त्यांसाठी मिळाला. परंतु २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांचे अजूनही टेंडर निघू शकलेले नाही. या वर्षाचे बजेट तर अजून बाकी आहे. माझी विनंती आहे की, या बाबतीत राज्य सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. कारण असे होते की, बजेटच्या बुकमध्ये ते काम येते. पण त्याचे टेंडर जर दोन-दोन वर्षे निघत नसेल तर लोक आम्हाला व्हॉट्सॲपला कळवितात की, अशी अशी बातमी मिळाली होती की वैजापूर ते उकटगाव कोपरगांवचा ५ कोटींचा रस्ता मंजूर झाला. पण त्याचे टेंडर का निघत नाही. म्हणून ते टेंडर निघावे. कारण बजेट झालेले असते. मग लगेच त्याला प्रशासकीय मान्यता द्यावी आणि असे झाले तर आमचे ते काम मार्गी लागू शकते. तसेच यामध्ये आणखी एक अशी अट

आहे की, ०३ आणि ०४ हे पीडब्ल्यूडी विभागाचे २ लेखाशीर्ष आहेत. या अंतर्गत जी कामे मंजूर होतात आणि जो गुत्तेदार ती कामे घेतो, तो ती कामे चार-चार वर्षे पूर्ण करीत नाही. तो कारण सांगतो की, या कामासाठी बजेट नाही. २०-२२-२५ टक्के काम करतो आणि इतर कामे सोडून देतो. त्यामुळे जे २५ टक्के काम झालेले असते त्यावर पुन्हा खड्डे पडायला सुरुवात होते आणि ते काम तसेच राहून जाते. असा एक प्रकार होतो, म्हणून याबाबत काही तरी नियोजन झाले पाहिजे. धन्यवाद.

**श्री. जयंत पाटील :** आपली सूचना चांगली आहे आणि जर २०१८-१९ किंवा २०१९-२० या वित्तीय वर्षातील कामाचे टेंडर अद्याप निघाले नसेल तर आपण ही बाब संबंधित मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**प्रश्न :** आम्हाला अधिकारीवर्गाने सांगितले की, कोरोनामुळे टेंडर निघाले नाही.

**श्री. जयंत पाटील :** त्यावेळी महसुली उत्पन्न पूर्णपणे थांबले असेल आणि म्हणून अशा सूचना दिल्या असतील.

**प्रश्न :** ग्रामीण भागामध्ये दोन गावांना जोडणारे जे ब्रिज असतात ते पूर्ण नसल्यामुळे लोकांना आणि गुरांना एका गावाहून दुसऱ्या गावात जाता येत नाही.

**श्री. जयंत पाटील :** आपण ही बाब सार्वजनिक बांधकाम मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**प्रश्न :** महोदय, ते ग्रामीण मार्गाचे हेड आहे.

**श्री. जयंत पाटील :** ग्रामीण मार्गाचे हेड असल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत आपल्याला ते काम करावे लागेल.

**प्रश्न :** महोदय, ओडीआर, व्हीआर यांच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला आहे त्यानुसार ही कामे जिल्हा परिषदेमार्फतच पूर्ण करावी लागतील. याबाबत आपल्याला बजेटमध्ये तरतूद करून जिल्हा परिषदेच्या पीडब्ल्यूडीकडून ही कामे काढून घेऊन करता येतील काय हे पाहावे लागेल.

**श्री. जयंत पाटील :** आपल्याला तसे करता येणार नाही. कारण जोपर्यंत जिल्हा परिषदा अस्तित्वात आहेत तोपर्यंत त्यांना काम दिलेच पाहिजे. काही जण म्हणजे उदयसिंग यांच्यासारखे सन्माननीय सदस्य नगरपालिकेला आलेला निधी पीडब्ल्यूडीमार्फत वापरून कामे करावीत असे पत्र देतात.

**प्रश्न :** या विषयाच्या अनुषंगाने मतदारसंघाची भोगौलिक दृष्टी विचारात घेता विविध विभागनिहाय म्हणजे पीडब्ल्यूडी, शिक्षण, ऊर्जा या विभागांची असलेली कामे जितक्या लांबीची आहेत ती विचारात घेता अशी कामे ओडीआर, व्हीआरमधून घेण्याच्या दृष्टीने शासनाला काही निधीची तरतूद करता येईल काय ?

**श्री. जयंत पाटील :** आपले म्हणणे बरोबर आहे की, ज्या भागातील रस्त्याची लांबी जितकी मोठी असेल त्याचा विचार करता जिल्ह्यासाठी आलेला निधी प्रर्पोशनेटली वितरित केला जावा. दुसरे म्हणजे जेथील रस्ते जास्त खराब असतील त्याच्या डागडुजीसाठी किंवा किमान सुधारणेसाठी जास्त निधी दिला पाहिजे. आपले म्हणणे बरोबर आहे.

**प्रश्न :** कारण त्याचा फायदा भौगोलिकदृष्ट्या होईल. कारण ज्या मतदारसंघात अशा सुविधा नसतात त्यानुसार त्या तालुक्यात शिक्षणाचाही अभाव असतो. मी सुचविल्यानुसार कामे झाली तर एमएसईबीचाही अनुशेष दूर होईल.

**श्री. जयंत पाटील :** पूर्वी मानव विकास निर्देशांक नावाची संज्ञा काढलेली आहे आणि त्यानुसार सर्व्हे केला जातो. त्या सर्व्हेनुसार असे ठरविले होते की ज्या जिल्ह्यांचे एसडीआय कमी आहेत तेथील सुविधा वाढविण्यावर भर द्यावा. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य या विषयांचा समावेश होता. त्या काळात आपण त्या त्या जिल्ह्यांना निधी देत होतो. विशेषतः विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्हे आणि खान्देशातील नंदुरबार वगैरेसारखे जिल्हे होते.

**प्रश्न :** महोदय, मानवी विकास निर्देशांकाचा विचार करता माझ्या मतदारसंघातील लोकसंख्या कमी असली तरी भौगोलिकदृष्ट्या हा तालुका विस्ताराने फार मोठा आहे.

**श्री. जयंत पाटील :** लोकसंख्येचा संबंध येत नाही. मानव विकास निर्देशांकाचा संबंध वाळवे तालुक्यात आरोग्यविषयक किंवा शिक्षणविषयक कोणकोणत्या सुविधा आहेत हे विचारात घेण्यासाठी येतो.

**प्रश्न :** महोदय, आताचे सर्व प्रश्न हे खर्चाबाबतचे होते. परंतु मी महसूल जमेच्या बाबतीत प्रश्न विचारत आहे. एस्टिमेट समितीच्या बैठकीवेळी मला असा अनुभव आला की, आपले महसूल अधिकारी महसूल जमेच्या दृष्टीने भरपूर ऑर्डर्स देतात. पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. म्हणून बजेटमध्ये आपल्याला बरीच रिकव्हरी असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे ती रिकव्हरी वसूल करण्यासाठी आपण काही धोरणात्मक निर्णय घेणार आहोत काय किंवा त्याबाबत बजेटमध्ये काही तरतूद आहे काय ?

**श्री. जयंत पाटील :** ज्या अलीकडच्या सूचना असतात त्यांची खालच्या स्तरावर अंमलबजावणी होते. ज्या ठिकाणी महसूल कमी मिळतो तेथे जास्त लक्ष दिले जाते. There is a proper procedure in the Finance Department for Sales Tax. Excise Department मध्येही...

**प्रश्न :** हे दंडाच्या स्वरूपात असते.

**श्री. जयंत पाटील :** ज्यावेळी बजेट तयार होते त्यावेळी प्रत्येक विभाग त्या वर्षी किती महसूल गोळा करू शकते हे वित्त विभागाला सांगते. संबंधित विभाग आणि वित्त विभागाची बैठक होते. उदाहरणच द्यायचे झाले तर राज्य उत्पादन शुल्क आणि वित्त विभागाचे अधिकारी आणि मंत्री एकत्रित बसून महसूल जमेचे टार्गेट निश्चित करतात. उत्पादन शुल्क विभाग त्यांच्या करांचा अंदाजे आकडा ७ हजार कोटी देत असेल तर वित्त विभाग त्यांना काही वेळेस त्याऐवजी ९ हजार कोटींचा महसूल जमा करायला सांगते. त्यावेळी उत्पादन शुल्क विभाग त्यांना कायद्यातील अमुक अटी किंवा तरतुदींमध्ये बदल करावा किंवा करांमध्ये अमुक याप्रमाणे बदल करावा असे सुचवितात आणि असे केले तर ९ हजार कोटींचा महसूल गोळा होऊ शकेल, असे सांगतात. त्यानुसार कर आकारणीची रचना निश्चित होते व त्यानुसार टॅक्स अनाऊन्स होतो आणि मग तो टॅक्स गोळा केला जातो.

**प्रश्न :** महोदय, माझा एक प्रश्न आहे. बजेटच्या बाबतीत येथे प्रशिक्षण होत आहे. पण सर्व आमदारांचे लक्ष व्हीआर आणि ओडीआर याकडे लागून आहे. आज पीडब्ल्यूडीचे रस्ते बजेटमध्ये ओढाताण करून आपण देऊ शकतो. पण व्हीआर आणि ओडीआरला डीपीडीसीमधून निधी देऊ, अशी आपण आता सूचना केली. पण डीपीडीसीमध्ये व्हीआर आणि ओडीआरला खूप कमी बजेट आहे. त्यातून काहीच कामे पूर्ण होत नाहीत.

मघाशी आपण म्हणालात की, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला सामोरे जाताना आपण काही शब्द देतो आणि असे शब्द पाळण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे ठरविले आणि लेखाशीर्ष २५१५ चा जन्म झाला. त्यामुळे आता आपण आमच्या व्हीआर आणि ओडीआरमधील निधी वाढविण्याच्या दृष्टीने नावीन्यपूर्ण काही तरी करण्यासाठी शब्द दिला तर बरे होईल, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**श्री. जयंत पाटील :** व्हीआर, ओडीआर आणि पाणंद रस्ते यांच्या बाबतीत माझे ठाम मत आहे. कारण अनेक शेतकऱ्यांच्या शेतात जाताच येत नाही. त्यामुळे पाणंद रस्त्यांचे विषय डीपीडीसीमध्ये घेतले तर चांगले होईल. कारण तो अगदी स्थानिक स्तरावरील विषय आहे. पाणंद रस्त्यांच्या बाबतीत आपण माननीय वित्तमंत्री महोदयांना विनंती करू की, पाणंद रस्त्यांसाठी मुरुमीकरण आणि खडीकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला निधी द्यावा. मुरुमीकरण आणि खडीकरण यापेक्षा अधिक काही नको. पूर्वी पाणंद रस्त्यांसाठी रोजगार हमी योजना हे उत्तर होते. पण आता मजूर मिळत नाहीत.

**प्रश्न :** आता जे बजेट अलोकेशन होते ते सर्वसाधारणपणे लोकसंख्या किंवा रस्त्यांची लांबी विचारात घेतली जात नाही. बजेट अलोकेशन अधिक एकूण रक्कम भागिले जेवढे मेंबर्स असतील तेवढे याप्रमाणे जनरली होते किंवा जो सदस्य सत्ताधारी पक्षात असेल त्याला थोडा जास्त निधी मिळू शकेल. पण यासाठी राज्याच्या निधीमधून वेगळी तरतूद करता येईल काय ?

**श्री. जयंत पाटील :** आपण जर अशी तरतूद राज्याच्या बजेटमध्ये करायचे ठरविले तर प्रत्येक जिल्ह्यामध्ये समान निधी वाटप होणार नाही. त्यापेक्षा अर्थमंत्र्यांचे डीपीडीसीचे बजेट २२० कोटी रुपयांचे असेल तर २२० अधिक १० असे २३० कोटी रुपये झाल्यास उदाहरण म्हणून २१० कोटी रुपये हे पाणंद रस्त्यासाठी वापरता येतील.

**प्रश्न :** अशा प्रकारचा उल्लेख करून द्यावा लागेल.

**श्री. जयंत पाटील :** या संदर्भात आपण सर्वांनी वेळ काढून उद्या दुपारी तीन वाजता माननीय अर्थमंत्र्यांची भेट घेऊ.

**प्रश्न :** राज्याचा अर्थसंकल्प तयार करीत असताना कोणत्या विभागासाठी किती निधी द्यावयाचा, यासाठी काही नियम आहेत काय ?

**श्री. जयंत पाटील :** यासाठी कोणतेही बंधन नाही. अर्थसंकल्प कोणत्या फॉरमॅटमध्ये मांडावयाचा याचा अधिकार वित्तमंत्री महोदयांना असतो. परंतु आपल्याकडे प्रथेप्रमाणे अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले जाते. प्रत्येक विभागाचा आढावा वित्तमंत्री महोदय घेत असतात. एखाद्या विभागाने १० हजार कोटी रुपयांची मागणी केली असेल आणि तेवढा निधी त्या विभागाला देता येत नसेल तर त्यामध्ये कपात करता येते. ही निगोसिएशनची प्रोसेस असते.

**प्रश्न :** सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी इलेक्ट्रिसिटी बिलसंदर्भात माहिती दिली होती. मी एक उदाहरण देऊ इच्छिते. महसूल विभागाची एखादी जमीन पोलीस विभागासाठी पाहिजे असेल तर महसूल विभागाने रेडीरेकनरच्या दराप्रमाणे पैसे भरले पाहिजेत. मी सांगू इच्छिते की, माझ्याकडे पाच ते दहा वर्षांपासून

काही प्रकल्प रखडलेले आहेत. एका विभागाकडून दुसऱ्या विभागाला जमीन दिली जात आहे. असे असताना महापालिका काही करू शकत नाही. शहरी भागात महसूल विभागाच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असते. असे असतानाही महसूल विभागाच्या जमिनी देण्यासाठी विलंब होत असतो. एका विभागाची जमीन दुसऱ्या विभागाला विनाशुल्क देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करता येऊ शकते काय ?

**श्री. जयंत पाटील :** एखाद्या विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे पैसे देत असताना त्या विभागालाही निधी मिळाला पाहिजे. मागणी करण्यात आलेले काम जर प्राधान्याचे नाही, असे जर त्या विभागाला वाटत असेल तर त्या विभागाला कमी पैसे दिले जातात. त्यामुळे यासाठी विलंब होत असतो. आपल्याला जे काम प्राधान्याचे आहे असे वाटते, तेच काम त्या विभागाला प्राधान्याने वाटत नसेल तर विलंब होतो. यासाठी सन्माननीय सदस्यांना पाठपुरावा करावा लागतो.

**प्रश्न :** डोंगरी भागामध्ये साकव योजना राबविता येते. परंतु इतर भागांमध्ये ती योजना राबविता येत नाही. शहरी तालुक्यातील गावाच्या ठिकाणी ओढे-नाले, असतात. त्या ठिकाणीही असे साकव बांधता आले पाहिजेत. यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करता येते का ?

**श्री. जयंत पाटील :** डोंगरी भागामध्ये साकवांची आवश्यकता असते. मोकळ्या जमिनीवर पाणी येत असेल तर तेथे साकवापेक्षा पूल अधिक उपयोगी ठरत असतो. कारण त्या ठिकाणी वाहतूकही मोठ्या प्रमाणात असते. डीपीडीसीमध्ये छोटे पूलही घेता येतात.

**प्रश्न :** जिल्हा नियोजन समितीसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो. जिल्हा नियोजन समितीचे पैसे राज्यस्तरावरून मागविले जातात. मी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेबाबत सांगू इच्छितो. मार्च महिन्यामध्ये आमच्या जिल्ह्याचे राज्यस्तरावर २० कोटी रुपये जमा आहेत. अनेक ठिकाणी व्हीआर आणि ओडीआर रस्त्यांचा प्रश्न निर्माण होतो. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे १० टक्के पैसे राज्यस्तरावर घेण्यात आले असून ते अद्यापपर्यंत आमच्या जिल्ह्यास दिलेले नाहीत. जिल्ह्याचे पैसे जिल्ह्यातच खर्च झाले पाहिजेत. परंतु असे होताना दिसत नाही.

**श्री. जयंत पाटील :** जिल्ह्याचे पैसे जिल्ह्यातच खर्च व्हावयास पाहिजेत. जर असा खर्च होत नसेल तर त्याची माहिती घ्यावी लागेल.

**प्रश्न :** मार्च महिन्यात राज्यस्तरावर पैसे खर्च झालेले आहेत. अजूनही ते जिल्हास्तरावर दिलेले नाहीत.

**श्री. जयंत पाटील :** याबाबत वित्तमंत्री महोदयांना भेटून विचारणा करता येईल.

**प्रश्न :** मी विधान परिषद सदस्य आहे. माझा मतदारसंघ सहा जिल्हे, ६३ तालुक्यांचा आहे. डीपीडीसीमध्ये निधी देताना विधानपरिषद सदस्यांसोबत भेदभाव केला जातो. असा अनेक विधानपरिषद सदस्यांचा आरोप आहे. म्हणून आम्हाला कशा प्रकारे अधिकाधिक निधी आमच्या मतदारसंघात खर्च करता येईल, याबाबत मार्गदर्शन करावे.

**श्री. जयंत पाटील :** जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन पाठपुरावा केला तर अधिक निधी मिळू शकतो.

**प्रश्न :** गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यात मामा तलाव, नाले यांची संख्या मोठी आहे. जलसंपदा, सिंचन विभागाच्या माध्यमातून ब्रिज कम बंधारे बांधले आहेत. काही बंधारे, मामा तलाव फुटत असतात. परंतु जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये बंधारे दुरुस्तीसाठी कोणताही हेड नाही.

**श्री. जयंत पाटील :** जिल्हा नियोजन समितीचा निधी हा नियोजन करून दिला जातो. नियोजित निधी दुरुस्तीसाठी वापरता येत नाही. हा निधी नव्या कामासाठी वापरला जातो. दुरुस्तीसाठी शासनाकडे निधीची मागणी केली पाहिजे.

*****



"आमदार निधीतून आदिवासी विकास किंवा तत्सम बाबींसाठी खर्च करणे अनिवार्य असते. बऱ्याच वेळा तो खर्च आपण करू शकलो नाहीत तर त्यासाठीचा राखीव निधी परत जातो. त्यामुळे आपण आपल्या निधीपैकी किती निधी मागासवर्गीय भागासाठी किंवा त्यांच्या विकासासाठी खर्च करू शकतो, त्याबाबत काय नियम आहेत इत्यादी बाबींचे देखील सुरुवातीलाच नियोजन केले पाहिजे. कारण हा निधी परत गेल्यानंतर ज्यावेळी त्या समाजातील लोकांकडे मते मागण्यासाठी तुम्ही जाता त्यावेळी ते जाब विचारतात. बऱ्याचशा आमदारांना या निधीबाबत काही माहितीदेखील नसते हेही खरे आहे. त्यामुळे सर्वप्रथम जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांकडून जाणून घेतले पाहिजे की, निधीचा वापर कधी आणि कशासाठी करू शकतो. त्यासंबंधीचे नियम, अवधी, इत्यादी बाबी सविस्तर समजून घेतल्या पाहिजेत. अर्थसंकल्पाची जशी पुस्तके असतात तशी पुस्तके जिल्हा नियोजन समितीमार्फत दिल्या जाणाऱ्या निधीसाठीदेखील आहेत. सर्व नवीन आमदारांनी या बाबी समजून घेतल्या पाहिजेत."

**'राज्याचा अर्थसंकल्प माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात'**
**दिनांक ५ व ६ ऑक्टोबर, २०२१ मध्यवर्ती सभागृह, विधानभवन, मुंबई**
**विधिमंडळ सदस्यांचा स्थानिक विकास निधी व त्याचा सुनियोजित वापर**

—ॲड. अनिल परब, (तत्कालीन संसदीय कार्यमंत्री)

वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण कार्यशाळेच्या आजच्या दुसऱ्या दिवशीच्या या सत्रामध्ये आताच ज्यांचे मार्गदर्शन झाले, ते शिवसेनेचे नेते महाराष्ट्राचे उद्योगमंत्री श्री. सुभाष देसाई, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माझे खूप वर्षांपासूनचे सहकारी ज्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सगळे धडे गिरविले, ते आमचे मानद सचिव श्री. हेमंत टकलेसाहेब, उपस्थित २७-२८ आमदार आणि ऑनलाइन उपस्थित असलेले २५ आमदार ही चांगली उपस्थिती आहे.

माझ्या व्याख्यानाचा विषय 'विधिमंडळ सदस्यांचा स्थानिक विकास निधी व त्याचा सुनियोजित वापर' मला असे वाटते की, गेले दोन दिवस आपण या सर्व विषयांवर वेगवेगळ्या व्याख्यातांचे मार्गदर्शन ऐकलेले आहे. काल रोजी माननीय विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी जे सांगितले ते आज सकाळी मला आठवले. त्यांनी काल एका कीर्तनकारांची गोष्ट सांगितली की मी काय सांगू ? तसेच आता माझे झालेले आहे. मला वाटत नाही की, कोणत्या आमदाराला माहिती नाही की, आपला निधी कसा वापरायचा ? निधी हा शब्द असा आहे की, हा हक्काचा शब्द आहे. आमदाराचा हक्क व कर्तव्य या दोन बाजू ज्याप्रमाणे असतात. त्या हक्कामधील निधी हा शब्द महत्त्वाचा आहे. हक्काचा शब्द म्हणजे निधी ! हा शब्द आमदारांना अतिशय जवळचा वाटतो. जे आमदार पहिल्यांदा निवडून आलेले असतात, त्यांच्यावर मतदारसंघाचा प्रचंड दबाव असतो. आम्हीदेखील ज्यावेळी पहिल्यांदा निवडून आलो, त्यावेळी असे वाटले होते की, आता गेल्या गेल्या सगळे बदलून टाकू. एवढे पैसे मिळणार आहेत की, सर्व मतदारसंघाचा त्यामध्ये कायापालट करून टाकू. जी स्वप्ने घेऊन आमदार मतदारसंघातून विधिमंडळात येतात, ती स्वप्ने कशी हळूहळू भंग होतात ते ज्यावेळी टर्म संपत येते, त्यावेळी लक्षात येते की, काय स्वप्न बघून आलो होतो आणि आता आपल्या हातात काय आहे ? ज्यावेळी पूर्ण पाच वर्षांचा आपण लेखाजोखा करतो, त्यावेळी आपल्या लक्षात येते की, काही नियोजनामध्ये तर आपल्या हातून चूक झाली नाही ना ! नियोजन करताना तर आपण कुठे गडबड केली नाही ना! केवळ स्वप्न बघून आपण काम करायला लागलो, आता पाच वर्षे संपत आल्यानंतर आतातरी आपल्या हाती काही लागते की नाही किंवा आपल्या हातात काही राहिलेले आहे की नाही ? या सर्व गोष्टींचा आपण त्यावेळी विचार करतो, ज्यावेळी लोकांच्या समोर जाण्याचा प्रसंग येतो. त्यावेळी या सर्व गोष्टींचा विचार सुरू होतो. काही वेळा तिकिट मिळते, काही वेळा तिकीट मिळत नाही पण या सर्व गोष्टींचा विचार कधी ना कधीतरी करावाच लागतो. आपण नेमके पाच वर्षांमध्ये या मतदारसंघासाठी किंवा तेथील लोकांसाठी काय केले ? आपल्याला सरकारकडून काय मिळाले, त्याचा वापर आपण लोकांसाठी कशा पद्धतीने केला ? याचा कधी ना कधी तरी विचार, कधी ना कधी तरी लेखाजोखा द्यायचाच असतो. बरेचसे आमदार वर्षाचा लेखाजोखा व हिशेब मतदारसंघात देतात. मतदारसंघासाठी काय केले, मतदारसंघासाठी मी कसे कसे, काय काय केले या सर्व बाबींचा वृत्तांत लोकांना दिला जातो. यामध्ये नियोजनाचा जो भाग असतो, यामध्ये जे टप्पे आपण पार करत असतो, याबाबत आपण जे ऐकत असतो की, अर्थसंकल्प माझ्या मतदारसंघासाठी कसा आहे ? अर्थसंकल्पामधून डीपीडीसीमध्ये काय आले ? डीपीडीसीचा वापर मी कसा केला ? त्याच्यातून जो निधी मिळाला तो कसा मी आणला ? शेवटी आमदार निधी जो माझ्या हक्काचा म्हणून ओळखला जातो.

सुरुवातीला १९८४-१९८५ मध्ये हा निधी आला. त्यावेळी हा निधी लोकोपयोगी लहान कामांचा निधी म्हणून सुरू करण्यात आला होता. त्यानंतर हळूहळू त्याचे नामांतरण झाले. त्याचे नामांतरण होऊन 'स्थानिक विकास कार्यक्रम निधी' म्हणून ओळखला जाऊ लागला. १९९६-१९९७ मध्ये आमदारांच्या असे लक्षात

आले की, हा तर आपल्या हक्काचा निधी आहे. याचे नाव स्थानिक विकास कार्यक्रम निधी असे झाले पाहिजे. शेवटी आमदारांचा 'स्थानिक विकास कार्यक्रमांचा निधी' असे त्याचे नामकरण झाले. या निधीवर अगदी शेवटचा हक्क असतो, असे म्हटले जाते. बाकीच्या निधीवर सरकारचा अधिकार असतो. ज्या पक्षाचे सरकार तो त्याला कसा रंग देईल, यावर सगळे अवलंबून असतो. हा निधी आपल्या नावाने लागत असतो. मतदारसंघामध्ये या निधीवर दुसऱ्या कोणाचेही नाव लागत नाही. या निधीवर केवळ आपलेच नाव लागते. या निधीचा जो काही वापर आहे, या निधीचा वापर कसा केला जात आहे, याला फार महत्त्व आहे. सन २०११-२०१२ मध्ये दोन कोटी निधी होता, आताच महाविकास आघाडीच्या अर्थमंत्री यांनी तो निधी चार कोटी रुपये केलेला आहे. आता या चार कोटींमध्ये हा कार्यक्रम मतदारसंघाकरिता कसा बसविणार आहोत? गेली दोन वर्षे कोविडमध्ये काम करत असताना यामधून तीस टक्के निधी कोविडकरिता खर्च केला जात आहे. या सर्व टप्प्यांवर या निधीचा वापर, हा निधी कोणत्या हेडमध्ये वापरायचा आहे, कोणत्या गोष्टींकरिता वापरायचा आहे, याचे नियोजन जो आमदार करतो, त्याला काही समस्या येत नाही. मला वाटते की, वर्षाच्या शेवटाला ज्यावेळी तो हिशेबाला बसतो की, माझ्या मतदारसंघामधील प्राधान्यक्रम काय आहे, त्याप्रमाणे मी कामांकरिता पैसा खर्च केला की नाही याकरिता या निधीचे नियोजन महत्त्वाचे आहे, असे त्याला समजते. अर्थसंकल्प ज्यावेळी मांडला जातो, अर्थसंकल्पामध्ये एखादी तरतूद केली जाते. अर्थसंकल्पाच्या बरोबरीने केंद्राच्या व राज्याच्या योजना असतात. या सर्व आपण ज्यावेळी आपण पाहतो. या योजनांमध्ये माझ्या मतदारसंघाकरिता काय आहे ? या योजनांमधून मी माझ्या मतदारसंघात काय घेऊन जाऊ शकतो ? आपल्याला जो जिल्हा विकास निधी येतो, या योजनेतून आपण काय घेऊ जाऊ शकतो. ज्या कामांबाबत आपण गेल्या पाच वर्षांत जी काही आश्वासन लोकांना दिलेली आहेत, याचा प्राधान्यक्रम लावताना लोकांच्या दबावाखाली आपण आपला जो हक्काचा निधी आहे, तो मोठ्या कार्यक्रमांकरिता खर्च करतो. या निधीने तर काहीच होत नाही. हा निधी इकडून खर्च केल्यामुळे दुसरीकडून येणारे जे काही रस्ते होते, ते देखील ब्लॉक होत चालले आहेत. मग अशा वेळेला आपण कैचीत सापडतो, तेव्हा अडचण होते. एका बाजूला आपण लोकांच्या दबावापोटी निधीला हात घातलेला आहे. दुसऱ्या बाजूला अर्थसंकल्पातून ज्या अपेक्षेने आपल्याला पैसे यायला पाहिजे होते, तो निधी आणायचा असेल तर त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. कारण त्यासाठी मंत्र्यांकडे, मंत्रालयात पाठपुरावा करावा लागतो, पाठीशी लागावे लागते, सारख्या बैठका घ्याव्या लागतात. मग त्यानंतर आपण त्या निधीपर्यंत पोहोचत असतो. आमदार निधी आपल्या हाताशी असतो म्हणून यातून ताबडतोब काम करण्यासाठी आपण निधी देतो. परंतु या निधीच्या काही मर्यादा आहेत. मी सुरुवातीला आमदार झाल्यानंतर मलादेखील असे वाटले होते की, आपला जो निधी आहे तो पटापट खर्च करून लोकांना खूश करावे. परंतु खूश करण्याच्या नादात आपण हळूहळू लोकांचा रोष कसा ओढवून घेतो याबाबत आपले नियोजन चुकल्यानंतर आपल्या लक्षात येते, तेव्हा नियोजनात गडबड झाली हे आपल्या लक्षात येते. मला हे सर्व कळल्यानंतर, हा निधी आपला फायर फायटिंग फंड असे मी समजतो. याचा अर्थ जिथे जिल्हा नियोजनामध्ये, अर्थसंकल्पामध्ये काही बसत नाही आणि अशा छोट्या कामासांठी तातडीचा निधी वापरायचा असेल तर आमदार निधी हा तातडीचा निधी म्हणून वापरला गेला पाहिजे. कारण मोठ्या कामांसाठी हा निधी वापरला तर त्याचा योग्य वापर होणार नाही. आपली गावे, वाडे इतकी मोठे आहेत त्या सर्वांपर्यंत आपण या निधीच्या माध्यमातून पोहोचू शकत नाही.

४ कोटी रुपयांच्या निधीतून कोविडची कामे सोडून बाकीच्या कामाचे नियोजन केले तर आपली बरीच कामे यामध्ये बसू शकतात. मग अशा वेळेला प्रत्येक गावासाठी यातून काय करू शकता याचे नियोजन

करावे लागेल. आपण पहिल्या तीन महिन्यांमध्ये जिल्हाधिकारी किंवा नियोजन अधिकाऱ्याकडे निधीचे नियोजन करण्यासाठी आमदार निधी देतो आणि यातून पुढच्या कार्यवाहीला सुरुवात करा असे सांगतो. मग अशा पद्धतीने आपली छोट्या कामांची प्रायोरिटी असते, त्याच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचू शकतो. प्रत्येक गावाला किंवा तालुक्याला वाटत असते की, या आमदाराने आमच्यासाठी काहीतरी आणलेले आहे. परंतु आपण एकाच भागातील खूप मोठे काम हाती घेतले आणि त्यामुळे इतर गावात कामाच्या माध्यमातून तुमचा संपर्कच झाला नाही तर त्याचा इनबॅलेन्स खूप मोठा होता. त्याचा परिणाम तुमच्या लोकप्रियतेवर होतो; त्यामुळे आमदार निधीचे नियोजन करणे खूप महत्त्वाचे आहे. याचा वापर करण्यासाठी जर आपण पहिल्या तीन महिन्यांत व्यवस्थित आयोजन केले पाहिजे. आमदार निधीचा वापर छोट्या छोट्या कामांसाठी आपत्कालीन निधी म्हणून वापर केला तर आपण जास्तीत जास्त कामांचे यश आपल्या पदरात पाडून घेऊ असे मला वाटते. या निधीचा वापर करताना आपल्याला कोणकोणत्या हेडखाली जावे लागते हे आपल्याला माहीत आहे. आता ५० टक्केच निधी वितरित झाला आहे, त्यामुळे याच्या माध्यमातून आपण किती लोकांपर्यंत पाहचू शकतो याचे नियोजन करणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टी करताना आपली १ ते २५ लाख रुपयांपर्यंतची मर्यादा आहे. ३ लाख रुपयांचे ई-टेंडर आपण १० लाख रुपयांपर्यंत नेलेले आहे. मागच्या वेळेस आमदारांची पूर्ण पाच वर्षे तर मर्यादा वाढवून द्या या मागणीमध्येच गेली आहेत. त्यासाठी बरीच शिष्टमंडळे आली किंवा विधानसभेमध्ये पण विषय झाले. मागच्या टर्ममध्ये जे आमदार होते त्यांनी हे पाहिलेले आहे. परंतु माझ्या मतदारसंघाला प्रत्येक गोष्टीचा कसा फायदा करून घ्यायचा, माझ्या निधीवर माझा अधिकार आहे, त्याच्या माध्यमातून मी कोणत्या गोष्टीमध्ये जाऊ शकतो, कोणत्या गोष्टी मी घेऊ शकतो याचा विचार केला पाहिजे. मागच्या दोन वर्षांत कोविडच्या कालावधीत माझ्या मतदासंघात कोविडसाठी लागणाऱ्या कोणत्या गोष्टींचा वापर केला की, ज्याच्या माध्यमातून मी लोकांच्या घरापर्यंत पोहोचू शकलो. त्याची प्रायोरिटी लिस्ट आपण सर्वांनी तयार केली असेल असे मला वाटते. मुंबई शहरात महानगरपालिकेचे काम मोठे असते. मी आमदारांची लिस्ट बघितली की, त्यांनी कोणती कामे, वस्तू मागितल्या आहेत. तिथे दुसरा स्कोपच नाही, कारण रुग्णालये महानगरपालिकाच बनवते, बऱ्याच सुविधा महानगरपालिका देते. मग निधी कशासाठी दिला जातो तर जास्तीत जास्त निधी हा सॅनिटायझरसाठी वापरला गेला आहे. सॅनिटायझर तरी किती वापरायचे कारण एखादी गोष्ट वापरण्यासाठीदेखील मर्यादा आहे. अशा वेळेला निधी असूनही तो मी किती वापरू शकतो यासाठी इनबॅलन्स होते. त्यावेळी आपली प्रायोरिटी काय असायला पाहिजे याचा विचार केला पाहिजे. १ कोटी रुपयांचे केवळ सॅनिटायझर मी मतदारसंघात वाटले तर कदाचित सॅनिटायझरचा पूर येईल. मग नेमके काय करायला पाहिजे तर माझ्या पातळीवर ग्रामीण भागात ॲम्ब्युलन्स आहे किंवा नाही हे बघितले पाहिजे. परंतु आता कोविडच्या परिस्थितीमुळे रुग्णवाहिका पण खूप झाल्या आहेत. कोविड गेल्यानंतर त्या रुग्णवाहिकांचे काय करायचे हा एक मोठा प्रश्न निर्माण होतो. काळाची गरज बघून अशा वेगवेगळ्या गोष्टी मतदारसंघासाठी करायला पाहिजेत, असे मला वाटते. याचे सर्व नियोजन जर आपण सुरुवातीच्या तीन महिन्यांत केले तर पूर्ण वर्षभर हा स्थानिक निधी व्यवस्थित वापरता येतो. स्थानिक संस्थांना लागणाऱ्या एनओसी बऱ्याच वेळेला मिळत नाहीत म्हणून काही वेळेला निधी परत जातो. त्याची कारणे म्हणजे आपण उशिरा अर्ज करतो म्हणून यंत्रणा काम करीत नाहीत.

आपल्याला माहीत आहे की, काही वेळेला स्थानिक राजकारण असते. आपण दुसऱ्याच्या कामात घुसलेलो असतो त्यामुळे कामे अडवून ठेवलेली असतात. या सर्व भानगडीमध्ये जो निधी खरोखर वापरला गेला पाहिजे तो वापरला जात नाही. कारण काही वेळेला अशी परिस्थिती निर्माण होते की, 'मला निधी मिळाला नाही तरी चालेल पण तुझे पण काम नाही झाले पाहिजे, माझे ५ ते २५ लाख रुपये अडकले तरी चालतील पण तुझे काम होणार नाही.' त्या त्या मतदारसंघाची राजकीय गणिते ही प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने करीत असतो. परंतु मला असे वाटते की, आपला पूर्ण निधी हा विनावापर जाता कामा नये. त्यामुळे या निधीचा वापर व्यवस्थित व्हायचा असेल तर त्याच्या परवानग्या मिळण्यासाठी जो आवश्यक कालावधी लागतो त्या कालावधीपूर्वी आपली सर्व प्रपोजल्स गेली पाहिजे. विधानसभेच्या आमदारांना त्यांच्याच मतदारसंघात काम करता येते. परंतु विधान परिषदेच्या आमदारांना सर्व महाराष्ट्रात काम करता येते. जे सदस्य विधानपरिषदेमधून निवडून गेले आहेत त्यांच्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र हा मतदारसंघ आहे. स्थानिक प्राधिकरण संस्थेद्वारा ते ज्या मतदारसंघातून निवडून गेले आहेत त्यांच्यासाठी त्या मतदारसंघात ते काम करू शकतात. पदवीधरांसाठी जो मतदारसंघ आहे तिथे ते काम करू शकतात. शिक्षक मतदारसंघातून जे सदस्य निवडून गेले आहेत ते शिक्षकांसाठी काम करू शकतात. राज्यपालांकडून जे सदस्य निवडून आले आहेत त्यांचा मतदारसंघदेखील पूर्ण महाराष्ट्र आहे. विधानपरिषदेच्या सदस्यांचा तसेच पक्षाकडून कधी कधी निधी दिला जातो तो सर्व निधी स्थानिक निधी म्हणून वापरता येतो. विधानपरिषद आमदार तसेच राज्यसभा खासदारांचा निधी पण बऱ्याच वेळेला स्थानिक निधीमध्ये येत असतो. माझा अनुभव असा आहे की, बऱ्याच वेळेला एकाच कामासाठी चार ते पाच यंत्रणांमधून निधी येत असतो. एखाद्या विधानसभेच्या आमदारांनी निधी मागितला तर तो आमच्या ओळखीचा, मित्र म्हणून किंवा आमच्या पक्षाचा म्हणून आम्ही त्याला निधी देतो. तो निधीदेखील एखाद्या रस्त्यासाठी किंवा पुलासाठी असतो. दुसरीकडूनदेखील त्याला त्याच कामासाठी आलेला निधी असतो. त्याच्या स्वतःच्या काही कमिटमेंटमुळे त्याने तोच निधी प्रस्तावित केलेला असतो,अशा तीन ते चार संस्थांच्या किंवा यंत्रणांच्या माध्यमातील निधी हे एकाच कामासाठी आलेले मी बघितलेले आहेत. कोणता निधी नेमका कोणत्या कामासाठी जायला पाहिजे याचेदेखील नियोजन केले पाहिजे. माझ्या विभागातील रस्ते, पूल किती आहेत, तसेच कोणता निधी कोणत्या यंत्रणेमध्ये वापरायचा या सर्वांचे नियोजन व्यवस्थित केले तर वर्षाच्या शेवटी आपण आपल्या मतदारसंघात जे कार्यवृत्त देतो त्यामध्ये निधीची अडचण झाली, त्यामुळे कामे झाली नाहीत असे क्वचितच लक्षात येईल. परंतु हे करण्यासाठी आपल्याला नियोजन करणे खूप महत्त्वाचे आहे. आता जे नवीन आमदार आले आहेत त्यांना कोरोनाच्या या दोन वर्षांच्या कालावधीत नियोजन विभागाशी काहीही संपर्क साधता आला नसेल हे मला माहीत आहे. या सर्व अडचणींना जेव्हा आपल्याला सामोरे जावे लागते त्या वेळेला आपल्या लक्षात येते की, यातील एक एक अडचण पार करीत करीत हे काम करून घेण्यासाठी किती वर्षे लागणार आहेत किंवा आपण तो टप्पा कधी पार करणार आहोत. या सर्व यंत्रणेमध्ये कामे सुचविण्याची पद्धत किंवा ती कशा पद्धतीने सुचविली पाहिजे यासाठी आता आयपा सिस्टीम सुरू झालेली आहे. तसेच ऑनलाइन कामे कशी करून घेता येतील हे बघितले पाहिजे. आता तुम्हाला सर्वांना हळूहळू आयडी मिळतील. या आयडीद्वारे लॉग-इन करून आपल्या कामाचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करून कसा मंजूर करून घेता येईल हे शिकून घेतले पाहिजे.

बऱ्याच वेळा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून कामे केली जातात. त्यामध्ये ग्रामपंचायतीपासून सर्वच निवडणुकांचा समावेश असतो. आमदार म्हणून ज्यावेळी आपण विविध गावांना भेटी देतो तेव्हा तेथील

लोकांच्या मागणीप्रमाणे कामांचे प्रस्ताव सादर केले जातात. निवडणुकीच्या तोंडावर आपण एखादा प्रस्ताव पाठविला व तो प्रस्ताव मंजुरीविना अडकून पडला तर आपण आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी जेव्हा संबंधित लोकांसमोर जातो, त्यावेळी लोकांनी प्रश्न विचारल्यावर आपली अडचण होते. काहीतरी थापा मारून तेथून निघण्याची वेळ येते. त्यामुळे आपल्याला येणाऱ्या काळामध्ये कोणकोणत्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे, कोणत्या गावातील लोकांचे काय प्रश्न आहेत, त्यावर आपण काय आश्वासन दिलेले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही झाली आहे का, जेव्हा आपण संबंधित गावात जाऊ त्यावेळी आपण लोकांना काय देणार आहोत याचे नियोजन व्यवस्थितरीत्या केले पाहिजे. आपण सर्व जण लोकांमधून निवडून आलेली असल्यामुळे आपणा सर्वांनाच याबाबत कल्पना आहे. पहिल्या टर्ममध्ये लोक जास्त विचारत नाहीत परंतु दुसऱ्या वेळी लोकांसमोर जाणाऱ्या लोकप्रतिनिधीला काय काय प्रश्न विचारले जातात याचा अनुभव आम्ही नेहमी घेतो. मला मिळालेला निधी मी सुनियोजितरीत्या पूर्णपणे खर्च केला व त्यामुळे लोकांना मदत झाली हे जेव्हा एखादा आमदार अभिमानाने सांगतो त्यावेळी आमच्या लक्षात येते की यांनी प्रामाणिकपणे व चांगले काम केलेले आहे.

वेगवेगळ्या लेखाशीर्षांखाली वेगवेगळा निधी येत असतो. बऱ्याच वेळा असेही पाहायला मिळते की, एखादे चांगले काम आपल्या हातून होते. म्हणजे एखादी चांगली वास्तू आपल्या प्रयत्नातून साकार झालेली असते. त्या वास्तूच्या उद्‌घाटनाचा टोलेजंग कार्यक्रम पार पडतो. त्याचे आपल्याला समाधान असते व लोकदेखील खूश असतात. परंतु वास्तू मोठी असल्यामुळे तिचा देखभाल खर्चदेखील मोठा असतो. हा देखभाल खर्च करू न शकल्याने पुढील दोन-तीन वर्षांनी वास्तूची दुरवस्था व्हायला सुरू होते. त्यावेळी आपल्या लक्षात येते की, वास्तूवर खर्च करीत असताना आपण तिच्या देखभालीबाबत विचार केला नाही. या वास्तूची देखभाल कोणी करायची, ज्यांच्यामार्फत देखभाल केली जात आहे ते योग्य प्रकारे काम करीत आहेत किंवा कसे इत्यादी अनेक प्रश्न उपस्थित होतात. माझे असे मत आहे की, केलेल्या कामाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी आमदार निधीतील ठराविक रक्कम आपण राखून ठेवली पाहिजे व वर्षाच्या सुरुवातीलाच त्याचे नियोजन केले पाहिजे.

आमदार निधीतून आदिवासी विकास किंवा तत्सम बाबींसाठी खर्च करणे अनिवार्य असते. बऱ्याच वेळा तो खर्च आपण करू शकलो नाहीत तर त्यासाठीचा राखीव निधी परत जातो. त्यामुळे आपण आपल्या निधीपैकी किती निधी मागासवर्गीय भागासाठी किंवा त्यांच्या विकासासाठी खर्च करू शकतो, त्याबाबत काय नियम आहेत इत्यादी बाबींचे देखील सुरुवातीलाच नियोजन केले पाहिजे. कारण हा निधी परत गेल्यानंतर ज्यावेळी त्या समाजातील लोकांकडे मते मागण्यासाठी तुम्ही जाता त्यावेळी ते जाब विचारतात. बऱ्याचशा आमदारांना या निधीबाबत काही माहितीदेखील नसते हेही खरे आहे. त्यामुळे सर्वप्रथम जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांकडून जाणून घेतले पाहिजे की, निधीचा वापर कधी आणि कशासाठी करू शकतो. त्यासंबंधीचे नियम, अवधी, इत्यादी बाबी सविस्तर समजून घेतल्या पाहिजेत. अर्थसंकल्पाची जशी पुस्तके असतात तशी पुस्तके जिल्हा नियोजन समितीमार्फत दिल्या जाणाऱ्या निधीसाठीदेखील आहेत. सर्व नवीन आमदारांनी या बाबी समजून घेतल्या पाहिजेत.

पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, शिक्षण, विद्युत, सार्वजनिक आरोग्य, लघु पाटबंधारे, अपारंपरिक ऊर्जा, रस्ते विकास, दळणवळण, स्वच्छता, क्रीडा, इतर सार्वजनिक कामे हे विविध लेखाशीर्ष आहेत. या अंतर्गत खर्च केला जातो. समजा, एखाद्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची योजना करणे आवश्यक असेल तर सर्वप्रथम हे समजून घेतले पाहिजे की, जिल्ह्याच्या आराखड्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठीच्या लेखाशीर्षांतर्गत किती निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानंतर राज्याच्या अर्थसंकल्पातून किती निधी मिळतो आहे हे पाहिले पाहिजे. जर त्यातून निधीची तरतूद होणे शक्य असेल तर सदर योजनेसाठी आमदार निधीतून खर्च करता कामा नये. परंतु जर इतर पर्यायांमधून निधी उपलब्ध होणे शक्य नसेल तर आमदार निधीतून किती खर्च करता येऊ शकतो हे पाहिले पाहिजे. कारण बऱ्याचदा असे होते की, लोकांच्या दबावामुळे बहुतांश पैसे पिण्याच्या पाण्याच्या योजनांवरच खर्च केले जातात. नंतर शिक्षण, विद्युत, आरोग्य या सुविधा मागण्यांसाठी लोक येतात त्यावेळी निधी शिल्लक नसतो. अशा वेळी निधीचे असंतुलित वितरण होऊन मतदारसंघातील काही लोक निधी मिळाल्यामुळे खूश होतात तर काही लोक निधी न मिळाल्यामुळे नाराज होतात. मी परत परत सांगत आहे की, आमदार निधी हा फायर फायटिंग निधी आहे. ज्यावेळी अशी परिस्थिती असते की, कमी पैशांमध्ये परिणामकारक काम करता येऊ शकते त्यावेळी या निधीचा वापर केला पाहिजे, असे माझे एवढ्या वर्षांनंतर मत झाले आहे. या निमित्ताने माझा आपणास सल्ला आहे की, आमदार निधी अशा कारणांसाठीच वापरला पाहिजे.

प्रत्येक मतदारसंघाचा डी.एन.ए. म्हणजे स्वरूप वेगवेगळे असते. ते अगोदर तपासून पाहिले पाहिजे. मतदारसंघाचे भौगोलिक स्वरूप, तेथील लोकांच्या गरजा इत्यादी बाबी तपासून पाहिल्या पाहिजेत. लोकांनी आपल्याला कशासाठी निवडून दिले आहे व त्यांची कामे करताना कोणत्या निधीचा कशासाठी उपयोग करून जास्तीत जास्त परिणाम साधला जाऊ शकतो याचा विचार केला पाहिजे व त्यानुसार नियोजन केले पाहिजे. हे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्याचा उद्देशच हा आहे की, लोकांनी आपल्याला ज्या अपेक्षेने या सभागृहामध्ये पाठविले आहे त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मदत झाली पाहिजे.

खरे तर, मी विधानपरिषद सदस्य असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हा माझा मतदारसंघ आहे. माझे आमदार निधीचे पैसे नेमके कुठे जातात हे मलादेखील समजत नाही. कारण माझे स्वतःचे स्वप्न म्हणून ते पैसे जात नाहीत. मला फ्लोअर मॅनेजमेंट किंवा संसदीय आयुधांसंदर्भातील एखादा विषय बोलण्यासाठी दिला असता तर जास्त आनंद झाला असता. परंतु मला स्थानिक विकास निधीच्या विनियोगाबाबतचा विषय देण्यात आला आहे. मला गेल्या अनेक वर्षांचा अनुभव असल्यामुळे मी यावरदेखील बोलू शकतो. परंतु विधानसभा सदस्य म्हणून मी या निधीचे कधीही वाटप केलेले नाही. मला विधानपरिषदेवर ज्या सन्माननीय सदस्यांनी निवडून पाठविले आहे त्या २८ लोकांना खूश ठेवण्याचे काम मी या निधीच्या माध्यमातून करतो. या २८ लोकांकडून राज्यातील २८८ मतदारसंघातील लोकांपर्यंत हा निधी जाऊन त्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे थेट मी निधी देऊन काहीतरी काम झाल्याचे समाधान अद्यिाप मला मिळालेले नाही. माझ्याशी संबंधित २८ आमदारांना मी निधीतून खूश केले म्हणजे माझी पुढच्या टर्मची व्यवस्था झाली, तसेच तुमचेदेखील आहे. तुम्हालाही पुन्हा या ठिकाणी यायचे आहे आणि येथे येण्याचा रस्ता तेवढा सोपा नाही. तुमची काय औकात आहे असे जर कोणी विचारले तर मी उत्तर देत असतो की, ‘साडेअकरा कोटींमधून निवडून जाणाऱ्या सुमारे

साडेतीनशे जणांमधील मी एक आहे व मी त्या ठिकाणी तीन वेळा गेलो आहे, ही माझी औकात आहे.' येथे यायचे म्हणजे येण्यासाठीचे सर्व मार्ग माहिती असले पाहिजेत. त्या मार्गावरून आपली गाडी सुसाट वेगाने चालावी असे वाटत असेल तर मार्गदेखील चकचकीत करून ठेवला पाहिजे. आमदार निधी हा देखील सदर रस्ता चकचकीत करण्याचा एक मार्ग आहे. त्यामुळे आपला निधी चांगल्या प्रकारे कसा वापरात येईल, निधीचे व्यवस्थापन कसे करता येईल, इत्यादी बाबी पाहिल्या पाहिजेत. नियोजनात गडबड झाली तर सर्वच व्यवस्थापन ढासळते. आपण निवडणुका लढताना ज्या प्रकारे कोणती मते कुठून मिळतील याचे गणित जुळवितो तसेच या शिबिरातून देखील दोन दिवसांमध्ये आम्ही आपणास सांगत आहोत की अर्थसंकल्पाचे नियोजन कसे केले पाहिजे, जिल्हा नियोजन समितीमधून मिळणाऱ्या निधीचे नियोजन कसे केले पाहिजे व आमदार निधीचे नियोजन कसे केले पाहिजे.

मला असे वाटते की, जे आमदार हे समजतात, ज्यांना हे कळते असे बरेच आमदार सभागृहात बोलत नाहीत. ते म्हणतात, आम्ही भाषणे करून थोडेच निवडून येतो. ते मतदारसंघात लोकांवर प्रभाव पाडतात म्हणून ते निवडून येतात. असे तीन-चार टर्म झालेले आमदार मी पाहिले आहेत की, ज्यांनी सभागृहात कधी तोंडही उघडलेले नाही. पण त्यांना आपला निधी कसा वापरायचा, लोकांपर्यंत कसे पोहचायचे, लोकांवर कसा इम्पॅक्ट करायचा. या सर्व गोष्टींचा त्यांनी बरोबर अभ्यास केलेला असतो. म्हणून मला असे वाटते की, एखाद्याला यशस्वी लोकप्रतिनिधी व्हायचे असेल तर त्याच्यासाठी या अर्थसंकल्पात माझ्यासाठी काय आहे, जिल्हा नियोजन मंडळाच्या विकास निधीतून माझ्या मतदारसंघात काय घेऊन जातो, आपला हक्काचा आमदार निधी याचा वापर मी कसा करू शकतो, या सर्व गोष्टीचे नियोजन म्हणजे तुमची यशस्वी कारकीर्द होय. शेवटी पाच वर्षांनंतर तुमचे मूल्यमापन या माध्यमातून होते. मला असे वाटत नाही की, कोणत्याही आमदाराला फार कमी वेळा विचारले असेल की, विधानसभेत तुझ्या मतदारसंघाचे प्रश्न किती मांडलेस. परंतु या मतदारसंघात तू किती कामे केलीस, किती निधी आणलास, कशा प्रकारे आणला हे विचारतात. कारण तुमची ही कामे समोर दिसत असतात. त्याच्या पाठी तुमचा छानसा फोटो लावलेला असतो. बऱ्याच वेळा आपला जुना तरुणपणातील फोटो लावलेला असतो. तो बघून आपणही खूश होत असतो. मी बघतो की, माझा पूर्ण केस असलेला फोटो लोक लावतात. मी म्हटले या सर्व कारकिर्दीत केस पूर्ण गेले. तरी तिकडे जुनाच फोटो लावलेला असतो. ते आपल्यासाठी उत्साहवर्धक वातावरण या निधीतून तयार होत असते. हल्ली नवनवीन पॅटर्न निघालेले आहेत. स्थानिक विकास निधीवर आपला ब्रँण्डिंग हा आपला हक्क असतो. त्यामुळे हल्ली मी वेगवेगळे पॅटर्न बघतो. कोणत्या भागात आपले काम झाले पाहिजे की, त्या मतदारसंघात जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येक माणसाचे लक्ष वेधते. हल्ली आमच्या वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेला फाइव्ह स्टार टॉयलेट्स बांधतात. टॉयलेट ही काही प्रसिद्धीची जागा नाही. परंतु मुंबईतील आमदारांचे हायवेवरील एकूण एक टॉयलेट बघाल तर प्रत्येक जाणारा माणूस तिथे बघत असतो. ती ब्रँण्डिंगची जागा आहे. म्हणून तुमच्या निधीतून ब्रँण्ड तयार करण्याची जागा आहे. एसटी स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन्स येथून जाणारा प्रत्येक मतदार ते बघत असतो. त्याच्या मनात तुमच्याबद्दल वेगळी भावना निर्माण करण्याचा हा हक्काचा निधी आहे. तो तुम्ही कसा वापरता याला महत्त्व आहे. म्हणून मला असे वाटते की, गेल्या दोन वर्षांत कोविडच्या कालावधीमध्ये आपण एकमेकांपासून फार दुरावलो गेलो होतो. आपल्याला प्राप्त झालेला निधी लोकांच्या आरोग्यासाठी जास्त खर्च करावा लागला. हळूहळू आपण या संकटातून बाहेर पडत आहोत. उरलेल्या वर्षांमध्ये आपल्या

निधीचे सुनियोजित, व्यवस्थित वाटप जर केले तर मला विश्वास आहे की, मला माहिती आहे की, सर्व मतदारसंघात एका टर्ममध्ये अपेक्षा पूर्ण करणे हे काही सोपे नाही, तशी शक्यता फार कमी असते. परंतु मतदारांना एवढा फिल दिला की, आम्ही तुमचा विचार करीत आहोत. तुमच्यासाठी फूल नाही पण फुलाची पाकळी माझ्या स्वतःच्या आमदार निधीतून मी तुमच्यापर्यंत पोहचविलेली आहे. मला असे वाटते की, ज्या अपेक्षेने त्यांनी इथपर्यंत पाठविले आहे त्यांच्या अपेक्षांची पूर्तता होण्यासाठी हे सर्व नियोजन या सर्व टप्प्यांवर अतिशय महत्त्वाचे काम आहे.

श्री. हेमंत टकले यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. माननीय सभापती, माननीय उप सभापती यांनी मेहनत करून पुन्हा एकदा आमदारांना या विविध विषयांवर मार्गदर्शन करून, यशस्वी आमदार बनण्यासाठी आयुधे व प्रकार आपणास वापरावे लागतात, पुनः पुन्हा येथे येण्यासाठी जे जे काही करावे लागते. सध्या अर्थसंकल्प हा एक विषय झाला, अजूनही काही विषयही आपणास घ्यावे लागतील. आता म्हटले की, न बोलणाऱ्या आमदारांसाठी एक दिवसाचे अधिवेशन घेण्यात यावे. मी तर संसदीय कार्यमंत्री आहे, मला पहिल्या बाकापर्यंत येण्यास चौथी टर्म लागली. आम्हीदेखील तुमच्यासारखे फार दुःखी असायचो. पूर्ण रात्रभर अभ्यास करून यायचो, सकाळी बोलायला उभे राहण्याच्या तयारीत असताना सभापती खाली बसण्यास सांगायचे व दुसऱ्यास बोलायला परवानगी द्यायचे. तुम्ही विचार करा, पूर्ण अभ्यास करून एखादा आमदार येतो व त्या दिवशी त्याला सभागृहात बोलायला मिळत नाही, त्यावेळी काय त्रास होत असेल ते तुमच्या सगळयांपेक्षा मी जास्त अनुभवले आहे. म्हणून मी एक दिवस तरी संसदीय कार्यमंत्री होईन व कोणाला तरी एक दिवस खाली बसवीन ही मनामध्ये फार प्रबळ इच्छा होती. परंतु एक गोष्ट मी तुम्हाला सांगतो, खरे तर आजचा विषय नाही, पण फ्लोअर मॅनेजमेंट हा माझा आवडीचा विषय आहे. तुम्ही सभागृहात काय विचारता यावर तुमचे स्थान अधोरेखित होते. मी आता उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांना तेच सांगत होतो. जेव्हा तुम्ही सभापतींना / पीठासीन अधिकाऱ्यांना अडचणीत आणाल तेव्हा तुम्हाला बोलायला मिळेल. पीठासीन अधिकारी विचार करतात की, याला बोलायला द्या, नाही तर उगीच काही प्रश्न विचारायचा. म्हणून पहिला वक्ता बोलतो, तो जर दुसऱ्या दिवशी सायंकाळी शेवटचा वक्ता बोलणार असेल तर तुम्हाला कोणी बोलायला देणार नाही. मी पाहतो की, भाषणांचे ते ते रिपिटेशन होत राहते. शेवटी सभापती व अध्यक्ष कंटाळलेले असतात, ते तुम्हाला लवकर भाषण आटोपायला सांगतात. मला असे वाटते की, प्रत्येकाला संधी मिळते, कोणाला संधी मिळत नाही असे नाही. जेव्हा तुम्हाला संधी मिळते तेव्हा सभागृहाला ही जाणीव करून द्यावी लागते की, माझ्याकडे काही तरी वेगळे मटेरियल आहे. मी काही तरी वेगळे घेऊन आलेलो आहे, याची सभागृहाला दखल घ्यावीच लागेल. त्या दिवशी तुमचे स्थान अधोरेखित केले जाते व हळूहळू तुम्हाला बोलायला मिळते. जसे तुम्ही बोलायला लागता तसे तुम्ही मागच्या बाकावरून हळूहळू पुढे यायला लागता. मागच्या बाकावरून पुढच्या बाकावर येण्याचे मार्ग हा विषय आपण पुढे चर्चेला ठेवू. काही लोकांना मागच्या बाकावर फार आवडते, गप्पा मारायला, बाहेर जायला बरे पडते, मंत्र्यांना क्रॉस करावे लागत नाही. पण ही संस्था प्रामाणिकपणे हे काम करीत असते, या माध्यमातून एकमेकांकडून बऱ्याच गोष्टी आपण शिकतो, समजतो. मी पहिल्यांदा विधानपरिषद सभागृहात आलो तेव्हा एकाहून एक दिग्गज सदस्य होते. एक एक किस्सा सांगायचा म्हटले तर अशा कार्यशाळा व्हायला पाहिजेत. कै. नवलकर त्यावेळी सभागृहाचे सदस्य होते. एका मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, आज लवकर जायचे आहे तुमचे भाषण लवकर

आटोपा. १० मिनिटांचा ब्रेक द्या, मी येतो असे ते म्हणाले. मला आजही आठवते की, ते एवढी पुस्तके घेऊन आले. सायंकाळी ६ वाजता भाषण सुरू केले, रात्री १२.३० वाजता सभापतींना माफी मागावी लागली की, 'आता संपवा, नाही त्यांना लवकर पाठवा' असेदेखील वक्ते या सभागृहात येऊन गेलेले आहेत. मी कित्येक उदाहरणे, किस्से तुम्हाला सांगू शकेल. मला वाटते की, नवलकर व विलासरावांचा होय-नाहीचा किस्सा ज्या सदस्यांनी ऐकला नसेल त्यांना पुन्हा एकदा सांगावा लागेल. या सभागृहात तुम्हाला अधोरेखित करायचे असेल तर काय करावे लागेल. या सर्व गोष्टी या शिबिरातून व्यक्त होतात. ग्रंथालय हा आपल्यासाठी फार महत्त्वाचा विषय आहे. नवीन सदस्यांनी ग्रंथालयात जायला पाहिजे. ग्रंथालयात तुम्हाला प्रत्येक वर्षाचे मटेरियल मिळते. तेव्हा देशमुखसाहेब पुस्तके व कार्यवृत्त घेऊन सभागृहात आले की मंत्री घाबरायचे. कारण ते ३५ वर्षे सभागृहात होते. ३५ वर्षांतील प्रत्येक गोष्टीचे ते साक्षीदार होते. कोणताही मंत्री त्यांना काही बोलू शकत नव्हता. ही लीगसी उभी करायची असेल तर त्याच्यासाठी आपल्या या संस्थेचे योगदान फार मोठे आहे. म्हणून मला असे वाटते की, प्रत्येक नवीन सदस्याने अशा शिबिरामध्ये नक्की आले पाहिजे. या मार्गदर्शनाचा लाभ घ्यायला पाहिजे. जरी आम्ही तुम्हाला काही सांगत असलो तरी स्थानिक राजकारण, गणित या सर्वांवर ते अवलंबून असते. परंतु आम्ही घेतलेल्या प्रशिक्षण शिबिरातील १० टक्के भाग जरी आपल्याला कामाला आला तरी या संस्थेचे उद्दिष्ट सफल होईल. ते सफल होण्यासाठी ईश्वरचरणी मी प्रार्थना करतो. आपण माझे विचार ऐकून घेतल्याबद्दल आपले आभार मानतो. जयहिंद, जय महाराष्ट्र! धन्यवाद.

**यापुढे झालेली प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे –**

**प्रश्न :** आपण आज कार्यशाळेच्या निमित्ताने सर्व जण एकत्र जमलो आहोत. आम्ही शहरी भागातील लोकप्रतिनिधी आहोत. शहरी भागांमध्ये कामे करण्यासाठी स्थानिक विकास निधी हा मोठा पर्याय आहे. पुण्यासारख्या शहरांमध्ये मोठमोठ्या सोसायट्या निर्माण झालेल्या आहेत. तसेच काही सोसायट्या अतिशय जुन्या आहेत. त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांच्याकडून आमच्याकडे सातत्याने मागणी केली जाते की, आम्ही कर तसेच मेंटेनन्स भरत आहोत. त्यांना महानगरपालिकेच्या माध्यमातून वीज, पाणी, रस्ते अशा मूलभूत सुविधा दिल्या जातात. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, सोसायट्यांना अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीमची कामे याकरिता आर्थिक भार उचलणे शक्य होत नाही. परंतु रस्ते, ड्रेनेज सिस्टीमची कामे आमच्या इमारतीपर्यंत येण्यासाठी अंतर्गत खर्च स्थानिक विकास निधीमधून झाल्यास ते सोयीचे होऊ शकेल. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन दिलेले आहे. आम्ही आज 'अ' वर्गाच्या महानगरपालिकेमध्ये राहत आहोत. त्यामुळे आम्हाला उक्त मूलभूत सुविधांसाठी कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध होत नाही. शहरी सडक योजनेच्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रांमध्ये काही योजना राबविता येऊ शकते का ? अशी आमच्याकडे विचारणा केली जाते. पुणे मोठ्या प्रमाणात डेव्हलप झालेले असून तेथे झोपडपट्टी आणि सोसायट्या असे भाग तयार झालेले आहेत. या संदर्भात नवीन हेड निर्माण झाल्यास ते सोयीचे होऊ शकेल. अन्यथा ती कामे अनेक वेळा करावी लागतात.

**ॲड. अनिल परब :** आपण उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. मी देखील शहरी भागामध्ये अनेक वर्षांपासून काम करीत आहे. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे अनेक दिवसांपासून पाठपुरावा

करीत आहे. अनेक विभागांमधील खासगी सोसायट्यांकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी देता येत नाही. अशा ठिकाणी आमदारांना स्वतःचा आमदार निधी वापरण्यासाठी परवानगी मिळाली पाहिजे. मुंबई महानगरपालिकेमध्ये या बाबतीत काही ठिकाणी कार्यवाही सुरू केलेली आहे. ही पद्धत अद्यापही सर्व भागांमध्ये पोहोचलेली नाही. अनेक विभागांमधील खासगी सोसायट्यांकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी वापरता येत नाही. अशा ठिकाणी आमदारांना स्वतःचा आमदार निधी वापरण्यासाठी परवानगी मिळावी याकरिता आपल्याला यश मिळू शकेल.

**प्रश्न :** या कार्यशाळेच्या निमित्ताने अतिशय चांगल्या प्रकारे आमदारांना मार्गदर्शन मिळालेले आहे. मी सन २००९ मध्ये आमदार म्हणून निवडून आलो. तसेच आम्ही अधिवेशनाला जाण्यापूर्वी लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे तसेच विविध आयुधांची आम्हाला माहिती देण्यात आली होती. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये संबंधित प्रश्नाच्या मर्यादेतच आपण बोलायचे असते. याबाबत अनेक नवीन सन्माननीय सदस्यांना माहिती नसते. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये साधारणतः ५ ते ७ प्रश्नांवर चर्चा होत असते. विधेयकांच्या माध्यमातून कायदे तयार होत असतात. सदर विधेयक कशा प्रकारे तयार केले जाते, विधेयक पुनःस्थापन, विधेयकाची मांडणी याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती नसल्यामुळे त्याबाबत सदनामध्ये आपले विचार मांडण्यासाठी त्यांची डेरिंग होत नाही. सदनामध्ये वापरल्या जाणाऱ्या आयुधांची माहिती देण्यासाठी सीपीएमार्फत एखाद्या महिन्यामध्ये कार्यशाळा आयोजित केल्यास सन्माननीय सदस्यांना आयुधांबाबत चांगली माहिती मिळू शकेल. विधिमंडळ सदस्यांना प्रशासनाकडून अनेक अडचणी येत असतात. आम्ही दिलेल्या लेखी पत्रांना विभागांकडून उत्तरेसुद्धा दिली जात नाहीत. याबाबत मंत्रिमहोदयांना लेखी पत्र पाठविले तरी त्यांच्याकडून त्याबाबत कोणतेही उत्तर दिले जात नाहीत. आमदारांनी आपापल्या मतदार संघामध्ये चांगली विकास कामे करून घेतली पाहिजेत. परंतु या संदर्भात जाणूनबुजून व्हिजिलन्स वीक करून ठेवलेला आहे. सामाजिक कामे किंवा रस्त्यांची कामे असो, त्याबाबत इन्स्पेक्शन करण्यासाठी आमदारांना अधिकार आहेत किंवा कसे ? याबाबत आपण मला मार्गदर्शन करावे.

**ॲड. अनिल परब :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोविड काळात दोन वर्षांपासून सीपीए मार्फत कार्यशाळा घेऊ शकलो नाही. परंतु अशा प्रकारे नेहमी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. तसेच नवीन आमदार निवडून आल्यानंतर प्रत्येक वेळी त्यांच्याकरिता दोन दिवसांची कार्यशाळा ठेवली जाते आणि त्यामध्ये १३ आयुधांचा वापर कशा प्रकारे करावा याबाबत नवीन आमदारांना मार्गदर्शन केले जाते. परंतु नवीन आमदारांनी सर्वप्रथम विधिमंडळाच्या नियमांचे पुस्तक वाचणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून त्यांना नियमांबाबत चांगली माहिती मिळू शकते. मी प्रथमच आमदार म्हणून निवडून आल्यानंतर मला असे वाटले होते की, आपल्याला सदनात प्रश्न विचारण्याची संधी मिळू शकणार नाही. मी त्यावेळी नियम वाचून येत होतो. तसेच एखादे सन्माननीय सदस्य सदनामध्ये बोलण्यासाठी उभे राहिल्यानंतर मी माननीय सभापती यांच्याकडे विचारणा करायचो की, संबंधित सन्माननीय सदस्य कोणत्या नियमान्वये बोलत आहेत ? त्यावेळी बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांना नियम माहीत नसल्यामुळे ते थोडे गडबडतात. तसेच माननीय सभापती आपल्याला नियम शोधून अवगत करेपर्यंत सदनात आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधले जाते. अशा प्रकारे सदनामध्ये आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधले जावे असा आपला जो मूळ उद्देश असतो तो आपोआप साध्य

होतो. अशा प्रकारे ४-५ वेळा नियमांचा अभ्यास झाल्यानंतर सदनामध्ये सर्वांच्या निदर्शनास येते की, सदर सन्माननीय सदस्यांना सर्व नियमांची माहिती असल्यामुळे यांच्यापासून थोडे सावध राहिले पाहिजे. तसेच त्यांना जास्त बोलण्याची संधी दिली पाहिजे. कायदे कशा प्रकारे तयार केले जातात ? याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना सीपीएमार्फत कार्यशाळा आयोजित करून प्रशिक्षण द्यावयाचे आहे. मी याबाबत विधिमंडळ सचिवालयाला विनंती करतो की, त्यांनी अशा प्रकारची कार्यशाळा लवकरात लवकर आयोजित करावी. तसेच कायद्याचे वाचन कशा प्रकारे केले पाहिजे ? याबाबत आमदारांना माहिती झाल्यास त्यांना विधेयकावर पाहिजे तेवढे बोलता येईल. त्यावेळी तुमचा अभ्यास व ज्ञान सदनामध्ये आपल्या भाषणाच्या माध्यमातून दाखविण्याची संधी मिळू शकते. सामाजिक कामे किंवा रस्त्यांची कामे असो, त्याबाबत इन्स्पेक्शन करण्यासाठी आमदारांना अधिकार आहेत. तसेच त्यावेळी आपल्या अधिकारांचे काही उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याकरिता विधिमंडळामध्ये विशेषाधिकार भंग नावाचे मोठे आयुध आहे. परंतु विशेषाधिकार भंगापूर्वी लेखी पत्र दिल्यास त्या संदर्भात नेहमी अंमलबजावणी होत असते. हा माझा स्वतःचा अनुभव आहे.

**प्रश्न :** स्थानिक विकास निधीसंबंधी सांगायचे झाल्यास हा निधी फायर फायटिंग किंवा तातडीच्या कामांसाठी वापर करावा या संदर्भात मुद्दा मांडण्यात आला आहे. आम्ही ग्रामीण व शहरी भागांमध्ये काम करीत असताना तेथे रस्ते तसेच विविध कामे होत असतात. त्यातील काही रस्ते बी अॅण्ड सी, महानगरपालिका, जिल्हा परिषदा किंवा एमएसआरडीसी करू शकते. परंतु ग्रामीण भागातील नॉन-प्लॅनमधील रस्ते तसेच पाणंद रस्ते असो, ते कोणाकडूनही केले जात नाहीत. आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून अशा रस्त्यांची कामे व्हावीत अशी जनतेची सुद्धा अपेक्षा असते. भविष्यात अशा कामांसाठी आमदार निधी वापरता आला पाहिजे.

**ॲड. अनिल परब :** काल या संदर्भात चर्चा झाली असून त्यावेळी माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी असे सांगितले होते की, पाणंद रस्त्यांसाठी आपल्याला हेड तयार करावा लागेल. तसेच जी कामे हेडमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत अशा कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये नवीन हेड तयार व्हावयास पाहिजे. याकरिता आज अनेक जण माननीय अर्थमंत्री यांची भेट घेणार आहेत. सदर विषयासंबंधी त्यांच्याकडे आज दुपारी ३.०० वाजता बैठक आयोजित केलेली आहे.

**प्रश्न :** आम्ही अनेक वेळा प्रश्न देऊनसुद्धा त्यांचा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समावेश होत नाहीत. याबाबत आम्हाला माहिती मिळाल्यास बरे होईल.

**ॲड. अनिल परब :** तारांकित प्रश्न लागण्यासाठी बॅलट काढले जाते. ज्या दिवशी बॅलट काढले जाते, त्या दिवशी तुम्ही स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे. जेणेकरून आपला प्रश्न का लागत नाही किंवा कसा लागतो याची आपल्याला माहिती मिळू शकेल. तसेच त्यावेळी तुम्हाला प्रायोरिटीदेखील मिळते. परंतु अनेक सन्माननीय सदस्य बॅलट काढण्याच्या वेळी उपस्थित राहत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

**प्रश्न :** मंत्रिमहोदय, माझा एक प्रश्न आहे. मी कालदेखील लेखाशीर्षाबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी असे सांगितले होते की, कोणत्याही लेखाशीर्षामध्ये, हेडमध्ये बदल करायचा असल्यास कॅगची परवानगी घ्यावी लागते. समाजामध्ये तसा बदल गरजेचा आहे. अनेक

वर्षांपासून असलेल्या बजेट पॅटर्नमधील लेखाशीर्षामध्ये ज्या तरतुदी आहेत त्यात काळानुरूप बदल करणे आवश्यक आहे. काही ठिकाणी त्यामध्ये कशा प्रकारे कामे करायची याबाबत तरतूद नाही. पदवीधर मतदारसंघाचा आमदार या नात्याने प्रत्येक जिल्ह्यामध्ये, खेड्यांमध्ये तसेच गावांमध्ये वाचनालयाची मोठी मागणी असते. वाचनालयाकरिता पुस्तके देता येतात. परंतु रीडिंग नोंदीकरिता तरतूद नाही. अशा अनेक गोष्टी आहेत. पूर्वीच्या काळात वाचनालयासाठी पुस्तकांकरिता जेवढी तरतूद केली जात होती, तेवढी तरतूद आता केली जात नाही. त्यामुळे लेखाशीर्षामध्ये बदल करून नवीन अभ्यास करण्यासाठी एक अभ्यास समिती तयार करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

**ॲड. अनिल परब :** आपली सूचना योग्य आहे, यामध्ये काळानुरुप बदल केले पाहिजेत. लायब्ररीसंदर्भात आपण स्पेसिफिक मागणी करावी. ग्रंथालय या हेडअंतर्गत आमदार विकास फंडांतर्गत मागणी मांडत असतो.

**प्रश्न :** वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे मी या कार्यशाळेकरिता आभार मानतो व माझी सूचना मांडतो. चांगली योजना बनविण्याकरिता मंत्रिमहोदयांना मंत्री याप्रमाणे ट्रेनिंग मिळण्याकरिता योग्य ती कार्यवाही करावी.

**ॲड. अनिल परब :** ठीक आहे, याचा विचार करण्यात येईल. आपल्याला भावी वाटचालीकरिता शुभेच्छा!

**प्रश्न :** रुग्णवाहिकेची साइज गावातील छोट्या रस्त्यांमधून रुग्णांना रुग्णालयाकडे घेऊन जाण्याकरिता योग्य व आवश्यकतेप्रमाणे असावी, याकरिता वेगळा व परिपूर्ण असा प्रस्ताव तयार करण्यात यावा. आमचे प्रश्न लागत नाहीत, हे खरे आहे. बीएसीमध्ये असे बंधनकारक केले पाहिजे की, किमान एक किंवा दोन प्रश्न तरी प्रत्येक सदस्यांचे लागले पाहिजेत. माझा जो मतदारसंघ आहे, त्यामध्ये ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका आहे. विरोधी पक्षाकडे असलेल्या महानगरपालिका प्रशासनाकडून आम्हाला कोणतीही विचारणा होत नाही. आम्हाला याबाबत असे सांगितले जाते की, याकरिता हक्कभंगाची आयुधे आहेत. या दृष्टिकोनातून त्यांनाही काही निर्देश देण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक विधानसभेमध्ये साधारणतः दहा-पंधरा टक्के अपक्ष असतात. अपक्षांकरिता वेळ राखीव ठेवावा, ही विनंती करीत आहे.

**प्रश्न :** महोदय, आमदार निधीचा कसा वापर व्हावा, याबाबत आपण सखोल माहिती दिलेली आहे. आम्ही- देखील आमदार निधीचे वाटप कसे करायचे, याचा अभ्यास करून पूर्ण काम करीत असतो. रुग्णवाहिका शासनाने मोठ्या घेतलेल्या आहेत. त्या खेडेगावातील छोट्या रस्त्यांमधून जाऊ शकत नाहीत. या मोठमोठ्या गाड्या कोणी घ्यायला तयार नाहीत. आम्हाला क्रूझरसारखी छोटी गाडी याकरिता आवश्यक आहे.

**ॲड. अनिल परब :** ठीक आहे. आपण याकरिता आमदार म्हणून वित्त खात्याला पत्र द्यावे. या संदर्भातील नियमांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न करू.

**प्रश्न :** महोदय, मी शहरी भागातून निवडून आलेलो आहे. शहरी भागात मोठमोठे ले-आऊट असतात. त्या मोठ्या ले-आऊटमध्ये इंटरर्नल रोड असतात. इंटरर्नल रोडला कॉर्पोरेशन, आमदारदेखील निधी देऊ शकत नाही. हे इंटरर्नल रोड सोसायट्या किंवा ले-आऊटमधील इमारती मेंटेन करू शकत नाहीत. त्या

रोडची हालत खराब असताना लोकांना वाटते हा रोड कॉर्पोरेशन किंवा आमदार का बनवू शकत नाही? आता आपण सांगितले की, याबाबत तीन वाजता आमची बैठक आहे, त्यामध्ये याबाबत निर्णय घेण्यात येईल, याकरिता मी आता या प्रश्नासंदर्भात उभी राहिलेली आहे. शहरी भागाकरिता लिमिट थोडी वाढवून दिली तर बरे होईल. इंटरर्नल रोड जे कॉर्पोशनला हॅण्डओव्हर झालेले नाहीत, तो निधी आपण वापरु शकत नाही, यामुळे ते रोड व आरजी मेंटेन होत नाहीत. मीरा-भाईंदरमध्ये आरजीमधून लाइट कापली गेलेली आहे. यावरून खूप मोठे भांडण झालेले आहे. याकरिता आपण काहीतरी एक नवीन हेड तयार करावा, अशी माझी विनंती आहे.

**ॲड. अनिल परब :** महोदया, हा मुद्दा ज्याप्रमाणे आपण मांडला त्याप्रमाणे याबाबत आमच्याही मनात प्रश्न आहेत. आमचादेखील हा निधी त्या भागाकरिता वापरता आला पाहिजे, याकरिता प्रयत्न चालू आहेत.

**प्रश्न :** महोदय, ज्या ठिकाणी कोणी पोहोचू शकत नाही, तेथे स्थानिक आमदार पोहोचतो. म्हणजे ज्या कामाकरिता डीपीडीसी किंवा बजेटमधून पैसा मिळाला नाही तर ते काम आमदार निधीतून मार्गी लावण्यात येते. स्थानिक विकास निधीचा प्रवास कमी झाला पाहिजे. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये डीपीडीसीची बैठक होते, तेथून पुढे त्या कामाची सुरुवात होते. जे बजेटमध्ये आले नाही जे डीपीडीसीमध्ये आले नाही, ते आमदार निधीमधून घेण्याची आपली परंपरा आहे. याचा प्रवास खूप मोठा होतो. आमदार निधीबाबत सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पत्र दिले नाही तर आमदार निधी लॅप्स होतो. त्याचा प्रवास कमी करावा, असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे मत आहे. या प्रवासाच्या बाबत हा टेबल आणि तो टेबल, याचे एनओसी आणि त्याचे एनओसी असे होता कामा नये. ट्रायल म्हणून माझ्या वैजापूर मतदारसंघामध्ये २०० कामे एक-एक लाख रुपयांची घेतलेली आहेत. याबाबत आपण काही सूचना दिल्या तर छोटे छोटे पाणंद रस्ते मार्गी लागतील.

**ॲड. अनिल परब :** ठीक आहे, याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल.

**प्रश्न :** महोदय, माझी अशी एक विनंती आहे की, मतदारसंघातील दिव्यांग मतदार आमदारांकडे खूप आशेने येतात. दिव्यांगांना सायकल किंवा इतर कोणते वेहिकल हवे असते. त्यासाठी आपण स्थानिक आमदार विकास निधीमधून मदत करता आली पाहिजे. डीपीडीसीमध्ये याची तरतूद आहे. मंत्रालयातील क्रीडा विभागाच्या माध्यमातून याकरिता तरतूद केलेली आहे. परंतु ती व्यक्ती दिव्यांग असल्यामुळे मंत्रालयात, डीपीडीसीमध्ये येऊ शकत नाही. आमदार त्याच्या हक्काचा असतो, जवळपासच आमदार राहत असतो. मला असे वाटते की, याचा विचार केला गेला पाहिजे. मतदारसंघातील दिव्यांगांना आमदार विकास निधीतूनच मदत देता आली पाहिजे. मला निवडून येऊन दोन वर्षं झाली आहेत आणि दुर्दैव असे आहे की, प्रत्येक वर्षी आम्हाला अतिवृष्टीला सामोरे जावे लागत आहे. तहसील कार्यालयामार्फत आपण सानुग्रह निधी देऊ शकतो. परंतु कोणत्याही यंत्रणा सर्व्हे करण्यासाठी वेळेवर पोहोचत नाहीत. अशा वेळेला लोकप्रतिनिधी जबाबदार असतात. त्यामुळे ते तिथे जातात परंतु आमदार निधीतून ते त्यांना काहीही मदत करू शकत नाहीत. अशा वेळेला सानुग्रह निधीप्रमाणे अतिवृष्टीच्या ठिकाणी ज्यांच्या घरात पाणी गेलेले आहे किंवा ज्यांची खाण्या-पिण्याची व्यवस्था नसेल यासाठी आपण आमदार निधीच्या माध्यमातून काय मदत करू शकतो याचासुद्धा विचार केला पाहिजे.

**प्रश्न :** मी सर्वप्रथम वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे आभार व्यक्त करतो. त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारचे शिबीर घेतले आहे. आमचे सहकारी श्री. प्रशांत बंब यांनी सांगितल्याप्रमाणे मी आपल्याला विनंती करतो की माननीय संसदीय कार्यमंत्री अॅड. अनिल परब यांनी सांगितल्याप्रमाणे फ्लोअर मॅनेजमेंटबद्दल लवकरात लवकर एक प्रशिक्षण घ्यावे. त्याचप्रमाणे आमदारांचे हक्क, अधिकार आणि कर्तव्य याबाबतसुद्धा आपण एक प्रशिक्षण घ्यावे. कारण बऱ्याच वेळा आम्ही जिल्हा परिषद, महापालिका किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्यांना जेव्हा आम्ही पत्रव्यवहार करतो तेव्हा त्याची उत्तरे येत नाहीत. माननीय विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे आमदारांचे अधिकाराबद्दल एक पुस्तक आहे ते मी वाचले आहे. परंतु ते अधिकार पाळले जात नाहीत. याबाबतीत आमचे प्रशिक्षण घ्यावे. तसेच संबंधित अधिकारी आणि विभागाला तशा सूचना द्याव्यात. किंवा प्रशिक्षण द्यावे, अशी माझी विनंती आहे.

**प्रश्न :** काही संस्थांच्या खालच्या मजल्याला आमदार निधीतून मदत होते. परंतु दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्यासाठी आमदार निधी वापरता येत नाही. त्यामुळे आपण याचादेखील अर्थसंकल्पामध्ये समावेश करायला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे शासनाचा प्रत्येक निधी हा आमदाराच्या नावाने यायला पाहिजे; कारण एखादा निवडणुकीत पराभूत झालेला उमेदवार हा त्याच्या ओळखीच्या एखाद्या मंत्र्याकडे जाऊन निधी आणण्याचा प्रयत्न करतो. अशा गोष्टींना आपण आळा घातला पाहिजे. कारण त्यांना जनतेला आणि आमदारांना हे दाखवायचे असते. मंत्री किंवा पक्ष जवळचा असेल तरी त्याला अशा प्रकारे निधी वाटप करता येतो काय ? अशा प्रकारचे बरेच प्रश्न मी माननीय विधानसभा अध्यक्ष तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना देखील विचारले आहेत परंतु आजपर्यंत मला याचे उत्तर आले नाही. आमचे सर्वच आमदारांचे असे म्हणणे आहे की, शासनाचा सर्व पैसा हा आमदारांमार्फतच यायला पाहिजे.

*****

**विधानपरिषद शतक महोत्सव आणि नागपूर हिवाळी अधिवेशनांचे योगदान... जनसंपर्क अधिकारी यांचा विशेष लेख.**



“ विशाल मराठी भाषिक राज्याची निर्मिती आणि नागपूर करार या संदर्भात बोलताना प्रथम मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी भावनिक ऐक्याला महत्त्व दिले होते. नागपूर येथील अधिवेशनाच्या आयोजनासंदर्भात खर्चाचा मुद्दा घेऊन टीका केली जाते परंतु अधिवेशनामुळे भावनिक ऐक्याचा बंध बळकट होणे आणि अधिवेशन काळात विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळणे, विकास योजनांना गती मिळणे शक्य झाले आहे. नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांवर, विकास योजनांवर प्रश्न-लक्षवेधी-ठराव-अर्धा तास चर्चा-अशासकीय ठराव-औचित्याचे मुद्दे-स्थगन प्रस्ताव अशा विविध संसदीय आयुधांद्वारे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सखोल विचारमंथन झाल्याचे आपल्याला मागील अधिवेशनांच्या कार्यवृत्तावरून दिसून येईल. दोन्ही सभागृहांचे मा.पीठासीन अधिकारी नागपूर अधिवेशन काळात विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी संबंधित विषयांना, सन्माननीय सदस्यांना अग्रक्रमाने संधी उपलब्ध करून देत असतात. ”

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सवानिमित्त हिवाळी अधिवेशन, २०२३ चे औचित्य साधून दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत विधानपरिषद सभागृह, नागपूर येथे विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे महत्त्वपूर्ण योगदान' या विषयावरील चर्चासत्राच्या माध्यमातून गत हिवाळी अधिवेशनांमधील महत्त्वपूर्ण संमत विधेयके, ठराव, चर्चा, प्रस्ताव आणि त्यानुषंगाने घेण्यात आलेले निर्णय यांचे संदर्भ नव्याने अधोरेखित होणार आहेत. भारतातील संसदीय लोकशाहीत केंद्रस्तरावर लोकसभा आणि राज्यसभा ही द्विसभागृह पद्धती स्वीकारण्यात आली असली तरी राज्यस्तरावर सहा राज्यांचा अपवाद वगळता सर्व राज्यांमध्ये विधानपरिषद हे दुसरे सभागृह अस्तित्वात नाही. महाराष्ट्र विधानपरिषदेने गत शंभर वर्षांच्या कालकसोटीवर आपली उपयुक्तता आणि महत्त्व सिद्ध केले असून एरवी राजकीय परिघात येण्याची शक्यता नसलेल्या विद्वतजनांचा संसदीय सहभाग विधानपरिषदेमुळे शक्य झाला.

देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधानपरिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड शिफारशीनुसार भारत सरकार अधिनियम १९१९ अन्वये 'Bombay Legislative Council' ची प्रारंभिक बैठक १९ फेब्रुवारी, १९२१ रोजी टाऊन हॉल, मुंबई येथे झाली. श्री. नारायण गणेश चंदावरकर यांची विधानपरिषदेच्या सभापतीपदी झालेली नियुक्ती ही एक ऐतिहासिक घटना होती. सन १८६२ ते सन १९२० पर्यंत Governor of Bombay यांच्या अध्यक्षतेखाली Council चे कामकाज चालत होते. सन १९२१ मध्ये श्री. नारायण चंदावरकर यांच्या रूपाने पहिल्यांदा भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून नियुक्ती झाली. अतः सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधानपरिषद शतकपूर्तीचा कालखंड मानता येईल. भारताच्या घटनात्मक इतिहासातील १९१९-१९२०-२१ नंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (Government of India Act 1935) होय. या कायद्याद्वारे संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. या कायद्यान्वये विधानसभा आणि विधानपरिषद असे नामाभिधाना देऊन मुंबई प्रांतात १९३७ मध्ये दोन सभागृहे अस्तित्वात आली.

***दिग्गज सदस्यांची मालिका—**

विधानपरिषदेचा आरंभबिंदू ठरवायचा झाले तर आपल्याला शंभरपेक्षाही जास्त वर्षे मागे जावे लागेल. २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भूतपूर्व मुंबई प्रातांच्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिलची (Council of Governor of Bombay) पहिली बैठक भरली होती. १८६२ ते १९३७ या पंचाहत्तर वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत—

सर्वश्री जगन्नाथ शंकरशेठ, जमशेटजी जीजीभॉय, सर माधवराव विंचूरकर, रावसाहेब विश्वनाथ, नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशाह मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, नारायण गणेश चंदावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी दिग्गज सन्माननीय सदस्यांची मालिका विधिमंडळाला लाभली आहे. तेव्हापासून १९२१ चा संदर्भ पुढे नेत आजही विधानपरिषद कार्यरत आहे,

उल्लेखनीय योगदान देत आहे. केवळ राज्यातील नव्हे तर देशातील ते एक सर्वाधिक जुने सभागृह आहे, ज्याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे.

**वरिष्ठ सभागृह पद्धतीवरील टीका एकांगी–**

विधानसभा हे सभागृह लोकांनी थेट निवडून दिलेल्या सदस्यांद्वारे तयार होत असल्याने तेच जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी ठरतात. त्यामुळे मग विधानपरिषद या सभागृहाची गरजच काय? विधानपरिषद हे सभागृह असावे की, असू नये, असा प्रश्न, असे वादविवाद अधूनमधून उपस्थित केले जात असतातच. 'मागल्या दाराने प्रवेश', 'राजकीय सोय लावण्याचा उपाय' असे अनेक प्रवाद विधानपरिषद नामनियुक्त सदस्यत्वासंदर्भात जोडले गेले आहेत तर विधानपरिषदेच्या एकूणच अस्तित्वाच्या विरोधात मतप्रदर्शन करणारा गट नेहमीच विधानपरिषदेच्या बाबतीत 'वेळकाढूपणाचे सभागृह', 'कायदयाचा किस पाडणारे सभागृह', 'खर्चिक प्रणाली' अशी मल्लिनाथी करीतच असतो. परंतु या गोष्टी, यासंदर्भातील टीका ही एकांगी स्वरूपाची आहे. वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आहे. पूर्ण विचारांती या प्रश्नाकडे बघितल्यास लोकशाही संवर्धन व बळकटीसाठी विधानपरिषद किंवा द्विसभागृह पद्धती ही एक आवश्यक अशी संकल्पना आहे, असेच म्हणावे लागेल. It is a 'Revising Chamber' and not a 'Delaying Chamber' – असे माजी सभापती श्री. जयंतराव टिळक यांनी म्हटले आहे, ते अगदी योग्यच होय.

संसदीय लोकशाहीत निर्णय प्रक्रियेअगोदर सखोल विचारमंथनाला महत्त्व आहे. Decision out of Discussion is Important. त्याचप्रमाणे कोणत्याही धोरणात्मक निर्णयापर्यंत पोहचताना त्यासंदर्भातील सर्व मतमतांतरांचा परामर्श घेतला जाणे आवश्यक असते. Diverse views must be acknowlegded. विधानपरिषद या दुसऱ्या सभागृहाच्या अस्तित्वामुळे ही गरज पूर्ण होऊ शकते. महाराष्ट्र विधानपरिषदेने आजवरच्या वाटचालीत या दृष्टीने उल्लेखनीय योगदान देत आपली आवश्यकता अधोरेखित केली आहे आणि त्यात नागपूर अधिवेशनांचे महत्त्वपूर्ण संदर्भ, कामकाज यांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल.

**हिवाळी अधिवेशनांत महत्त्वपूर्ण कामकाज...**

राज्यातील सहकाराचा पाया विस्तृत आणि भक्कम करून ग्रामीण भागात समृद्धीचे वारे खेळविणारा महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा तत्कालीन सहकारमंत्री श्री. बाळासाहेब भारदे यांनी डिसेंबर, १९६० साली नागपूर हिवाळी अधिवेशनात मांडला आणि याच अधिवेशनात विस्तृत चर्चेअंती तो संमत झाला. मा.श्री. भारदे साहेब पुढे १९६२ ते १९७२ असे दोन टर्म विधानसभा अध्यक्ष राहिले होते. जिल्हापरिषद व पंचायत समिती विधेयक माहे डिसेंबर, १९६१, शिक्षण क्षेत्रातील बाबींसंदर्भात श्वेतपत्रिकेवर चर्चा माहे नोव्हेंबर, १९६८, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कायदा माहे डिसेंबर, १९६८, विदर्भ-कोकण-मराठवाडा यांच्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळ स्थापन करण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण अशासकीय ठराव माहे नोव्हेंबर, १९६९, हरिजनांवर होणाऱ्या अत्याचाराची मीमांसा करण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय – श्री. वि. स. पागे समितीचे गठन माहे डिसेंबर, १९७२, पंढरपूर मंदिरे विधेयक माहे

नोव्हेंबर, १९७३, प्राणी रक्षण विधेयक माहे डिसेंबर, १९७६, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आरक्षण विधेयक – पदोन्नतीतील आरक्षण विधेयक माहे डिसेंबर, २००२, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग विधेयक माहे डिसेंबर, २००५, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण विधेयक माहे डिसेंबर, २००८, प्रदीर्घ चर्चा आणि छाननीअंती संमत करण्यात आलेले महत्त्वपूर्ण असे अंधश्रद्धा निर्मूलन विधेयक माहे डिसेंबर, २०१३ असे नागपूर अधिवेशनांमधील संमत विधेयकांचे महत्त्वपूर्ण योगदान आपल्या डोळ्यासमोर आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राबविण्यात आलेली कापूस एकाधिकार खरेदी योजना तसेच रोजगार हमी योजना अशाच मूलगामी चर्चा आणि विचारमंथनांचे फलित आहे. यावेळी या विधेयकांमधील विधानपरिषदेतील चर्चा, सुचविलेल्या सुधारणा उल्लेखनीय ठरल्या आहेत. त्याचप्रमाणे सन १९६० ते २०२३ या कालखंडात महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण शासकीय ठराव संमत करण्यात आले.

**सामंजस्य आणि सहमतीचे दर्शन–**

आजपर्यंत नागपूर येथील अधिवेशने ही विदर्भातील प्रश्नांबरोबरच राज्यातील महत्त्वाचे प्रश्न, ध्येयधोरणे, संमत कायदे या दृष्टीने नेहमीच महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत. कृष्णा-गोदावरी पाण्याच्या वाटपासंबंधातील ठराव, लोकसभेत व विधानसभेत सरळ निवडणुकीने भरल्या जाणाऱ्या एकूण जागांच्या एक-तृतीयांशपेक्षा कमी नाही एवढ्या जागा महिलांसाठी आरक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव, वनसंवर्धन कायदा, मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ मध्ये सुधारणा करणारा ठराव, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यासाठी घटनेत सुधारणा करण्याबाबत, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी मा.अध्यक्षांनी सर्व गटनेत्यांची बैठक घेऊन या संदर्भात सभागृहाने संमत केलेला ठराव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी एन.टी.सी. च्या मालकीची साडेबारा एकर जागा केंद्र शासनाने देण्याबाबतचा एकमताने संमत झालेला ठराव, छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबईचा नामविस्तार 'छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई' असे करण्याबाबत केंद्र सरकारला करण्यात आलेली शिफारस एकमताने संमत, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी टर्मिनसचा 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' असा नामविस्तार, एल्फिन्स्टन रोड या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून 'प्रभादेवी' असे करण्यात यावे अशी शिफारस केंद्र सरकारला करण्यात आली. अशा अनेक संदर्भामध्ये नागपूर अधिवेशनात घेण्यात आलेले हे निर्णय, चर्चा महत्त्वपूर्ण ठरली आहे. या सर्व वेळी सभागृहांमध्ये अतिशय सामंजस्य आणि सहमतीचे दर्शन घडले.

**महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर आणि कर्नाटक...**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रसंगी मध्य प्रांतातील मराठी भाषिक विदर्भ प्रदेश महाराष्ट्रात सामील झाला. नागपूरला असलेला तेव्हाच्या राजधानीचा दर्जा त्यागून वैदर्भीय जनता महाराष्ट्रात सामील झाली. २८ सप्टेंबर, १९५३ रोजी अस्तित्वात आलेल्या नागपूर करारान्वये 'शासनाचे कार्यस्थान अधिकृत निश्चित कालावधीकरिता नागपूर येथे हलविण्यात येईल आणि दरवर्षी राज्य विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे भरविण्यात येईल', असे सुनिश्चित करण्यात आले. अशा प्रकारे दोन ठिकाणी विधिमंडळाची अधिवेशने

गेली अनेक वर्षे भारतात महाराष्ट्र आणि जम्मू आणि काश्मीर या दोन राज्यात आयोजित केली जात आहेत. सन २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर, लडाख केंद्रशासित प्रदेश झाले आहेत. तसेच कर्नाटकमध्ये सन २०१२ मध्ये बेळगांव येथे सुवर्ण विधानसभा नावाने नवीन इमारत बांधण्यात आली असून तेथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन आयोजित केले जाते. नागपूर करारानुसार १९६० पासून उपराजधानी नागपूरमध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे आयोजित केले जाते. फक्त काही अपवाद वगळता नागपूर कराराद्वारे अमलात आणली गेलेली ही व्यवस्था अव्याहतपणे सुरू आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर नागपूर येथे घेण्यात न आलेल्या अधिवेशनांची संख्या सहा आहे. त्यांचे वर्ष आणि कारणे पुढीलप्रमाणे :—

(१) १९६२ - भारत-चीन युद्धामुळे नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

(२) १९६३ - तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मारोतराव कन्नमवार यांचे दिनांक २४ नोव्हेंबर, १९६३ रोजी निधन झाल्यामुळे नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

(३)१९७९ - लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यामुळे त्यावर्षी नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

(४) १९८५ - दिनांक २८ डिसेंबर, १८८५ ला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना मुंबई येथे झाली होती. त्याचा शताब्दी महोत्सव मुंबई येथे आयोजित करण्यात आल्याने या वर्षी नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही. मात्र १९८६ साली ३ ऐवजी ४ अधिवेशने झाली, त्यापैकी जानेवारी, १९८६ आणि नोव्हेंबर, १९८६ अशी दोन अधिवेशने नागपूरला झाली. या दोन्ही अधिवेशनाच्या बैठकांची संख्या प्रत्येकी १५ दिवस होती.

(५) सन २०२० (६) सन २०२१ - वैश्विक महामारी कोरोना (कोविड-१९) मुळे नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

उपरोक्त सहा अपवाद वगळता १९६० पासून दरवर्षी नित्यनेमाने एक अधिवेशन उपराजधानी नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. त्यात नागपुरातील चार पावसाळी अधिवेशनांचाही समावेश आहे. (सन १९६१, १९६६, १९७१ आणि अलीकडचे जुलै, २०१८)

**बरखास्तीचा ठराव सखोल विचारमंथनाअंती फेटाळला...**

महत्त्वाची बाब म्हणजे नागपुरातील १९६१ च्या पहिल्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषद हे ज्येष्ठांचे सभागृह बरखास्त करण्यात यावे, असा ठराव विधानसभेत मांडण्यात आला होता आणि त्यावर चर्चाही झाली होती. श्री. स. गो. वर्टी (वसई), ठाणे यांनी विधानपरिषद बरखास्त करण्यात यावी, अशी मागणी करणारा हा ठराव २५ जुलै, १९६१ रोजी विधानसभेत मांडला. ठरावावर बरेच विचारमंथन झाले. हा ठराव ४४ विरुद्ध ८४ मतांनी फेटाळण्यात आला. हे कार्यवृत्त जिज्ञासूंनी वाचणे आवश्यक आहे. द्विसभागृह असावे की नसावे आणि असल्यास ते का असावे, या संदर्भातील सखोल विचारमंथन आपल्याला वाचायला मिळेल. द्विसभागृह पद्धतीसंदर्भातील हा महत्त्वाचा वैचारिक ठेवा आहे.

**भावनिक ऐक्य आणि पीठासीन अधिकारी यांची महत्त्वाची भूमिका–**

विशाल मराठी भाषिक राज्याची निर्मिती आणि नागपूर करार या संदर्भात बोलताना प्रथम मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी भावनिक ऐक्याला महत्त्व दिले होते. नागपूर येथील अधिवेशनाच्या आयोजनासंदर्भात खर्चाचा मुद्दा घेऊन टीका केली जाते परंतु अधिवेशनामुळे भावनिक ऐक्याचा बंध बळकट होणे आणि अधिवेशन काळात विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळणे, विकास योजनांना गती मिळणे शक्य झाले आहे. नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांवर, विकास योजनांवर प्रश्न-लक्षवेधी-ठराव-अर्धा तास चर्चा-अशासकीय ठराव-औचित्याचे मुद्दे-स्थगन प्रस्ताव अशा विविध संसदीय आयुधांद्वारे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सखोल विचारमंथन झाल्याचे आपल्याला मागील अधिवेशनांच्या कार्यवृत्तावरून दिसून येईल. दोन्ही सभागृहांचे मा.पीठासीन अधिकारी नागपूर अधिवेशन काळात विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी संबंधित विषयांना, सन्माननीय सदस्यांना अग्रक्रमाने संधी उपलब्ध करून देत असतात.

**नागपूर अधिवेशन आणि राजकीय घडामोडी–**

नागपूर हिवाळी अधिवेशनांचे महत्त्व सभागृहातील कामकाजाइतकेच या दरम्यानच्या सभागृहाबाहेरील राजकीय घडामोडींना देखील तितकेच आहे. ज्येष्ठ नेते श्री. शरदचंद्रजी पवार विधानसभा विरोधी पक्षनेते असतांना मुख्यमंत्री श्री. अ. र. अंतुले सरकारचे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी श्री. पवार यांच्या नेतृत्वाखाली जळगाव ते नागपूरपर्यंत डिसेंबर, १९८० मध्ये काढण्यात आलेली ऐतिहासिक शेतकरी दिंडी, बॅरिस्टर बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असतांना त्यांच्याविरोधात झालेले डिसेंबर, १९८२ चे बंड, मंत्रीपदी असतांना ज्येष्ठ नेते श्री. सुशीलकुमारजी शिंदे आणि श्री. विलासरावजी देशमुख यांनी डिसेंबर, १९९० चे नागपूर हिवाळी अधिवेशन आटोपताच जानेवारी महिन्यात फडकावलेले बंडाचे निशाण, तत्कालीन आक्रमक शिवसेना नेते श्री. छगन भुजबळ यांनी शिवसेना पक्षाला सोडचिठ्ठी देत केलेले डिसेंबर १९९१ चे बंड, त्यामुळे शिवसेनेचे विधानसभेतील संख्याबळ घटल्याने विरोधी पक्षनेतेपद श्री. मनोहर जोशींकडून श्री. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे याच हिवाळी अधिवेशनात येणे, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी काढलेली शेतकरी दिंडी, शिवसेना नेते श्री. दिवाकरजी रावते यांची कापूस दिंडी, ११ डिसेंबर, २०१२ रोजी श्री. नितीनजी गडकरी, श्री. गोपीनाथजी मुंडे, श्री. एकनाथराव खडसे-पाटील, श्री. देवेंद्रजी फडणवीस, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. विनोद तावडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेला नागपूर अधिवेशनावरील विराट घेराव मोर्चा आणि त्याचे सभेत झालेले रूपांतर या घटनांची राजकीय इतिहासात नोंद झाली आहे.

विधानपरिषद सदस्यत्वाच्या (विदर्भ पदवीधर सन १९७८ ते १९८४ आणि १९८४ ते १९९०) माध्यमातून दमदार कामगिरीद्वारे 'विधानपरिषदेतील वाघ' असा लौकिक श्री. गंगाधरराव फडणवीस यांनी प्राप्त केला होता. सन २०१४ ते २०१९ या कालावधीत दस्तुरखुद्द नागपुरातील विधानसभा सदस्य असलेल्या श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांच्या माध्यमातून विदर्भाकडे मुख्यमंत्रीपद आले. या त्यांच्या कारकिर्दीत नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून विदर्भाच्या विकासासंदर्भात सर्वंकष प्रयत्न सभागृहात आणि सभागृहाबाहेर करण्यात आले. ज्याचे दृश्य परिणाम सध्या दिसत आहेत. नागपूर विधानभवन जुन्या इमारतीतील नवीन मंत्री परिषद सभागृहात त्यांनी अधिवेशन कालावधीत विदर्भातील सर्व जिल्ह्यांच्या विकास कामांच्या संदर्भातील सादरीकरणासह उच्चस्तरीय बैठकांचे काटेकोर नियोजन आणि अंमलबजावणी केली. गतिमान प्रशासनासाठी त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला.

**१२५ व्या जयंतीनिमित्त महामानवाला मानवंदना...**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून नागपूर हिवाळी अधिवेशन डिसेंबर, २०१५ मध्ये दोन्ही सभागृहात त्यांच्या कार्याचा गौरव आणि अभिवादन करण्यासाठी विशेष चर्चेचे आयोजनही तत्कालीन मुख्यमंत्री आणि पीठासीन अधिकारी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले. सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी अतिशय अभ्यासूपणे या संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. घटनाकारांना दोन्ही सभागृहांनी अशा प्रकारे केलेले अभिवादन हा विधिमंडळ कार्यवृत्तातील अनमोल ठेवा आहे.

**वादे वादे जायते तत्त्वबोधा : ...**

ज्येष्ठांचे सभागृह, विद्वानांचे सभागृह असा लौकिक प्राप्त केलेल्या विधानपरिषदेने 'वादे वादे जायते तत्त्वबोधाः' ही उज्ज्वल प्रबोधन परंपरा जपली आहे. या शतक महोत्सवी वाटचालीत सभागृहाचे पीठासीन अधिकारी आणि विरोधी पक्षनेते यांचे विशेष योगदान लाभत आले आहे आणि लाभत राहील. यंदाचे नागपूर डिसेंबर, २०२३ हिवाळी अधिवेशन या शतक महोत्सवाबरोबरच आणखी दोन कारणांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. दरवर्षी नागपूर अधिवेशनात राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा आयोजित केला जाणारा अभ्यासवर्ग यंदाचा सुवर्णमहोत्सवी असा ५० वा संसदीय अभ्यासवर्ग आहे. त्याचप्रमाणे नागपूर विधिमंडळाची ऐतिहासिक वारसावास्तू आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेसाठी प्रसिद्ध आहे. या वास्तूची पायाभरणी १७ डिसेंबर, १९१२ मध्ये करण्यात आली होती, ज्याला यंदाच्या वर्षी १११ वर्षे पूर्ण होत आहेत. भारताच्या संसदीय वाटचालीत लोकहिताचे प्रभावी कायदे मंजूर करून ते राबविण्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आणि महाराष्ट्र विधिमंडळाच्या या संस्मरणीय वाटचालीत योगदान देणाऱ्या सर्वांचे हे कृतज्ञ स्मरण! त्याचप्रमाणे दिवंगतांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.!

**निलेश मदाने,**

जनसंपर्क अधिकारी, म. वि. स.<br>
संचालक, वि. स. पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र,<br>
विधानभवन, नागपूर.<br>
nilmadane72@gmail.com

४ डिसेंबर, २०२३.

**म.वि.स./ज(ग्रंथालय)कक्ष**

**फक्त कार्यालयीन उपयोगासाठी**

## माननीय मुख्यमंत्री
## (१९३७ ते नोव्हेंबर, २०२४)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| **मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री** | | |
| ०१ | सर धनजीशा बोमनजी कपूर | सन १९३७ |
| ०२ | श्री. बाळ गंगाधर खेर | दि. १९ जुलै, १९३७ ते दि. ०४ नोव्हेंबर, १९३९ * |
| ०३ | श्री. बाळ गंगाधर खेर | दि. ०३ एप्रिल, १९४६ ते दि. १६ एप्रिल, १९५२ |
| ०४ | श्री. मोरारजी रणछोडजी देसाई | दि. १७ एप्रिल, १९५२ ते दि. ३१ ऑक्टोबर, १९५६ |
| **व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री** | | |
| ०१ | श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण | दि. ०१ नोव्हेंबर, १९५६ ते दि. ३० एप्रिल, १९६० |
| **महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री** | | |
| ०१ | श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण | दि. ०१ मे, १९६० ते २० नोव्हेंबर, १९६२ |
| ०२ | श्री. मारोतराव सांबशिव कन्नमवार | दि. २१ नोव्हेंबर, १९६२ ते दि. २४ नोव्हेंबर, १९६२ ** |
| ०३ | श्री. परशुराम कृष्णाजी सावंत (हंगामी) | दि. २५ नोव्हेंबर, १९६३ ते दि. ०४ डिसेंबर, १९६३ |
| ०४ | श्री. वसंतराव फुलसिंग नाईक | दि. ०५ डिसेंबर, १९६३ ते दि. २० फेब्रुवारी, १९७५ |
| ०५ | श्री. शंकरराव भाऊराव चव्हाण | दि. २१ फेब्रुवारी, १९७५ ते दि. १६ एप्रिल, १९७७ |
| ०६ | श्री. वसंतराव बंडूजी पाटील | दि. १७ एप्रिल, १९७७ ते दि. ०६ मार्च, १९७८ |

| | | |
|---|---|---|
| ०७ | श्री. वसंतराव बंडूजी पाटील | दि. ०७ मार्च, १९७८ ते दि. १७ जुलै, १९७८ |
| ०८ | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | दि. १८ जुलै, १९७८ ते दि. १७ फेब्रुवारी, १९८० *** |
| ०९ | श्री. अब्दुल रहमान अब्दुल गफूर अंतुले | दि. ०९ जून, १९८० ते दि. १२ जानेवारी, १९८२ |
| १० | श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले | दि. २० जानेवारी, १९८२ ते दि. ०१ फेब्रुवारी, १९८३ |
| ११ | श्री. वसंतराव बंडूजी पाटील | दि. ०२ फेब्रुवारी, १९८३ ते दि. ०९ मार्च, १९८५ |
| १२ | श्री. वसंतराव बंडूजी पाटील | दि. १० मार्च, १९८५ ते दि. ०१ जून, १९८५ |
| १३ | श्री. शिवाजीराव भाऊराव पाटील- निलंगेकर | दि. ०३ जून, १९८५ ते दि. ०७ मार्च, १९८६ |
| १४ | श्री. शंकरराव भाऊराव चव्हाण | दि. १४ मार्च, १९८६ ते दि. २४ जून, १९८८ |
| १५ | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | दि. २५ जून, १९८८ ते दि. ०३ मार्च, १९९० |
| १६ | श्री. शरदचंद्र गोविंदरावपवार | दि. ०४ मार्च, १९९० ते दि. २५ जून, १९९१ |
| १७ | श्री. सुधाकरराव राजूसिंग नाईक | दि. २५ जून, १९९१ ते दि. २३ फेब्रुवारी, १९९३ |
| १८ | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | दि. ०६ मार्च, १९९३ ते दि. १३ मार्च, १९९५ |
| १९ | श्री. मनोहर गजानन जोशी | दि. १४ मार्च, १९९५ ते दि. ३० जानेवारी, १९९९ |
| २० | श्री. नारायण तातू राणे | दि. ०१ फेब्रुवारी, १९९९ ते दि. १७ ऑक्टोबर, १९९९ |
| २१ | श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख | दि. १८ ऑक्टोबर, १९९९ ते दि. १८ जानेवारी, २००३ |
| २२ | श्री. सुशिलकुमार संभाजीराव शिंदे | दि. १८ जानेवारी, २००३ ते दि. ३१ ऑक्टोबर, २००४ |
| २३ | श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख | दि. ०१ नोव्हेंबर, २००४ ते दि. ०७ डिसेंबर, २००८ |
| २४ | श्री. अशोक शंकरराव चव्हाण | दि. ०८ डिसेंबर, २००८ ते दि. ०८ नोव्हेंबर, २००९ |

| | | |
|---|---|---|
| २५ | श्री. अशोक शंकरराव चव्हाण | दि. ०९ नोव्हेंबर, २००९ ते दि. १० नोव्हेंबर, २०१० |
| २६ | श्री. पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण | दि. ११ नोव्हेंबर, २०१० ते दि. २७ सप्टेंबर, २०१४ **** |
| २७ | श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस | दि. ३१ ऑक्टोबर, २०१४ ते दि. ०८ नोव्हेंबर, २०१९ ***** |
| २८ | श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस | दि. २३ नोव्हेंबर, २०१९ ते दि. २६ नोव्हेंबर, २०१९ |
| २९ | श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे | दि. २८ नोव्हेंबर, २०१९ ते दि. २९ जून, २०२२ |
| ३० | श्री. एकनाथ संभाजी शिंदे | दि. ३० जून, २०२२ ते दि. २६ नोव्हेंबर, २०२४ |
| ३१ | श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस | दि. ०५ डिसेंबर, २०२४ पासून |

* मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यामुळे भारत सरकार अधिनियम, १९३५ मधील कलम ९३ अन्वये माननीय राज्यपालांनी प्रशासन ताब्यात घेतले व मा. मुख्यमंत्री यांना "पंतप्रधान" असे संबोधण्यात आले.

** सेवेत कार्यरत असताना निधन पावले

*** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये दि. १७ फेब्रुवारी, १९८० पासून दि. ०९ जून, १९८० पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट अंमलात होती.

**** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये दि. २८ सप्टेंबर, २०१४ पासून दि. ३१ ऑक्टोबर, २०१४ पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट अंमलात होती.

***** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये दि. १२ नोव्हेंबर, २०१९ पासून दि. २३ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट अंमलात होती.

## महाराष्ट्र विधानपरिषद सभापती
## (सन १९३७ ते डिसेंबर, २०२४)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| **१.** | श्री. मंगलदास मच्छाराम पक्वासा | २२ जुलै १९३७ ते १६ ऑगस्ट १९४७ |
| **२.** | श्री. रामचंद्र रमेश सोमण | १८ ऑक्टोबर १९४७ ते ५ मे १९५२ |
| **३.** | श्री. रामराव श्रीनिवासराव हुक्केरीकर | ५ मे १९५२ ते २० नोव्हेंबर १९५६ |
| **४.** | श्री. भोगीलाल धीरजलाल लाला | २१ नोव्हेंबर १९५६ ते १० जुलै १९६० |
| **५.** | श्री. विठ्ठल सखाराम पागे | ११ जुलै १९६० ते २४ एप्रिल १९७८ |
| **६.** | श्री. राम मेघे (कार्यकारी सभापती) | १३ जून ते १५ जून, १९७८ |
| **७.** | श्री. रामकृष्ण सूर्यभानजी गवई | १५ जून १९७८ ते २२ सप्टेंबर १९८२ |
| **८.** | श्री. जयंत श्रीधर टिळक | २३ सप्टेंबर १९८२ ते ७ जुलै १९८६ |
| **९.** | श्री. जयंत श्रीधर टिळक | ८ जुलै १९८६ ते ७ जुलै १९९२ |
| **१०.** | श्री. जयंत श्रीधर टिळक | ८ जुलै १९९२ ते ७ जुलै १९९८ |
| **११.** | श्री. भाऊराव तुळशीराम देशमुख (अस्थायी सभापती) | २० जुलै १९९८ ते २४ जुलै १९९८ |
| **१२.** | प्रा. नारायण सदाशिव फरांदे | २४ जुलै १९९८ ते ७ जुलै २००४ |
| **१३.** | श्री. वसंत शंकर डावखरे (अस्थायी सभापती) | ९ जुलै २००४ ते १३ ऑगस्ट २००४ |
| **१४.** | श्री. शिवाजीराव बापूसाहेब देशमुख | १३ ऑगस्ट २००४ ते २४ एप्रिल २००८ |
| **१५.** | श्री. शिवाजीराव बापूसाहेब देशमुख | २५ एप्रिल २००८ ते २४ एप्रिल २०१४ |
| **१६.** | श्री. शिवाजीराव बापूसाहेब देशमुख | ८ मे २०१४ ते १६ मार्च २०१५ |
| **१७.** | श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर | २० मार्च २०१५ ते ७ जुलै २०१६ |
| **१८.** | श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर | ८ जुलै २०१६ ते ७ जुलै २०२२ |
| **१९.** | प्रा. राम शंकर शिंदे | १९ डिसेंबर, २०२४ पासून |

## मुंबई राज्य/ महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष
## (सन १९३७ ते डिसेंबर, २०२४)

| अ.क्र. | नाव | कालावधी | राजकीय पक्ष |
|---|---|---|---|
| **मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)** | | | |
| १. | श्री. गणेश वासुदेव मावळणकर | २१ जुलै १९३७ ते २० जानेवारी १९४६ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| २. | श्री. कुंदनमल सोभाचंद फिरोदिया | २१ मे १९४६ ते ३१ जानेवारी १९५२ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ३. | श्री. दत्तात्रय काशिनाथ कुंटे | ०५ मे १९५२ ते ३१ ऑक्टोबर १९५६ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| **द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)** | | | |
| १. | श्री. सयाजी लक्ष्मण सिलम | २१ नोव्हेंबर १९५६ ते ३० एप्रिल १९६० | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| **महाराष्ट्र विधानसभा (०१ मे, १९६० पासून)** | | | |
| १. | श्री. सयाजी लक्ष्मण सिलम | ०१ मे १९६० ते १२ मार्च १९६२ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| २. | श्री. त्र्यंबक शिवराम भारदे | १७ मार्च १९६२ ते १३ मार्च १९६७ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ३. | श्री. त्र्यंबक शिवराम भारदे | १५ मार्च १९६७ ते १५ मार्च १९७२ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ४. | श्री. शेषराव कृष्णराव वानखेडे | २२ मार्च १९७२ ते २० एप्रिल १९७७ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ५. | श्री. दौलतराव श्रीपतराव उर्फ बाळासाहेब देसाई | ०४ जुलै १९७७ ते १३ मार्च १९७८ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ६. | श्री. शिवराज विश्वनाथ पाटील | १७ मार्च १९७८ ते ०६ डिसेंबर १९७९ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ७. | श्री. प्राणलाल हरकिशनदास व्होरा | ०१ फेब्रुवारी १९८० ते २९ जून १९८० | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ८. | श्री. शरद शंकर दिघे | ०२ जुलै १९८० ते ११ जानेवारी १९८५ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ९. | श्री. शंकरराव चिमाजी जगताप | २० मार्च १९८५ ते १९ मार्च १९९० | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| १०. | श्री. मधुकरराव धनाजी चौधरी | २१ मार्च १९९० ते २२ मार्च १९९५ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| ११. | श्री. दत्ताजी शंकर नलावडे | २४ मार्च १९९५ ते १९ ऑक्टोबर १९९९ | शिवसेना |
| १२. | श्री. अरुणलाल गोवर्धनदास गुजराथी | २२ ऑक्टोबर १९९९ ते १७ ऑक्टोबर २००४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| **१३.** | श्री. कृष्णराव रखमाजीराव देसाई उर्फ बाबासाहेब कुपेकर | ०६ नोव्हेंबर, २००४ ते ०३ नोव्हेंबर २००९ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष |
| **१४.** | श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | ११ नोव्हेंबर २००९ ते ०८ नोव्हेंबर २०१४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष |
| **१५.** | श्री. हरिभाऊ किसनराव बागडे | १२ नोव्हेंबर २०१४ ते २५ नोव्हेंबर २०१९ | भारतीय जनता पक्ष |
| **१६.** | श्री. नाना फाल्गुनराव पटोले | ०१ डिसेंबर २०१९ ते ०४ फेब्रुवारी, २०२१ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) |
| **१७.** | श्री. राहूल सुरेश नार्वेकर | ०३ जुलै, २०२२ ते ०६ डिसेंबर, २०२४ | भारतीय जनता पक्ष |
| **१८.** | श्री. राहूल सुरेश नार्वेकर | ०९ डिसेंबर, २०२४ पासून | भारतीय जनता पक्ष |

## महाराष्ट्र विधानपरिषद उप सभापती
## (सन १९३७ ते डिसेंबर, २०२४)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| १. | श्री. रामचंद्र गणेश सोमण | २२ जुलै १९३७ ते १६ ऑक्टोबर १९४७ |
| २. | श्री. शांतीलाल हरजीवन शहा | २१ ऑक्टोबर १९४७ ते ४ मे १९५२ |
| ३. | श्री. व्ही. जी. लिमये | ५ मे १९५२ ते १८ ऑगस्ट १९५५ |
| ४. | श्रीमती जे. टी. सिपाहीमलानी | १९ ऑगस्ट १९५५ ते २५ एप्रिल १९५६ |
| ५. | श्रीमती जे. टी. सिपाहीमलानी | २६ एप्रिल १९५९ ते २४ एप्रिल १९६२ |
| ६. | श्री. व्ही. एन. देसाई | २१ जून १९६२ ते २८ जुलै १९६८ |
| ७. | श्री. रामकृष्ण सुर्यभान गवई | ३० जुलै १९६८ ते १३ जून १९७८ |
| ८. | श्री. अर्जुन गिरीधर पवार | १ डिसेंबर १९७८ ते २४ एप्रिल १९८४ |
| ९. | श्री. दाजीबा पर्वत पाटील | १२ जुलै १९८४ ते ७ जुलै १९८६ |
| १०. | श्री. सुर्यभान रघुनाथ वहाडणे | २९ जुलै १९८८ ते २७ जुलै १९९४ |
| ११. | प्रा. नारायण सदाशिव फरांदे | ३० जुलै १९९४ ते २३ जुलै १९९८ |
| १२. | श्री. वसंत शंकर डावखरे | २४ जुलै १९९८ ते ११ मे २००४ |
| १३. | श्री. वसंत शंकर डावखरे | १३ ऑगस्ट २००४ ते ८ जून २०१० |
| १४. | श्री. वसंत शंकर डावखरे | १३ जुलै २०१० ते ८ जून २०१६ |
| १५. | श्री. माणिकराव गोविंदराव ठाकरे | ५ ऑगस्ट २०१६ ते २७ जुलै २०१८ |
| १६. | डॉ. नीलम दिवाकर गोऱ्हे | २४ जून २०१९ ते २४ एप्रिल २०२० |
| १७. | डॉ. नीलम दिवाकर गोऱ्हे | ०८ सप्टेंबर २०२० पासून |

## मुंबई राज्य/ महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष
## (सन १९३७ ते मार्च, २०२५)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| **मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)** | | |
| **१.** | श्री. नारायणराव गुरुराव जोशी | १९३७ ते १९३९ |
| **२.** | श्री. शनमुगाप्पा निंगाप्पा अंगदी | १९४६ ते १९५२ |
| **३.** | श्री. शिवलिंगप्पा रुद्रप्पा कंठी | ०५ मे १९५२ ते ३१ ऑक्टोबर १९५६ |
| **द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)** | | |
| **१.** | श्री. शेषराव कृष्णराव वानखेडें | २३ नोव्हेंबर १९५६ ते ०५ एप्रिल १९५७ |
| **२.** | श्री. दिनदयाळ गुप्ता | २० जून १९५७ ते ३० एप्रिल १९६० |
| **महाराष्ट्र विधानसभा (१९६० पासून)** | | |
| **१.** | श्री. दिनदयाळ गुप्ता | ०१ मे १९६० ते ०३ मार्च १९६२ |
| **२.** | श्री. कृष्णराव तुकाराम गिरमे | २० मार्च १९६२ ते ०१ मार्च १९६७ |
| **३.** | श्री. कृष्णराव तुकाराम गिरमे | १६ मार्च १९६७ ते १३ मार्च १९७२ |
| **४.** | श्री. रामकृष्ण व्यंकटेश बेत | २३ मार्च १९७२ ते २६ फेब्रुवारी १९७६ |
| **५.** | श्री. सय्यद फारुक पाशा सय्यद मगदुम पाशा | १२ मार्च १९७६ ते २० एप्रिल १९७७ |
| **६.** | श्री. शिवराज विश्वनाथ पाटील | ०५ जुलै १९७७ ते ०२ मार्च १९७८ |
| **७.** | श्री. गजाननराव रघुनाथराव गरुड | २१ मार्च १९७८ ते ०५ एप्रिल १९७९ |
| **८.** | श्री. सूर्यकांत जागोबाजी डोंगरे | ०७ एप्रिल १९७९ ते ०९ जून १९८० |
| **९.** | श्री. शंकरराव चिमाजी जगताप | ०३ जुलै १९८० ते ०८ मार्च १९८५ |
| **१०.** | श्री. कमलकिशोर नानासाहेब कदम | २१ मार्च १९८५ ते २२ जून १९८६ |
| **११.** | डॉ. पद्मसिंह बाजीराव पाटील | २४ जून १९८६ ते २५ जून १९८८ |
| **१२.** | श्री. बबनराव दादाबा ढाकणे | ३० जुलै १९८८ ते ०९ डिसेंबर १९८९ |
| **१३.** | श्री. लक्ष्मण सोनोपंत उर्फ अण्णा जोशी | २० डिसेंबर १९९० ते ०३ जुलै १९९१ |
| **१४.** | श्री. मोरेश्वर विठ्ठलराव टेमुर्डे | १९ जुलै १९९१ ते ११ मार्च १९९५ |
| **१५.** | श्री. शरद मोतीराम तसरे | २८ मार्च १९९५ ते १५ जुलै १९९९ |
| **१६.** | श्री. प्रमोद भाऊरावजी शेंडे | २३ डिसेंबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००४ |
| **१७.** | श्री. प्रमोद भाऊरावजी शेंडे | ०९ डिसेंबर २००४ ते ०३ नोव्हेंबर २००९ |

| | | |
|---|---|---|
| **१८.** | श्री. मधुकरराव देवराव चव्हाण | १० डिसेंबर २००९ ते १८ नोव्हेंबर २०१० |
| **१९.** | प्रा. वसंत चिंधुजी पुरके | ०४ डिसेंबर २०१० ते ०८ नोव्हेंबर २०१४ |
| **२०.** | श्री. विजय भास्करराव औटी | ३० नोव्हेंबर २०१८ ते ०९ नोव्हेंबर २०१९ |
| **२१.** | श्री. नरहरी सिताराम झिरवाळ | १४ मार्च २०२० ते २६ नोव्हेंबर, २०२४ |
| **२२.** | श्री. अण्णा दादू बनसोडे | २६ मार्च, २०२५ पासून |

# पूर्व हंगामी अध्यक्ष
## (सन १९३७ ते डिसेंबर, २०२४)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| **मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)** | | |
| १. | श्री. रावबहादुर गणेश कृष्णा चितळे | १९ जुलै १९३७ ते २१ जुलै १९३७ |
| २. | सर सोराबजी दोराबजी साकलतवाला | २० मे १९४६ ते २१ मे १९४६ |
| ३. | डॉ. एम. यु. मास्कोरेन्हस | ३ मे १९५२ ते ५ मे १९५२ |
| **द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)** | | |
| ४. | श्री. एम.सी. शहा | ७ नोव्हेंबर १९५६ ते २१ नोव्हेंबर १९५६ |
| ५. | श्री. कल्याणजीभाई मेहता | १७ जून १९५७ ते १९ जून १९५७ |
| **महाराष्ट्र विधानसभा (०१ मे, १९६० पासून)** | | |
| ६. | श्री. भानुशंकर याज्ञिक | १५ मार्च १९६२ ते १७ मार्च १९६२ |
| ७. | श्री. वसंत नारायण नाईक | १३ मार्च १९६७ ते १५ मार्च १९६७ |
| ८. | श्री. रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार | २० मार्च १९७२ ते २२ मार्च १९७२ |
| ९. | श्री. डी. एस. उर्फ बाळासाहेब देसाई | २५ एप्रिल १९७७ ते १ जुलै १९७७ |
| १०. | श्री. पी. के. देशमुख | १ जुलै १९७७ ते ४ जुलै १९७७ |
| ११. | श्री. डी. एस. उर्फ बाळासाहेब देसाई | १४ मार्च १९७८ ते १७ मार्च १९७८ |
| १२. | श्री. डी. एस. उर्फ बाळासाहेब देसाई | ३० जून १९८० ते २ जुलै १९८० |
| १३. | श्री. केशवराव शंकरराव धोंडगे | १६ मार्च १९८५ ते २० मार्च १९८५ |
| १४. | श्री. गणपतराव अण्णासाहेब देशमुख | १८ मार्च १९९० ते २१ मार्च १९९० |
| १५. | श्री. रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार | २२ मार्च १९९५ ते २४ मार्च १९९५ |
| १६. | श्री. शंकरराव गेणुजी कोल्हे | २० ऑक्टोबर १९९९ ते २२ ऑक्टोबर १९९९ |
| १७. | श्री. गणपतराव अण्णासाहेब देशमुख | ४ नोव्हेंबर २००४ ते ६ नोव्हेंबर २००४ |
| १८. | श्री. गणपतराव अण्णासाहेब देशमुख | ९ नोव्हेंबर २००९ ते ११ नोव्हेंबर २००९ |
| १९. | श्री. जिवा पांडु गावित | १० नोव्हेंबर २०१४ ते १२ नोव्हेंबर २०१४ |
| २०. | श्री. कालिदास निळकंठ कोळंबकर | २६ नोव्हेंबर २०१९ ते २९ नोव्हेंबर २०१९ |
| २१. | श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | ३० नोव्हेंबर २०१९ ते ०१ डिसेंबर २०१९ |
| २२. | श्री. कालिदास निळकंठ कोळंबकर | ०६ डिसेंबर, २०२४ ते ०९ डिसेंबर, २०२४ |

# विधान परिषद सभागृह नेता / उप नेता पदी
# निवड करण्यात आलेल्या मंत्र्यांची यादी
## सन १९९५ ते सन २०२४ पर्यंत

| अ.क्र. | सभागृह नेते / उप नेते पदी नियुक्ती करण्यात आलेल्या मंत्री महोदयांची नावे | विधान परिषद सभागृहात घोषणा करण्यात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | श्री.अण्णा डांगे, मा. ग्रामविकास मंत्री | दिनांक २५ मार्च,१९९५ |
| ३ | श्री.छगन भुजबळ, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक २३ डिसेंबर,१९९९ |
| ४ | श्री.गोविंदराव आदिक, मा.कृषी मंत्री | दिनांक २६ मे,२००४ |
| ५ | श्री.आर.आर. पाटील, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक १८ डिसेंबर,२००४ |
| ६ | श्री.छगन भुजबळ, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक १५ डिसेंबर,२००८ |
| ७ | श्री.छगन भुजबळ, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक ११ नोव्हेंबर,२००९ |
| ८ | श्री.अजित पवार, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक ०१ डिसेंबर,२०१० |
| ९ | श्री.अजित पवार, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक १० डिसेंबर,२०१२ |
| १० | श्री.एकनाथ खडसे-पाटील, मा.महसूल मंत्री<br>**विधान परिषद सभागृह नेता** | दिनांक १० डिसेंबर,२०१४ |
| ११ | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील, मा.महसूल मंत्री<br>**विधान परिषद सभागृह उप नेता** | दिनांक १० डिसेंबर,२०१४ |
| १२ | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील,मा.महसूल मंत्री | दिनांक ०८ जुलै,२०१६ |
| १३ | श्री.सुभाष देसाई,मा.उद्योग मंत्री | दिनांक १६ डिसेंबर,२०१९ |
| १४ | श्री.अजित पवार, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक २४ फेब्रुवारी,२०२० |
| १५ | श्री.देवेंद्र फडणवीस, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक १७ ऑगस्ट,२०२२ |
| १६. | श्री.एकनाथ शिंदे, मा.उप मुख्यमंत्री | दिनांक ०९ डिसेंबर,२०२४ |

## महाराष्ट्र विधानपरिषद विरोधी पक्ष नेते
## (सन १९६० ते ऑगस्ट, २०२५)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| **१.** | श्री. माधव बयाजी गायकवाड | १४ जुलै १९६० ते २३ मार्च १९६२ |
| **२.** | श्री. वासुदेव बळवंत गोगटे | २७ जुलै १९६२ ते २८ ऑगस्ट १९६६ |
| **३.** | श्री. रामजीवन फालुराम चौधरी | २९ ऑगस्ट १९६६ ते २१ जुलै १९६७ |
| **४.** | श्री. उत्तमराव लक्ष्मणराव पाटील | २२ जुलै १९६७ ते २६ मार्च १९७८ |
| **५.** | श्री. अर्जूनराव श्रीपतराव कस्तुरे | २७ मार्च १९७८ ते १९ जुलै १९७८ |
| **६.** | श्री. राम कृष्णा मेघे | २८ जुलै १९७८ ते ९ जुलै १९८० |
| **७.** | प्रा. गणेश प्रभाकर प्रधान | ९ जुलै १९८० ते ७ सप्टेंबर १९८२ |
| **८.** | श्री. दत्तात्रय राघोबाजी मेघे | ७ सप्टेंबर १९८२ ते १६ नोव्हेंबर १९८४ |
| **९.** | श्री. देविदास मारोतीराव कराळे | १७ नोव्हेंबर १९८४ ते १२ डिसेंबर १९८६ |
| **१०.** | श्री. रामकृष्ण सुर्यभान गवई | १२ डिसेंबर १९८६ ते २० डिसेंबर १९८८ |
| **११.** | श्री. विठ्ठलराव गणपतराव हांडे | २३ डिसेंबर १९८८ ते २० डिसेंबर १९९० |
| **१२.** | श्री. रामकृष्ण सुर्यभान गवई | २० डिसेंबर १९९० ते १७ जुलै १९९१ |
| **१३.** | श्री. प्रमोद सच्चिदानंद नवलकर | १७ जुलै १९९१ ते २ जुलै १९९२ |
| **१४.** | श्री. रामचंद्र महादेव उर्फ अण्णा डांगे | २ जुलै १९९२ ते ३० जुलै १९९३ |
| **१५.** | श्री. सुधीर गजानन जोशी | ३० जुलै १९९३ ते ३० जुलै १९९४ |
| **१६.** | श्री. रामचंद्र महादेव उर्फ अण्णा डांगे | ३० जुलै १९९४ ते १८ मार्च १९९५ |
| **१७.** | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | २५ मार्च १९९५ ते २१ मे १९९६ |
| **१८.** | श्री. छगन चंद्रकांत भुजबळ | १० जुलै १९९६ ते १७ ऑक्टोबर १९९९ |
| **१९.** | श्री. नितीन जयराम गडकरी | २३ ऑक्टोबर १९९९ ते १९ जुलै २००२ |
| **२०.** | श्री. नितीन जयराम गडकरी | २० जुलै २००२ ते ११ एप्रिल २००५ |
| **२१.** | श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर | ११ एप्रिल २००५ ते २२ डिसेंबर २०११ |
| **२२.** | श्री. विनोद श्रीधर तावडे | २३ डिसेंबर २०११ ते २४ एप्रिल २०१४ |
| **२३.** | श्री. विनोद श्रीधर तावडे | ८ मे २०१४ ते २० ऑक्टोबर २०१४ |
| **२४.** | श्री. धनंजय पंडितराव मुंडे | २२ डिसेंबर २०१४ ते ७ जुलै २०१६ |
| **२५.** | श्री. धनंजय पंडितराव मुंडे | ८ जुलै २०१६ ते २४ ऑक्टोबर २०१९ |
| **२६.** | श्री. प्रविण यशवंत दरेकर | १६ डिसेंबर २०१९ ते ०७ जुलै, २०२२ |
| **२७.** | श्री. अंबादास एकनाथराव दानवे | ०९ ऑगस्ट, २०२२ ते २९ ऑगस्ट, २०२५ |

# महाराष्ट्र विधानसभा
## विरोधी पक्ष नेते
## (सन १९३७ ते नोव्हेंबर, २०२४)

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| | **मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)** | |
| १. | श्री. सर अली महंमद खान देहलवी | १९३७ ते १९३९ |
| २. | श्री. ए. ए. खान | १९४६ ते १९५२ |
| ३. | श्री. तुळशीदास सुभानराव जाधव | १९५२ ते १९५५ |
| | **द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)** | |
| १. | श्री. एस. एम. जोशी | १९५७ ते १९५८ |
| २. | श्री. उध्दवराव साहेबराव पाटील | १९५८ ते १९५९ |
| ३. | श्री. विठ्ठल देविदास देशपांडे | १९५९ ते १९६० |
| | **महाराष्ट्र विधानसभा ( ०१ मे, १९६० पासून)** | |
| १. | श्री. रामचंद्र धोंडिबा भंडारे | १९६० ते १९६२ |
| २. | श्री. कृष्णराव नारायणराव धुळप | १९६२ ते १९६७ |
| ३. | श्री. कृष्णराव नारायणराव धुळप | १९६७ ते १९७२ |
| ४. | श्री. दिनकर बाळू पाटील | ०७ एप्रिल १९७२ ते जुलै १९७७ |
| ५. | श्री. गणपतराव अण्णासाहेब देशमुख | १८ जुलै १९७७ ते फेब्रुवारी १९७८ |
| ६. | श्री. उत्तमराव लक्ष्मणराव पाटील | २८ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८ |
| ७. | श्रीमती प्रभा आनंद राव | फेब्रुवारी १९७९ ते १३ जुलै १९७९ |
| ८. | श्रीमती प्रतिभा देविसिंह पाटील | १६ जुलै १९७९ ते फेब्रुवारी १९८० |
| ९. | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | ०३ जुलै १९८० ते ०१ ऑगस्ट १९८१ |
| १०. | श्री. बबनराव दादाबा ढाकणे | १७ डिसेंबर १९८१ ते २४ डिसेंबर १९८२ |
| ११. | श्री. दिनकर बाळू पाटील | २४ डिसेंबर १९८२ ते १४ डिसेंबर १९८३ |
| १२. | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | १५ डिसेंबर १९८३ ते १३ जानेवारी १९८५ |
| १३. | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | २१ मार्च १९८५ ते १४ डिसेंबर १९८६ |
| १४. | श्री. निहाल अहमद | १४ डिसेंबर १९८६ ते २६ नोव्हेंबर १९८७ |
| १५. | ॲड. दत्ता नारायण पाटील | २७ नोव्हेंबर १९८७ ते २२ डिसेंबर १९८८ |
| १६. | श्रीमती मृणाल केशव गोरे | २३ डिसेंबर १९८८ ते १९ ऑक्टोबर १९८९ |
| १७. | ॲड. दत्ता नारायण पाटील | २० ऑक्टोबर १९८९ ते ३ मार्च १९९० |
| १८. | श्री. मनोहर गजानन जोशी | २२ मार्च १९९० ते १२ डिसेंबर १९९१ |
| १९. | श्री. गोपीनाथ पांडुरंग मुंडे | १२ डिसेंबर १९९१ ते १४ मार्च १९९५ |
| २०. | श्री. मधुकरराव काशिनाथ पिचड | २५ मार्च १९९५ ते १५ जुलै १९९९ |
| २१. | श्री. नारायण तातु राणे | २२ ऑक्टोबर १९९९ ते १९ ऑक्टोबर २००४ |
| २२. | श्री. नारायण तातु राणे | ०६ नोव्हेंबर २००४ ते १२ जुलै २००५ |
| २३. | श्री. रामदास गंगाराम कदम | ०१ ऑक्टोबर २००५ ते ०३ नोव्हेंबर २००९ |
| २४. | श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील | ११ नोव्हेंबर २००९ ते ०८ नोव्हेंबर २०१४ |
| २५. | श्री. एकनाथराव संभाजी शिंदे | १२ नोव्हेंबर २०१४ ते ०५ डिसेंबर २०१४ |
| २६. | श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील | २३ डिसेंबर २०१४ ते ०४ जून २०१९ |
| २७. | श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार | २४ जून २०१९ ते ०९ नोव्हेंबर २०१९ |

| | | |
|---|---|---|
| **२८.** | श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस | ०१ डिसेंबर, २०१९ ते ३० जून, २०२२ |
| **२९.** | श्री. अजित अनंतराव पवार | ०४ जुलै, २०२२ ते ३० जून, २०२३ |
| **३०.** | श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार | ०३ ऑगस्ट, २०२३ ते २६ नोव्हेंबर, २०२४ |

## विधानसभेमध्ये अर्थसंकल्प सादर केलेल्या मान्यवर मंत्रीमहोदयांचे नांव

| क्रमांक | अर्थसंकल्प वर्ष | अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक | मा.मंत्री महोदयांचे नाव |
|---|---|---|---|
| १) | ६०-६१ | ११ जुलै १९६० | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| २) | ६१-६२ | १५ फेब्रुवारी १९६१ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| ३) | ६२-६३ | २७ मार्च १९६२ | स.गो. बर्वे |
| ४) | ६३-६४ | २० फेब्रुवारी १९६३ | स.गो. बर्वे |
| ५) | ६४-६५ | १९ फेब्रुवारी १९६४ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| ६) | ६५-६६ | १७ फेब्रुवारी १९६५ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| ७) | चतुर्थ मंडळ | २२ नोव्हेंबर १९६५ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| ८) | ६६-६७ | २१ मार्च १९६६ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| ९) | ६७-६८ | २३ मार्च १९६७ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| १०) | ६७-६८ | १५ जून १९६७ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| | अतिरिक्त | | |
| ११) | ६८-६९ | १२ फेब्रुवारी १९६८ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| १२) | ६९-७० | १९ मार्च १९६९ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| १३) | ६९-७० | १७ जून १९६९ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| | अतिरिक्त | | |
| १४) | ७०-७१ | ११ मार्च १९७० | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| १५) | ७१-७२ | २४ मार्च १९७१ | बॅरिस्टर श्री शेषराव वानखेडे |
| १६) | ७२-७३ | २४ मार्च १९७२ | मधुकरराव चौधरी |
| १७) | ७२-७३ | १३ जून १९७२ | मधुकरराव चौधरी |
| | अतिरिक्त | | |
| १८) | ७३-७४ | १९ फेब्रुवारी १९७३ | मधुकरराव चौधरी |
| १९) | ७४-७५ | १८ फेब्रुवारी १९७४ | मधुकरराव चौधरी |
| २०) | ७५-७६ | १० मार्च १९७५ | मधुकरराव चौधरी |
| २१) | ७६-७७ | १२ मार्च १९७६ | यशवंतराव मोहिते |
| २२) | ७७-७८ | २२ मार्च १९७७ | यशवंतराव मोहिते |
| २३) | ७८-७९ | २१ मार्च १९७८ | यशवंतराव मोहिते |
| २४) | ७८-७९ | १२ जून १९७८ | यशवंतराव मोहिते |
| | अतिरिक्त | | |
| २५) | ७९-८० | ७ मार्च १९७९ | शंकरराव चव्हाण |
| २६) | ८०-८१ | ४ जुलै १९८० | रामराव आदिक |
| २७) | ८१-८२ | ९ मार्च १९८१ | रामराव आदिक |
| २८) | ८२-८३ | १३ मार्च १९८२ | डॉ. व्ही. सुब्रमण्यन |
| २९) | ८३-८४ | १४ मार्च १९८३ | सुशीलकुमार शिंदे |
| ३०) | ८४-८५ | १४ मार्च १९८४ | सुशीलकुमार शिंदे |
| ३१) | ८५-८६ | २५ मार्च १९८५ | सुशीलकुमार शिंदे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२) | ८५-८६ | २४ जून १९८५ | सुशीलकुमार शिंदे |
| | अतिरिक्त | | |
| ३३) | ८६-८७ | १७ मार्च १९८६ | सुशीलकुमार शिंदे |
| ३४) | ८६-८७ | १६ जून १९८६ | सुशीलकुमार शिंदे |
| | अतिरिक्त | | |
| ३५) | ८७-८८ | २५ मार्च १९८७ | सुशीलकुमार शिंदे |
| ३६) | ८८-८९ | १६ मार्च १९८८ | सुशीलकुमार शिंदे |
| ३७) | ८९-९० | १० मार्च १९८९ | सुशीलकुमार शिंदे |
| ३८) | ९०-९१ | २२ मार्च १९९० | रामराव आदिक |
| | अंतरिम | | |
| ३९) | ९०-९१ | २० जून १९९० | रामराव आदिक |
| | अतिरिक्त | | |
| ४०) | ९१-९२ | ७ मार्च १९९१ | रामराव आदिक |
| ४१) | ९२-९३ | १७ मार्च १९९२ | रामराव आदिक |
| ४२) | ९३-९४ | १६ मार्च १९९३ | रामराव आदिक |
| ४३) | ९४-९५ | १६ मार्च १९९४ | रामराव आदिक |
| ४४) | ९५-९६ | २५ मार्च १९९५ | हशु अडवाणी |
| | अंतरिम | | |
| ४५) | ९५-९६ | ६ जुलै १९९५ | गोपीनाथ मुंडे |
| | अतिरिक्त | | |
| ४६) | ९६-९७ | २१ मार्च १९९६ | एकनाथराव खडसे |
| | अंतरिम | | |
| ४७) | ९६-९७ | ९ जुलै १९९६ | एकनाथराव खडसे |
| | अतिरिक्त | | |
| ४८) | ९७-९८ | १८ मार्च १९९७ | एकनाथराव खडसे |
| ४९) | ९८-९९ | २३ मार्च १९९८ | महादेवराव शिवणकर |
| ५०) | ९९-२००० | २२ मार्च १९९९ | महादेवराव शिवणकर |
| ५१) | २०००-२००१ | २२ मार्च २००० | जयंत पाटील |
| ५२) | २००१-२००२ | २७ मार्च २००१ | जयंत पाटील |
| ५३) | २००२-२००३ | २२ मार्च २००२ | जयंत पाटील |
| ५४) | २००३-२००४ | २० मार्च २००३ | जयंत पाटील |
| ५५) | २००४-२००५ | १६ मार्च २००४ | जयंत पाटील |
| | अंतरिम | | |
| ५६) | २००४-२००५ | २७ मे २००४ | जयंत पाटील |
| | अतिरिक्त | | |
| ५७) | २००५-२००६ | २१ मार्च २००५ | जयंत पाटील |
| ५८) | २००६-२००७ | २१ मार्च २००६ | जयंत पाटील |
| ५९) | २००७-२००८ | २२ मार्च २००७ | जयंत पाटील |
| ६०) | २००८-२००९ | १९ मार्च २००८ | जयंत पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ६१) | २००९-२०१० अंतरिम | १७ मार्च २००९ | दिलीप वळसे-पाटील |
| ६२) | २००९-२०१० अतिरिक्त | ४ जून २००९ | दिलीप वळसे-पाटील |
| ६३) | २०१०-२०११ | २५ मार्च २०१० | सुनिल तटकरे |
| ६४) | २०११-२०१२ | २३ मार्च २०११ | अजित पवार |
| ६५) | २०१२-२०१३ | २६ मार्च २०१२ | अजित पवार |
| ६६) | २०१३-२०१४ | २० मार्च २०१३ | अजित पवार |
| ६७) | २०१४-२०१५ | २५ फेब्रुवारी २०१४ अंतरिम | अजित पवार |
| ६८) | २०१४-२०१५ | ५ जून २०१४ अतिरिक्त | अजित पवार |
| ६९) | २०१५-२०१६ | १८ मार्च, २०१५ | सुधीर मुनगंटीवार |
| ७०) | २०१६-२०१७ | १८ मार्च, २०१६ | सुधीर मुनगंटीवार |
| ७१) | २०१७-२०१८ | १८ मार्च, २०१७ | सुधीर मुनगंटीवार |
| ७२) | २०१८-२०१९ | ९ मार्च, २०१८ | सुधीर मुनगंटीवार |
| ७३) | २०१९-२०२० | २५ फेब्रुवारी, २०१९ अंतरिम | सुधीर मुनगंटीवार |
| ७४) | २०१९-२०२० | १८ जून, २०१९ अतिरिक्त | सुधीर मुनगंटीवार |
| ७५) | २०२०-२०२१ | ६ मार्च, २०२० | अजित पवार |
| ७६) | २०२१-२०२२ | ८ मार्च, २०२१ | अजित पवार |
| ७७) | २०२२-२०२३ | ११ मार्च, २०२२ | अजित पवार |
| ७८) | २०२३-२०२४ | ९ मार्च, २०२३ | देंवेंद्र फडणवीस |
| ७९) | २०२४-२०२५ | २७ फेब्रुवारी, २०२४ अंतरिम | अजित पवार |
| ८०) | २०२४-२०२५ | २८ जून २०२४ अतिरिक्त | अजित पवार |
| ८१) | २०२५-२०२६ | १० मार्च, २०२५ | अजित पवार |

# ॥ लोकसेवेचा लोकजागर ॥

“विधिमंडळ कामकाजाच्या रुपाने लोकशाही आपले संसदीय मार्गक्रमण करीत असताना त्या वाटचालीत अनेक उल्लेखनीय टप्पे येत असतात. अशा महत्त्वाच्या टप्प्याप्रसंगी विशेष प्रस्ताव, होणारी चर्चा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यावेळी पक्षीय भूमिकेच्या पलीकडे जात सन्माननीय सदस्यांनी मांडलेले विचार, अनुभव, अपेक्षा, चर्चेतील सहभाग हे आपल्या विधिमंडळ कामकाजातील लखलखते तेजोकण ठरतात. अशा तेजोकण ठरलेल्या मार्गदर्शक विचारांचे या पुस्तकातील संकलन आपला पुढील मार्ग आणखी प्रकाशमान करणारे ठरणार आहे. आपली राज्यघटना देशवासीयांतर्फे स्वीकारण्यात आली त्या सुवर्ण प्रसंगाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून प्रकाशित करण्यात येत असलेला हा ग्रंथ संसदीय लोकशाहीतील बलस्थानांविषयी आस्था बाळगणाऱ्या आपणा सर्वांसाठी तसेच अभ्यासक, पत्रकार आणि वाचक अशा सर्वांसाठी महत्वाचा संदर्भठेवा ठरेल असा विश्वास वाटतो...”